मं. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. १२५९

REFBK-0016674
REFBK-0016674

# स्वातंत्र्यवीर सावरकर



वि. स. वाळिंबे

# स्वातंत्र्यवीर सावरकर

वि. स. वाळिंबे

REFBK-0016674

मूल्य सहा रुपये

केसरी प्रकाशन
पुणे

© वि. स. वाळिंबे

प्रकाशक :

ज. श्री. टिळक
केसरी प्रकाशन
५६८ नारायण पेठ
पुणें २

प्रथमावृत्ति :
२८ मे १९६७

मुद्रक :

ज. श्री. टिळक
केसरी मुद्रणालय
५६८ नारायण पेठ
पुणें २

मुखपृष्ठ :

अनंत सालकर

हुतात्म्यांच्या

तेजस्वी स्मृतीस

म्यां असतां दिवस नसे व्यर्थ गमविला
दिवसास्ताचेंहि म्हणुनि दुःख ना मला

असें स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी स्वतःच्या जीवनासंबंधी एके ठिकाणीं म्हटलें आहे. २६ फेब्रुवारी १९६६ रोजीं त्यांच्या पार्थिव देहाचें अंत्यदर्शन घेत असतांना मला आठवण झाली ती या काव्यपंक्तींची. खरोखरच भारतमातेची उपासना हा सावरकरांच्या सर्व कार्यांचा आणि विचारांचा एकमेव ध्यासविषय होता. मातृभूमीवर अत्युत्कट भक्ति करणाऱ्या या राष्ट्रयोग्याचा हा ध्यास त्याच्या जीवनचरित्राच्या आधारें शब्दबद्ध करण्याचा प्रयत्न करावा असा संकल्प सावरकर-सदनांतून बाहेर पडतांना मी स्वतःशीं बोलून गेलों. श्री. जयंतराव टिळक यांच्या सक्रिय पुरस्कारामुळे तो सिद्धीस जात आहे.

सावरकरांचे विचार आणि कार्य यांचा धावता आढावा घेण्याचा हा एक प्रयत्न असून त्यासाठी प्रामुख्याने त्यांच्याच लिखाणाचा आणि भाषणांचा मी येथे आधार घेतला आहे.

— वि. स. वाळिंबे

# चार शब्द

स्वातंत्र्यवीर सावरकरांचें सारेंच जीवन ज्वलंत ज्वालामुखीसारखें होतें. चाफेकरांच्या फाशींतून स्फूर्ति घेऊन त्यांनी वयाच्या अवघ्या पंधराव्या वर्षी स्वातंत्र्याचें होमकुंड पेटविलें. त्या होमकुंडांत सहस्रावधि क्रांति-कारकांनी आपल्या जीवनाचा हविर्भाग अर्पण केला. असंख्य तरुणांच्या स्वातंत्र्योत्सुक मनांवर क्रांतिकारक विचारांचे घणाघात घातले आणि त्यांचीं मनें त्या विचारांनी पेटविलीं. 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळेना!' हा ठाम सिद्धान्त त्यांनी आपल्या मनाशीं बांधून ठेवलेला होता. त्यांनी हिंदुस्थानच्या प्राचीन उज्ज्वल इति-हासाचें पानन् पान चाळून पाहिलें होतें आणि 'धर्मासाठी मरावें' ही आपल्या मायभूमीची पूर्वपरंपरा सांगतांना 'मारितां मारितां घ्यावें राज्य आपुलें' हेंहि स्वातंत्र्यप्राप्तीचें अपरिहार्य साधन म्हणून सांगून ठेवलें होतें. देशसेवेचें हें क्रांतिकारी व्रत त्यांनी अंधपणानें मुळीच स्वीकारलेलें नव्हतें. इतिहासक्रमानें, तर्कशास्त्रानें आणि युक्तायुक्ततेचा विचार करूनच त्यांनी हें असिधारा-

व्रत स्वीकारलेलें होतें. 'जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें, बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें!' ही तर त्यांच्या क्रांतिकारी पक्षाची बहुमानाची बिरुदावलि होती.

हें सतीचें उग्र व्रत हातीं घेतांना त्यांनी मानवी जीवनाचीं आणि प्रामुख्यानें तारुण्याचीं सुखस्वप्नें पार भंग करून टाकलीं होतीं. देशभक्तीच्या पायरीवरून फासांवर चढणाऱ्या आणि चितेवर जळणाऱ्या देशभक्तांचा अत्युग्र मार्ग हाच त्यांचा मार्ग होता. क्रांतीचें शिक्षण घेतांना त्यांनी जणू मरणाचें बाळकडूच घेतलें होतें. हस्तगत झालेलें खंडित देशाचें स्वातंत्र्य मात्र त्यांना मुळींच अभिप्रेत नव्हतें. अखंड हिंदुस्थानचें स्वातंत्र्य हेंच त्यांचें जीवनस्वप्न होतें; आणि आज ना उद्यां अखंड हिंदुस्थानचें मानचित्र आपल्यासमोर उभें ठाकेलच ठाकेल, असा दृढ विश्वास त्यांनी जीवनाच्या अखेरच्या क्षणापर्यंत अंतःकरणाशीं बाळगलेला होता. आपल्या अखंड मातृभूमीच्या स्वातंत्र्याच्या प्रीतिस्तव त्यांनी बलिदान देण्याचा संकल्प सोडलेला होता. हुतात्म्यांचें बलिदान कधीच वाया जात नसतें. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या या भव्य आणि दिव्य जीवनाला श्री. वि. स. वाळिंबे यांनी आपल्या लेखणीनें टिपण्याचा प्रयत्न केला आहे. कितीहि लिहिलें आणि कसेंहि लिहिलें तरी अपुरें पडावें, असा हा महाकाव्याचा विषय. जन्म-मृत्यु आणि कांही मामुली घटना अशा अपुऱ्या चौकटींतील हा विषय थोडाच आहे? या ठिकाणीं सारेंच विशाल आहे, सारेंच अमर्याद आहे. परंतु एखाद्या झरोक्यांतून पडलेल्या एखाद्या सूर्यकिरणांत त्या सहस्ररश्मीचे सारे गुण ओतप्रोत भरलेले असावेत, असा प्रकार श्री. वाळिंबे यांच्या या चरित्र-लेखनांत घडलेला आहे. त्यांनी जें टिपलेलें आहे तें अचूक आहे. ज्वलंत ज्वालामुखींतील ज्वाला हस्तगत करतांना हात भाजावेत असा प्रकार या चरित्र-लेखनांत कोठेंहि घडलेला नाही. स्वातंत्र्यवीरांचें चरित्र श्री. वाळिंबे यांनी स्वतः नीट समजावून घेतलेलें आहे आणि म्हणूनच त्यांना तें चरित्र वाचकांना नेटक्या स्वरूपांत सांगतां आलेलें आहे. श्री. वाळिंबे यांचीहि ही मर्मग्राही दृष्टि केव्हाहि प्रशंसनीय अशीच मानावी लागेल.

अशा प्रकारच्या सर्वंकष पण नेटक्या चरित्राची फारच आवश्यकता होती. श्री. वाळिंबे, यांनी ती गरज चांगलीच भरून काढलेली आहे. त्यांनी प्रत्येक प्रकरणाला अर्थवाही असें शीर्षक दिलेलें आहे. या दृष्टीने ' व्यर्थ न हें बलिदान ' या पहिल्या शीर्षकापासून ' अंतिम योगसमाधि ' या अखेरच्या शीर्षकापर्यंत त्यांनी दिलेलें प्रत्येक शीर्षक अर्थवाही आणि अन्वर्थक वाटतें. श्री. वाळिंबे यांनी घडविलेलें स्वातंत्र्यवीरांचें हें धावतें दर्शन त्यांनी प्रत्येक प्रकरणाला दिलेल्या शीर्षकाप्रमाणेच मनोज्ञ वाटेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या अशा प्रेरक व नेटक्या चरित्राची भासणारी उणीव श्री. वाळिंबे यांनी पुरेपूर भरून काढलेली आहे.. त्या दृष्टीने या गतिमान कालांतील तरुण वाचकवर्ग श्री. वाळिंबे यांना धन्यवादच देईल.

अनलंकृत पण ओघवती भाषा, रचनाचातुर्य, विषय सुबोध करून मांडण्याची हातोटी इत्यादि लेखन-गुणांनी नटलेलें हें श्री. वाळिंबे यांचें पुस्तक 'केसरी' प्रकाशनाच्या वतीने प्रसिद्ध होत आहे. जें वैशिष्ट्यपूर्ण व कालोचित असेल तें वाचकांच्या हातीं द्यावें हा तर 'केसरी' प्रकाशनचा हेतूच आहे. हेंहि पुस्तक वाचकांना आवडेल असा विश्वास वाटतो.

**– ज. श्री. टिळक**

व्यर्थ न हें बलिदान ... १

मारितां मारितां मरेतो झुंजेन ! ... १२

क्रांतिकार्याची प्राणप्रतिष्ठा ... २३

विदेशी कपड्यांची होळी ... ४[illegible]

शत्रूच्या शिबिरांत ... ६२

अलौकिक सागरदिव्य ... ८६

अंदमानच्या अंधेरांत ... १०७

ते चरण पुन्हा दिसले ! ... १२७

समाजपुरुषा, जागृत हो ! ... १४३

राष्ट्रवादाचें पुरुषसूक्त ... १५९

सांगता आणि संकल्प ... १७६

अंतिम योगसमाधि ... २००

दीक्षानलात निजमातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळुनी अम्ही ठरलों कृतार्थ

होती. इंग्रजी शिक्षणामुळे आधुनिक जगाशीं ओळख घडल्याचा फायदा असा झाला की, इंग्रजांचें बळ कशांत आहे हें या वर्गाला समजून आलें. या बळाच्या जाणीवेमुळे ब्रिटिशांविरुद्ध सशस्त्र उठाव करून स्वातंत्र्य हस्तगत करण्याची कल्पना या इंग्रजी-शिक्षितांना हास्यास्पद वाटत होती. आपल्या देशबांधवां-वरील अन्याय ब्रिटिश सरकारला समजावून सांगितले तर हे अन्याय खचित दूर होतील असा या स्वदेशनिष्ठांचा समज होता. ब्रिटनचा लोकशाहीवर विश्वास असल्यामुळे कालांतराने ते भारताला समान दर्जाहि देईल अशी त्यांची धारणा असल्यामुळे त्यांचा अर्ज-विनंत्यांवर विशेष भर होता. साहजिकच या वर्गाच्या कार्याची व्याप्ति सभा-संमेलनांपुरतीच मर्यादित असे.

या दोन वर्गांप्रमाणेच त्या वेळच्या इंग्रजी-शिक्षितांमध्ये आणखीहि एक वर्ग होता व तो म्हणजे सशस्त्र क्रांतिनिष्ठांचा. हा वर्ग संख्येने सर्वांत लहान होता; परंतु स्वातंत्र्य गेल्यामुळे तो सदैव बेचैन असे. हताश होऊन स्वस्थ बसण्याऐवजी कांही तरी कृति केली पाहिजे असें या वर्गाला वाटत होतें. मोगली सत्तेशीं कणखर झुंज घेणाऱ्या मराठ्यांचा भीमपराक्रम या क्रांति-निष्ठांची प्रेरक शक्ति होता. १८५७ चा स्वातंत्र्यसंग्राम तर त्यांच्या डोळ्यां-समोरच घडलेला होता. या संग्रामाची स्मृति त्यांच्या मनांत ताजी असल्यामुळे सशस्त्र उठाव करून इंग्रजांना आपण येथून घालवून दिल्याशिवाय ते येथून हलणार नाहीत हें त्यांना पटलें होतें. या क्रांतिनिष्ठ गटाचे सूत्रधार होते वासुदेव बळवंत फडके. त्यांनी १८४८ मध्ये ब्रिटिश राजसत्तेविरुद्ध क्रांतीचें रणशिंग फुंकण्यासाठी रामोशांची सेना उभारली. आधीच रामोशी दुष्काळामुळे चिडून गेले होते. वासुदेव बळवंतांचें नेतृत्व लाभतांच त्यांनी सरकारी तिजोऱ्यांवर छापे घालण्याचें कार्य हातीं घेतलें. त्यांच्यांतील दौलत रामोशीला वासुदेव बळवंतांनी आपल्या सैन्याचे प्रमुख नेमलें. 'सरदार दौलतराव' असा ते त्याचा उल्लेख करीत. वासुदेव बळवंतांच्या तुकडीचा बंदोबस्त करण्याची कामगिरी मुंबई सरकारने मेजर डॅनिएलवर सोपविली. डॅनिएलला झुकांडी देण्यांत वासुदेव बळवंत आणि सरदार दौलतराव वाकबगार होते. शेवटीं वासुदेव बळवंतांना जो पकडून देईल त्याला इनाम दिलें जाईल असें सरकारला जाहीर करावें लागलें. लागलीच मुंबईचा गव्हर्नर सर रिचर्ड टेंपल याला पकडून आपल्या स्वाधीन करील त्याला आपणहि बक्षीस देऊं असें वासुदेव बळवंतांनी जाहीर

केलें. या पत्राखाली झोकदार स्वाक्षरी होती – ' पेशव्यांचा नवा मुख्य प्रधान वासुदेव बळवंत फडके. '

इनामाच्या आशेने गावकऱ्यांनी वासुदेव बळवंतांना पकडून मेजर डॅनिएलच्या स्वाधीन केलें. सरकारने त्यांच्यावर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरून जन्मठेपेची शिक्षा सुनावली. ही जन्मठेप भोगण्यासाठी वासुदेव बळवंतांची एडनला रवानगी करण्यांत आली. कारागृहांत अडकले असतांनाहि सरकारच्या हातावर तुरी देऊन पळून जाण्याचा धाडसी प्रयत्न करण्याचें त्यांनी ठरविलें. त्याप्रमाणे रात्रींच्या वेळीं कारागृहाचा तट चढून जाऊन त्यांनी बाहेरच्या मोकळ्या मैदानांत उडी टाकली व ते वाट दिसेल तिकडे जाऊं लागले. वासुदेव बळवंतांचें हें पलायन बंदीपालाला कळतांच त्याने घोडेस्वारांचें पथक त्यांचा शोध करण्यासाठी धाडलें. दिवसभरच्या श्रमाने थकून वासुदेव बळवंत दुपारच्या वेळीं एका झाडाखाली विश्रांति घेत असतांना घोडेस्वारांनी त्यांना पकडलें व पुन्हा कारागारांत आणून सोडलें. यानंतर त्यांचें शरीर खंगूं लागलें आणि ' अहो हिंदुस्थानवासी लोकहो, माझ्यामुळे तुम्हांला कांही सुद्धा लाभ झाला नाही. मी माझें उद्दिष्ट साध्य करूं शकलों नाही याबद्दल मला क्षमा करा ' असें म्हणत या क्रांतिवीराने १७ फेब्रुवारी १८८३ रोजीं परलोकीं प्रयाण केलें.

त्यांच्या पार्थिव देहावर कारागृहांतच अंत्यसंस्कार करण्यांत आला. वासुदेव बळवंतांची चिता विझली. तिची राख झाली. परंतु हुतात्म्यांचें बलिदान कधीच वाया जात नसतें. वासुदेव बळवंतांच्या राखेंतूनच, मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी सशस्त्र क्रांतीची ध्वजा उभारणारी आणि स्वदेशमुक्तीसाठी कोणतेंहि दिव्य करावयास आनंदाने तयार असणारी स्वातंत्र्यवीरांची अतिशय तेजस्वी परंपरा या देशांत उभी ठाकली. इंग्रजी सत्तेला हादरा देण्याचें सामर्थ्य असलेला अलौकिक नेता लवकरच या आंदोलनाचीं सूत्रें आपल्याकडे घेणार होता.

सोमवार दि. २८ मे १८८३ रोजीं रात्रीं दहा वाजतां नाशिक जिल्ह्यांतील भगूर या गावीं विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म झाला.

## २

# मारितां मारितां मरेतों झुंजेन

सावरकर घराणें मूळचें चिपळूण तालुक्यांतील गुहागरचें. गुहागरपासून सहा मैलांवर पालशेतजवळ सावरवाडी नांवाचें ठिकाण असून त्यावरूनच या घराण्याला सावरकर हें नांव पडलें असावें. पेशवाईच्या काळांत गुहागरचीं सावरकर आणि धोपावकर हीं दोन घराणीं देशावर आलीं. नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत या घराण्यांना भगूरजवळचे राहुरी हें गाव इनाम देण्यांत आलें. सावरकर व धोपावकर कुटुंबांवर पेशव्यांचा लोभ असल्यामुळे त्यांना समाजांत मानमान्यता होती आणि आर्थिक परिस्थितीहि चांगली होती. पेशवाई बुडाल्यानंतरहि सावरकर कुटुंबाला बाराशे रुपये वर्षासन मिळत असे. इंग्रज सरकारने इनाम कमिशनच्या शिफारशीनुसार हें वर्षासन बंद केलें. त्यानंतरहि कांही वर्षें एकोणतीस रुपये वर्षासनाचे मिळत असत. वेदशास्त्रसंपन्न म्हणूनहि सावरकर घराण्याचा लौकिक होता. या घराण्यांतील कोणी एकाने यज्ञदीक्षा घेतली होती व तेव्हापासून या घराण्याला दीक्षित ही पदवीहि प्राप्त झाली होती. या घराण्यांतील संस्कृत विद्येच्या उपासनेवर प्रसन्न होऊन पेशव्यांनी त्याना पालखीचा मानहि बहाल केला होता.

सावरकरांनी आपल्या आठवणींत या पालखीचा उल्लेख केला आहे. ‘ माझे वडील आणि काका लहानपणीं मला घराच्या माळ्यावरचें एक भलेभक्कम लाकूड दाखवून सांगत कीं, हें लाकूड त्या पूर्वार्जित पालखीचाच अवशेष आहे. ’

पेशवाईच्या काळांत भगूरला अनेक श्रीमंत कुटुंबें राहत असत. शेवटचे बाजीरावहि ब्रह्मावर्ताला जाण्यापूर्वी भगूरला येऊन गेल्याची आख्यायिका सांगण्यांत येते. या जुन्या स्मृतिशेष झालेलें भगूरचें रम्य कल्पनाचित्र सावरकरांनी आपल्या 'गोमांतक' काव्यांत रेखाटलें आहे –

परचक्रातें हें तैसें गाव भार्गव की धरी
म्लानता वर्तमानाची, गतगर्व मुखावरीं

या चरणांत वर्णन केलेलें 'भार्गव' म्हणजेच सावरकरांचें भगूर होय.

भगूरमधील श्रीमंत कुटुंबांपैकीच सावरकर कुटुंब हें एक असल्यामुळे सावरकरांच्या बालपणीं गावकरी त्यांचा 'छोटे जहागीरदार' म्हणून मोठ्या कौतुकाने उल्लेख करीत असत.

१८५७ चा स्वातंत्र्यरक्षणांचा शेवटचा प्रयत्न अयशस्वी झाल्यानंतर पेशव्यांच्या काळांत उदयास आलेल्या अनेक घराण्यांची वाताहात झाली. अशाहि परिस्थितींत महादेवराव आणि दामोदरपंत हे दोघे सावरकर बंधु आपली शेतजमीन व सावकारी टिकवून होते. महादेवराव ऊर्फ बापूकाका थोरले. त्यांना मूळबाळ नव्हतें. वडिलकीच्या नात्याने घरच्या मालमत्तेचे सर्व व्यवहार ते पाहत असत. सावरकर-बंधूंना एक बहीण होती व ती कोठूरच्या कानिटकरांकडे दिली होती. बापूकाका घरचें पाहत असल्यामुळे दामोदरपंत नाशिकला जाऊन मॅट्रिकपर्यंत शिकले. त्या वेळच्या पद्धतीप्रमाणे शिक्षण पूर्ण होण्यापूर्वीच ते विवाहबद्ध झाले होते. कोठूरच्या मनोहर घराण्यांतील राधाबाईबरोबर दामोदरपंतांचा विवाह झाला होता. भगूरसारख्या लहानशा गावांत मॅट्रिकपर्यंत शिकलेल्या दामोदरपंतांना बराच मान होता. दामोदरपंतांची पहिलीं दोन अपत्यें अल्पायुषी ठरल्यामुळे घरांतील वातावरण उदासीन होतें. त्यानंतर या दांपत्याला चार मुलें झालीं. गणेश, विनायक, माई आणि नारायण. मुलाबाळांनी घर भरल्यामुळे पुन्हा तें दांपत्य सुखासमाधानाने कालक्रमणा करूं लागलें; परंतु हें समाधान अल्पायुषी ठरलें. १८९२ मध्ये राधाबाईचा मृत्यु झाल्यानंतर सावरकर कुटुंबाच्या आर्थिक संपन्नतेस ओहोटी लागली. दामोदरपंत म्हणायचे, " आमच्या घरीं ती आली ती लक्ष्मी घेऊनच आली. ती जातांच लक्ष्मी निघून गेली. तीच माझ्या घरची लक्ष्मी होती. "

आईचा मृत्यु झाला तेव्हा हीं सारीं मुलें लहानच होतीं. थोरले गणेशपंत ऊर्फ बाबा तेरा वर्षांचे, विनायकराव ऊर्फ तात्या नऊ वर्षांचे, माई सहा वर्षांच्या आणि धाकटे नारायणराव ऊर्फ बाळ अवघे चार वर्षांचे. सावरकरांच्या नवव्या वर्षी आईचा मृत्यु झाल्यामुळे तिची रूपरेखा त्यांना आठवत नसे. परंतु तरीहि आईच्या लालनपालनाच्या ज्या पुसट आठवणी त्यांच्या मनांत जाग्या होत्या त्यांचें प्रतिबिंब 'गोमांतकां'तील रमेच्या भूमिकेंत पाहवयास सापडतें.

राधाबाईच्या मृत्यूनंतर आपल्या वडिलोपार्जित घरांत राहणेंहि दामोदरपंतांना असह्य वाटूं लागलें. आपल्या पत्नीच्या आग्रहाखातर जुन्या घराशेजारींच ते नवें घर बांधीत होते. तें त्यांनी लवकर पुरें केलें आणि आपल्या चार मुलांसह तेथे राहवयाला गेले. जुन्या घरांत बापूकाका एकटेच राहत होते. मुलें लहान असल्यामुळे दामोदरपंतांनीं दुसरें लग्न करावें असें त्यांच्या मित्रांनी सुचविलें. परंतु मुलांवरील मायेमुळे त्यांनी त्या सूचनेचा कधीच विचार केला नाही. राधाबाईच्या मृत्युपूर्वीच बाबा आणि तात्या यांच्या मुंजी होऊन ते शाळेंत जाऊं लागले होते. बाबांना इंग्रजी शिक्षणासाठी नाशिकला ठेवले होते. १८९६ मध्ये त्र्यंबकेश्वरच्या नानाराव फडक्यांच्या पुतणीशीं—येसूबाईशीं—बाबांचा विवाह करण्यांत झाला. दामोदरपंत अधूनमधून खटल्यांच्या कामासाठी नाशिकला राहूं लागले. त्यामुळे घराची सारी जबाबदारी येसूवहिनींवर पडली. तात्यांनी तिला लिहावाचावयास शिकविलें. याचा एक फायदा असा झाला कीं, पुढे बाबा आणि तात्या अंदमानमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगीत होते तेव्हा येसूवहिनींनी बालपणांतील आपल्या साऱ्या आठवणी लिहून काढल्या. येसूवहिनी मुळांतच हुषार आणि प्रेमळ होत्या. त्यांची पाठांतरशक्ति दांडगी असल्यानुळे लहान वयांतहि पन्नास-साठ गाणीं त्यांना मुखोद्गत होतीं. त्यांचा गळाहि गोड होता. येसूवहिनींच्या सहवासामुळे सावरकरांच्या कवित्वशक्तीला अधिकच बहर आला. ते गाणें रचीत आणि वहिनींकडून पाठ करुन घेत.

या काळांत सावरकरांनी आपल्या घराच्या माळ्यावर अडगळींत पडलेलीं अनेक पुस्तकें वाचून काढलीं. पोथ्या, इतिहास-ग्रंथ, नामवंत इंग्रजी लेखकांच्या कादंबऱ्या व कवितासंग्रह, जें कांही हातांत पडेल तें वाचण्याचा त्यांना छंद जडला होता. पुण्या-मुंबईहून येणाऱ्या 'केसरी', 'गुराखी', ' पुणें वैभव ", 'जगद्धितेच्छु' आदि वृत्तपत्रांचेंहि ते नियमित वाचन करीत. इतकेंच

नव्हे तर वाचन चालू असतांनाच महत्त्वाच्या मुद्द्यांचें ते टाचण करून ठेवीत. या टाचणाच्या वहीला 'सर्वसारसंग्रह' असें त्यांनी नांव दिलें होतें.

पोथ्या वाचीत असतांना आपणहि महाकाव्य लिहावें असें सावरकरांच्या मनाने घेतलें. महाकाव्य लिहिण्यासाठी त्यांनी काडेपेटीच्या आकाराची पोथी तयार करून घेतली. सावरकर घराण्यांत अष्टभूजादेवीची उपासना परंपरागत चालू असल्यामुळे सावरकरहि या देवीपुढे तासन् तास ध्यानस्थ बसूं लागले. देवीच्या भक्तांचा विजय वर्णन करण्यासाठी 'दुर्गादासविजय' नांवाचें महाकाव्य लिहिण्याचा विचार बळावतांच त्यांनी 'इलियड' या महाकाव्याचा इंग्रजी अनुवादहि अभ्यासिला. महाकाव्य लिहावयास बसल्यानंतर आपलें हस्ताक्षर डौलदार नाही असें आढळून आल्यामुळे त्यांनी हस्ताक्षर सुधारण्याचें ठरविलें व या बालकवीचा महाकाव्याचा बेत बाजूस पडला.

हातीं येईल तें पुस्तक वाचण्याच्या नादांत, जुन्या घराच्या माडीवर सापडलेलीं आरण्यकेंहि ते वाचूं लागले. घरांत आरण्यकें वाचल्यास घर अरण्यासारखें उजाड होतें अशी कल्पना प्रचलित असल्यामुळे आरण्यकें अरण्यांत जाऊन वाचावींत असा संकेत रूढ झाला होता. तात्या घरांत आरण्यकें वाचतो आहे हें पाहून दामोदरपंतांचें मन चरकलें. आपल्या मुलाचा संसार लौकिक दृष्टीने तरी सुखाचा होणार नाही अशी भीति त्यांच्या मनांत चमकून गेली.

आपल्या थोरल्या मुलाचें – बाबांचें लग्न केल्यानंतर आपल्या एकुलत्या एका मुलीचेंहि लग्न उरकण्याचें दामोदरपंतांनी ठरविलें. त्र्यंबकेश्वर येथील श्री. काळे यांच्या चिरंजिवांशीं माई विवाहबद्ध झाल्या. या सुमारास सावरकरांचें भगूरला मराठी पांचव्या इयत्तेपर्यंतचें शिक्षण पुरें झालें होतें. भगूरला पुढच्या शिक्षणाची सोय नसल्यामुळे ते वर्षभर घरींच होते. या काळांत त्यांनी पहिल्या दोन इंग्रजी इयत्तांचा अभ्यास पुरा केल्यामुळे पुढील शिक्षणासाठी दामोदरपंतांनी त्यांना नाशिकला धाडलें. तेथल्या शिवाजी शाळेने त्यांची परीक्षा घेऊन तिसऱ्या इयत्तेंत दाखल केलें. तींत एक महिन्यांतच सावरकरांनी तिसरीची परीक्षा देऊन चौथ्या इयत्तेंत पदार्पण केलें. नाशिकमधल्या या प्रारंभींच्या काळांत बाबा आणि तात्या कानड्या मारुतीपाशीं राहत होते. मुलांची प्रगति पाहण्यासाठी दामोदरपंत कधी कधी नाशिकला येत

तेव्हा आपलीं दोन्ही मुलें वाचनांत आणि व्यायामांत दंग होऊन गेलीं आहेत असें दृश्य त्यांच्या दृष्टीस पडे.

नाशिकच्या वास्तव्यांत सावरकरांच्या वाचनाचें आणि अभ्यासाचें क्षेत्र अधिकच विस्तृत झालें. एकदा सुट्टीनिमित्त ते भगूरला गेले असतांना 'Short History of the world या प्रसिद्ध इतिहास-ग्रंथाचा पहिला भाग त्यांच्या हातीं पडला. या ग्रंथांतील भाषा जराशी अवघड असल्यामुळे सावरकर आपल्या वडिलांच्या – अण्णांच्या – मदतीने तो वाचूं लागले. या ग्रंथांत अरबस्तानच्या प्रारंभ-कालांतील इतिहास निवेदन केला होता. लागलीच सावरकरांच्या मनांत शंका आली की, त्यापूर्वीच्या काळांतील परिस्थिति कशी होती हें कोठे वाचावयास मिळणार ? या जुन्या पुस्तकाचें पहिलें पान हरवलेलें आहे ही गोष्ट खरी असली, तरी पहिलें पान असणारा कोणताहि इतिहास-ग्रंथ त्याच्या पूर्वीच्या काळाबद्दल माहिती देत नसल्याने वास्तव अर्थाने दुसऱ्या पानापासूनच सुरू होतो. त्या वेळीं त्यांच्या मनांत आलेला हा विचार पुढे 'सप्तर्षि' काव्यांत शब्दबद्ध झाला आहे –

इतिहासाचें पहिलें पान न मिळणें कधी पाहायातें
'आरंभ तुझा दुसऱ्या पानापासूनि' शाप हा यानें

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची निबंधमाला, पेशव्यांची बखर, छत्रपतींची बखर या पुस्तकांची तर सावरकरांनी या काळांत पारायणें केलीं. ओव्या, फटके, आरत्या यांची रचना करणें हाहि त्यांचा एक छंद होता. ओव्या तर अगदी सहज बोलावें तसें ते रचीत असत असें येसूवहिनींनी लिहून ठेवलें आहे. येसूवहिनींकडे येणाऱ्या समवयस्क मुलींनी किंवा प्रौढ स्त्रियांनी एखादी ओवी म्हणून दाखविली की, सावरकर लगेच नवी ओवी रचून त्यांना म्हणून दाखवीत. माजघरांतील झोपाळ्यावर बसून अशी एखादी स्पर्धा सुरू झाली की, 'पहिली माझी ओवी'पासून सावरकरांचें जें आख्यान सुरू होई तें 'दोनशेवी माझी ओवी'पर्यंत चालत असे.

धन्य कुलामधि धनी सवाई भाग्य धन्यची रायाचें
सेवक हातीं यशस्वि असती पुण्य किती त्या पायांचें

हा श्रीमंत सवाई माधवरावांच्या रंगपंचमीचें वर्णन करणारा फटका त्यांनी आपल्या अकराव्या वर्षी लिहिला.

इतिहासाचा आणि प्रचलित राजकीय परिस्थितीचा अभ्यास करूं लागल्यामुळे सावरकरांचें मन मुसलमानांच्या धार्मिक दांडगाईविरुद्ध आणि इंग्रजांच्या राजकीय अत्याचारांविरुद्ध खवळून उठूं लागे. शाळा सुटली की, सावरकर आणि त्यांचे बालमित्र छड्या हातांत घेऊन त्या तलवारीसारख्या फिरवूं लागत. या तलवारींचे वार रस्त्याच्या बाजूला उगवणाऱ्या काटेरी झाडांना सहन करावें लागत. कारण या झाडांना जी पिवळीं फुलें येत त्यांना विलायती असें संबोधिलें जात असे. १८९४–९५ च्या सुमारास पुणें-मुंबई आदि ठिकाणीं मुसलमानांच्या दंगलीची लाट उसळली. मुसलमानांच्या या अरेरावीपुढे हिंदु कां नमतें घेतात हें त्यांना कळेनासें होई व हिंदूंमधील ही पराभूत मनोवृत्ति आपण दूर केली पाहिजे असें ते ठरवीत. निदान भगूर-पुरती ही पराभूत मनोवृत्ति दूर झाली पाहिजे या विचाराने त्यांनी एकदा आपल्या सवंगड्यांसह गावांतल्या ओसाड मशिदीवर हल्ला चढविला. मुसलमान विद्यार्थ्यांना ही बातमी कळतांच त्यांनी मारामारीची तयारी केली. परंतु सावरकरांनी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चाकू, रुळ, टाचण्या आदि आयुधें जमविलीं आहेत हें पाहून त्या मुसलमान मुलांनी तेथून पळ काढला. या अपमानाचा सूड घेण्यासाठी सावरकरांना एकटें गाठून त्यांच्या तोंडांत बोंबील-मासा कोंबण्याचा त्यांनी बेत केला होता; परंतु तो कांही सिद्धीला जाऊं शकला नाही.

मशिदीवरील हल्ल्याच्या वेळीं मुसलमान मुलें येतांच आपल्या कांही सवंगड्यांनी पळ काढला हें पाहून या बालचमूंत शिस्त आणि शौर्य निर्माण करण्यासाठी सैनिकी शाळा उभारण्याचें सावरकरांनी ठरविलें. या सैनिकी शाळेंत निंबोळ्यांच्या गोळ्यांचा वापर करून तोफगोळ्यांच्या वापराचें शिक्षण देण्यास प्रारंभ झाला. सैनिकी शिक्षण म्हटलें की, घोड्यावर बसणें आलेंच. म्हणून सावरकरांनी आपल्या एका मित्राच्या घरचें तट्टू आणून घोड्यावर बसण्याचा सराव सुरू केला. कधी कधी बाबाहि या सैनिकी शाळेंत येत असत. त्यांना धनुष्यबाणाची आवड असे. बाणाने नेम धरून त्यांनी कण्हेरीचें फूल उडवि-ल्याचें पाहतांच सावरकर बाबांपासून नेमबाजीचे धडे गिरवूं लागले. वडिलां-जवळ जुन्या तलवारी व एक बंदूक होती. त्यांना कळणार नाही अशा बेताने सावरकर ती बंदूक माळावर नेत व नेमबाजीचा सराव करीत. जुन्या

घराच्या तिसऱ्या मजल्यावरच्या एका बळदांत सावरकरांनी आपलें हें शस्त्रागार जमविलें होतें.

स्वातंत्र्य मिळविण्याचा प्रयत्न करणाऱ्याने केवळ स्वदेशी वस्तुच वापरण्याचा निश्चय केला पाहिजे हा विचार आपल्या मित्रांमध्ये लोकप्रिय व्हावा म्हणून सावरकरांनी स्वदेशीचा फटका लिहिला व तो पुण्याच्या 'जगद्धितेच्छु' पत्राने प्रसिद्ध केला –

काश्मीराच्या शाली त्यजुनी अलपाकाला का भुलतां
मलमल त्यजुनी वलवल चित्तीं हलहलकें पट कां वरितां

असा सवाल करून –

द्रव्यखाणि हीं खोरें घेऊनि परकी पोरें खणतीं रे
एकचित्त या करूं गड्यांनो, वित्त जिंकुं तें पुनरपि रे

असा निर्धार या फटक्यांत सावरकरांनी व्यक्त केला आहे.

घरांतील कुलस्वामिनी देवीपुढे ध्यानस्थ बसले असतांना सावरकरांना कधी कधी आश्चर्यकारक अनुभव येत. देवीने आपल्याला प्रत्यक्ष दर्शन दिलें आहे किंवा तिची दिव्य वाणी आपल्या कानांवर पडत आहे असा त्यांना भास होई. यासंबंधाचा एक अनुभव त्यांनी आपल्या आठवणींत नमूद करून ठेवला आहे. 'एकदा वहिनींच्या कानांतील मोत्याचा दागिना माझ्या हातून हरवला. सर्वांनी धुंड-धुंड धुंडाळला. मीं शेवटीं वडिलांच्या धाकें देवीपाशीं धरणें घेतलें तों माझ्या मिटलेल्या डोळ्यांस तो दागिना फडताळाखाली अंधारांत पडलेला स्पष्ट दिसला. तिथे तर आम्ही दहादा पाहूनहि सापडला नव्हता. पण पुन्हा मला आवाज ऐकूं आला – 'ऊठ, पुन्हा पाहा.' मी उठलों आणि वहिनीला घेऊन त्या फडताळाखाली गेलों तों अचूक हात टाकतांच दागिना सापडला.'

परंतु सावरकरांची ही भावुक मनःस्थितीहि फार काळ टिकली नाही. कारण लहानपणापासून त्यांची भावना जशी उत्कट होती तशीच बुद्धीहि तर्ककर्कश होती. त्यामुळे ते जसजसे विचार करूं लागले तसतशी पोथ्यापुराणांवरील अशंकनीय श्रद्धा डळमळूं लागली. विशेषतः सोवळेंओवळें, धर्माच्या नांवाखाली बोकाळलेल्या रूढी, साधुसंन्याशांचे चमत्कार इत्यादि विषयांबाबत

घरांत वा मित्रमंडळांत चर्चा निघे तेव्हा सावरकरांची तर्ककर्कश बुद्धि अधिकच प्रखर रूप धारण करी.

आपल्या विचारांशीं समरस होईल असा मित्र त्यांना नाशिकच्या वास्तव्यांतील पहिल्या पांच-सहा महिन्यांत मिळालाच नाही. त्यामुळे शाळेच्या वेळेव्यतिरिक्त सावरकर प्रामुख्याने वाचनांतच गढलेले असावयाचे. त्यांची बहुश्रुतता पाहून शिक्षकवर्गाचा त्यांच्यावर लोभ जडला. भगूरला असतांना सावरकरांनी जे कांही लेख लिहिले होते ते त्यांनी आपल्या शिक्षकांना दाखविले. हें लिखाण शिक्षकांना इतकें आवडलें की, त्यांनी ते प्रसिद्धीसाठी 'नाशिक वैभव'चे संपादक श्री. खरे व 'लोकसेवा'चे संपादक श्री. अ. वा. बर्वे यांच्याकडे धाडलें. या संपादकद्वयांनीहि लेखांची प्रशंसा करून तें आपल्या पत्रांत प्रसिद्ध केले. या उत्तेजनामुळे प्रोत्साहित होऊन सावरकरांनी 'हिंदु संस्कृतीचा गौरव' या मथळ्याचा लेख लिहून तो 'नाशिक वैभव'कडे धाडला. हा लेख चौदा-पंधरा वर्षं वयाच्या मुलाने खचितच लिहिला नसेल अशी श्री. खरे यांना शंका आल्यामुळे त्यांनी तो लेख सावरकरांच्या शिक्षकांना दाखविला. हा लेख सावरकरांनीच लिहिला आहे अशी शिक्षकांनी ग्वाही दिल्यानंतर श्री. खरे यांनी तो लेख 'नाशिक वैभव'चा अग्रलेख म्हणून दोन भागांत प्रसिद्ध केला.

लोकमान्य टिळकांनी पुण्यास सुरू केलेले गणेशोत्सव, शिवजयंत्युत्सव नाशिकलाहि सुरू करावेत यासाठी 'लोकसेवा' पत्राचे श्री. बर्वे यांची धडपड सुरू होती. या उत्सवासाठी श्री. बर्वे जीं पदें करीत ती सावरकरांना ऐकवीत असत.

लेखनाप्रमाणेच सावरकरांनी वक्तृत्वकलेचाहि अभ्यास करावा असें श्री. बर्वे यांनी सुचविलें. इतकेंच नव्हे, तर नाशिकच्या वक्तृत्वोत्तेजक सभेच्या वतीने होणाऱ्या स्पर्धेत भाग घेण्याचा त्यांना आग्रह केला. स्पर्धेत भाग घ्यावयाचा असल्यामुळे सावरकरांनी या भाषणाची पूर्वतयारी चांगली केली होती. त्यांचें हें पहिलेंवहिलें वक्तृत्वहि इतकें सरस झालें की, या स्पर्धेत त्यांचा पहिला क्रमांक आला. या वेळेस हें भाषण सावरकरांनी कोणाकडून तरी लिहून घेतलें असावें असा परीक्षकांना संशय आला. परंतु आपल्या या विद्यार्थ्याने स्वतःच तें लिहून काढून मुखोद्गत केलें असें शिक्षकांनी सांगितल्यावर परीक्षकांना विशेष आनंद झाला व सावरकरांच्या असामान्य बुद्धि-

मत्तेची त्यांनी मनमोकळी प्रशंसा केली. काव्यशक्तीप्रमाणेच वक्तृत्वकला ही देखील सावरकरांना नैसर्गिक देणगी लाभली आहे हें या प्रसंगाने दिसून आलें. या नैसर्गिक देणगीला अधिक सखोल व धारदार करण्यासाठी वाचन व मनन यांची सतत जोड दिली पाहिजे असें सावरकरांनी ठरविलें. या कार्यासाठी नाशिक येथे कोणाचेंच मार्गदर्शन मिळण्याची शक्यता नसल्यामुळे त्यांनी स्वतःच स्वतःचे गुरु होण्याचें ठरविलें. मेकॉलेच्या भाषणांचें पुस्तक आणून त्यांतील उतारे पाठ करण्यास त्यांनी प्रारंभ केला. डिमॉस्थेनीस, सिसरो, शेरिडन यांच्या चरित्रांचाहि अभ्यास चालूच होता. महाभारतांतील श्रीकृष्णाची सभापर्वांतील आणि कर्णपर्वांतील भाषणें ते वारंवार वाचीत असत, स्वतःलाच म्हणवून दाखवीत असत.

सावरकरांच्या वक्तृत्वावर प्रसन्न होऊन नाशिकचे शीघ्रकवि श्री. बळवंत खंडुजी पारख यांनी त्यांची पाठ थोपटली. पारखांचा व दामोदरपंतांचा परिचय होता. त्यामुळे आपल्या मित्राच्या मुलाचें हें कर्तृत्व पाहून तर ते विशेषच खूष झाले. पारख लोकमान्य टिळकांचे अनुयायी होते. त्यामुळे सावरकरांच्या मनांतील देशसेवेचा अंकुर विकसित व्हावयास हवा या हेतूने ते सावरकरांना म्हणत, “ सावरकर नाव यथार्थ कर बरं का ! ज्याचा कर आपल्या पडत्या राष्ट्रास सावरतो असा सावरकर हो ! ” शब्दांवर कोट्या करणें हें पारख यांचें वैशिष्ट्य होतें.

नाशिकला राहत असतांना सावरकरांना देवी आल्यामुळे बरेच दिवस भगूरला राहवें लागलें. या सुमारास पुण्या-मुंबईला प्लेगचा कहर उसळला होता. त्याचीं ‘केसरी’मध्ये येणारीं वर्णनं सावरकर अण्णांना वाचून दाखवीत असत. प्लेगने दूषित झालेलीं घरें शुद्ध करण्यासाठी ब्रिटिश सैनिक पुण्याच्या नागरिकांवर जो अत्याचार करीत त्यांचें वृत्तान्त वाचून सावरकरांचें मन संतप्त होई.

ब्रिटिश सैनिकांच्या या अत्याचारांचा सूड घेण्यासाठी पुण्याच्या चाफे-कर बंधूंनी रँड आणि आयर्स्ट या इंग्रज अधिकाऱ्यांचा २२ जून १८९७ रोजीं गणेशखिंडीच्या रस्त्यावर गोळ्या झाडून खून केला. त्या दिवशीं व्हिक्टोरिया राणीच्या राज्यारोहणाच्या हिरकमहोत्सवानिमित्त गव्हर्मेंट हाऊसवर एक

समारंभ आयोजित करण्यांत आला होता व त्याला हजर राहण्यासाठी रँड आणि आयर्स्ट चालले असतांना त्यांचा खून करण्यांत आला म्हणून मुंबई सरकार फारच चिडलें. सरकारी दडपशाहीला आणखीनच ऊत आला. या खुनाची संधि साधून सरकारने लोकमान्य टिळकांवर राजद्रोहाच्या आरोपाखाली खटला भरला. यामुळे जनमत सरकारविरुद्ध अधिकच बिथरलें. रँड आणि आयर्स्ट यांच्या खुनींना पकडून देणाऱ्यास सरकारने बक्षीस जाहीर केलें तरी देखील त्यांचा पत्ता लागेना. शेवटीं द्रवीड बंधूंनी चाफेकरांचा ठाव-ठिकाणा सांगितला आणि त्या माहितीच्या आधारें पोलिसांनी दामोदरपंत चाफेकरांना पकडलें. यानंतरहि दामोदरपंतांचे दुसरे बंधु बाळकृष्णपंत सरकारच्या हातीं सापडण्यास बराच अवधि लागला. द्रविड बंधूंनी माहिती पुरविल्यामुळे आपले बंधु सरकारच्या हातीं लागले म्हणून चिडलेले तिसरे बंधु वासुदेवराव व त्यांचे एक स्नेही महादेव विनायक रानडे यांनी द्रविड बंधूंचा खून केला.

८ ऑक्टोबर १८९७ रोजी मुंबईचे प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेट हॅमिल्टन यांच्यापुढे दामोदरपंत चाफेकरांवरील खटला सुरू झाला. दामोदरपंतांनी आपल्या जबाबांत रँडचा खून केल्याची कबुली दिली. आपल्या जबाबांत ते म्हणाले, "पुण्यांत प्लेगच्या अमदानींत सोजीर लोकांनी केलेले अत्याचार पाहून मला त्वेष आला व त्यांचा मुख्य अधिकारी रँडसाहेब याला मारून सूड उगविण्याचा मींच निश्चय केला. ज्युबिलीच्या दिवशीं मी व माझा भाऊ बाळकृष्ण असे गणेशखिंड रस्त्यावर गेलों. मीं रँडसाहेबाला गोळी घातली व बाळकृष्णाने लेफ्टनंट आयर्स्ट याला मारलें." नोव्हेंबरच्या अखेरीस हा खटला सेशन्स न्यायालयाकडे वर्ग करण्यांत आला व तेथे दामोदरपंतांना फाशींची शिक्षा सुनावण्यांत आली. या वेळीं लोकमान्य टिळकहि येरवड्याच्या कारागृहांत शिक्षा भोगीत होते. त्यांच्याजवळची गीतेची प्रत मागून घेऊन व ती हातांत ठेवून दामोदरपंत १८ एप्रिल १८९८ रोजीं फाशीं गेले. यानंतर बाळकृष्णपंत व वासुदेवराव चाफेकर आणि महादेवराव रानडे यांनाहि फाशीं देण्यांत आलें.

दामोदरपंत फाशीं गेल्याची बातमी सावरकरांनी वाचली तेव्हा त्यांच्या डोळ्यांतून आसवें वाहूं लागलीं. त्यांचें स्वातंत्र्योत्सुक क्रांतिप्रवण मन विचारूं लागलें, 'चाफेकर, रानडे आपल्या स्वदेशाच्या छळाचा सूड घेऊन फासावर

चढले. त्यांच्या प्राणज्योतींनी जातां जातां चेतविलेली ही शत्रुंजय वृत्ति यज्ञकुंडांत समिधेमागून समिधा टाकून अशीच भडकवीत नेणें असेल आणि ती शेवटीं कोण्या प्रचंड स्वातंत्र्ययुद्धाच्या महायज्ञांत परिणमवणें असेल तर त्याचें दायित्व माझ्यापुरतें मजवरहि पडत नाही का? चाफेकरांचें कार्य कुणी तरी चालविलें पाहिजे ना? तर मग ते मींच कां चालवूं नये? तो होम मींहि कां करूं नये?'

सावरकर देवघरांत गेले. त्या लहानशा देवघरांत सुगंधी फुलांचा दरवळ पसरलेला होता. तुपाचा मंद दिवा तेवत होता. उदबत्त्यांचा उन्मादकारक नागमोडी धूर फुलांच्या सुवासांत विणला जात होता. ध्यानस्थ बसलेल्या सावरकरांनी डोळे उघडले, देवीच्या पायांवर हात ठेवले आणि त्या महिषासुरमर्दिनीला साक्ष ठेवून शपथेचा उच्चार केला – "माझ्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी सशस्त्र युद्धांत शत्रूस मारीन; चाफेकरांसारखा मरेन किंवा शिवाजीसारखा विजयी होऊन माझ्या मातृभूमीच्या मस्तकीं स्वराज्याचा राज्याभिषेक करीन. यापुढे मी माझ्या देशाचें स्वातंत्र्य परत मिळविण्यासाठी सशस्त्र क्रांतीचा केतु उभारून मारितां मारितां मरेतों झुंजेन!"

सावरकरांचें वय या वेळीं अवघें पंधरा वर्षांचें होतें.

# ३

# क्रांतिकार्याची प्राणप्रतिष्ठा

भगूरच्या जुन्या घरांतल्या देवघरांत अष्टभुजेला साक्षी ठेवून स्वातंत्र्यसंपादनासाठी अहर्निश झुंजण्याची शपथ घेतल्यामुळे सावरकरांचें जीवनध्येय निश्चित झालें. त्या वेळीं शपथेची लहानशी ठिणगी उडाली – पुढे भविष्यकाळांत तिचा केवढा भडका होणार होता ! सावरकरांच्याच शब्दांत सांगावयाचें तर 'एक भयंकर वादळचें वादळ त्या पहिल्या विजेंत तळपत सामावलेलें होतें.' पुढे हिंदुस्थानभर गाजलेल्या 'अभिनव भारत' या क्रांतिकारी संघटनेचें मूळ बीज या शपथेंत होतें. सावरकरांच्या मनावर त्या दिवशीं जो संस्कार झाला तो कधीहि पुसला गेला नाही.

या प्रतिज्ञापूर्तीसाठी सावरकरांना स्वतःची मानसिक, बौद्धिक आणि शारीरिक अशी त्रिविध तयारी करावयाची होती. त्याचप्रमाणे हें प्रचंड क्रांतिकार्य एकाकी अवस्थेंत पार पाडलें जाण्यासारखें नव्हतें. लोकसमुदाय आपल्या पाठीमागे येणार नाही हें त्यांना माहीत होतें. त्याबरोबरच या प्रतिज्ञेशीं समरस होणारे, तिच्या पूर्तीसाठी आत्मबलिदानास सिद्ध असणारे मूठभर का होईना, पण निर्धारी मनाचे सहकारी त्यांना हवे होते. हे सहकारी कसे मिळवावयाचे, त्यांना स्वातंत्र्यसंगरांत सहभागी होण्याची दीक्षा कशी द्यावयाची, परकी सत्तेशीं कोठे व कशी झुंज करावयाची या विचारांत सावरकर बुडून गेले. आता विचार, आचार आणि उच्चार एकच होता. स्वातंत्र्यप्राप्तीसाठी झुंज !

आपल्या या अंगीकृत कार्यांत, जिच्या साक्षीने आपण हें व्रत घेतलें त्या देवीने आपल्याला यश द्यावें म्हणून सावरकरांनी तिची करुणा भाकणाऱ्या ओव्यांची रचना केली. पुढे सहा-सात वर्षांनी, घराच्या झडतींत हें लिखाण पुरावा म्हणून वापरण्यास सरकारला उपलब्ध होऊं नये म्हणून जाळण्यांत आलें.

लोकमान्य टिळकांचें कार्य आणि चाफेकर-रानडे यांचें हौतात्म्य यांची मनीमानसीं पूजा बांधणाऱ्या सावरकरांनी त्या कार्याच्या आणि हौतात्म्याच्या गौरवार्थ एक एकांकिकाहि लिहिली. ती बसविण्याची जबाबदारी भगूरच्या राणू शिंप्याने उचलली. परंतु राणूला गावच्या पाटलाने धमकीवजा इशारा दिल्यामुळे त्या एकांकिकेचा प्रयोग कांही होऊं शकला नाही.

या सुमारास सावरकरांनी लिहिलेला चाफेकर आणि रानडे यांच्यावरील फटका महाराष्ट्रांत खूप गाजला. सरकारी भीतिमुळे तो छापून देण्यास कोणताहि छापखानेवाला तयार झाला नाही. परंतु तरीहि त्याची लोकप्रियता मुळीच कमी झाली नाही. उलट स्वदेशप्रेमाने एकत्र येणाऱ्या तरुणांच्या मेळाव्यांत तो गाइला जाऊं लागला. १८९९ मध्ये रचलेला हा फटका सावरकर-वाङ्मयावरील बंदी उठल्यानंतर १९४६ मध्ये प्रथम प्रसिद्ध करण्यांत आला. तोंपर्यंत जवळ जवळ पन्नास वर्षें तो केवळ गायिला जात होता, अनेकांच्या पाठांतरांत होता.

या फटक्यांत, गोऱ्या सैनिकांच्या उन्मत्त अरेरावीविरुद्ध निषेधाचा झंझावात उठविणाऱ्या लोकमान्य टिळकांचा पुढील शब्दांत गौरव करण्यांत आला आहे –

देशवीर महाराज शूरश्री टिळक तयांचें क्षेम असो
खरा हिरा हा कसासि उतरे काळभीति 'बाळा'सि नसो
सायंकाळीं सवे चमकतीं बहुत काजवे आणि शशी
तशाच न्यायें टिळक-सुधाकर ठरत तोलतां इतरांशीं

दामोदरपंत फासावर चढत आहेत या प्रसंगाला सावरकरांनी विवाह-समारंभाची उपमा दिली आहे –

न्यायाविशचि जोशी उत्तम, उदयमुहूर्ता योग्य गणीं
सत्य देशहित वऱ्हाड जमलें कीर्ति-नीति या वऱ्हाडणीं

टिळक-गजानन नमस्कारिला फास-बोहले मग पुरलें
स्मरलें गीतामंत्र 'दामु'ने मुक्ति नवरिला हो वरिलें

आणि शेवटीं त्यांनी आपल्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला आहे –

कार्य सोडूनी अपुरें पडला झुंजत, खंतीं नको – पुढे
कार्या चालवुं गिरवुनि तुमच्या पराक्रमाचे आम्ही धडे

चाफेकर प्रकरणामुळे टिळकांवर भरण्यांत आलेल्या खटल्याचा निकाल लागून त्यांना शिक्षा झाली. ही शिक्षा भोगून टिळक सुटले तेव्हा त्यांचा गौरव करण्यासाठी सावरकरांनी श्रीटिळकस्तवन ही कविता लिहिली –

लाजविलेंसि निज यशें धवलें त्वां सत्य हिमनगा तिलका
संतत जनपदसेवार्पित तूं तुज कवि न गान गातिल का

सावरकरांनी ही कविता आर्या वृत्तांत रचली असून मोरोपंतांच्या काव्याच्या अभ्यासाचा त्यांच्या शैलीवर किती परिणाम झाला होता हें यावरून दिसून येतें. खुद्द सावरकरांनीहि या कवितेच्या अखेरीस मोरोपंतांकडून आर्या रचण्याची आपल्याला स्फूर्ति झाल्याचा उल्लेख केला आहे –

गातो आर्याते श्रीमयुरेशस्फूर्तिने 'विनायक' तो
नायक तो जगताचा तिलकस्तवनास मुदित आयकतो

७ सप्टेंबर १८९८ रोजीं सावरकरांनी ही कविता रचली असावी असा अंदाज आहे. कारण त्याच सुमारास ही कविता पुण्याच्या 'जगद्धितेच्छु' पत्रांत प्रसिद्ध झाली होती.

आपल्या आईच्या श्राद्धदिनानिमित्त सावरकरांनी जे 'मातृशोकापालाष्टक' लिहिलें त्यांतहि त्यांचा देशसेवेचा निर्धार व्यक्त झाला होता –

वंदन पदकमलीं तव नंदन करि गीत गातां आर्यांत
मंद न धी होऊं, झिजो चंदनसा देह देशकार्यांत

आपल्या मुलाच्या विचारांना असे क्रांतिकारक वळण लागल्याचें पाहून दामोदरपंतांना त्याच्या भवितव्याबद्दल चिंता वाटूं लागली. एके दिवशीं रात्रींच्या वेळीं ते घरीं परतले तेव्हा आपला हा मुलगा अदृश्य देखाव्याकडे टक लावून बसला आहे, त्याच्या डोळ्यांतून आसवें वाहत आहेत आणि तो कविता गुणगुणत आहे हें पाहतांच दामोदरपंतांनी त्याच्या हातांतला कागद घेऊन

पाहिलें, तर तो चाफेकरांचा पोवाडा होता. तो पोवाडा .वाचून आपल्या मुलाच्या कवित्वशक्तीचें व उत्कट देशभक्तीचें त्यांना कौतुक वाटलें. तरीहि पित्याच्या प्रेमाने त्यांनी सांगितलें, 'तात्या, अजून तुझें वय कोवळें, तुझा देह मूळचाच सुकुमार. हे विचार आणि मार्ग फार भयंकर आणि कठोर. तुझ्या कोमल मेंदूला फार ताण बसेल अशा या विषयांचा ध्यास धरूं नकोस. फेडलेंस तर तूंच आपल्या घराचें पांग फेडशील. तेव्हा स्वतःच्या जिवास अशा संकटांत ढकलूं नकोस. तुला अजून याचे परिणाम किती भयंकर असतात याची कल्पना नाही. तूं इतर कविता रच, शिक, मोटा हो. मग काय तें कर." या प्रसंगानंतर घरांतील सगळेजण झोपल्यानंतर सावरकरांनी लेखन-वाचन करण्याचा परिपाठ सुरू केला.

येसूवहिनींचे बंधु अण्णा यांच्या लग्नासाठी बाबा आणि तात्या कर्जतला गेले होते. कांही कारणाने लग्न आठवड्याभराने पुढे गेल्यामुळे ते दोघेजण पुण्याला जाऊन आले. पुण्याला पोचतांच आपण शनिवारवाडा केव्हा पाहतों असें सावरकरांना झालें होतें. पुण्यांत पाऊल ठेवतांच, मोगली सत्तेला धूळ चारलेल्या शिवशाहीच्या आणि पेशवाईच्या काळांतील अनेक रोमहर्षक घटनांच्या आठवणींनी त्यांच्या मनांत गर्दी केली होती. अण्णांच्या लग्नासाठी मंडळी कर्जतला परतली तेव्हा शेजारच्या दहीवली येथे दोन-चार दिवसांतच वक्तृत्वस्पर्धा होणार असल्याचें त्यांना कळलें. सावरकरांनी या स्पर्धेत भाग घेतला व नाशिकप्रमाणेच येथेहि त्यांचा पहिला क्रमांक आला परंतु पारितोषिक वाटतांना अध्यक्ष म्हणाले, "या मुलाने हें भाषण कोणाकडून तरी लिहून घेतलें असावें. कारण या वयांत एवढें भाषावैभव व विचारवैभव त्याचें स्वतःचें नसावें असें मला वाटतें." लागलीच सावरकर उठले व म्हणाले, "मी स्वतः हें भाषण लिहिल्याचें घरच्या मंडळींनी पाहिलें आहे. हें भाषण मींच लिहिलें आहे असें मी पुनः पुन्हा सांगत असतांनाहि केवळ माझें वय लहान आहे हीच शंका पुनः पुन्हा व्यक्त करण्यांत येत आहे. ही माझी यःकश्चित् गोष्ट राहो. पण याच न्यायाने चालायचें तर ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी लिहिली हेंहि साफ खोटेंच म्हणावें लागेल."

या वक्तृत्वस्पर्धेत भाग घेतल्यामुळे सावरकरांचा मोठाच फायदा झाला. त्यांना मिळालेल्या पहिल्या पारितोषिकानुसार शिवरामपंत परांजपे यांचें 'काळ'

पत्र त्यांना वर्षभर विनामूल्य पाठविण्यांत येणार होतें. 'काळ'मधील परांजपे यांचें तेजस्वी लिखाण वाचावयास मिळाल्यामुळे सावरकरांच्या मूळच्या क्रांतिकारक प्रवृत्तीला अधिकच धार चढूं लागली. काळकर्त्यांच्या लिखाणाचा आपल्यावर किती परिणाम झाला हें सांगतांना त्यांनी असें म्हटलें आहे की, 'माझ्या मतावर नसला तरी माझ्या ज्ञानावर, भाषेवर, संस्कृतीवर आणि उत्साहावर 'काळा'च्या अखंड परिशीलनाचा फार मोठा परिणाम झाला. इतका की, जर मला माझ्या क्रांतिप्रवण जीवनाच्या स्फूर्तीचें गुरुपद कोणास तरी देणेंच असेल तर तें मी 'काळा'सच देऊं शकेन. पण तेंहि केवळ क्रांतिकारक स्फूर्तीचें, कृतीचें नव्हे. कारण क्रांतिकारक संघटनेंत आणि संगरांत मलाच माझे पुढारी व्हावें लागलें.'

शिवरामपंत परांजपे यांच्या 'काळा'प्रमाणेच लोकमान्य टिळक यांच्या 'केसरी'चाहि सावरकरांच्या राजकीय विचारांच्या घडणींत मोठा वांटा होता. त्यांनी असें म्हटलें आहे की, 'क्रांतिकारक धोरणाची गोष्ट वगळली असतां 'काळा'इतकीच नव्हे, तर 'काळा'हूनहि अनेकपटींनी अधिक अशी 'केसरी'-वरहि माझी आबाल्यभक्ति होती. 'काळा'प्रमाणेच 'केसरी'च्याहि अनेक लेखांचीं मी पारायणें करीत आलों. लोकमान्यांच्या अत्यंत कृतज्ञ आणि अत्यंत निष्ठावंत अनुयायांहूनहि मी कृतज्ञ आणि निष्ठावंत होतों आणि राहिलों याचें हेंच निरुत्तर प्रत्यंतर आहे की, मी आणि माझ्या सहकाऱ्यांनी लोकमान्यांचें सर्व राजकारण आणि उपदेश आचरण्याची पराकाष्ठा करून त्यांच्या कार्यक्षेत्राच्या पुढच्या प्रत्यक्ष रणक्षेत्रांत उतरण्याची हाव धरली. लोकमान्य खड्गाची मूठ होते. आम्ही क्रांतिकारक त्यांचें पातें होतों. खड्गाची मूठ ही जरी पातें होऊं शकत नाही, तरी पातें हें मुठीच्याच आधारावर रणकंदनीं लवलवतें. पातें मुठीच्याच मनोगताचें पारणें फेडीत असतें.'

कर्जत येथील विवाह-समारंभ आटोपून नाशिकला परतल्यानंतर सावरकर-बंधूंनी आपलें बिऱ्हाड तिळभांडेश्वराच्या गल्लींत दातारांच्या शेजारीं थाटलें. बाबांचे वर्गबंधु रामभाऊ दातार यांच्यामुळे दातार कुटुंबाचा व सावरकर कुटुंबाचा चांगलाच परिचय झाला होता आणि अल्पावधींतच या दोन्ही कुटुंबांत घरोब्याचे संबंध निर्माण झाले होते. सावरकरांचा अभ्यास नियमित होत असे. परंतु बाबांचें

मात्र अभ्यासात मुळीच लक्ष नव्हतें. दोन परस्परविरुद्ध प्रवृत्ति त्यांना दोन उलट दिशांनी खेचीत होत्या. त्यांना एक गोसावी-बैराग्यांची संगत तरी आवडे, नाही तर नाटक मंडळीची. परंतु हळूहळू वेदांताच्या वाचनाने नाटकांतलें त्यांचें लक्ष उडालें आणि साधुसंन्यासी यांच्या सहवासांत राहून योगविद्या शिकण्याचा विचार बळावला. त्या काळीं विवेकानंदांचें नांव साऱ्या भारतांत गाजत होतें. अमेरिकेंतील सर्वधर्म परिषद आपल्या विद्वत्तेने गाजवून ते नुकतेच मादेशीं परतले होते. योगशास्त्राचें शिक्षण देण्याठी ते लवकरच मायावती येथे आश्रम उघडणार आहेत ही बातमी बाबांच्या कानांवर जातांच त्यांनी मायावतीस पळून जाण्याचें ठरविलें. परंतु त्या सुमारास सावरकर कुटुंबावर प्लेगची आपत्ति कोसळल्यामुळे बाबांना आपला तो बेत रद्द करावा लागला.

१८९९ मध्ये प्लेगने नाशिकमध्ये हाहाकार उडवून दिला होता. त्यामुळे सावरकर बंधु व दातार कुटुंब भगूरला राहवयास गेले. परंतु भगूरहि प्लेगच्या साथींतून वांचूं शकलें नाही. सावरकरांच्या वडिलांना – अण्णांना प्लेगने गाठलें. या वेळीं त्यांचा थोरला मुलगा होता वीस वर्षांचा व सर्वांत धाकटा अकरा वर्षांचा. 'माझ्यामागे या चिल्यापिल्यांचें कसें होईल' हें अण्णांचे शब्द ऐकतांच चारी भावंडांच्या डोळ्यांत पाणी तरारलें. माई वडिलांच्या समाचारासाठी मुद्दाम त्र्यंबकेश्वराहून आल्या होत्या. माई आणि त्यांचे यजमान येईपर्यंत अण्णांची शुद्ध हरपली होती. अंगांतील तापामुळे त्यांना सारखी तहान लागावयाची व डॉक्टरांनी तर त्यांना पाणी देऊं नका असें मुलांना बजावलें होतें. त्यामुळे अण्णांच्या जिवाची तगमग होई. बळेंच उठण्याचा प्रयत्न करीत व ते मुलांच्या अंगावर पाणी देण्यासाठी ओरडूं लागत. अण्णांची अवस्था अशी चिंताजनक झाली असतांनाच धाकट्या बाळला प्लेग झाला. मग बाबा, तात्या आणि येसूवहिनी यांच्या कष्टांना सीमाच उरली नाही. त्यांतहि बाबा, कमालीचे सोशिक. केवळ कष्ट करण्यासाठीच आपला जन्म आहे अशा भावनेने कर्मयोग्यासारखे राबत. अण्णांचें जास्त झालें तेव्हा कोठूरचे मामाहि समाचाराला आले होते. अण्णांचें निधन झाल्यानंतर ते बाबांना म्हणाले, "आता हें लहान मूल – बाळ – क्षणाचें सोबती. आता त्याला दैवाच्या स्वाधीन करून तुम्ही तिघं एकदम कोठूरला आजोळीं चला. निघा."

पण बाबांनी मामांना स्पष्ट नकार दिला, "मामा, बाळच्या जिवांत जीव आहे तोंवर मी येथून हलणार नाही." प्लेगचा रोगी घरांत असतांना गावांत राहणेंहि शक्य नव्हतें. त्यामुळे अण्णांचा अंत्यविधि करतांच बाबांनी सर्वांना घेऊन घर सोडलें आणि गावाबाहेच्या झोपडींत राहवयास गेले. झोपडी दोन दिवसांत तयार करण्यांत आली. हे दोन दिवस त्यांनी झोपडी-लगतच्या देवळांत काढले. सोबतीसाठी म्हणून बापूकाकाहि मुलांच्यांत येऊन राहिले; पण त्यांनाहि तेथें येतांच प्लेग झाला. बापूकाका महादेवाच्या देवळांत वायु होऊन बेभान, तर धाकटा बाळ गणपतीच्या देवळांत आसन्नमरण स्थितींत. बाबा, तात्या आणि येसूवहिनी परस्परांना धीर देत अहोरात्र रुग्णाइतांची सेवा-शुश्रुषा करण्यांत गढून गेले होते. आता यानंतर कोणाची पाळी हा विचार प्रत्येकाला सतावत होता.

नाशिकला प्लेग आला असतांना बाबांनी रामभाऊ दातार यांच्या कुटुंबीयांना भगूरला आपल्या घरीं आणलें होतें. त्यामुळे आता सावरकर कुटुंबावर आपत्ति आली असतांना आपणहि मदत केली पाहिजे या भावनेने रामभाऊ दातार भगूरला गेले व सावरकर कुटुंबीयांना नाशिकला आपल्या घरीं आणलें. परंतु प्लेगचे रोगी आपल्या घरीं आणल्याबद्दल गल्लींतील रहिवासी दातारांना दूषणें देऊं लागले. परंतु रामभाऊंनी या विरोधाला जुमानलें नाही. बापूकाका तर दुसऱ्याच दिवशीं वारले. वडिलांना जाऊन दहा दिवस व्हावयाच्या आंतच चुलत्याचाहि आधार तुटला. बापूकाकांच्या निधनानंतर दातारांच्या घरीं प्लेगचे रोगी आहेत ही बातमी सरकारी अधिकाऱ्यांपासून लपून राहणें शक्यच नव्हतें. म्हणून बाबांनी बाळला सरकारी दवाखान्यांत दाखल केलें. परंतु त्या रुग्णालयांत बाळला एकटे ठेवण्यास त्यांचा विरोध होता. त्यामुळे ते बाळच्या शुश्रुषेसाठी प्लेगच्या रुग्णालयांत राहवयास गेले. रोग्याच्या शुश्रुषेसाठी रुग्णालयांत राहणाऱ्यांना रोग गावांत फैलावूं नये म्हणून रुग्णालयाच्या बाहेर जाऊ दिलें जात नसे. त्यामुळे सावरकर, बाबांच्या जेवणाचा डबा घेऊन रुग्णालयाच्या दारापाशीं जात व तो घेण्यासाठी बाबा दारापर्यंत येत. एके दिवशीं डबा घेण्यासाठी बाबा आले नाहीत हें पाहतांच सावरकरांचें मन चरकलें. रुग्णालयाचा द्वारपाल म्हणाला, "डबा माझ्याजवळ द्या, तुमच्या थोरल्या बंधूंनाहि ताप भरला

आहे." हे शब्द ऐकतांच पायाखालची जमीन दुभंगते आहे काय, असे सावरकरांना झालें. त्यांच्या डोळ्यांपुढे उभी राहिली ती येसूवहिनींची निरांजनाप्रमाणे तेवत असणारी शांत अन् प्रसन्न मूर्ति. बाबांना ताप भरला आहे ही गोष्ट त्यांनी वहिनींपासून लपवून ठेवली. सुदैवाची गोष्ट अशी की, बाबांचा प्लेग विकोपाला गेला नाही. दोन-तीन महिन्यांत बाळहि बरा झाला. बाबा आणि बाळ घरीं आले तेव्हा नाशिकचा प्लेगहि थंडावला होता. अण्णांच्या व बापूकाकांच्या मृत्यूमुळे भगूरला जाण्यांत कांहीच स्वारस्य नव्हतें. त्यामुळे सर्वांनीच यापुढे नाशिकला राहवें असें ठरलें. भगूर आता कायमचें सुटलें होतें.

रामभाऊ दातारांच्या वाड्यांतच बाबांनी बिऱ्हाड थाटलें. दातारांच्या घराजवळच वर्तकांचें घर होतें. वर्तकांचीं मुलें रामभाऊ दातारांचे मित्र होते. त्यामुळे सावरकर, दातार व वर्तक यांच्याध्ये सौहार्दाचे संबंध निर्माण होण्यास फारसा वेळ लागला नाही. बाबा, तात्या आणि बाळ हे सावरकर बंधु, रामभाऊ व वामनशास्त्री हे दातार बंधु व नाना, त्रिबक आणि श्रीधर हे वर्तक बंधु अशा आठ तरुणांचा आपोआपच एक गट निर्माण झाला. दातार आणि वर्तक यांच्या घरांमध्ये धोंडभट विश्वामित्रे यांचें घर होतें. धोंडभटांच्या घराच्या मागच्या पडक्या भागांत एक मोलकरीण आपल्या पांगळ्या मुलासह राहत असे. आबा दरेकर हें त्या पांगळ्या मुलाचें नांव. गुडघ्यापासूनचे पाय लुळे पडल्यामुळे हात पुढे ठेवून बेडकासारख्या उड्या मारीत आबा तिळभांडेश्वराच्या गल्लींत संचार करीत असत. अक्षरहि वाचतां येत नसलेले आबा नाटकें लिहायचे, कविता करायचे. आबांची पदें रामभाऊ दातार म्हणत तेव्हा आबा तबल्याची साथ करायचे. रामभाऊंमुळे आबांचा आणि सावरकरांचा लवकरच परिचय झाला. आबांच्या प्रतिभेवर सावरकरांच्या देशसेवेचे संस्कार होतांच त्यांच्या कवित्वशक्तीला निराळेंच तेज चढलें. अल्पावधींतच ते स्वातंत्र्यकवि गोविंद म्हणून ओळखले जाऊं लागले.

वर्तकांच्या वाड्यांत राहत असतांनाच म्हसकर आणि पागे या तरुणांचाहि सावरकरांशीं परिचय झाला. देशासाठी कांही तरी करावें हा विचार म्हसकर आणि पागे यांच्या डोक्यांत घोळत असतांनाच सावरकरांचा परिचय झाल्यामुळे या विचारांना निश्चित स्वरूप प्राप्त होऊं लागलें. या विचारविनिमयांतूनच

सशस्त्र क्रांतीसाठी गुप्त मंडळ स्थापन करण्याचा विचार पक्का झाला व १८९९ च्या नोव्हेंबरच्या शेवटच्या आठवड्यांत सावरकर, पागे व म्हसकर या तिघांनी 'राष्ट्रभक्तसमूह' या गुप्त क्रांतिकारक संस्थेची प्राणप्रतिष्ठा केली. या गुप्त संस्थेच्या कार्याकडे अधिकाधिक तरुण आकृष्ट करण्यासाठी एक उघड संस्थाहि स्थापन करावयास हवी असें ठरलें. या उघड संस्थेंत दाखल होणाऱ्या तरुणांपैकी जे क्रांतिकार्यास सिद्ध होतील त्यांना 'राष्ट्रभक्तसमुहां'त समाविष्ट केले जाणार होते. त्यानुसार १ जानेवारी १९०० या दिवशीं मित्रमेळा या संघटनेचा जन्म झाला. दातार बंधु, वर्तक बंधु, आबा दरेकर, गणपत न्हावी आदि आपल्या मित्रांना सावरकरांनी 'मित्रमेळ्या'चे सदस्य केले. बाबा सावरकरहि प्रारंभापासून मित्रमेळ्याच्या दर शनिवारीं व रविवारीं भरणाऱ्या बैठकींना हजर राहूं लागले. या साप्ताहिक बैठकींमध्ये प्रचलित राजकीय परिस्थितीबाबत चर्चा होई. इतर परतंत्र राष्ट्रांनी स्वातंत्र्य कसें संपादन केलें याचा इतिहास सावरकर कथन करीत असत. आपल्या सहकाऱ्यांचीं मनें सशस्त्र क्रांतीसाठी सिद्ध करणें हा सावरकरांच्या इतिहासकथनाचा मूलभूत हेतु असे.

सावरकर सांगत असत – 'परवशतेचा विषारी वृक्ष सुधारण्याचा एकच मार्ग आहे नि तो म्हणजे त्याचें आमूलात् उन्मूलन. त्या वृक्षाच्या मुळाशींच आपलें खरें भांडण आहे. इंग्रजांचा इकडे येणारा अधिकारीवर्गच नव्हे, तर इंग्रजी सत्ताच उलथून पाडली पाहिजे आणि ही गोष्ट स्पष्टपणें, ज्वालाग्राही भाषेंत व बंदीगृहाच्या छपरावरून नि फाशीच्या खांबावरून गर्जत राहिल्यावांचून लोकांची हीन आणि क्लीब उपेक्षावृत्ति मावळून ते केव्हाहि उठावयाचे नाहीत. कोणत्या तरी अत्युच्च, अतिभव्य, अतिदिव्य ध्येयाला, त्याभोवतीं त्यागाची आणि पराक्रमाची जाज्वल्य प्रभावळ पेटवून ती लोकांच्या दृष्टीसमोर धरल्यावांचून, लोकांचीं मनें आकर्षित होणार नाहीत. वैयक्तिक संसाराच्या चाकोरींतून तें तसल्या कोणा बेभान दिव्य ऊर्मिवांचून बाहेर येणार नाहीत. महान् ध्येयाच्या प्रेमाने उन्मत्त झाल्यावांचून ते उसळून उठावयाचे नाहीत. आज हा धाडसी प्रारंभ केला, तर समजा, शंभर वर्षांनी ते महान् कार्य यशस्वी होईल. परंतु आरंभ उद्यावर लोटला, जितका उशीर कराल तितकेंच यशहि दुरावत जाईल. वास्तव, निर्भेळ आणि संपूर्ण

राजकीय स्वातंत्र्य हेंच आमचें ध्येय होय. या राजकीय परवशतेचा बट्टा नांवापुरता देखील, आमचा नाण्यावर देखील राहतां कामा नये. तें स्वदेश-स्वातंत्र्य हेंच आमचें ध्येय. तें स्वदेशस्वातंत्र्य हाच आमचा राजकीय धर्म. तें स्वदेशस्वातंत्र्य हीच आमची राष्ट्रीय देवता. आमचा राजकीय देव, आमची ऐहिक उन्नति, आमचा मोक्ष आणि ध्येय जर संपूर्ण राजकीय स्वातंत्र्य हें होय तर अर्थातच त्याची साधना सशस्त्र क्रांतीवांचून दुसरी कोणती असणार ?"

प्रारंभींच्या काळांत मित्रमेळ्याच्या बैठकींच्या जागा बदलत असत. परंतु तसें करणें गैरसोयीचें आहे हें आढळून आल्यानंतर या बैठकी नियमित-पणें आबा दरेकरांच्या माडीवर भरूं लागल्या. 'मूळ नगरकरांची आळी हीच अरुंद, त्यांत तिळभाडेश्वराची पट्टी म्हणजे एक बोळ, त्यांत विश्वामित्र्यांचें घर म्हणजे पाहूं गेलें तरी न सापडणारे सुयार आणि त्याच्या अंधेऱ्या भागांतील एका तिरप्या कोपऱ्याच्या लहान दारांतून बरेच आंत गेल्यावर लागणाऱ्या जिन्यावरची आबांची माडी म्हणजे एक बीळ. जणू काय कोण्या गुप्त कटासाठीच आधीपासून शास्त्रोक्त पद्धतीनें ती बांधविली होती' असें या जागेचें सावर-करांनी वर्णन केलें आहे. या माडीवर भिंतीच्या मधोमध शिवाजीमहाराजांचें चित्र लावण्यांत आलेलें होतें. त्याच्या शेजारीं 'टाइम्स'मध्ये छापून आलेलीं नानासाहेब पेशवे, तात्या टोपे आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई या १८५७ च्या स्वातंत्र्यसंग्रामांतील योद्ध्यांचीं छायाचित्रें. या छायाचित्रांना लागूनच वासुदेव बळवंतांचें तैलचित्र. दुसऱ्या बाजूला लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांचीं छायाचित्रें लावण्यांत आलीं होतीं. चाफेकर बंधु व रानडे यांचीं छाया-चित्रेंहि मुद्दाम मिळवून त्या माडीवर लावण्यांत आलीं. मित्रमेळ्याच्या वतीने सावरकरांनी शिवजयंति-उत्सव सुरू केला. या उत्सवांत बोलतांना ते म्हणाले, "शिवाजी-उत्सव करण्याचा अधिकार त्यांनाच आहे की, जे शिवाजीसारखेच आपल्या या परतंत्र मातृभूमीला स्वतंत्र करण्यासाठी झुंजण्यास सिद्ध आहेत. 'इंग्रजी राज्याविरुद्ध आमचें कांही म्हणणें नाही, केवळ आम्हांस पेन्शनें हवींत, पोटभर खावयास हवें, सवलती हव्यात' इतकीच ज्यांची महत्वाकांक्षा आहे त्या पारतंत्र्याशीं राजनिष्ठ असणाऱ्यांना पावला तर ब्रह्मावर्ताचा शेवटचा बाजीराव पावेल, रायगडचा शिवाजी नव्हे. शिवाजी स्वातंत्र्याची देवता आहे.

आम्ही तरी आज तिचें अशासाठी आवाहन करीत आहोंत की, ती आमच्या अंगांत संचारून आम्हांस त्या स्वदेश-स्वातंत्र्याच्या कार्यक्षेत्रीं झुंजण्याची आणि जिंकण्याची शक्ति यावी. परिस्थितीनुरूप साधनें बदलतील, पण साध्य तेंच. बाण बदलतील, पण लक्ष्य तेंच. स्वातंत्र्यलक्ष्मी की जय."

शिवजयंती-उत्सवाप्रमाणेच मित्रमेळयाच्या वतीने नाशिकमध्ये गणेशोत्सवहि सुरू करण्यांत आला. या गणेशोत्सवांतहि राजकीय भाषणांवरच भर दिला जाई. लोकमान्य टिळकांनी हे दोन्ही उत्सव पुण्याला ज्या हेतूने सुरू केले तो हेतु प्रारंभीं नाशिकपुरता तरी सफल करावा यावर सावरकरांचा कटाक्ष असे आणि म्हणूनच गणेशोत्सवांतील व्याख्यात्याचें व्याख्यान आटोपलें की, ते तेथे उपस्थित असलेल्या तरुणांकडून 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय'चा गजर करवून घेत.

लोकमान्य टिळकांचें व्याही श्री. गंगाधरपंत केतकर नाशिकला राहत असत. तेथील सार्वजनिक जीवनांत त्यांचा पुढाकार असे. त्यामुळे त्यांच्या निधनानंतर 'केतकर सभागृह' बांधण्याचें नाशिकच्या नागरिकांनी ठरविलें. या इमारतीची कोनशिला बसविण्यासाठी पुण्याहून न्यायमूर्ति महादेव गोविंद रानडे यांना पाचारण करण्यांत आलें होतें. या समारंभासाठी सावरकरांनी स्वागतगीत तयार करावें अशी सूचना पुढे आली. या गीतांत त्यांनी कै. केतकर यांना श्रद्धांजलि वाहून या निमित्ताने न्यायमूर्ति रानडे यांच्या दर्शनाचा योग आल्याबद्दल आनंद व्यक्त केला आहे –

ज्यांच्या सत्कृति थोर थोर करिती त्यांची वसावी स्मृती
साधूंची करितात्ति यास्तव जनीं हीं स्मारकें सन्मती
आजी नाशिकवासि केतकर जो दैवें अम्हां लाभला
त्याचा स्मारकयोग हा जुळतसे आनंद झाला भला
बांधावें नगरगृहासि ठरलें पाया तया घालण्या
येती जस्टिस रानडे झडकरी मानोनि बोलावण्या
थोरांचे स्तवनार्थ थोरचि भले, आम्हांसि या कारणें
झालें दर्शन साधुचे, फिटतसे या चक्षुंचे पारणें

सावरकरांचें हें सार्वजनिक कार्य चालू असतांनाहि त्यांच्या शालेय शिक्षणांत खंड पडला नव्हता. शिवाजी शाळेंत चौथीच्या पुढचे वर्ग नसल्यामुळे

ते १८९९ च्या शेवटी नाशिक हायस्कूलमध्ये पांचवीच्या वर्गांत दाखल झाले. या शाळेंत दाखल झाल्यानंतर चार महिन्यांनी जी वार्षिक परीक्षा झाली तींत उत्तीर्ण होऊन १९०० च्या जूनमध्ये ते सहावींत गेले. या शाळेचे मुख्याध्यापक श्री. दा. ब. जोशी राष्ट्रीय वृत्तीचे होते. त्यामुळे ते विद्यार्थ्यांकडून देशभक्तिपर इंग्रजी कविता म्हणवून घेत. अशा कवितांच्या पाठांतराची एक स्पर्धाहि त्यांनी आयोजित केली होती. या स्पर्धेत सावरकर पहिले आले. अभ्यासापेक्षा अवांतर कार्यांत सावरकरांचा बराचसा वेळ जात असल्यामुळे परीक्षेपूर्वीचे एक-दोन महिने ते झटून अभ्यास करीत व तेवढ्या अभ्यासावर ते परीक्षा उत्तीर्ण होत.

तिघेहि सावरकर बंधु नाशिकला राहूं लागल्यामुळे भगूरचें घर बंदच असावयाचें. याचा फायदा घेऊन गावांतील चोरट्यांनी घरांतील भांडींकुंडीं पळविलीं. वडिलोपार्जित मालमत्तेकडे तिघांपैकी कोणाचेंच लक्ष नसल्यामुळे कुळांनी शेती, मळे आंबराया आपल्या ताब्यांत घेऊन टाकल्या. घरच्या सावकारीचे कागदपत्रहि गहाळ झाले होते. याउलट वडिलांनी काढलेलें कर्ज मात्र मुलांच्या डोक्यावर बसलें. घरची मालमत्ता अशी चोरांहातीं गेल्यामुळे सावरकर बंधूंची आर्थिक ओढगस्त होऊं लागली. बाबा अधूनमधून नोकरी करीत. परंतु त्यांचा स्वभाव असा होता की, दोन-चार महिन्यांतच मालकाशीं खटका उडे व नोकरी सोडावी लागे. तरीहि संसाराचा सारा भार बाबांनीच आपल्याकडे घेतला होता. आपल्या दोन्ही धाकट्या भावांच्या शिक्षणांत खंड पडूं नये व घरच्या विवंचना त्यांच्या कानांवर जाऊं नयेत यासाठी ते आणि येसूवहिनी स्वतः अर्धपोटीं राहून आला प्रसंग निभावून नेत. एकदा तर सावकाराची जप्ती चुकविण्यासाठी येसूवहिनींना आपल्या अंगावरील माहेरचे सारे दागिने काढून द्यावे लागले. एवढी अडचण सहन करूनहि वहिनींच्या चेहऱ्यावरचें प्रसन्न हास्य कधी मावळलें नाही. या काळांत येसूवहिनींना एक मूल झालें. परंतु बाळंतपणांत पैशाअभावीं त्यांचे इतके हाल झाले की, त्याचा परिणाम त्या मुलाच्या प्रकृतीवर होऊन तें वारलें. एके काळची भगूरच्या जहागिरदाराची सून आता अक्षरशः लंकेची पार्वती झाली होती. परंतु त्याहि परिस्थितींत तात्या आणि बाळ यांना या अडचणींचा वाराहि लागू नये म्हणून बाबा आणि येसूवहिनी सारीं दुःखें त्यांचा उच्चार न करतां सहन करीत.

बाबाहि या वेळीं वयाने मोठे होते असें नव्हे. त्यांचें वय होतें एकवीस-बावीसच्या आसपास. बरीच ओढगस्त झाली तेव्हा ते कुळाकडून कांही येणें वसूल होतें काय या विचाराने भगूरला गेले. तेथले कारंजकर नांवाचें कूळ मोठे वस्ताद होतें. बाबांसारख्या व्यवहारांत अनभिज्ञ असलेल्या तरुणाला हातोहात फसविण्याचें कारंजकरने ठरविलें. अजीजी करीत तो बाबांना म्हणाला, "तुमच्या अन्नावर आम्ही वाढलों आहोंत. आता तुमची परिस्थिति चांगली नसतांना तुम्हांला यथाशक्ति मदत करणें हें आमचें कर्तव्यच आहे. नदीकाठच्या आपल्या शेतांत दहा हजार रुपयांचा हंडा आहे असें मला खात्रीलायक कळलें आहे. परवा रात्रीं मी तो काढणार आहे. तो हातीं आला की, मी तुमचें सारें देणें देऊन टाकीन. पण शेत खणण्यापूर्वी तेथे कांही धार्मिक विधि करावयाचे आहेत आणि त्यासाठी लागणारे दोन-तीनशे रुपये तुम्ही कसेंहि करून मला द्या."

आपण लवकरच कर्जमुक्त होणार या आशेने बाबांनी आपल्या मित्राकडून तीनशे रुपयाचें कर्ज काढून ते पैसे कारंजकरला दिले. परंतु कोणती तरी सबब सांगून कारंजकर धार्मिक विधि लांबणीवर टाकूं लागला तेव्हा आपण पुरेपूर फसविलें गेलें आहोंत हें बाबांना कळून चुकलें. येणें वसूल करण्यासाठी म्हणून भगूरला गेले व तीनशे रुपयांचें आणखी कर्ज करून ते परतले. बाबांचे हे हाल पाहून सावरकरांनी शिक्षण सोडून देऊन नोकरी करण्याचा विचार केला. त्या काळीं पब्लिक सर्व्हिसची एक परीक्षा होती. ती परीक्षा उत्तीर्ण झालेल्यांनाच सरकारी नोकरी मिळत असे. म्हणून सावरकरांनी ती परीक्षाहि देऊन टाकली. परंतु आपल्या धाकट्या भावाचा हा बेत बाबांना कळतांच ते कळवळ्याने म्हणाले, "वाटेल तो त्रास मी सोशीन, पण तात्याचें शिक्षण बंद पडूं देणार नाही. तात्याने अभ्यास करावा. नोकरीचा विचार देखील करतां कामा नये.' बाबा आणि येसूवहिनी सावरकरांना आई-वडिलांच्या ठिकाणीं होतीं. त्यामुळे ते बाबांच्या किंवा येसूवहिनींच्या शब्दाबाहेर जाणें शक्यच नव्हते. त्यांनी लागलीच अभ्यास सुरू केला व १९०१ मध्ये इंग्रजी सहावीची परीक्षा उत्तीर्ण होऊन मॅट्रिकच्या वर्गांत गेले.

या काळांतहि सावरकरांचें वाचन अव्याहत चालू होतें. मागील वर्षापेक्षा चालू वर्षी वाचलेल्या पुस्तकांची संख्या अधिक भरली पाहिजे याकडे ते

कटाक्षाने लक्ष देत असत. मॅझिनी, गॅरिबाल्डी आदि स्वातंत्र्यवीरांच्या चरित्राच्या अभ्यासाबरोबरच काव्यशास्त्रावरील व तत्त्वज्ञानावरील ग्रंथहि ते वाचीत असत. अलंकारशास्त्रावर व मोरोपंतांवर व्याख्यानें देण्याइतकी त्यांची तयारी झाली होती. स्पेन्सरच्या उपयुक्ततावादाचा त्यांच्या विचारावर पगडा बसला होता; भगवान् श्रीकृष्ण हा उपयुक्ततावादाचा पहिला प्रणेता, नव्हे पहिला आचार्य; कारण त्याने तो प्रत्यक्ष आचरून दाखविला हा आपला सिद्धान्त सावरकर महाभारतांतील अनेक उदाहरणें देऊन सिद्ध करीत.

आपल्या या वाचनाला व चिंतनाला शिस्त लागावी म्हणून सावरकर महिन्याच्या आरंभीं आपलें वाचनाचें वेळापत्रक तयार करीत व त्या क्रमानेच पुस्तकांचें वाचन करीत. दैनंदिनी लिहिण्याची सवयहि लहानपणापासून त्यांनी अंगीं बाणवली होती. इंग्लंडला जाईपर्यंत ही सवय कायम होती; परंतु तेथे पोलिसांचा ससेमिरा सुरू झाल्यामुळे दैनंदिनी लिहिण्याचें त्यांनी मुद्दामच बंद केलें. इतकेंच नव्हे, तर आपल्या पूर्वीच्या सर्व दैनंदिनी जाळून टाकल्या.

मित्रमेळ्याच्या कार्याचा प्रसार करण्यासाठी हातीं आलेली कोणतीहि संधि ते सोडीत नसत. नाशिकला पुन्हा प्लेग सुरू झाला तेव्हा ते आपल्या मामांकडे कोठूरला राहवयास गेले होते. तेथे वामनराव व बळवतराव या बर्वे बंधूंच्या साहाय्याने मित्रमेळ्याची शाखा स्थापन केली. असेंच एकदा ते भगूरला गेले असतांनाहि तेथेहि जुन्या सवंगड्यांना गाठून त्यांना मित्रमेळ्याची दीक्षा दिली. माईंना सासरीं पोचविण्यासाठी त्र्यंबकेश्वरला जावें लागतांच त्या लहानशा गावांतहि मित्रमेळ्याची शाखा त्यांनी उघडली.

क्रांतिकारक पोलिसांच्या हातीं सापडला की, त्याचा केवळ मानसिक छळ होईल असें नव्हे; प्रसंगीं त्याला शारीरिक छळालाहि तोंड द्यावे लागेल हें ओळखून सावरकरांनी मित्रमेळ्यांतील आपल्या सहकाऱ्यांना शरीर काटक व सहनशील करणाऱ्या व्यायाम-प्रकारांचा सराव करण्यास सांगितलें. स्वतः ते भगूरला असल्यापासून सूर्यनमस्काराचा व्यायाम नियमाने घेत असत. नाशिकला राहवयास आल्यानंतर डंबेल्स, जोर, बैठका आदि व्यायाम-प्रकारांचाहि त्यांनी सराव केला. सवड मिळेल तेव्हा ते मलखांबहि शिकत असत. कधी कधी आपल्या मित्रांना बरोबर घेऊन ते रामकुंडावर जात आणि गोदावरीच्या प्रवाहांत तासन् तास डुंबत बसत. गोदावरीच्या प्रवाहामध्ये ते जें पोहणें शिकलें त्याचा

पुढे मार्सेलिसच्या समुद्रांत उडी टाकतांना उपयोग झाला. याशिवाय धांवणें, झाडावर व डोंगरावर जलद गतीने चढणें, रानावनांत हिंडणें, उघड्यावर झोपणें, मधूनच उपोषण करून उपासमार सहन करण्याची शरीराला सवय लावणें अशा अनेकविध गोष्टी क्रांति-जीवनाच्या पूर्वतयारीसाठी त्यांनी नाशिकच्या वास्तव्यांत आत्मसात केल्या. शरीर आणि मन कणखर केल्याखेरीज क्रांति-कार्याचें शिवधनुष्य पेलतां येणार नाही असें ते आपल्या मित्रांना सदैव बजावीत असत. अंदमानमध्ये जन्मठेपेची शिक्षा भोगतांना सावरकरांना त्यांच्या शरीराने व मनाने जी अदम्य साथ दिली त्याचें श्रेय नाशिकच्या वास्तव्यांतील वाचन-चिंतनाला आणि व्यायामाला आहे.

१९०१ च्या अखेरीस होणाऱ्या मॅट्रिकच्या परीक्षेच्या तयारीसाठी सावरकर अभ्यासांत गर्क झाले असतांना कोठूरचे मामा आले आणि म्हणाले, " तात्या, तुझे लग्न ठरवून आलोंय. " मामाना काय सांगावें हें सावरकरांना सुचेना. मॅट्रिक झाल्यानंतर कॉलेजशिक्षणासाठी पैसा कसा उभा करावयाचा या विवंचनेंत असतांना मामा त्यांना लग्न करण्याचा आग्रह करीत होते. शिवाय क्रांतिकारकाने बिवाहबद्ध होणें कितपत युक्त आहे याबद्दलहि त्यांचा विचार पक्का झाला नव्हता. विवाहामुळे क्रांतिकार्यावरचें पाऊल मागे घेण्याचा मोह तर होणार नाही ना, ही शंका मनांत आली तेव्हा दुसरें मन त्यांना समजावूं लागलें, ' क्रांतिकारकाने लग्न केल्यास पत्नीच्या किंवा संततीच्या मोहाने तो प्रतिज्ञेपासून चलित होईल काय ? पण असेंच कां व्हावें ? त्याचें मनोबल जर स्वतःच्या पित्याच्या, बंधूच्या, किंबहुना स्वतःच्या प्राणांचाहि मोह सोडण्या-इतकें प्रखर असेल तर मग केवळ पत्नीच्या व संतानाच्या मोहास तोडणें त्याला कठीण पडणार नाही. वास्तविक पाहतां, वीरात्म्यांनी योग्य समयीं विवाह करून शक्यतों उत्कृष्ट संततीस जन्म देणें हें त्यांचें राष्ट्रीय कर्तव्यच ठरतें. कारण आपल्या संततीच्या ओघानेच क्रांतिकारक आपला वीरत्वाचा ओघहि अखंडित राखील, देशभक्तांची परंपरा निर्माण करील. तो वीर आघाडीस पडला तर त्याचीं बायकामुलें अनाथ होतील. होतील तर होतील ! त्याच्या पत्नी-पुत्रांनी आपला नाथ असा महान् हुतात्मा झाला या विचाराने आपल्या त्या अनाथपणासच स्पृहणीय असें सनाथत्व मानलें पाहिजे. पण

तेंहि होत नसेल तर अशा अनाथ स्त्रियांनी सुखेनैव तशाच कोणा थोर पुरुषाशीं पुनर्विवाह करून आपला संसार पुन्हा थाटावा. अशी अनुज्ञा मनः-पूर्वक देण्याइतका तो क्रांतिवीर उदार असेल. निदान असला तरी पाहिजे.’

आपल्या क्रांतिजीवनांत वैवाहिक जीवनाचा अडसर येणार नाही असा त्यांच्या मनाने जेव्हा कौल दिला तेव्हा त्यांनी मामांना होकार कळविला. मात्र वैवाहिक जीवनांत पदार्पण केल्यानंतर कॉलेजशिक्षणाच्या खर्चाची सोय कशी करावयाची ही आपली शंकाहि मामांच्या कानांवर घातली. मामांनाहि ही गोष्ट पटल्यामुळे त्यांनी मुलीच्या वडिलांपाशीं – भाऊराव चिपळूणकरांपाशीं हा विषय काढला. श्री. चिपळूणकर जव्हार संस्थानामध्ये मोठ्या हुद्दयावर होते. त्यामुळे त्यांची आर्थिक परिस्थिति चांगली होती. शिवाय स्वभावहि मोठा दानशूर होता. त्यामुळे सावरकरांच्या कॉलेजशिक्षणाच्या खर्चासंबंधी मामांनी विषय काढतांच चिपळूणकर म्हणाले, “तात्याचें शिक्षण होय ? माझ्या मुलांचें शिक्षण मी करीन हें जसें मीं कोणाला वचन द्यावयास नको तसेंच तात्याचें शिक्षणहि मी करीन हें वचन द्यावयाची कांहीच गरज नाही. तें माझें कर्तव्यच आहे.” भाऊराव चिपळूणकरांचा स्वभाव बाबांना माहीत होता. येसूवहिनींचें व चिपळूणकरांचें लांबचें नातेंहि होतें. त्यामुळे चिपळूणकर आपला शब्द खरा करून दाखवतील याबद्दल कोणालाच शंका वाटत नव्हती. अशा रीतीने सर्व खुलासा झाल्यानंतर १९०१ च्या माघ महिन्यांत सावरकर चिपळूणकरांच्या यमुनेशीं विवाहबद्ध झाले.

हा विवाह-समारंभ आटोपल्यानंतर थोड्याच दिवसांनी चिपळूणकरांच्या दुसऱ्या कन्येचा विवाह ओझरतांबटचे श्री. जोशी यांच्या चिरंजिवांशीं निश्चित करण्यांत आला. या विवाहासाठी सावरकरहि ओझरतांबटला गेले होते. वऱ्हाडी मंडळींत शीघ्रकवि पारख यांचाहि समावेश होताच. त्यामुळे तेथील वास्तव्यांत सावरकर आणि पारख काव्यशास्त्रविनोदांत रंगून गेले. एकदा ते दोघेजण गप्पा मारीत बसले असतांना पारख यांनी एखादी नवी कविता म्हणून दाखविण्याचा सावरकरांना आग्रह केला. नारोशंकरांनी दिल्लीहून आणलेली एक मोठी घंटा नाशिकला गोदावरीच्या काठावर बांधण्यांत आली आहे. सावरकरांनी या घंटेवर नुकतीच कविता केली होती. ती त्यांनी पारख यांना म्हणून दाखविली –

दिल्लीचें पद हालवोनि वरिली तेजे जिही संपदा
राहोनिः निरपेक्ष वाहुनि दिली श्रीशंभूच्या संपदा
होते ते तुमचे सुपूर्वज असे यत्कीर्तिते ना लय
नारोशंकरचें असें कथितसें आम्हांसि देवालय

या लहानशा कवितेंतूनहि सावरकरांची इतिहासाकडे बघण्याची दृष्टि प्रतीत झाल्यामुळे पारख म्हणाले, "या तेजस्वी युवकाची क्रांतिकारी कविता त्याच्या स्वतःच्याच तेजाने एक दिवस जळून भस्म होईल!" पारख यांची भविष्यवाणी अल्पावधींतच खरी ठरली.

१९०१ च्या अखेरीस मॅट्रिक परीक्षेसाठी सावरकर मुंबईला गेले. या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्यानंतर त्यांचा नाशिकशीं असलेला संबंध तुटणार होता. म्हणून त्यांनी मुंबईला जाण्यापूर्वी मित्रमेळ्याच्या कार्याची यापुढील जबाबदारी कोणी उचलावी यासंबंधीच्या आपल्या मित्रांना सूचना दिल्या. श्री. वि. म. भट व श्री. सखारामपंत गोरे या दोघांवर मित्रमेळ्याची जबाबदारी सोपवून ते मुंबईस रवाना झाले.

लहानपणापासून सावरकरांना दोन गोष्टींची मोठीच आवड होती. एक म्हणजे टापटिपीच्या राहणीची. गबाळेपणा किंवा अव्यवस्थितपणा त्यांना कधीच आवडत नसे. गबाळेपणाबरोबरच भपकेबाजपणाचाहि त्यांना तिटकारा असे. परंतु नीटनेटके कपडे, शोभिवंत राहणी याबद्दल ते दक्ष असत. त्यांच्या खोलींत क्रांतिकारकांच्या छायाचित्रांभोवतीं नेहमी फुलांचा, अत्तराचा आणि उदबत्त्यांचा सुगंध दरवळत असे.

या नीटनेटकेपणाप्रमाणेच त्यांना अधूनमधूनहि एकान्तहि हवासा वाटे. मित्रांना न कळवितां नारोशंकराच्या देवळांतील गच्चीवर किंवा घाटावर जाऊन तासन् तास ते स्वतःच्या मनाशीं रमत असत. बालपणींहि भगूरला असतांना ते देवघरांत जाऊन देवीच्या मूर्तीपुढे ध्यानस्थ बसत असत. एकान्तांत बसून चिंतन केल्याखेरीज त्यांच्या मनाला स्वस्थताच वाटत नसे. 'मनाच्या पार्लमेंटमध्ये गेल्याशिवाय मला चैन पडत नाही' असें ते म्हणायचें. नीटनेटकी राहणी, सुवासांची आवड आणि एकान्तप्रियता ही त्यांचीं स्वभाववैशिष्ट्यें जीवनाच्या अखेरपर्यंत कायम होतीं.

सावरकरांचा मॅट्रिकचा अभ्यास चालू असतांनाच केरळकोकिळ मासिकाचे संपादक कविवर्य आठल्ये सावरकरांच्या निमंत्रणावरून मित्रमेळयास भेट देण्यासाठी नाशिकला येणार होते. आठल्यांच्या काव्यावर सावरकर निहायत खूष होते. इतकेंच नव्हे, तर तशी शैली आपणहि आत्मसात करावी असा त्यांचा प्रयत्न होता. त्यामुळेच त्यांनी आठल्ये यांना नाशिकला येण्याचें निमंत्रण दिलें होतें. श्री. आठल्ये यांच्या स्वागतासाठी आयोजित केलेल्या समारंभांत मित्रमेळयाचा उद्देश सावरकरांनी एका कवितेद्वाराच कथन केला –

बिंदूचें बनतें तळें हृदयीं या सृष्टिक्रमाने धरा
हिंदु जे असतील ते मिळवुनी निर्झळणें या परा
निंदूनी जनघातकारकसुखा राष्ट्रार्थ मृत्यु वरा
शुक्रेंदूज्ज्वल बीजमंत्र हृदीं ही संस्था धरी उर्वरा

सावरकरांच्या कवित्वशक्तीवर केरळकोकिळकार प्रसन्न झाले. त्यांनी सावरकरांनी आणखी कोणकोणत्या कविता केल्या आहेत याची अगत्याने चौकशी केली. इंग्रजी सहावींत असतांना सावरकरांनी स्कॉट या आपल्या आवडत्या आंग्ल कवीच्या 'लेडी ऑफ दी लेक' या प्रसिद्ध काव्याचें 'चुकलेलें कोकरूं' या शीर्षकाखाली भाषांतर केलें होतें. केरळकोकिळकारांनी हा अनुवाद आणि सावरकरांच्या इतर स्फुट कविताहि त्यांच्याकडून म्हणवून घेतल्या.

मुंबईला मॅट्रिकच्या परीक्षेला बसून सावरकर नाशिकला परतले. परंतु त्या वेळीं नाशिकला प्लेग सुरू झाला होता व म्हणून ते कोठूरला मामांकडे राहवयास गेले. कोठूरच्या मुक्कामांत त्यांनी मोरोपंतांच्या 'गंगावकिली'च्या धर्तीवर 'गोदावकिली' ही कविता रचली –

धवले धन्य गोदे सन्मुनिवरसंघवेष्टिते गंगे
संगे तव तो अतितर दुस्तर भवसिंधु परि त्वरे भंगे

या शब्दांत गोदावरीचा गौरव करून ते आपल्या मनांतील व्यथा तिजपुढे उकलून दाखवितात –

सांप्रत सर्वंचि झालें माते हें भरतखंड हीन खरें
परवशता बहु दुस्सह बरवी हृदयस्थ नडगिची नखरें

तत्तारणा झटावें सदये, संतत समस्त गावकरी
गाव जुटीने उठला तरी तद्हित केवि दुष्ट राव करी

कोठूरच्या परिसरांत सावरकरांची कवि म्हणून कीर्ति इतकी पसरली की, तमासगीरहि लावण्या रचून द्या अशी त्यांना विनंती करूं लागले. मामांच्या आग्रहावरून त्यांनी एका फडासाठी कांही लावण्याहि रचल्या.

मन्मन-मैत्रीच्या कासारा गणिकेचा हा तुला
गड्या रे छंद नसे चांगला

ही त्यांची लावणी कोठूरच्या फडांत बरीच लोकप्रिय झाली होती.

केरळकोकिळ आणि विविधज्ञानविस्तार या मासिकांप्रमाणेच हरिभाऊ आपटे यांचें 'करमणूक' पत्रहि सावरकर नियमित वाचीत असत. त्यामुळे 'सर्व पेशव्यांत थोर पेशवे कोण व ते कां याचीं कारणें' या विषयावर करमणुकीने निबंधस्पर्धा जाहीर करतांच सावरकरांनी तिच्यांत भाग घेण्याचें ठरविलें. थोरले माधवराव पेशवे हेच सर्व पेशव्यांत थोर होत असे प्रतिपादन करणारा निबंध सावरकरांनी 'करमणूक' पत्राकडे पाठविला. या निबंधांतील माधवराव पेशव्यांच्या मोठेपणाबद्दलचें त्यांचें विवेचन इतकें मूलगामी व अचूक होतें की, या निबंधाला पहिला क्रमांक देण्यांत आला. नंतर तो 'करमणूक' पत्रांत प्रसिद्धहि झाला.

१९ डिसेंबर १९०१ रोजीं मॅट्रिक परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर सावरकर कोठूरहून नाशिकला परतले. ते या परीक्षेंत उत्तीर्ण झाल्याचें कळतांच श्री. भाऊराव चिपळूणकर जव्हारहून नाशिकला आले व लग्नाच्या वेळीं कॉलेज-शिक्षणाच्या खर्चाबाबत दिलेलें आश्वासन पूर्ण करण्यास आपण आनंदाने तयार आहोंत असें त्यांना कळविलें. बी. ए. होईपर्यंतचा जावयाचा सारा खर्च आपण करूं असें त्यांनी बाबांना सांगितलें.

श्री. चिपळूणकरांच्या या उदार वृत्तीमुळे त्यांच्यासंबंधी सावरकरांच्या मनांत किती कृतज्ञता वास करीत होती हें त्यांनी अंदमानमधून धाडलेल्या पत्रावरून सिद्ध होतें. या पत्रांत ते म्हणतात, 'जगांतील उत्तमोत्तम वस्तु आत्मसात् करण्याची संधि व साधनें मला लाभलीं व आपल्या सर्वांना प्रिय वाटणाऱ्या आपल्या मायदेशासाठीहि कांही करण्याचा योग मला लाभला.

ज्यांच्या थोर पुरस्कारामुळे व प्रेमळ आपुलकीमुळे हें साधलें व त्यामुळे माझ्य ठिकाणीं जें कांही सर्वोत्तम असेल त्याचें श्रेय ज्यांना कृतज्ञपणें दिलें पाहिजे। अशा व्यक्तींमध्ये परमपूज्य बाबांच्या खालोखाल स्थान जर कोणास देणें रास्त असेल तर त्या व्यक्ति म्हणजे श्री. भाऊराव चिपळूणकर व त्यांच्या कुटुंबांतील माणसें याच होत.'

श्री. चिपळूणकरांकडून आर्थिक साहाय्याचें आश्वासन मिळल्यामुळे सावरकरांनी पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजकडे प्रवेशअर्ज धाडला. बऱ्याच ठिकाणीं प्लेगची धामधूम सुरू असल्यामुळे परगावच्या विद्यार्थ्यांना कॉलेजमध्ये क्रमाक्रमाने प्रवेश दिला जात असे. यामुळे सावरकरांचें एक वर्ष वाया गेलें. अखेरीस २४ जानेवारी १९०२ रोजीं त्यांना 'फर्ग्युसन'मध्ये प्रवेश मिळाला.

नाशिकहून पुण्यास जात असतांना सावरकर आपल्या मनाशीं भावी कार्याची रूपरेषा आखण्यांत गढून गेले होते. •

# ४
# विदेशी कपड्यांची होळी

फर्ग्युसन कॉलेजमध्ये प्रवेश मिळाल्यामुळे सावरकर त्या कॉलेजच्या वसतिगृहांतच राहूं लागले. भगूर-नाशिकप्रमाणे येथेहि त्यांचा स्वतंत्र मित्रपरिवार गोळा होऊं लागला. सावरकर-कॅंप म्हणून फर्ग्युसनमधील विद्यार्थ्यांचा हा गट ओळखला जात असे. प्रारंभीं वि. म. भट व ह. अ. थत्ते असे नाशिकचे दोघे तरुणच या सावरकर कॅंपचे सदस्य होते. परंतु सावरकरांच्या प्रयत्नामुळे दाजीसाहेब आपटे, ग. वा. जोगळेकर, ग. वि. रानडे, मोहोळकर, लोकमान्यांचे चिरंजीव विश्वनाथपंत टिळक, कृ. शि. परांजपे, र. द्वा. तर्खडकर आदि फर्ग्युसनमध्ये प्रीव्हियस किंवा इंटरच्या वर्गांत शिकत असलेले अनेक विद्यार्थी 'सावरकर कॅंप'मध्ये दाखल झाले. श्री. बाबासाहेब खापर्डे डेक्कन कॉलेजमध्ये शिकत होते. परंतु तेहि 'सावरकर कॅंप'च्या कार्यक्रमांना हजर राहत. जेवण्यासाठी सावरकरांनी पहिल्या क्लबमध्ये नांव नोंदविलें. पांच-सहा महिन्यांतच या क्लबची व्यवस्था त्यांच्याकडे आली. सावरकरांच्या प्रोत्साहनाने या क्लबतर्फे एक हस्तलिखित मासिकहि सुरू करण्यांत आलें.

या क्लबमधील एक विद्यार्थी मोहनीराज प्रधान याने एक कविता लिहिली होती. त्या कवितेंत पोहण्याचें साधन म्हणून भोपळ्याचा उल्लेख करण्यांत आला होता. जेवणाच्या वेळीं या कवितेवर चर्चा सुरू झाली तेव्हा भोपळा हें पोहण्याचें खरें साधन नसून बाहुबळ हें खरें साधन आहे असें सावरकर म्हणाले. यावरून हा वाद इतका पराकोटीस गेला की, सावरकर

आपल्या पानावरून उठले आणि प्रधानासमोर जाऊन आपले विधान त्याला पटवून देऊं लागले. सावरकरांच्या या वर्तनाबद्दल प्रधान याने कॉलेजच्या अधिकाऱ्यांकडे कागाळी केली. हस्तलिखित मासिकांतील क्रांतिकारक प्रवृत्तीच्या लिखाणामुळे फर्ग्युसनचे प्राचार्य रँग्लर र. पु. परांजपे यांचा सावरकरांवर राग होताच. त्यामुळे प्रधान याच्या तक्रारीचा फायदा घेऊन सावरकरांचें क्लबमधील वर्तन योग्य की अयोग्य याची शहानिशा करण्यासाठी वरच्या वर्गातल्या माधवराव भिडे व रामभाऊ कानिटकर या दोघां विद्यार्थ्यांना परांजप्यांनी पंच म्हणून नेमलें. एका लहानशा वादंगाचा फायदा घेऊन प्राचार्यांनी आपल्या वर्तनाची चौकशी सुरू करावी हा प्रकार सावरकरांना अर्थातच आवडला नाही. त्यामुळे त्यांनी पहिला क्लब सोडला व ते चौथ्या क्लबमध्ये जाऊं लागले.

सावरकरांसारखा बुद्धिमान् आणि तेजस्वी विद्यार्थी आपल्या क्लबमध्ये आला हें पाहून त्या क्लबच्या विद्यार्थ्यांना आनंद झाला. तेथे सर्वजण जेवावयास बसले असतांना सावरकरांना कोणी तरी शीघ्र कविता रचण्यास सांगितलें. पांच मिनिटांच्या आंतच सावरकरांनी कविता करून आपल्या स्नेह्यांना चकित केलें.

अन्यायासहि ये जगीं जय जई धैर्या धरोनी तदा
जे न्यायाप्रति रक्षण्यासि धजती सोसोनिही आपदा
ऐशा धन्य नराग्रणींसह घडे आम्हांप्रती संग हा
झालों धन्य अम्ही सुनंदयुतही झाली दिवाळी पहा

पुण्यास आल्यामुळे काळकर्ते शिवराम महादेव परांजपे व केसरीकर्ते लोकमान्य टिळक यांचा सावरकरांना सहवास घडूं लागला. एक तरुण, तडफदार आणि तेजस्वी कार्यकर्ता म्हणून टिळक सावरकरांचा उल्लेख करीत. शनिवार-वाड्यानजीकच्या कोनकरांच्या वाड्यांत शि. म. परांजपे यांच्या घरीं जाऊन सावरकर प्रचलित राजकारणाविषयी चर्चा करीत. सावरकरांच्या प्रतिभेवर काळकर्ते खूष होते. त्यामुळे ते सावरकरांना लिहिण्याचा आग्रह करीत. फर्ग्युसनमध्ये शिकत असतांना सावरकरांचें बरेचसें लिखाण 'काळ'मध्ये प्रसिद्ध झालें याचें हेंच कारण होतें.

फर्ग्युसनच्या वसतिगृहांत राहत असतांना सावरकरांचा व्यायामाचा परिपाठहि चुकला नाही. सकाळीं उठल्यानंतर ते प्रथम तीनशे जोर व तीनशे

बैठका काढीत, डंबेल्सचा व्यायाम करीत व नंतर अभ्यासाकडे लक्ष वळवीत. संध्याकाळीं सवड मिळाली तर कॉलेजच्या क्रीडांगणावर जाऊन फुटबॉलहि खेळत. कॉलेजच्या वार्षिक संमेलनानिमित्त जे कार्यक्रम होत त्यांतहि त्यांनी भाग घेतला होता. एका वर्षी 'त्राटिका' नाटकांत त्यांनी छोटीशी भूमिका केली होती, तर दुसऱ्या वर्षी 'झुंजारराव'मध्ये आयागोचें काम केलें. कॉलेजच्या वादसभेंतहि ते भाग घेत होते. रात्रींच्या वेळीं इतर विद्यार्थी अभ्यासाकडे वळले की, सावरकरांचें राजकीय वाचन व चिंतन सुरू होई. अभ्यासाच्या बाबतींत त्यांनी पूर्वीचीच पद्धत कॉलेजमध्येहि अवलंबिली. परीक्षेपूर्वी दोन महिने ते अभ्यासांत गढून जात व तेवढ्या अभ्यासावर परीक्षा उत्तीर्ण होत असत. इंटरची परीक्षा झाल्यानंतर सावरकरांनी फर्स्ट एल्एल्. बी.चा अभ्यास सुरू केला व १९०४ मध्ये त्या परीक्षेंतहि ते उत्तीर्ण झाले.

आपल्या क्लबमधील सदस्यांमध्येहि देशसेवेची बुद्धि जागृत व्हावी यासाठी सावरकरांनी क्लबमध्ये शिवाजीमहाराजांचें तैलचित्र लावून दर शुक्रवारीं संध्याकाळीं आरती म्हणण्याचा परिपाठ सुरू केला. ही आरतीहि त्यांनी स्वतःच लिहिली –

जयदेव जयदेव जय जय शिवराया। या या अनन्यशरणा आर्या ताराया।
त्रस्त अम्ही दीन, अम्ही शरण तुला आलों। परवशतेच्या पाशीं मरणोन्मुख झालों॥
साधु परित्राणाया, दुष्कृतिनाशाया। भगवन् भगवद्गीता सार्थ कराया या।
ऐकुनिया आर्यांचा धावा महिवरला। करुणोक्ते स्वर्गीं श्रीशिवनृप गहिवरला॥
देशास्तव शिवनेरी घेई जन्माला। देशास्तव रायगडीं ठेवी देहाला।
देशस्वातंत्र्याचा दाता जो झाला। बोला तत् श्रीमत् शिवनृप की जय बोला॥

'काळ'मध्ये सावरकरांच्या ज्या कविता प्रसिद्ध होत होत्या त्यांतील एका कवितेंत अनेक ऐतिहासिक घटनांचीं उदाहरणें देऊन उत्कर्ष आणि अपकर्ष हा सृष्टिनियमच आहे असें प्रतिपादन करण्यांत आलें होतें. आजचें सामर्थ्यसंपन्न ब्रिटिश साम्राज्यहि आपण प्रयत्न केला तर, या भूमीवरून आपण घालवूं शकूं हेंच या कवितेद्वारा त्यांना सूचित करावयाचें होतें –

हा उन्नती-अवनतीस समुद्र जातो
भास्वान रवीहि उदयास्त अखंड घेतो
उत्कर्ष आणि अपकर्ष समान केले
विश्वांत आजवरि शाश्वत काय झालें ?

जो मत्त फारचि बलान्वित गर्ववाही
उद्विग्न मानस निराशहि जें तयांहि
हो पाहिजे स्वमनीं चिंतन नित्य केलें
विश्वांत आजवरिं शाश्वत काय झालें ?

मुंबईचे सर भालचंद्र कृष्ण भाटवडेकर यांनी १९०२मध्ये हिंदु युनियन क्लबच्या वतीने हेमंत व्याख्यानमालेमार्फत ' विधवांचीं दुःखें ' या विषयावर उत्कृष्ट कविता करणाऱ्याला बक्षीस जाहीर केलें. या स्पर्धेचा निकाल ३ फेब्रुवारी १९०३ च्या 'केसरीं'त जाहीर झाला. सावरकर आणि दापोलीचे श्री. श्री. वा. मुजुमदार या दोघांत पहिलें पारितोषिक विभागून देण्यांत आलें होतें. सावरकरांची ही कविता नंतर 'विविधज्ञानविस्तारा'ने प्रसिद्ध केली.

विधुर आणि विधवा यांचा विचार करतांना विधवांच्या बाबतींत आपल्या समाजाची दृष्टि किती अनुदार आहे हें विशद करतांना सावरकर म्हणतात —

साठीच्या जरठांनो ! विधुरांनो ! नववधू खुशाल वरा
लग्नाच्या अष्टदिनीं विधवा परि अन्य ना वरो नवरा
हा न्याय कोण ? का हो विधवा-विधुरांत भेद हा असला ?
कसल्या अपराधाचा अबलांना क्रूर दंड हा बसला ?

कवितेच्या शेवटीं धर्ममार्तंडांना असें आवाहन करण्यांत आलें आहे की,

ज्या दीन बालविधवा द्या त्यांसि पुनर्विवाह संमतिला।
व्हा सदय-हृदय सकृप जे होईल मान्य सत्य सन्मतिला ॥

सावरकरांनी आपल्या वयाच्या एकोणिसाव्या वर्षी ही कविता लिहिली हें ध्यानांत घेतलें म्हणजे प्रारंभापासून त्यांना केवळ राजकीय अन्यायांचीच चीड होती असे नव्हे, तर हिंदु समाजाच्या हाडींमासीं खिळलेल्या दुष्ट आणि प्रतिगामी रूढींविरुद्धहि त्यांचें मन बंड करून उठत असें हें दिसून येतें.

सावरकर कॅंपमधील आपल्या सहकाऱ्यांना स्वातंत्र्याचें महत्त्व विशद करण्यासाठी सावरकरांनी १९०३ मध्ये ' स्वातंत्र्याचें स्तोत्र ' लिहिलें. त्यांची स्वातंत्र्याकांक्षा किती युयुत्सु आणि जाज्वल्य होती त्याचें या स्तोत्रांत दर्शन घडते –

जयोऽस्तुते श्रीमहन्मंगले ! शिवास्पदे शुभदे
स्वतंत्रते भगवति ! त्वामहं यशोयुतां वंदे
राष्ट्राचें चैतन्य मूर्त तूं नीति-संपदांची
स्वतंत्रते भगवती ! श्रीमती राज्ञि तूं त्यांची
परवशतेच्या नभांत तूंची आकाशी होशी
स्वतंत्रते भगवती ! चांदणी चमचम लखलखशी
गालावरच्या कुसुमी किंवा कुसुमांच्या गालीं
स्वतंत्रते भगवती ! तूंच जी विलसतसे लाली
तूं सूर्याचें तेज उदधिचें गांभीर्यहि तूंची
स्वतंत्रते भगवती ! अन्यथा ग्रहण नष्टतेची
मोक्ष मुक्ति ही तुझीच रूपें तुलाच वेदान्तीं
स्वतंत्रते भगवती ! योगिजन परब्रह्म वदती
जें जें उत्तम उदात्त उन्नत महन्मधुर तें तें
स्वतंत्रते भगवती ! सर्व तव सहचारी होते
हे अधम-रक्त-रंजिते। सुजन-पूजिते। श्रीस्वतंत्रते
तुजसाठि मरण तें जनन
तुजवीण जनन तें मरण
तुज सकल चराचर शरण

भरतभूमिला दृढालिंगना कधी देशील वरदे
स्वतंत्रते भगवती ! त्वामहं यशोयुतां वंदे

स्वतंत्रतादेवी ही अखेर स्त्री आहे व त्यामुळे तिला फुलां-दागिन्यांची विशेष आवड असणार अशी कल्पना करून सावरकरांनी तिला लडिवाळ भाषेत सांगितलें –

स्वतंत्रते ! या सुवर्णभूमित कमती काय तुला
कोहिनूरचें पुष्प रोज घे ताजें वेणीला

इंटरची परीक्षा झाल्यानंतर सावरकर कँपची सहल सिंहगडला गेली होती. सिंहगडच्या परिसरांत हिंडतांना सावरकरांचें मन शिवकालांत गेलें आधी लग्न कोंडाण्याचें सांगणारा तानाजी त्यांच्या डोळ्यांसमोर आला. पावनखिंड लढविणारा बाजी प्रभू त्यांना आठवला. शिवाजीमहाराजांच्या या दोन शूर सहकाऱ्यांच्या आत्मबलिदानाची कथा महाराष्ट्रांतील तरुणांना स्वातंत्र्यासाठी झुंजण्याची प्रेरणा खचित देईल हा विचार मनांत येतांत त्यांची तेजस्वी काव्यप्रतिभा जागी झाली. सिंहगड उतरतांना ते गुणगुणूं लागले –

धन्य शिवाजी तो रणगाजी धन्यचि तानाजी
प्रेमें आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी

देशामाजीं कहर गुजरला पारतंत्र्य-जहरें
हलाहलहि ह्या परदास्याहुनि गळा गाठितां बरें

गोमातांची मान आणि ती शिखा ब्राह्मणांची
परदास्याची सुरी बंधुंनो चिरी एकदाची

देश हिंदुंचा हाय तयाचा मालक म्लेंछ ठरे
परि परमेशा फार दिवस हें रुचेल केवि बरें

मग आर्यदेश तारणा । अधम मारणा । कराया रणा ।
परदास्यरात्रि नाशाला
शिवनेरी श्रीमान् आला
स्वातंत्र्यसूर्य उदयाला

त्या सूर्याचा किरण रणांगणीं तळपे तानाजी
प्रेमे आजी सिंहगडाचा पोवाडा गाजी

पारतंत्र्यांत समाधान मानणाऱ्यांचा धिक्कार करतांना सावरकर म्हणतात –

स्वातंत्र्याच्या सुखनीमाजी जन्म स्वतंत्रांचे
गुलामगिरिच्या उकिरड्यावरी गुलाम निपजाचे

श्वानहि भरितें पोट बापुडें चघळुनिया तुकडे
शेणामाजीं बांधुनि वाडे नांदतीं शेणकिडे

तानाजीसारख्या नररत्नाने सिंहगडावर देह ठेवला म्हणून रत्नांचा साठा ज्याच्या पोटांत आहे तो समुद्रहि सिंहगडाचा हेवा करूं लागला अशी मनोज्ञ कल्पना पोवाड्याच्या शेवटच्या भागांत वाचावयास मिळते —

मग त्या गडची भूमी ठेवी तानाजिस उदरीं
तेंव्हापासुनि रत्नाकर बहु तीचा द्वेष करी

स्वतंत्रतेच्या रणांत लढतां स्वतंत्रतेसाठी
त्या पक्षाचा कैवारी श्रीमुरहर जगजेठी

मित्रमेळ्याच्या बालशाखेतर्फे सावरकरांनी हा पोवाडा बसवून घेतला व शिवाजी-उत्सव, गणेशोत्सव अशा प्रसंगीं दत्तोपंत केतकर, नारायणराव सावरकर व श्रीधरपंत वर्तक हीं मुलें हा पोवाडा साभिनय म्हणूं लागली. लोकमान्य टिळकांनी हा मेळा मुद्दाम पुण्याला बोलाविला व आपल्या केसरी कचेरींतील गणपतीसमोर त्याचा कार्यक्रम केला.

तानाजीच्या पोवाड्याप्रमाणेच बाजीप्रभूचा पोवाडाहि त्या वेळीं महाराष्ट्रांत कमालीचा लोकप्रिय झाला होता.

या पोवाड्याच्या प्रास्ताविकांत सावरकरांनी साऱ्या स्वातंत्र्ययोद्ध्यांना बाजी प्रभूचा पोवाडा ऐकण्यासाठी येण्याचें आवाहन केलें आहे —

स्वतंत्रते भगवती ! या तुम्हि प्रथम सभेमाजीं
अम्ही गातसो श्रीबाजीचा पोवाडा आजी

चितोडगडिच्या बुरुजांनो त्या जोहारासह या
प्रतापसिंहा प्रथित-विक्रमा, या हो या समया

तानाजीच्या पराक्रमासह सिंहगडा येई
निगा रखो महाराज रायगडकी दौलत आई

जरिपटका तोलीत धनाजी संताजी या या
दिल्लीच्या तक्ताचीं छकलें उधळित भाऊ या

स्वतंत्रतेच्या रणांत मरुनी चिरंजीव झाले
या ते तुम्ही राष्ट्रवीरवर या हो या सारे

घनदाट सभा थाटली। गर्जना उठली। घोर त्या काळीं
जय स्वतंत्रतेचा बोला
जय राष्ट्रदेविचा बोला
जय भवानिकी जय बोला

तुम्ही मावळे बोला हरहर महादेव बोला
चला घालुं स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी घाला

पावनखिंडींत बाजी प्रभूंनी आपल्या प्राणांच्या मोलाने दुष्मन रोखून धरल्यामुळेच श्रीशिवाजीमहाराजांचें स्वातंत्र्याचें स्वप्न साकार झालें हें सांगतांना सावरकर म्हणतात –

तदा मराठे रणीं पहुडले जे आणिक सुर ते
पावनखिंडिंत बसुनी तिजसह जाती नभःपंथें
श्रीबाजीचें रक्त पेरिलें खिंडित त्या काला
म्हणुनि रायगडिं स्वातंत्र्याचा थोर वृक्ष झाला
अहो बंधुनो ! पूर्वज ऐसे स्वतंत्र रणगाजी
स्वतंत्र त्या पूर्वजा शोभतां वंशज कां आजी ?
विनवि विनायक यांतिल घ्यावें समजुनि अर्थाला
चला घालुं स्वातंत्र्यसंगरीं रिपूवरी घाला

१९०६ मध्ये बाबाराव सावरकरांनी हे दोन्ही पोवाडे अभिनव भारत प्रकाशन मालेच्या बालशाखेच्या वतीने प्रसिद्ध केले. या पोवाड्यांनी तरुण मनें स्वातंत्र्याकांक्षेने भारून जातात हें पाहिल्यामुळे १९०९ मध्ये ब्रिटिश सरकारने ते जप्त केले.

बी. ए.चा अभ्यास करीत असतांना सावरकरांनी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या क्षेत्रामध्ये घडणाऱ्या घटनांचें वाचन करावयास प्रारंभ केला. रशिया आणि जपान यांचें त्या वेळीं युद्ध सुरू झालें होतें आणि या युद्धांत चिमुकल्या जपानने अजस्त्र रशियावर विजय मिळविला होता. अर्थात् केवळ

स्वतःच्या बळावर जपान रशियाला नमवूं शकला नव्हता. रशियाचें वाढतें वर्चस्व ज्यांना सहन होत नव्हतें अशा राष्ट्रांनी जपानला साहाय्य केल्यामुळेच तो एवढा पराक्रम करूं शकला. दक्षिण आफ्रिकेमध्ये इंग्रज आणि बोअर यांचें जें युद्ध भडकलें होतें त्यांतहि इंग्लंडच्या शत्रु-राष्ट्रांनी बोअर लोकांना मदत केली होती. या घटनांचा अभ्यास करतांना सावरकरांच्या मनांत असा विचार आला की, भारताला जर बलाढ्य ब्रिटिश साम्राज्य सत्तेविरुद्ध यशस्वी झुंज द्यावयाची असेल तर त्यालाहि ब्रिटनच्या शत्रु-राष्ट्रांची मदत घ्यावी लागेल. सद्यःस्थितींत तरी, एकाकी भारत हें स्वातंत्र्ययुद्ध शेवटास नेऊं शकणार नाही. इंग्लंडच्या शत्रु-राष्ट्रांचें जर आपल्या क्रांतिप्रयत्नांना साहाय्य घ्यावयाचें असेल तर आपण आपली क्रांतिकारक संघटना आंतरराष्ट्रीय पातळीवर उभारावयास हवी. या विचाराला मूर्तस्वरूप देण्यासाठी त्यांनी १९०४ च्या मेमध्ये नाशिकला मित्रमेळ्याच्या सर्व सदस्यांची एक बैठक घेतली व तींत भारताच्या इतर प्रांतांतील क्रांतिकारकांना समाविष्ट करूं शकणारी ‘अभिनव भारत’ या नांवाची क्रांतिसंघटना स्थापन केली. मित्रमेळ्याचें स्वरूप फक्त महाराष्ट्रापुरतें मर्यादित होतें. म्हणून ‘अभिनव भारत’ या संस्थेंत मित्रमेळा समाविष्ट करण्यांत आला. नाशिकला भागवतांच्या वाड्यांत ‘अभिनव भारता’चा जन्म झाला व याच संस्थेच्या वतीने सावरकरांनी पुढे आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या क्रांतिसंग्रामाचा श्रीगणेशा केला. पुढे चाळीस-पंचेचाळीस वर्षांनी भारताला स्वातंत्र्यप्राप्ति झाल्यानतर ‘अभिनव भारता’ची रीतसर सांगता करण्यासाठी त्यांनी पुण्याला एक समारंभ आयोजित केला. त्याच सुमारास त्यांनी नाशिकला जाऊन ज्या भागवतांच्या वाड्यांत या संस्थेची प्राणप्रतिष्ठा करण्यांत आली होती तेथे या क्रांतिसंगरांत हौतात्म्य स्वीकारलेल्या सहकाऱ्यांचें स्मारक उभारलें.

१९०५ साल तर वंगभंगाविरुद्धच्या आंदोलनाने गाजत होतें. बंगालची फाळणी रद्द झालीच पाहिजे या मागणीसाठी देशांत जें आंदोलन उभारलें गेलें त्यांत लोकमान्य टिळकांचा पुढाकार होता. साऱ्या देशभर लॉर्ड कर्झन यांच्याविरुद्ध संतापाची एकच लाट उसळली होती. लोकमान्यांच्या या राष्ट्रीय आंदोलनाला पुण्यांतील विद्यार्थ्यांचाहि पाठिंबा आहे हें सरकारला दाखवून देण्यासाठी सावरकरांनी श्री. न. चिं. केळकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची

सभा भरविली. या सभेंतील सावरकरांचें वक्तृत्व खूप गाजलें. या भाषणांत त्यांनी लोकमान्यांनी सुरू केलेली स्वदेशीची चळवळ विद्यार्थ्यांनीहि चालविली पाहिजे असें सांगितलें. इतकेंच नव्हे तर, परकीय वस्तूंवर विद्यार्थ्यांनी बहिष्कार घालण्यासाठी स्वतःजवळील विलायती कपड्यांची होळी करावी अशीहि सूचना केली. सावरकरांच्यानंतर शि. म. परांजपे यांचें भाषण झालें. त्यांत त्यांनी विलायती कपड्यांची होळी करण्याच्या सावरकरांच्या सूचनेला आपला पाठिंबा असल्याचें सांगितलें.

दसऱ्याचा दिवस अगदी जवळ येऊन ठेपला होता. त्यामुळे परदेशी कपड्यांच्या होळीसाठी सावरकरांनी दसऱ्याचा मुहूर्त निश्चित केला. विद्यार्थ्यां-जवळील विलायती कपडे गोळा करण्याच्या कार्यांत भोपटकर बंधूंच्या महाराष्ट्र विद्यालयांतील मुलांनी पुढाकार घेतला. दसऱ्याच्या दिवशीं सायंकाळीं हे कपडे एकत्र आणले तेव्हा ते गाडाभर झाले होते. मंडईपासून विलायती कपड्यांच्या गाड्याची मिरवणूक काढण्यांत आली. या कपड्यांचें बलिदान होणार असल्या-मुळे त्यावर गुलाल शिंपडण्यांत आला. लोकमान्य टिळक, शि. म. परांजपे, भालाकार भोपटकर प्रभृति मंडळी या मिरवणुकींत सामील झाली. त्यामुळे सावरकर प्रभृति विद्यार्थ्यांचा उत्साह दुणावला. लकडीपूल ओलांडून मिरवणूक पुढे गेल्यानंतर नदीकाठच्या शेतांत हा ढिगारा ओतण्यांत आला व सावर-करांच्या हस्तें तो पेटविण्यांत आला. धगधगऱ्या होळीसमोर लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांचीं भाषणें होईपर्यंत रात्रींचे नऊ वाजले होते.

या होळीमुळे सरकार आपल्यावर रुष्ट होणार हें टिळकांना माहीत होतें. होळीचें निमित्त साधून सरकारी हस्तक शेतांतल्या गवताच्या गंजीला आग लावतील व आपल्यावर नसता आरोप ठेवतील अशी शक्यता वाटल्यामुळे टिळकांनी होळी पूर्णपणें विझेपर्यंत एक-दोन वियार्थ्यांनी तेथे थांबावें असें सुचविलें. सावरकरांनी ही कामगिरी भट व थत्ते या आपल्या सहकाऱ्यांवर सोपविली. सावरकर कॉलेजच्या वसतिगृहांत परतले तेव्हा रात्रींचे अकरा वाजून गेले होते. दसऱ्याच्या दिवशीं परदेशी कपड्याची होळी करण्याची कल्पना त्यांनी नाशिकमधल्या आपल्या सहकाऱ्यांनाहि कळविली होती. त्यामुळे इकडे पुण्याला विलायती कपड्यांची होळी असतानाच नाशिकलाहि दादासाहेब केतकरांच्या हस्तें अशीच होळी करण्यांत आली.

विलायती कपड्यांची होळी करण्याचें सावरकरांचें कृत्य फर्ग्युसन कॉलेजच्या अधिकाऱ्यांना आवडलें नाही. सरकारचा आपल्यावर रोष होऊं नये म्हणून या अधिकाऱ्यांनी सावरकरांना दहा रुपये दंड केला. इतकेंच नव्हे तर वसतिगृह सोडून जाण्यास सांगण्यांत आलें. सावरकर, जोगळेकर नांवाच्या आपल्या स्नेह्याच्या खोलीवर राहवयास गेले. दहा रुपयांचा दंड सावरकर एकटे भरूं शकत होते. परंतु सावरकरांच्या या कृत्याला आपलाहि पाठिंबा आहे हें कॉलेजच्या अधिकाऱ्यांना दाखवून देण्यासाठी विद्यार्थ्यांनी निधि जमवून हा दंड भरला व उरलेली रक्कम पैसा फंडाला देण्यांत आली. फर्ग्युसनच्या अधिकाऱ्यांचें हें कृत्य लोकमान्य टिळकांना मुळीच आवडलें नाही. १७ व २४ ऑक्टोबरच्या केसरींत त्यांनी ' हे आमचे गुरूच नव्हत ' या शीर्षकाचे दोन खरमरीत अग्रलेख लिहून फर्ग्युसनच्या अधिकारी-वर्गाच्या स्वाभिमानशून्य अन् लाचार मनोवृत्तीवर कडाडून प्रहार केला. १६ ऑक्टोबर रोजीं शि. म. परांजपे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्यांची सभा भरून तींत परदेशी कपड्यांची होळी करून राष्ट्राभिमानाची ज्योत प्रज्वलित केल्याबद्दल सावरकरांचें अभिनंदन करण्यास आलें.

या होळी-प्रकरणानंतर सावरकरांची बी. ए.ची परीक्षा दीड-दोन महिन्यांवर आली होती. त्यामुळे त्यांनी आपल्या नेहमीच्या पद्धतीने दीड महिन्यांत झटून अभ्यास केला. २१ डिसेंबरला या परीक्षेचा निकाल जाहीर झाला. एवढे व्याप सांभाळूनहि सावरकर परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल लो. टिळक व शि. म. परांजपे यांना समाधान वाटलें. परीक्षा आटोपतांच आपल्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी सावरकर नाशिकला गेले. त्या वेळीं त्यांचा पहिला मुलगा प्रभाकर वर्षाचा झाला होता. नाशिकहून १९०६ च्या जानेवारींत सावरकर सेकंड एल्‌एल्. बी.च्या अभ्यासासाठी मुंबईला राहवयास आले.

गिरगावांतील 'सुखनिवास' लॉजमध्ये वि. म. भट यांच्यासमवेत तें राहूं लागले. तेथील वास्तव्यात 'विहारी' साप्ताहिकाचे श्री. फडके यांच्याशीं परिचय झाल्यामुळे तें 'विहारी'साठी लिहूं लागले. सावरकरांच्या ज्वालाग्राही लेखणीचा 'विहारी'ला स्पर्श होतांच त्या पत्राचा खप वाढूं लागला.

'विहारी'मधला ' वंदे मातरम् ' हा त्यांचा लेख बराच गाजला. या लेखात ते म्हणतात, ' सर्व जगतातलावर पसरलेल्या हजारो भू-भागामध्ये

आर्यभूसारखी रमणीय भूमि दुसरी कोणती आहे हें पाहण्यासाठी हिमालय पर्वत उठून उभा राहिला. त्याने आपले डोकें सर्व विश्वांतील प्रदेश दिसतील इतकें उंच केलें, तरी त्याला इतकी रमणीयता अन्य कोठेंच आढळेना. भू-लोकांवर जिच्याइतकी रमणीयता नाही तिच्यासमान स्वर्गलोकांत तरी कांही आहे की नाही म्हणून जयाने उत्साह पावलेला तो हिमालय स्वर्गाचीं कपाटें उघडून आंत घुसला. परंतु तेथे हे आर्यभू, तुझ्यासारखी मनोरम वस्तु सापडण्याच्या ऐवजी कांही निराळाच प्रकार झाला. हिमालयाचीं तीं हिमधवल सौधशिखरें पाहून इंद्राच्या अमरावतींतील अप्सरांची एकच त्रेधा उडाली. त्या सर्वजणी हिमालयाच्या गळयांत मिठ्या मारूं लागल्या. अमरावतीचा त्याग करून तेव्हापासून त्या हिमालयावर स्वच्छंदाने विहार करीत असतात. अशा त्या हिमालयाने, हे आर्यभूमि, तूं संपन्न आहेस.

‘परमेश्वराने सर्व स्वाभाविक चारुता या आर्यभारतीला अर्पण केली असली तरी तिच्या सद्‌गुणांची व थोरवीची खरी कसोटी ही तिच्या स्वतःच्या कर्तबगारीवरूनच पाहवयास पाहिजे. उत्तम देश तो की, ज्याच्या पुत्रांच्या अंगीं कांही तरी असामान्यता असते. देशभूमीची खरी चारुता तिच्या स्वतःच्या महत्त्वाने जितकी प्राप्त होते तिच्या शतपट अधिक रीतीने त्या देशभूमीच्या पुत्रांच्या कृतीवरून ठरत असते. सर्व जगाला अजून वंद्य असणाऱ्या कपिल महामुनींनी जिला आई म्हणून वंदन करावें अशी भूमि या जगावर किंवा चंद्र, मंगळ, बुध आदि ग्रहहो, तुमच्या तिकडे तरी एखादी आहे काय ?’

सावरकरांचा मुंबईला सेकंड एल्‌एल्. बी.चा अभ्यास सुरू असतांना पुण्याला अगम्यगुरु नांवाचे बुवा येऊन राहिले होते. ते पूर्वी इंग्लंडला जाऊन आले असून आता क्रांतिकारक संघटना स्थापन करण्याचा या बुवाजींचा विचार आहे अशी कुणकुण पुण्यांतील कांही विद्यार्थ्यांना लागतांच त्यांनी या अगम्यगुरूंची भेट घेण्यासाठी सावरकरांना पुण्यास बोलाविलें. या अगम्यगुरूंचें आपण कांही ऐकावें असें त्यांच्याजवळ मुळीच नसल्याचें सावरकरांना पहिल्याच भेटींत आढळून आल्यामुळे ते मुंबईला परतले. वस्तुतः ही घटना अगदी मामुली होती. परंतु सरकारने आपल्या प्रतिवृत्तांत या भेटीला अवास्तव महत्त्व दिल्यामुळे अगम्यगुरूंचें प्रकरण बरेच दिवस चर्चिलें जात होतें.

मुंबईच्या वास्तव्यांत पं. शामजी कृष्णवर्मा यांच्या 'इंडियन सोशिऑलॉजिस्ट' पत्राचा अंक सावरकरांच्या वाचनांत आला. लंडनमध्ये राहून शामजी कृष्णवर्मा भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न करीत आहेत अशा आशयाची बातमी पूर्वी केसरींत वाचली असल्यामुळे सावरकरांनी तो अंक काळजीपूर्वक वाचला. या अंकांत कृष्णवर्मांनी देशाभिमानी तरुणांना परदेशांत अभ्यास व कार्य करतां यावें म्हणून आपण शिष्यवृत्ति सुरू केली असल्याचें जाहीर केलें होतें. क्रांतिकारक संघटनेचें आंतरराष्ट्रीय जाळें निर्माण करावयाचें असेल तर लंडनला जाणें आवश्यक होतें व त्यासाठी ही शिष्यवृत्ति मिळविण्याचा प्रयत्न करण्याचें सावरकरांनी ठरविलें. इंग्लंडमधल्या वास्तव्यांत बॅरिस्टरहि होतां येण्यासारखें होतें. सावरकरांनी आपला हा विचार श्री. भाऊराव चिपळूणकरांना कळविला. आपला जावई बॅरिस्टर होण्यासाठी इंग्लंडला जाण्याचा प्रयत्न करीत असल्यामुळे त्यांनी दोन हजार रुपयांची मदत करण्यास आपण तयार असल्याचें सावरकरांना कळविलें. जव्हारचे राजे कृष्णशहा यांनीहि चिपळूणकरांच्या मदतींत भर घालण्यास मान्यता दिली. चिपळूणकरांचें पत्र येतांच ९ मार्च १९०६ रोजीं सावरकरांनी पं. शामजी कृष्णवर्मा यांच्याकडे आपला अर्ज धाडून दिला. नंतर त्यांनी लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे यांच्याकडून प्रशस्तिपत्रें घेऊन तींहि कृष्णवर्मा यांच्याकडे धाडलीं.

लोकमान्यांनी कृष्णवर्मांना लिहिलेल्या पत्रांत असें म्हटलें होतें की, 'अर्जदारांमध्ये मुंबईचा सावरकर नांवाचा तरुण आहे. तो गेल्या वर्षी पदवीधर झाला आहे. हा तरुण मोठा तडफदार असून स्वदेशीच्या कार्याबद्दलचा त्याचा उत्साह विलक्षण आहे. त्याच्या निर्भय वक्तृत्वामुळे गेल्या वर्षी त्याने फर्ग्युसन कॉलेजच्या प्रमुखांचा स्वतःवर दोष ओढवून घेतला होता. सरकारी नोकरी कधीहि करावयाची नाही असा त्याचा निश्चय आहे. त्याचें शीलहि प्रशंसनीय आहे.'

या सुमारास श्री. चिपळूणकरांसमवेत राजे कृष्णशहा यांची भेट घेण्यासाठी सावरकर जव्हारला गेले होते. या भेटींत जें बोलणें झालें त्या आधारें मुंबईला परतल्यानंतर त्यांनी कृष्णशहांना उद्देशून एक कविता लिहिली —

यद्यद्विभूति-द्युतिमत्सुसत्त्वम्
तत्तद्मदात्म-प्रभवं शृणुत्वम्

इति स्वयं श्रीभगवान् प्रसिद्धं
गीता-वधू रत्नमुवाच तत्त्वम्

श्रीमान् नृपा ! तूं द्युतिमान तसाची
विशिष्टता व्यक्त तुझ्यांत साची
चिदंश ते यास्तव ईश्वराचे
रूपीं तुझ्या व्यक्त असावयाचें

असें कृष्णशहांचें वर्णन करून सावरकर त्या नरेशाकडे एकच मागणी करतात —

म्हणोनि एक्या करी मागणीते
स्वार्थार्थ कांही नलगे मला तें
कमी तुम्ही नें मज काय केलें
व्हावें तरी मन्मन हें भुकेलें

परंतु की आर्यवसुंधरा ही
माता नृपा आपुली सुंदरा ही
गेलें तिचें तें तिज द्यावयातें
झटेन ह्या दे वचनासि माते

सावरकरांच्या अर्जाला शामजी कृष्णवर्मा यांजकडून मेच्या पहिल्या आठवड्यांत उत्तर आलें. या पत्रांत सावरकरांना शिवाजी शिष्यवृत्ति देण्यांत आल्याचें त्यांनी कळविलें होतें. या शिष्यवृत्तीनुसार सावरकरांना दर सहा महिन्याला चारशे रुपये याप्रमाणे अडीच वर्षांच्या लंडनमधील वास्तव्यासाठी दोन हजार रुपये दिले जाणार होते. या पत्रासोबत शिष्यवृत्तीसंबंधीच्या करारापत्राचा मसुदाहि धाडण्यांत आला होता. सावरकरांच्या वतीने साक्षीदार म्हणून या करारपत्रावर श्री. काकासाहेब खाडिलकर व श्री. दाजीसाहेब आपटे यांनी स्वाक्षऱ्या केल्या. हा करार पूर्ण झाल्यानंतर कृष्णवर्मा यांच्या पत्रानुसार टिळकांनी सावरकरांना चारशे रुपये दिले. पैशाची जुळवाजुळव झाल्यानंतर इंग्लंडला जाण्यासाठी सावरकरांनी मुंबई बंदरांत उभ्या असलेल्या 'पर्शिया' बोटीवर ९ जून १९०६ रोजीं पाय ठेवला.

इंग्लंडला जाण्याचा सावरकरांचा बेत इतक्या घाईघाईने ठरला की, इंग्रजी रीतिरिवाजांची माहिती करून घेण्याइतका किंवा इंग्रजी पद्धतीचे कपडे

शिवून घेण्याइतका त्यांना वेळ मिळाला नाही. बोटीच्या प्रवासाला तीन आठवडे लागणार होते. त्यामुळे या काळांत इंग्रजी रीतिरिवाजांची माहिती करून घेण्याचें त्यांनी ठरविलें. बोटीवर त्यांच्याबरोबर हरनामसिंग नांवाचा जो शीख तरुण प्रवास करीत होता तोहि बॅरिस्टर होण्यासाठीच इंग्लंडला चालला होता. आणखीहि आठ-दहा भारतीय प्रवासी होते. त्यांच्या मदतीने सावरकरांनी काट्या-चमच्याने जेवण करण्याचे धडे गिरविले. मांसाशनाचा प्रयोगहि त्यांनी याच काळांत करून पाहिला. मासे खातांना त्यांतले काटे कसे टाळावयाचे याचें प्रात्यक्षिक प्रारंभीं बरेच जड गेलें. त्यांनी पोषाखांतहि आमूलाग्र बदल केला' धोतराला राम राम करून कोट, पँट, हॅट, बूट असा इंग्रजी वेष परिधान केला कानांतल्या भिकबाळीला रजा देऊन टायची गाठ कशी बांधावयाची हेंहि हरनामसिंगकडून शिकून घेतलें. ,

हरनामसिंगला बोट लागली होती. शिवाय घरच्या आठवणींनी तो व्याकुळ झाला होता. संध्याकाळच्या वेळीं डेकवर सावरकरांशीं गप्पा मारतांना तो म्हणाला, " बोट एडनला थांबली की उतरायचें आणि दुसऱ्या बोटीने मायदेशीं परतायचें असें मीं ठरविलें आहे. " हरनामसिंगसारख्या तरुणाने घर सोडून दोन-तीन दिवस होत आहेत न होत आहेत तोंच कावरेबावरें व्हावें ही गोष्ट सावरकरांना रुचली नाही. हरनामसिंगसारख्या युवकांमधूनच आपल्याला लंडनमध्ये सहकारी शोधावयाचें असल्यामुळे त्याला मायदेशीं परतण्याच्या विचारापासून परावृत्त करण्याचें सावरकरांनी ठरविलें. ते त्याला सांगूं लागले, " आजच्यासारख्या बोटी आणि तारायंत्रें नव्हतीं त्या वेळीं इंग्लंडहून हिंदुस्थानला यावयास सहा महिने लागत आणि तेथे सुखरूप पोचल्याचें वृत्त घरीं पोचावयास वर्ष लागे. आणि तरीहि त्या काळीं घर अंतरेल म्हणून मुळमुळू रडत न बसतां शतावधि इंग्लिश तरुण हिंदुस्थानांत येत राहिले, लढत राहिले आणि आमची राज्यें पालथीं घालून त्यावर त्यांनी साम्राज्य उभारलें. आज त्यांचें तें साम्राज्य पालथें पाडून जर आम्हां हिंदी तरुणांना स्वदेश स्वतंत्र करावयाचा असेल तर, आम्हांस आमचीं हृदयें त्यांच्याहूनहि शतपटींनीं कठोर केलीं पाहिजेत. "

हरनामसिंगप्रमाणेच 'केशवानंद' आणि 'शिष्टाचारी' हे आणखी दोन भारतीय प्रवासी सावरकरांशीं चर्चा करीत असत. क्रांतिकार्याकडे त्यांनाहि

आकृष्ट करावें हा त्यांच्याशीं चर्चा करण्यामागचा सावरकरांचा उद्देश होता. सावरकर त्यांना वारंवार सांगत असत, ' स्वतःला पैसा मिळावा म्हणून बॅरिस्टर किंवा आय्. सी. एस्. होण्यासाठी आपण विदेशांत जात आहों असा तुच्छ आणि क्षुद्र हेतु हा कांही आपल्या जीवनाचें ध्येय होऊं शकत नाही. आजच्या आपल्या सर्व भारतीय तरुणांचें ध्येय हेंच की, आपल्या स्वदेशाच्या आणि स्वधर्माच्या पायांत ब्रिटिशांनी ज्या शृंखला ठोकलेल्या आहेत त्या तोडून टाकून आपल्या मातृभूमीला, आपल्या राष्ट्राला स्वतंत्र करण्यासाठी मरूं तरी किंवा जिंकूं तरी अशा प्रतिज्ञेने त्या परकीय शत्रूशीं झुंज द्यावी. त्यासाठी देशांत जीं आज नाहीत अशीं कांही महत्वाचीं कार्यें विदेशांत जाऊन साधावयाचीं आहेत. विदेशी जाण्याचा आपला मुख्य हेतु हाच असला पाहिजे. इतर हेतु केवळ निमित्तमात्र.'

सावरकर त्यांना गुरुगोविंदसिंगांपासून चाफेकर बंधूंपर्यंतच्या अनेक देशवीरांच्या आत्मबलिदानाच्या कथा सांगत; मॅझिनीचें चरित्र वाचावयास देत. सावरकरांच्या विवेचनाने 'केशवानंद' व 'शिष्टाचारी' इतके प्रभावित झाले की, पर्शिया बोटीवरच त्यांनी ' अभिनव भारता 'ची शपथ घेतली. त्यांच्यासाठी सावरकरांनी ' अभिनव भारता 'च्या मराठी शपथेचें इंग्रजी भाषांतर केलें.

In the name of God
In the name of Hindusthan, My Motherland and Fatherland
In the name of all those Seers and Sages,
Heroes aad Martyrs who had made our nation
So glorious and great and had battled viotoriously
For its Freedom and Honour in the past,
I … …

Convinced that it is the paramount duty and mission of my life to liberate my Motherland from the armed bondage in which the British Tyrant in holding her enchained and to win back Absolute Political Independence of our nation and that it is a cause atonce holy and human.

Convinced also that the only effective means which besides providing the sanction to all other political efforts of our people can also enable us to achieve that and, to offer an armed and organised resistance to the alien foe who will never let go his hold unless struck at every available point, secretly or openly and caught up in the last resort in the course of a relentless and exhaustive world war, he is forced to leave our shores at the point of the bayonet and bloodshed. Enlist myself as a member of 'Abhinava Bharat', the All India Revolutionary Secret Society, based on the above principles.

And pledge myself to fight under its revolutionary banner against the British Tyrants ever unto Death or Victory.

So Help me God.

'केशवानंद' व 'शिष्टाचारी' यांनी ' अभिनव भारता 'ची शपथ घेतल्यानंतर आपण लंडनला कां चाललों आहोंत हें सावरकरांनी त्यांना सांगितलें. ते म्हणाले, ' या संस्थेच्या वतीनेच मी वस्तुतः इंग्लंडला चाललों आहें. बॅरिस्टर होण्यास जात आहें हेंहि खोटें नसलें तरी तें निमित्त आहे. '

आय्. सी. एस्. किंवा बॅरिस्टर होण्यासाठी जे हुषार भारतीय तरुण इंग्लंडमध्ये येतील त्यांना क्रांतिकार्याची दीक्षा देणें, खुद्द लंडनमध्ये एखादें क्रांतिकारक कृत्य केलें तर त्याचे पडसाद साऱ्या युरोपभर पडण्याची शक्यता असल्यामुळे तसें एखादें कृत्य करणें, लंडन-पॅरिसमध्ये आसऱ्यासाठी आलेल्या रशियन क्रांतिकारकांकडून बॉंबविद्या हस्तगत करणें आणि शक्य झाल्यास इंग्लंडच्या शत्रु-राष्ट्रांशीं संधान बांधून महायुद्धासारखी एखादी संधि प्राप्त झाली तर त्या वेळीं हिंदुस्थानांत इंग्रजांविरुद्ध सशस्त्र उठाव घडवून आणणें अशीं चार प्रमुख उद्दिष्टें डोळ्यांसमोर ठेवूनच सावरकर इंग्लंडला निघाले होते. बोटीवरच दोन भारतीय तरुण ' अभिनव भारतां 'त दाखल झाल्यामुळे ईप्सित कार्याला प्रारंभ तर चांगला झाला होता.

बोटीवरील प्रवासांतहि सावरकरांना कधी कधी एकांताची लहर येई व त्या वेळीं ते डेकवरच्या एखाद्या कोपऱ्यांत बसून तासचे तास आत्मचिंतनांत निमग्न होत. आजूबाजूचा तो तटशून्य अथांग महासागर व वरचे ते तलशून्य अथांग आकाश पाहतांना विश्वाची ही अवाढव्य घडामोड कशासाठी चालली आहे, या प्रचंड घडामोडींत बापड्या बिचाऱ्या माणसाचें स्थान तरी कोणतें आहे की माणसाचें मन हेंच मुख्य असून ब्रह्मांडाचा भासमान होणारा हा सारा पसारा केवळ भास आहे की काय अशा तऱ्हेचे जटिल प्रश्न त्यांच्या तत्त्वचिंतक मनांत गोळा होत. या तत्त्वचिंतनाचें प्रतिबिंब त्यांनी अंदमानांत रचलेल्या 'महासागर' या काव्यांत पाहवयास सापडतें --

स्वच्छ शांत गगन नील, शांतवृत्ति हा
सांध्यसमाधिस्थ तेवि नील जलनिधी
नौका परि एक मात्र शांत जळीं ह्या
ही प्रवासपटु अशान्त गतियुता किती !
'कळत काय, हे नौक ! की प्रवास हा
कोठुनि तव आणि कुठे तें तुला बरें ?'
'हो हो कविराज, जिथुनि आणि की जहा
जेथ तुझा तूं प्रवास करिसी : हें खरें
जाणितसा जितुकें की मनुज हो तुम्ही
तितुकें तें नौकाही जाणतो अम्ही !'

तर्ककर्कश विचारांच्या समाधींत दंग असलेले सावरकरांचें मन नकळत काव्यप्रांगणांत प्रवेश करी आणि मग आकाशांतील चांदण्यांचा निराळाच अर्थ त्यांच्या कल्पनाशक्तीला प्रतीत होई. 'पर्शिया'च्या डेकवरच त्यांनी लिहिलेल्या 'समुद्र आणि आकाश यांच्या संपुटांतील चांदणी' या कवितेंत हा ललितमनोहर प्रतिभाविलास पाहवयास मिळतो --

आकाशाच्या ग्रंथसंग्रहालयासि अर्पियला
कालें ग्रंथ प्रचंड विश्वेतिहास जो लिहिला
रौप्यमुद्रांकित तद्भागा अनुक्रमे रचिले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले

अशा एखाद्या भव्योदात्त कल्पनेमागोमागच –

सुवर्णगौरा गौरीशीं हर लीलारत झाले
थाप पडे तो द्वारी श्रीहरि भेटाया आले
नग्ना गिरिजा लगबग धावे, सावरूं शालूला
हिसका बघुनी हार गळ्यांतील तटकन् तो तुटला
त्या हारांतील मोतीं सैरावैरा ओघळले
तयांचि तारे म्हणुनि ज्योतिषी भलेभले चकले

अशी एखादी शृंगारमधुर कल्पनाहि ते समर्थपणें मांडतात.

पर्शिया बोट मार्सेलिसच्या बंदराला लागल्यानंतर इंग्लंडला जाणारे उतारू तेथे उतरले. यापुढचा प्रवास प्रथम आगगाडींतून व नंतर छोट्याशा होडींतून करावयाचा होता. आगगाडी सुटावयास वेळ असल्यामुळे सावरकर मार्सेलिस पाहवयास निघाले. फ्रेंच राज्यक्रांतीच्या वेळीं याच मार्सेलिसमधील मूठभर क्रांतिकारकांनी 'मार्सेलेस' हें रणगीत गात पॅरिसच्या रोखाने धांव घेतली होती. इटलीचा राष्ट्रपुरुष मॅझिनी हा निर्वासित असतांना याच मार्सेलिसच्या आश्रयास आलेला होता. मार्सेलिसच्या रस्त्यांवरून हिंडतांना, मॅझिनीच्या वास्तव्याने पुनीत झालेली वास्तु पाहण्यासाठी त्यांच्या जिवाची तडफड होत होती. परंतु मार्सेलिस मॅझिनीला केव्हाच विसरून गेलें होतें. निराश मनःस्थितींतच सावरकर स्टेशनवर परतले.

चार वर्षांनी ते पुन्हा मार्सेलिसला येणार होते. अगदी वेगळ्या परिस्थितींत. आजच्या त्यांच्या भेटीची मार्सेलिसने दखल घेतली नव्हती. चार वर्षांनी सावरकर आणि मार्सेलिस हीं दोन्ही नावें साऱ्या जगभर गाजणार होती.

मार्सेलिसहून निघाल्यानंतर फ्रान्समध्ये अन्यत्र कोठेहि न थांबतां सावरकर थेट लंडनला गेले. २ जुलै १९०६ रोजीं ते शत्रूच्या शिबिरांत येऊन पोचले होते.

# ५

# शत्रूच्या शिबिरांत

लंडनला सावरकर 'इंडिया हाऊस 'मध्ये राहूं लागले. तेथे येणाऱ्या भारतीय विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची अल्प खर्चांत सोय व्हावी म्हणून पं. शामजी कृष्णवर्मा यांनी तें बांधलें होतें. सावरकर येण्याच्या आदल्या वर्षींच म्हणजे १ जुलै १९०५ रोजीं 'इंडिया हाऊस 'चें उद्‌घाटन झालें होतें. हायगेट विभागांत बांधण्यांत आलेल्या या वसतिगृहांत पंचवीस विद्यार्थ्यांच्या राहण्या-जेवण्याची सोय होती. शामजींची शिष्यवृत्ति घेऊन लंडनला येणाऱ्या विद्यार्थ्यांना आठवड्याला अवघे सोळा शिलिंग द्यावे लागत. 'इंडिया हाऊस' हें लंडनमधल्या भारतीय विद्यार्थ्यांच्या सभा-बैठकांचें केंद्र असल्यामुळे सावरकरांच्या कार्याच्या दृष्टीने तेथे राहणें विशेष सोयीचें होतें.

लंडनमधील दैनंदिन कार्यक्रमाची पूर्वव्यवस्था करण्यांत प्रारंभींचे दहा-पंधरा दिवस गेल्यानंतर सावरकरांनी बॅरिस्टरीचा अभ्यास सुरू केला. परंतु त्यांच्या दृष्टीने ही बाब अगदी जुजबी होती. 'अभिनव भारता 'चें आंतरराष्ट्रीय केंद्र स्थापन करण्यासाठी सहकाऱ्यांची निवड करून त्यांना क्रांतिकार्याची दीक्षा देण्याचें कार्य महत्त्वाचें होतें. इंग्लंडमधल्या प्रमुख राजकीय प्रवाहांचा मराठी वाचकांना परिचय व्हावा म्हणून ते 'काळ' आणि 'विहारी' या पत्रांसाठी बातमीपत्रें धाडूं लागले. परंतु केवळ बातमीपत्रें लिहून सावरकरांच्या लेखणीचें समाधान होण्यासारखें नव्हतें. नाशिकला शाळेंत शिकत असल्यापासून मॅझिनीच्या जीवनकार्याने ते प्रभावित झाले होते. गुप्त क्रांति-मंडळ्या स्थापून आपल्या

मातृभूमीस ऑस्ट्रियाच्या मगरमिठींतून मुक्त करणाऱ्या या स्वातंत्र्यवीराचे देशस्वातंत्र्याबद्दलचे अतिशय उदात्त विचार आपल्या देशबांधवांना कळावेत म्हणून लंडनला पोचल्याबरोबर सावरकरांनी मॅझिनीचें चरित्र लिहिण्याचें व त्याच्या लेखांचें भाषांतर करण्याचें कार्य हातीं घेतलें. 'इंडिया हाउस'चे व्यवस्थापक श्री. मुकर्जी यांच्यामार्फत त्यांनी मॅझिनीचें आत्मवृत्त आणि समग्र लेखसंग्रह या ग्रंथाचे सहाहि भाग मिळविले. मॅझिनीबद्दलची सावरकरांची भक्ति किती जाज्वल्य होती हे त्यांनी या चरित्राला लिहिलेल्या प्रस्तावनेवरून दिसून येतें. मॅझिनीच्या चरित्राचा अडीचशे पानांचा ग्रंथ त्यांनी अवघ्या दोन महिन्यात लिहून पुरा केला. या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेंत सावरकरांनी देशस्वातंत्र्यविषयक आणि क्रांतिविषयक आपले विचार इतक्या परिणामकारक शब्दांत कथन केले आहेत की, त्या काळीं महाराष्ट्रांतल्या असंख्य तरुणांनी ही प्रस्तावना मुखोद्गत केली होती. २८ सप्टेंबर रोजीं प्रस्तावना लिहून झाल्यानंतर सावरकरांनी या पुस्तकाचें हस्तलिखित श्री. बाबाराव सावरकर यांच्याकडे धाडून दिलें. पुण्याच्या जगद्धितेच्छु मुद्रणालयामध्ये १७ डिसेंबरपासून पुस्तकाच्या छपाईस सुरुवात झाली. अभिनव भारत मालेच्या वरिष्ठ विभागाचे पहिलें प्रकाशन म्हणून बाबांनी १९०७ च्या जूनमध्ये हें पुस्तक प्रसिद्ध केलें. पहिली दोन हजार प्रतींची आवृत्ति अवघ्या महिन्याभरांतच संपली इतका या पुस्तकाचा प्रकाशनापूर्वीच बोलबाला झाला होता. 'केसरी', 'काळ', 'विहारी' आदि पत्रांनी अग्रलेख लिहून सावरकरांच्या मॅझिनीचें सहर्ष स्वागत केलें. सावरकरांनीं आपला हा पहिला ग्रंथ लोकमान्य टिळक व 'काळ'कर्ते शि. म. परांजपे यांना अर्पण केला होता.

मॅझिनीची पहिली आवृत्ति महिन्याभरांत संपल्यामुळे बाबारावांनी लागलीच दुसरी आवृत्ति काढण्याचें ठरविलें. मॅझिनीच्या शब्दांत का होईना राज्यक्रांतीचा उघड उघड प्रचार करणाऱ्या या ग्रंथाचा प्रसार होणें ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या दृष्टीने आक्षेपार्ह होते व म्हणून सरकारने दुसऱ्या आवृत्तीची जाहिरात येतांच हा ग्रंथ जप्त केल्याचें जाहीर केलें. पुढे १९४६ मध्ये सावरकर-वाङ्मयावरील बंदी उठल्यानंतर 'मॅझिनी'ची नवी आवृत्ति प्रसिद्ध झाली. परंतु चाळीस वर्षे हा ग्रंथ जप्त असूनहि त्याची लोकप्रियता तिळमात्र ओसरली नव्हती. मॅझिनीसंबंधी सावरकरांच्या मनांत नितान्त आदर होता व म्हणूनच

त्यांनी ‘ भगवान् मॅझिनी ’ असा त्याचा आवर्जून गौरवोल्लेख केला आहे. एके ठिकाणीं ते म्हणतात, “ इटलींत जन्मलेल्या रामदासाला मॅझिनी म्हणतात आणि भारतांत जन्मलेल्या मॅझिनीला रामदास म्हणतात. ... परमेश्वरावरीं प्रत्येक देशाकरिता एकेक मॅझिनी ठेवला असेल तर कोणालाच इटलीचा हेवा करण्याचें कारण नाहीं ! ”

‘ अभिनव भारता ’च्या क्रांतिकार्यांत कोण सहभागी होऊं शकेल याचा अंदाज यावा म्हणुन प्रथम एखादी उघड संस्था स्थापन करणें आवश्यक होतें. या उद्देशाने सावरकरांनी ‘ फ्री इंडिया सोसायटी ’ची स्थापना केली व या सोसायटीमार्फत दर रविवारीं ‘ इंडिया हाऊस ’च्या सभागृहांत लंडनमधल्या हिंदी विद्यार्थ्यांच्या बैठकी भरूं लागल्या. सावरकर ‘मॅझिनी’चें लेखन करीत असतांना दर रविवारीं ‘सोसायटी’च्या बैठकीमध्ये मॅझिनीच्या कार्याचें विवरण करूं लागले. त्यांच्या भाषणानंतर प्रश्नोत्तर होत व तेव्हा सावरकर सशस्त्र उठावाचें आपलें तत्त्वज्ञान मोठ्या चातुर्याने विशद करीत असत. प्रश्नोत्तराच्या कार्यक्रमांतून त्यांना कोणता विद्यार्थी आपल्या कार्याकडे किती आकृष्ट झाला आहे हेंहि कळून येई.

ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध हळूहळू असंतोष निर्माण होत आहे हें आजूबाजूच्या घटनांवरून दिसून येऊं लागतांच भारतीय सैनिकांमध्ये आपण स्वातंत्र्यभावना उद्दीपित करावयास हवी असें सावरकरांना वाटूं लागलें व हें कार्य करण्यासाठी सुशिक्षित तरुणांनी इंग्रजांच्या सैन्यांत प्रवेश मिळविला पाहिजे, आधुनिक शस्त्रास्त्रें वापरण्याचें ज्ञान घेतलें पाहिजे आणि हाताखालच्या सैनिकांमध्ये स्वातंत्र्यासाठी उठाव करण्याची प्रवृत्ति निर्माण केली पाहिजे असें ते फ्री इंडिया सोसायटीच्या बैठकीमध्ये प्रतिपादन करूं लागले. याशिवाय ते स्वतः रात्रींच्या वेळीं बॉंब तयार करण्याची विद्या हस्तगत करण्याच्या प्रयत्नांत गढले होते.

साम्राज्यवादी राष्ट्रांविरुद्ध निर्माण होत असलेल्या असंतोषाला हिंडमन नांवाच्या इंग्रज समाजवाद्यानेहि आपल्या एका भाषणांत वाचा फोडली होती. तो म्हणाला, “ आशियांत आता राज्यक्रांति सुरू झाली असून ती कोणालाहि थांबवितां येणार नाही. हें मी नुसत्या अदमासाने सांगत नाही. जपानचा पुरावाच आपल्यासमोर आहे. या भातखाऊ बुटक्या राष्ट्राने मासखाऊ व अगड-

बंब रशियाला चित केलें तें या राज्यक्रांतीच्या बळावरच होय. राज्यक्रांतीचा हा प्रवाह आता जपानमधून चीनमध्ये शिरत आहे; नव्हे शिरला आहे. राज्य-क्रांतीचा हा एकच प्रवाह असेंहि नाही. परतंत्रांना स्वतंत्र करण्याची शक्ति असणारा राज्यक्रांतीचा आणखीहि एक प्रकार निर्माण झाला आहे. तो म्हणजे हिंदुस्थानमधील राजकीय जागृति हा होय. ”

हिंडमन यांच्या या व्याख्यानाच्या निमित्ताने सावरकरांनी आपल्या वातमीपत्रांत राज्यक्रांत्या आणि समाजक्रांत्या या अपरिहार्य आहेत याचें विवेचन केलें आहे. ते म्हणतात –

‘ कालाच्या उतरणीवरून अकल्पनीय जोराने आपटत आपटत कोसळ-णाऱ्या प्रपातांना क्रांति म्हणतात व समप्रदेशावर वाहत असणाऱ्या नदीप्रमाणे विश्ववृत्तीचे जे प्रगमनात्मक मंदौघ त्यांना उत्क्रांति म्हणतात. प्रवाह ही विश्वाची निसर्गवृत्तीच असल्याने, लवकर किंवा उशिरा, मूळ रूपाने किंवा रूपांतराने पण गतिशून्यांना चलन मिळूं लागतें. या चलनाच्या आरंभाला, निर्बंधाला फोडून बाहेर घुसणाऱ्या ओघाच्या पहिल्या धडकीला किंवा गतिशून्य मनुष्याच्या व कुजूं पाहणाऱ्या राष्ट्राच्या पायांना बद्ध करणाऱ्या शृंखला प्रगतीच्या घणाखाली तुटत असतांना, ताडकन् होणाऱ्या आवाजाला क्रांति असें म्हणतात व हा प्रतिक्रियेचा विशेष वेग कमी होऊन मूळ व सामान्य गति प्राप्त झाली म्हणजे या गतीने होणाऱ्या प्रगमनास उत्क्रांति म्हणतात. जगांतील धर्मक्रांति संपून हल्ली धर्माची उत्क्रांति सुरू आहे. परंतु जगाच्या राजकारणाची उत्क्रांति होण्यास शेकडो आपमतलबांचे व अन्यायांचे बंधारे अडथळे करीत असल्यामुळे अजून बऱ्याच राज्यक्रांत्या व समाजक्रांत्या अवश्य आहेत. ’

अशा रीतीने राज्यक्रांतीची आवश्यकता पटवून दिल्यानंतर भारताला अखेरीस स्वतःच्या सामर्थ्यावरच ही राज्यक्रांति घडवून आणावी लागेल हा विचार मांडतांना सावरकरांच्या लेखणीला आगळें वैभव प्राप्त झाल्याचें दिसून येतें –

‘ लोकांच्या कडेवर बसून तुला चालतां येण्याचें शिक्षण संपादन करतां येणार नाही. हिंडमन असे बोलले म्हणून हुरळून जाऊं नकोस. हिंडमन किंवा कोणीहि महात्मा जर खरी सहानुभूति दाखवीत असेल तर ती साभार स्वीकार. सहानुभूति स्वीकार पण मागूं नकोस. सन्माननीय आमंत्रण आल्यास जेवावयास

जा. पण आगंतुकी मात्र करूं नकोस. स्वतः कर्तबगारी करून अन्न संपादन कर. परमेश्वराने तुला भरतभूसारखी शेती दिली आहे. या विस्तीर्ण शेतीला गंगा, यमुना, गोदावरी, कावेरी, सिंधु व ब्रह्मपुत्रा हे अखंड कालवे देवाने तयार करून ठेवले आहेत. या दिव्य शेतींत या अखंड कालव्यांच्या पाण्याने तुझ्या पूर्वजाने धान्यच नव्हे, तर प्रत्यक्ष सोनें पिकविलें आहे. तूंच ही शेती करशील तर हींत सोनें पिकेल. परंतु दुसऱ्याचा नांगर हिच्यावर फिरला की, हींत प्लेग पिकेल, दुष्काळ पिकेल, पारतंत्र्य पिकेल! मग हा नांगर बाल्फरचा असो किंवा मोर्लेचा असो. ही देवाची शर्त तूं पाळलीस की हिंदुस्थानांत, पुढच्या हंगामांत तुझ्या या दिव्य शेतींत पाऊस पडो किंवा न पडो, कोहिनूर पिकतील, मयुरासनें पिकतील, कालिदास पिकतील, शिवाजी पिकतील!'

फ्री इंडिया सोसायटीच्या चर्चा-सत्रांतून सावरकराना ग्यानचंद वर्मा, एम्. पी. टी. आचार्य, हरनामसिंग, कोरेगावकर, व्ही. व्ही. एस्. अय्यर आदि सहकारी लाभले. या सहकाऱ्यांच्या साहाय्याने त्यांनी प्रथम लंडनमध्ये व नंतर पॅरिसमध्ये अभिनव भारताच्या शाखा स्थापन केल्या. हे सर्व सहकारी रात्रीं झोपावयास जाण्यापूर्वी एकत्र येत आणि एकस्वराने अभिनव भारताच्या राष्ट्रीय संकल्पाचा पुनरुच्चार करीत – 'हिंदुस्थानास स्वतंत्र करावयाचें, हिंदुस्थानास एकराष्ट्र करावयाचें, हिंदुस्थानास लोकसत्ताक करावयाचें आणि या हिंदुस्थानाची राष्ट्रभाषा हिंदी व राष्ट्रलिपी नागरी.'

हिंदुस्थानाच्या स्वातंत्र्यासाठी झुंजण्याची शपथ घेणाऱ्या आपल्या सहकाऱ्यांना सावरकर आपलें हें कार्य किती बिकट आहे याची कल्पना देत असत. घरदार, सुखसंपत्ति, नांवलौकिक यांचाच काय, पण सगळ्या त्यागांत कठीण असलेला प्रीति आणि प्राण यांचाहि त्याग करण्याची क्रांतिकारकाने तयारी ठेवली पाहिजे असें ते बजावीत. आपला शत्रु कोणी सामान्य नसून बलाढ्य आणि चतुर साम्राज्यसत्तेशीं आपल्याला झुंज द्यावयाची आहे असें सांगून ते म्हणत, 'साम्राज्य स्थापन करण्यास निघालेल्या जातींत जे गुण म्हणा वा दुर्गुण म्हणा विशेषत्वाने असावे लागतात ते ब्रिटिश जातींत उत्कटपणाने वसत आहेत. ते शूर आहेत तसे क्रूरहि आहेत जसे क्रूर आहेत तसे ते कपटीहि आहेत. बाहुबल हेंच त्यांचें बायबल आहे. आणि बाहुबलाप्रमाणेच

बुद्धिबलांतहि त्यांचा हात धरणारा आज तरी जगांतील इतर राष्ट्रांत कोणी नाही.'

इंग्रजांच्या लष्करांत चाकरी करीत असलेल्या आपल्या देशबांधवांना ब्रिटिश सत्तेविरूद्ध उठाव करण्याचें आवाहन करण्यासाठी आणि त्यांच्यांत स्वातंत्र्यासाठी लढण्याची आकांक्षा जागृत करण्यासाठी सावरकरांनी मॅझिनीचें चरित्र लिहून पुरें होतांच १८५७ च्या स्वातंत्र्यसमराचा इतिहास लिहिण्याचें ठरविलें. ब्रिटिश सरकारच्या दप्तरीं असलेलीं कागदपत्रें पाहून त्या वेळच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांनी या उठावाबाबतचीं जीं टिपणें लिहिलीं आहेत तीं वाचून या स्वातंत्र्यसंग्रमाचा तपशीलवार इतिहास लिहिण्यासाठी त्यांनी इंडिया हाऊसच्या श्री. मुकर्जी यांच्यामार्फत इंडिया ऑफिसमध्ये प्रवेश मिळविला. इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयांत १८५७ च्या संग्रामासंबंधी कागदपत्रांचा आणि पत्रव्यवहाराचा अक्षरशः ढीग पडला होता. हातीं आलेला प्रत्येक कागद आणि प्रत्येक पत्र नीट वाचून त्याचें टाचण करावयास प्रारंभ करतांच सावरकरांची अशी खात्री झाली कीं, हें युद्ध केवळ तात्कालिक असंतोषांतून निर्माण झालेलें बंड नसून भारतीय सैनिकांनी, संस्थानिकांनी आणि प्रांताप्रांतांतील जनतेने एकत्र येऊन परक्या इंग्रजी सत्ते-विरुद्ध प्राणपणाने केलेला तो स्वातंत्र्य-संग्रामच होता. इतकेंच नव्हे तर आपल्या मूळ कल्पनेपेक्षाहि अधिक विस्तृत प्रमाणावर, विशिष्ट उच्च ध्येयाने प्रेरित होऊन नि त्यासंबंधी पूर्वयोजना आखून या स्वातंत्र्यसंग्रामाची सिद्धता करण्यांत आली होती. ब्रिटिश सरकारच्या ग्रंथालयांत उपलब्ध झालेल्या इंग्रज नाग-रिकांच्या नोंदीवरूनच सावरकरांनी या ग्रंथाची रूपरेषा आखली. हा इतिहास लिहून सावरकरांना काय साधावयाचें आहे याचा इंडिया ऑफिसच्या अधिकाऱ्यांना सुगावा लागतांच त्यांनी सावरकरांचा परवाना काढून घेतला. परंतु या वेळेपर्यंत ग्रंथालयांत स्वातंत्र्यसंगरासंबंधी किती कागदपत्र आहेत व ते कोठे ठेवले आहेत हें सावरकरांना माहीत झालें होतें. त्यामुळे ते व्ही. व्ही. एस्. अय्यर याना ग्रंथालयांत धाडत व त्यांच्यामार्फत आपल्याला हवी असलेली माहिती मिळवीत.

या स्वातंत्र्यसंगराचें लेखन चालू असतांनाच या संगराची स्मृति जागृत ठेवण्यासाठी दरवर्षी १० मे रोजीं स्वातंत्र्यसंग्राम-स्मृतिदिन साजरा

करावा अशी कल्पना सावरकरांच्या मनांत आली. विशेषतः १९०७ मध्ये त्या संग्रामाची अर्धशताब्दी साजरी करण्यांत विशेष औचित्य होतें. सावरकरांच्या कल्पनेप्रमाणे हा उत्सव फार मोठ्या प्रमाणावर व्हावयाचा होता. परंतु अवधि थोडा असल्यामुळे या वर्षी हा उत्सव लहान प्रमाणावर साजरा करून पुढील वर्षी तो आपल्या कल्पनेप्रमाणे साजरा करण्याचें त्यांनी ठरविलें. १० मे १९०७ रोजीं नितिसेन द्वारकादास यांच्या ' टिळक हाऊस ' या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या निवासस्थानीं ' अभिनव भारता 'च्या वीस सदस्यांनी स्वातंत्र्य-संग्रामाचा स्मृतिदिन साजरा केला. या स्मृतिदिनाचें अध्यक्षस्थान अर्थातच सावरकरांनी भूषविलें होतें. या वेळीं त्यांनी या स्वातंत्र्य-संग्रामाचा इतिहास इतक्या ओजस्वी भाषेंत कथन केला कीं, त्यांच्या सहवासांत असणारे सहकारीहि चकित झाले.

सावरकरांना लंडनला येऊन आता जवळ जवळ एक वर्ष झालें होतें. या वर्षभरांतल्या त्यांच्या कार्याने पं. शामजी कृष्णवर्मा प्रभावित झाले होते. त्यांनी ' अभिनव भारता 'ची शपथहि घेतली होती. कांही काळ विश्रांति घेण्यासाठी कृष्णवर्मांनी ' इंडिया हाऊस 'ची सारी जबाबदारी सावरकरांवर सोपवून १९०७ च्या मे महिन्याच्या मध्यास पॅरिसला प्रयाण केलें. सारे ' इंडिया हाऊस ' हातीं आल्यानंतर सावरकरांच्या कार्याला अधिकच गति आली. सरदारसिंग राणा, मॅडम कामा प्रभृतींचाहि या काळांत परिचय झाला. दररोज सायंकाळीं भोजन आटोपलें कीं, सावरकरांचें मित्रमंडळ त्यांच्या खोलीवर जमे व शस्त्रास्त्रें कशीं गोळा करतां येतील, तीं भारतांत कशीं धाडतां येतील यासंबंधी चर्चा सुरू होई. या चर्चेंतूनच सेनापति बापट, हेमचंद्र दास व मिर्झा अब्बास यांनी पॅरिसला जाऊन रशियन क्रांतिकारकाकडून बॉम्बविद्या हस्तगत करावी असें ठरलें. त्यानुसार हे तिघेजण पॅरिसला गेले. तेथे त्यांना शामजी कृष्णवर्मा यांचें मार्गदर्शन लाभलें.

या वर्षी १८ ऑगस्टपासून जर्मनींतील स्टटगार्ट येथे आंतरराष्ट्रीय समाजवादी परिषद भरावयाची होती. या परिषदेंत भारतीय प्रतिनिधींनीहि भाग घेतला पाहिजे असें कृष्णवर्मा यांनी सावरकरांना सुचविलें. त्याप्रमाणे मॅडम कामा व सरदारसिंग राणा या परिषदेसाठी स्टटगार्टला रवाना झाले. परिषदेंत भारता च्या वतीने मांडावयाच्या ठरावाचा मसुदा कृष्णवर्मा यांनी तयार केला होता.

जर्मन समाजवादी पक्षाचे नेते हेर सिंगर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या परिषदेला निरनिराळ्या राष्ट्रांतून जवळ जवळ एक हजार प्रतिनिधि आले होते. भारताच्या स्वातंत्र्यलढ्याला जगांतील सर्व स्वातंत्र्यप्रेमी नागरिकांनी पाठिंबा द्यावा अशा आशयाचा मॅडम कामा यांनी मांडलेला ठराव टाळ्यांच्या गजरांत संमत झाला. त्या वेळीं कामाबाईंनी 'वंदे मातरम्' हा शब्द लिहिलेला हिंदुस्थानचा तीनरंगी राष्ट्रध्वज या परिषदेंत फडकविला.

पॅरिस येथील रशियन क्रांतिकारकांकडून बॉंबविद्या शिकून सेनापति बापट व हेमचंद्र दास लंडनला परतल्यानंतर या विद्येचा उपयोग कसा करावयाचा यासंबंधी 'इंडिया हाउस'मध्ये चर्चा सुरू झाली. ही विद्या भारतापर्यंत पोंचणें आवश्यक असल्यामुळे रशियन बॉंब मॅन्युअलचा इंग्रजी अनुवाद करण्यांत आला व त्याच्या सायक्लोस्टाईल केलेल्या प्रती हेमचंद्र दास व होतीलाल वर्मा यांच्याबरोबर भारताकडे धाडण्यांत आल्या. वर्मा १९०८ च्या फेब्रुवारीस पुण्याला पोंचल्यानंतर त्यांनी लोकमान्य टिळकांची भेट घेतली. वर्मा व दास यांच्यानंतर थोड्या दिवसांनी सेनापति बापटहि मायदेशीं परतले. 'वर्माबरोबर धाडलेलें पुस्तक मिळालें का?' असे त्यांनी लोकमान्यांना विचारलें असतांना लोकमान्यांकडून होकारार्थी उत्तर मिळालें होतें.

बॉंब मॅन्युअलच्या आधारें स्वतः बॉंब तयार केल्याशिवाय सावरकरांचें समाधान होणार नव्हतें. म्हणून त्यांनी इंडिया हाऊसच्या वरच्या माळ्यावर आपली प्रयोगशाळा उघडली व रात्रीं इतर विद्यार्थी झोपले की, आपल्या निवडक सहकाऱ्यांसह ते आपले प्रयोग सुरू करीत. रविवारची सुट्टी तर खास या प्रयोगासाठी राखून ठेवलेली होती. संध्याकाळीं फ्री इंडिया सोसायटीच्या बैठकीची वेळ झाली की, पिक्रीक ॲसिडने पिवळे झालेले हात न धुतांच घाईघाईने सावरकर तळमजल्यावरच्या सभागृहांत येत व आपलें भाषण सुरू करीत.

लंडन सोडण्यापूर्वी आपण तयार केलेल्या बॉंबचा लंडनमध्येच प्रयोग करावा असें सेनापति बापटांना वाटलें. म्हणून त्यांनी 'पार्लमेंटची बैठक चालू असतांना तेथे बॉंब टाकावा काय?' असें सावरकरांना विचारलें. बॉंब-विद्येचा पुरेसा प्रसार होण्यापूर्वी अशा एकाकी साहसाने कार्यभाग होण्याऐवजी कार्यनाशच होईल असें सावरकरांनी सांगितल्यामुळे बापट यांनी आपला बेत रद्द

केला. परंतु न जाणो बापट कोठे तरी आपल्या विद्येचा प्रयोग करून पाहतील अशी सावरकरांना शंका आल्यामुळे त्यांनी बापटांना तावडतोब मायदेशीं जाण्यास सांगितलें.

१९०८ च्या एप्रिलमध्ये ' १८५७ चें स्वातंत्र्यसमर ' या ग्रंथाचें लेखन पुरें झालें होतें. त्यामुळे २ मे रोजीं शिवजयंती साजरी केल्यानंतर सावरकरांनी १० मेच्या समारंभाची पूर्वतयारी सुरू केली. ब्रिटनमधल्या सर्व भारतीय नागरिकांना या समारंभाचें निमंत्रण धाडण्यांत आलें होतें.

वंदे मातरम् ।

१८५७ मधील भारताच्या राष्ट्रीय उत्थानाचा वर्षदिन
साजरा करण्यासाठी
रविवार, १० मे १९०८ रोजीं दुपारीं चार वाजतां इंडिया हाऊस,
६५, क्रॉमवेल ॲव्हेन्यु, हायगेट नॉर्थ
या ठिकाणीं इंग्लंडमधील सर्व भारतीयांची सभा होणार असून
आपण आपल्या मित्रांसह अवश्य उपस्थित राहवें.

कार्यक्रम

( १ ) राष्ट्रगीत ( २ ) प्रार्थना ( ३ ) बादशहा बहादूरशहा, श्रीमंत नानासाहेब पेशवे, राणी लक्ष्मीबाई, मौलवी अहमदशहा, राजा कुंवरसिंह आदि हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतीला श्रद्धांजलि ( ४ ) शपथग्रहण ( ५ ) अध्यक्षीय भाषण ( ६ ) प्रसाद-वांटप ( ७ ) राष्ट्रीय गीतें.

या समारंभाचें वर्णन सावरकरांनी आपल्या एका बातमीपत्रांत पुढील-प्रमाणे केलें आहे – ' इंडिया हाऊस 'चा हॉल या कार्याकरिता फारच सुंदर रीतीने शृंगारलेला होता. श्रोतृसमाजाचा समोरील बाजूला एक भव्य रक्तचित्र लावलेलें होतें व त्यावर पुष्पमालांच्या पंक्ति गुंफलेल्या होत्या. नानाविध रंगांच्या पुष्पमंडपांत अर्धा फूट जाडीच्या अक्षरांनी सोनेरी, हिरव्या, श्वेत व गुलाबी रंगांत राजा बहादूरशहा, श्रीमंत नानासाहेब, राणी लक्ष्मीबाई, मौलवी

अहमदशहा, राजा कुंवरसिंह व १८५७ सालीं झुंजलेले आणखी काही योद्धे या सर्वांचीं नांवें अभिनंदनार्थ स्मरण म्हणून लिहिण्यांत आलेलीं होतीं. या भव्य स्मृतिपटाच्या भोंवतीं निरनिराळ्या देशभक्तांच्या तसबिरीहि लावलेल्या होत्या. त्या हॉलमध्ये मनोहर पुष्पांच्या लहान झाडांच्या कुंड्या सर्वत्र मांडून ठेवलेल्या होत्या. उदबत्त्यांच्या सुवासाचा एकच दाट परिमल येऊन पेटीच्या सुस्वर स्वरांनी व दे. भ. वर्मा यांच्या राष्ट्रगीतगायनाने उदात्त स्फूर्तीचा संचार झाला होता.'

या समारंभाला लंडनबाहेरचे विद्यार्थीहि आले होते. त्यामुळे समारंभ सुरू झाला तेव्हा इतकी गर्दी झाली की, उशिरा आलेल्यांना बाहेर रस्त्यावरच उभें राहवें लागलें. समारंभांतील मुख्य भाषण सावरकरांनी केलें. त्यानंतर सत्तावनच्या युद्धांत धारातीर्थी पडलेल्या हुतात्म्यांचा जयजयकार करण्यांत आला. या समारंभासाठी मॅडम कामा यांनी पॅरिसहून पाठविलेला संदेश राणाजींनी वाचून दाखविला. संदेशासोबत कामाबाईंनी हुतात्मा स्मृतिनिधीसाठी पंचाहत्तर रुपये पाठविले होते. संदेशवाचनानंतर खान, दास, मास्टर, येरूळकर, रायपेन प्रभृति विद्यार्थ्यांचीं भाषणें झाल्यानंतर प्रसाद वांटण्यात आला. १८५७ मध्ये क्रांतीचा संदेश पोचविण्यासाठी चपात्या वांटण्यांत आल्या होत्या. त्या घटनेचें स्मरण म्हणून या वेळींहि चपात्यांचाच प्रसाद वाटला. एक महिनाभर सर्वांनी व्रतस्थ राहून आपल्या आवडत्या वस्तूचा त्याग करावा व त्यामुळे वांचणारा पैसा हुतात्मा स्मृति-निधीला द्यावा असेंहि आवाहन करण्यांत आलें. या हुतात्म्यांच्या स्मृतीसाठी वीरस्मृति-मुद्रा तयार करून घेण्यांत आल्या होत्या. सर्वांनी त्या महिनाभर आपल्या कोटावर लावाव्यात असेंहि ठरलें. समारंभाच्या निमित्ताने सावरकरांनी 'Oh Martyrs' व 'Grave Warning' अशीं दोन पत्रकें तयार केलीं होतीं, तीं उपस्थितांना देण्यांत आलीं. इंग्लंडची आंतरराष्ट्रीय बाजारांतील पत कमी होऊं लागली असल्यामुळे हिंदी नागरिकांनी इंग्रजी मालकीच्या बँकातून पैसे ठेवल्यास ते बुडण्याचा धोका आहे असा इशारा 'Grave Warning' या पत्रकांत देण्यांत आलेला होता. 'Oh Martyrs' हें पत्रक सत्तावनच्या हुतात्म्यांना उद्देशून लिहिण्यांत आलेलें होतें.

'आज १० मे हा दिवस आहे. हुतात्म्यांनो, भारताच्या रणांगणावर तुम्हीं स्वातंत्र्य-संग्रामांतील पहिली मोहीम १८५७मध्ये याच दिवशीं सुरू केली. आपल्या मातृभूमीला ज्या दास्यामुळे अवकळा आलेली होती त्या दास्याची जाणीव निर्माण झाल्यामुळे मायदेशाने त्या दिवशीं आपले खड्ग म्यानांतून बाहेर काढलें, त्याने आपल्या शृंखला ताडकन् तोडून टाकल्या आणि स्वातंत्र्य व स्वाभिमान यांच्या प्रीत्यर्थ त्याने पहिला घाव घातला. सहस्रावधि लोकांच्या कंठांतून 'मारो फिरंगीको' हा रणनाद निघाला तो याच दिवशीं!

'क्रांतियुद्ध सुरू झालें की, स्वातंत्र्य अगर मृत्यु यांच्याविना अन्य पर्याय उरतच नाही. तुमच्या स्फूर्तीने प्रेरित झालेले आम्ही १८५७ मध्ये तुम्ही सुरू केलेला संग्राम पुढे चालू ठेवण्याचा निर्धार करतों. सध्या लढाई थांबलेली असली तरी तह झाला आहे असें आम्ही मानीत नाही. तुम्ही ज्या लढाया खेळलांत त्या आपल्या स्वातंत्र्य-संग्रामांतील पहिल्या लढाया होत्या असेंच आम्ही मानतों. त्या लढायांतील पराभव म्हणजे कांही स्वातंत्र्य-संग्रामांतील अखेरचा पराभव नव्हे. कारण १० मे १८५७ रोजीं सुरू झालेला संग्राम १० मे १९०८ रोजींहि संपलेला नाही. कोणत्या तरी वर्षी १० मे हा दिवस असा उजाडेल की, त्या दिवशीं भारताचें भाग्य निश्चित झालेलें असेल!'

१० मेच्या समारंभानंतर अभिनव भारताचे सदस्य कोटावर वीरस्मृति-मुद्रा लावून लंडनमध्ये वावरूं लागले. मदनलाल धिंग्रा यांच्या इंग्रज स्नेह्याने कुचेष्टेने त्यांच्या कोटावरच्या वीरमुद्रेला हात लावतांच धिंग्रा इतके संतप्त झाले की, ते सुरा घेऊन त्या मित्राच्या अंगावर धांवून गेले. हरनामसिंग व आर. एम्. खान यांच्या प्राचार्यांनी या स्मृतिमुद्रेचा अवमानकारक उल्लेख केला म्हणून त्या दोघांनी प्राचार्यांसकट कॉलेजला रामराम ठोकला. समारंभांत ठरल्याप्रमाणे १० मे ते १० जून या महिनाभरांत सावरकर, व्ही. व्ही. अय्यर व डॉ. राजन् हे तिघे सदस्य हुतात्मा-स्मृति निधीसाठी पेट्या फिरवून मदत गोळा करीत होते. ते दर आठवड्याला स्वतःचे पंचवीस शिलिंग निधीसाठी बाजूला ठेवत होते. या वेळीं नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचें वास्तव्य लंडनला होतें. त्यामुळे सावरकर आणि अय्यर यांनी गोखल्यांची भेट घेऊन आपण लंडनमध्ये करीत असलेल्या कार्याची त्यांना माहिती सांगितली. परंतु

नेमस्त वृत्तीच्या गोखल्यांना सावरकर प्रभृतींचें क्रांतिकार्य रुचणें शक्यच नव्हतें. स्वातंत्र्य-संपादनासाठी सावरकर अनुसरत असलेल्या मार्गाबद्दल आपली नापसंती व्यक्त करण्यासाठी गोखल्यांनी हुतात्मा-स्मृति निधीला मदत करण्यासहि नकार दिला.

हा निधि गोळा करण्याच्या निमित्ताने सावरकर मध्यंतरीं पॅरिसलाहि जाऊन आले. शामजी कृष्णवर्मा, मॅडम कामा, राणाजी प्रभृतींशीं पुढील कार्याच्या दृष्टीने विचारविनिमय करणें हाहि पॅरिसला जाण्यामागचा हेतु होता. अभिनव भारताच्या सदस्यांना बॉंब तयार करण्याच्या शिक्षणाप्रमाणेच नेमबाजीचें शिक्षणहि दिलें पाहिजे या विचाराने सावरकरांनी डॉ. राजन् यांना रायफल क्लबचें सदस्यत्व स्वीकारण्यास सांगितलें. त्याप्रमाणे डॉ. राजन् नेमबाजीचे धडे गिरवूं लागले. परंतु लवकरच नेमबाजीचें शिक्षण घेण्यामागच्या राजन् यांच्या उद्देशाबद्दल रायफल क्लबच्या अधिकाऱ्यांना संशय आल्यामुळे त्यांनी राजन् यांचें सदस्यत्व रद्द केलें. राजन् यांनी जें कांही अर्धेमुर्धे शिक्षण घेतलें होतें त्याच्या आधारें त्यांनी सावरकरांना एअरगन वापरण्याचें तंत्र समजावून सांगितलें. जुलैच्या मध्यास ‘ अभिनव भारता ’च्या सदस्यांची सभा होऊन नव्या वर्षासाठी अध्यक्ष म्हणून सावरकरांची फेरनिवड झाली.

२३ जुलै १९०८ रोजीं, राजद्रोहाच्या आरोपाखाली लोकमान्य टिळकांना सहा वर्षें काळयापाण्याची शिक्षा झाली. हें वृत्त लंडनमध्ये पोचतांच, सावरकरांनी ब्रिटिश सरकारचा निषेध करण्यासाठी कॅक्स्टन हॉलमध्ये भारतीय नागरिकांची सभा बोलावली. या सभेचें अध्यक्षस्थान नामदार गोखले यांनी स्वीकारावें असें सावरकरांनी सुचविलें. परंतु अध्यक्षपदच काय, सभेला हजर राहण्यासहि त्यांनी नकार दिला. त्यामुळे या निषेध-सभेंत ना. गोखले यांच्या वर्तनाचा निषेध करणारा ठरावहि संमत करण्यांत आला.

टिळकांची शिक्षा आणि गोखल्यांचें वर्तन यासंबंधीची आपली प्रतिक्रिया सावरकरांनी त्या वेळच्या बातमीपत्रांत पुढीलप्रमाणे नमूद केली आहे –

‘ महाराष्ट्राच्या विभूषणाला, आर्यधर्माच्या अभिमानाला, नीतिमत्तेच्या निपुणतेला व स्वदेशप्रीतीच्या उद्भवाला – त्या बाळ गंगाधर टिळकांना – काळ्या-पाण्यावर धाडण्याची शिक्षा झाल्यापासून ज्याच्या हृदयांत त्वेष आलेला

नाही व ज्याच्या मस्तकांत भयंकर खळबळाट झालेला नाही असा खऱ्या अंतःकरणाचा एकहि हिंदु आढळणें दुर्मिळ आहे. ... दे. भ. गोपाळराव गोखल्यांसंबंधी अजूनपर्यंत जी कांही पूज्यबुद्धि लोकांत आहे तिच्या योगाने लोक त्यांच्या हजेरी-गैरहजेरीस महत्त्व देत असतात. परंतु सर्व राष्ट्राच्या स्वयंस्फूर्त विचाराला व मनोवृत्तीला टिळकांच्या हद्दपारीसारख्या अत्यंत कोमल प्रसंगीं असा निरर्थक अडथळा करून त्यांनी काय महत्त्वाची देशसेवा बजावली तें गोपाळरावांचें गोपाळरावांनाच माहीत.'

ना. गोखल्यांचा नेमस्त मार्ग सावरकरांना परिणामशून्य वाटे आणि म्हणून त्यांनी आपल्या लिखाणांतून आणि भाषणांतून नेमस्तांच्या 'आराम-खुर्ची'च्या राजकारणावर कडाडून टीका केली असली, तरी गोखल्यांची देशसेवेची तळमळ, त्यांची बुद्धिमत्ता, त्यांचें निःस्पृह चारित्र्य आदि गुणांबद्दल सावरकरांच्या मनांत आदराचीच भावना होती हें ना. गोखल्यांच्या मृत्यूनंतर, त्यांनी अंदमानांतून आपल्या बंधूंना लिहिलेल्या पत्रावरून दिसून येतें. या पत्रांत ते म्हणतात – 'नामदार गोखल्यांना मृत्यूने गाठलें हें वाचून फार वाईट वाटलें. ते फार मोठे देशभक्त होते यांत शंका नाही. प्रसंगीं भांबावल्यामुळे कधी कधी त्यांच्या तोंडांतून असे उद्‌गार निघून जात आणि हातून अशा कांही गोष्टी होऊन जात की, त्यांविषयी नंतर त्यांना लाज वाटे. परंतु त्यांचें सर्व जीवन मातृभूमीच्या सेवेला समर्पिलेलें होतें आणि स्वार्थमूलक किंवा व्यक्तिविषयक असें त्यांच्या वागण्यांत फार थोडें असें हें आपण विसरतां कामा नये. त्यांच्या कल्पनेप्रमाणे त्यांनी मातृभूमीच्या सेवेंत आणि तिचें कल्याण करण्यांत आपलें आयुष्य व्यतीत केलें. मृत्यूने आमची कायमची ताटातूट करण्यापूर्वी त्यांची भेट व्हावी आणि पूर्वी लंडनमध्ये त्यांनी म्हटल्याप्रमाणे आम्ही एकमेकांचे अनुभव ताडून पाहवेत अशी माझी फार इच्छा होती. लंडनमधील चर्चेच्या वेळीं कांही बाबतींत आमचें एकमत होईना तेव्हा ते म्हणाले होते, 'सावरकर, आपण सहा वर्षांनी भेटूं व परस्परांचे अनुभव ताडून पाहूं.' त्यांनी जितकें कार्य केलें तितकें जरी प्रत्येक हिंद-वासियाला करतां आलें तरी किती महान् कार्य होईल!'

स्वातंत्र्यसाधनेच्या आपल्या प्रयत्नांत जसे सैनिकांना सहभागी करून घेतलें पाहिजे तसेंच संस्थानिकांनाहि या कार्यांतील महत्त्वाचा वांटा उचलण्यास

प्रवृत्त करावयास हवें हा विचार सावरकरांच्या मनांत घोळत होता. त्यामुळे १९०८ च्या उन्हाळयांत नेपाळचे प्रधानमंत्री चंद्रसमशेर जंगबहादूर लंडनला आलेले असतांना सावरकरांनी त्यांची भेट घेतली. या भेटीपूर्वी जंगबहादुरांना जें पत्र धाडण्यांत आलें त्यांत असें म्हटलें होतें की, ' हिंदुस्थानच्या स्वातंत्र्य-संग्रामांत आपण उघड पुढाकार घ्याल तर हा भारतीय साम्राज्याचा मुकुट आपल्या मस्तकावर विराजूं लागेल. आपण हिंदुस्थानचे व्हिक्टर इमॅन्युएल व्हाल! साहस तेवढें करा.' या पत्रावर ' अभिनव भारता 'च्या सदस्यांनी रक्ताने स्वाक्षऱ्या कराव्यात असें सावरकरांनी सुचवितांच धिंग्रा यांनी आपलें बोट कापलें.

वंगभंगविरोधी आंदोलनामुळे देशांत एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली म्हणून १६ ऑक्टोबरचा वंगभंग-निषेधदिन लंडनमध्येहि साजरा करण्याचें ठरलें. फ्री इंडिया सोसायटीच्या वतीने लाला लजपतरायांच्या अध्यक्षतेखाली कॅक्स्टन हॉलमध्ये भरलेल्या सभेंत डॉ. कुमारस्वामी, बिपिनचंद्र पाल, दादासाहेब खापर्डे व दादासाहेब करंदीकर यांचीं भाषणें झालीं. या सभेच्या निमित्ताने रक्षाबंधनाचा कार्यक्रमहि आयोजित करण्यांत आला होता. या सभेनंतर मंचरजी भावनगरी यांच्या अध्यक्षतेखाली दक्षिण आफ्रिकेंतील हिंदी नागरिकांविषयी सहानुभूति व्यक्त करण्यासाठी दुसरी सभा भरली. या सभेंतहि लाला लजपतराय, सावरकर, दादासाहेब खापर्डे, बिपिनचंद्र पाल प्रभृतींनी भाग घेतला होता.

'१८५७ चें स्वातंत्र्यसमर' लिहिल्यानंतर 'शिखांचा इतिहास' लिहिण्याच्या दृष्टीने सावरकरांनी वाचन सुरू केलें. शीख वीरवरांपैकी गुरु गोविंदसिंहांच्या जीवन-चरित्राने सावरकर अक्षरशः भारून गेले होते. त्यामुळे २९ डिसेंबर रोजीं गुरु गोविंदसिंहांची जन्मतिथीहि अभिनव भारताच्या वतीने मोठ्या उत्साहाने साजरी करण्यांत आली. तलवारीवांचून तत्त्वहि दुबळें ठरतें हाच गोविंदसिंहांच्या जीवनाचा निष्कर्ष होय, अशा आशयाचे विचार सावरकरांनी गोविंदसिंहांच्या जीवनांतील अनेक प्रसंग कथन करून प्रदर्शित केले. बिपिनचंद्र पाल यांनीहि गोविंदसिंहांच्या स्मृतीला श्रद्धांजलि वाहिली. शिखांचा इतिहास लिहिण्याच्या निमित्ताने सावरकरांनी पंजाबी भाषा व गुरुमुखी लिपी आत्मसात केली होती. त्या अभ्यासाच्या आधारें त्यांनी गोविंदसिंहांच्या

जन्मतिथीचा प्रसंग साधून या शेवटच्या शीख गुरुच्या जीवनाचा संदेश कथन करणारीं पत्रकें गुरुमुखी लिपींत लिहून घेऊन ती शीख पलटणींमध्ये वाटण्यासाठी भारतांत रवाना केलीं. या सभेमध्ये सावरकरांनी ' प्रियकर हिंदुस्थान ' —ही आपली नवी कविताहि म्हटली.

सकल जगामधि छान, अमुचे प्रियकर हिंदुस्थान
पुण्यभूमि तूं, पितृभूमि तूं, तूं अमुचा अभिमान

असा या कवितेचा मुख्य आशय होता.

पॅरिसच्या मुक्कामांत सावरकरांनी खरेदी केलेली एकवीस ब्राउनिंग रिव्हॉल्व्हर्स व काडतुसें इंडिया हाउसमध्ये १९०९ च्या प्रारंभीं येऊन पोचलीं. ' इंडिया हाउस 'मधला आचारी चतुर्भुज याच्याबरोबर तीं भारतांत धाडण्याचें सावरकरांनी ठरविलें. त्याप्रमाणे चतुर्भुज १५ फेब्रुवारी रोजीं लंडनहून निघाला व ७ मार्चला मुंबईला पोचला. बोटीवरून उतरण्यापूर्वी चतुर्भुजच्या सामानाची तपासणी करण्यांत आली. परंतु हीं रिव्हॉल्व्हर्स त्याच्या सामानामध्ये इतक्या खुबीने दडविण्यांत आलीं होतीं कीं, तपासणी करणाऱ्या अधिकाऱ्याना त्यांचा सुगावा लागला नाही. त्यामुळे चतुर्भुज सुखरूपपणें सरदारगृहांत येऊन उतरला. रिव्हॉल्व्हर्स घेऊन चतुर्भुज निघाला आहे हें बाबाराव सावकरांना माहीत होतें. फेब्रुवारीच्या मध्यास सावकरांच्या पहिल्या मुलाचें – प्रभाकराचें – निधन झाल्यामुळे सारे कुटुंबीय खिन्न मनःस्थितींत होते. तरी पण तें दुःख बाजूला ठेवून फेब्रुवारीच्या शेवटीं बाबा मुंबईस आले. बाबांच्या हालचालींची नेमकी माहिति पोलिसांना मिळाली नसली तरी त्यांना संशय आला होता व म्हणून त्यांनी २८ फेब्रुवारी रोजीं माधवाश्रमांत बाबांना अटक केली. ठरल्याप्रमाणे बाबा सरदारगृहांत भेटावयास न आल्यामुळे चतुर्भुज माधवाश्रमांत गेला. तेथे बाबांची भेट झाली नाही म्हणून त्याने ते पार्सल वि. म. भट यांच्या सल्ल्याने गोपाळराव पाटणकर यांच्या बिऱ्हाडीं पोचविलें. नंतर पाटणकरांनी हीं रिव्हॉल्व्हर्स पेणला धाडून दिलीं.

सावरकरांच्या सहकाऱ्यांमधील मदनलाल धिंग्रा हा पंजाबी तरुण अतिशय मनस्वी स्वभावाचा होता. एकदा इंडिया हाऊसमध्ये गप्पा चालल्या असतांना कोणी तरी जपानी लोकांच्या शौर्यासंबंधी गौरवोद्गार काढतांच धिंग्राजी गरजले,

' आम्ही हिंदु लोकहि कांही कमी शूर नाही ', शब्दावरून शब्द वाढला आणि प्रकरण पैजेवर गेले. मदनलालजींनी आपला तळहात पुढे केला. त्यांच्याशीं वाद घेणाऱ्याने त्या तळहातावर टाचणी ठेवली व संपूर्ण टाचणी त्यांच्या तळव्यांत घुसवण्यांत आली. तळव्यांतून भळभळा रक्त वाहूं लागलें. परंतु धिंग्रा यांनी आपला तळवा किंचित् देखील हलवला नाही. त्यांच्या साहसी वृत्तीचा असाच आणखी एक प्रसंग सावरकरांच्या ध्यानांत होता. ' इंडिया हाऊस '-च्या वरच्या माळ्यावर रात्रींच्या वेळीं बॉंब तयार करण्याचा प्रयोग चालू होता. शेगडीवरचे रसायन उकळूं लागलें. तें तावडतोब खाली उतरवावयास हवें होतें. पण सावरकरांना चिमटा सापडेना. कांही क्षणांचा उशीर झाला असता तर स्फोट होण्याची शक्यता होती. आता काय करावें या विचारांत सावरकर असतांना धिंग्रा यांनी आपल्या हातांनी तें भांडें खाली उतरविलें; त्या वेळीं त्यांचा सारा तळहात भाजून निघाला होता. धिंग्रा यांच्या या सांहसी वृत्तीमुळे त्यांच्या हूडपणाकडे सावरकर दुर्लक्ष करीत असत.

' इंडिया हाउस 'च्या तळमजल्यावरच्या सभागृहामध्ये सावरकरांचें भाषण चालू असतांना ही स्वारी इंग्रजी प्रेमगीतांच्या ध्वनिमुद्रिका ऐकण्यांत दंग झाली होती. भाषणांत व्यत्यय आल्यामुळे चिडलेले सावरकर बाहेर आले व धिंग्राना म्हणाले, " हौतात्म्याच्या आणि शौर्याच्या गोष्टी बोलतोस आणि आंत चर्चा चालू असतांना तिला हजर राहण्याऐवजी बाहेर गाण्यांत रंगून जातोस ! " सावरकरांचे हे शब्द ऐकतांच धिंग्रा तेथून निघून गेले. तेंव्हापासून सावरकरांचे ते शब्द सतत त्यांच्या कानांत घुमत होते. चार-पांच दिवसांनी ते इंडिया हाऊसमध्ये आले आणि त्यांनी सावरकरांना विचारले, " हौतात्म्य गाजविण्याची वेळ आली आहे असें तुम्हांला वाटतें काय ? "

" हुतात्म्याची मनाची तयारी झाली की हौतात्म्य गाजविण्याची वेळ आलेली असते " सावरकर उत्तरले.

यानंतर बराच वेळ ते दोघे बोलत होते. इतकेंच नव्हे तर त्यानंतर धिंग्रा दररोज संध्याकाळीं सावरकरांना भेटण्यासाठी ' इंडिया हाऊस 'मध्ये येऊं लागले. इंजिनियरिंग कॉलेजांतील धिंग्रा यांचे सहकारी कोरेगावकरहि त्यांच्याबरोबर येत असत. या भेटीगाठी चालू असतांनाच धिंग्रा यांनी सातबारी बोल्ट रिव्हॉल्व्हर खरेदी केले. एका इंग्रज मित्राच्या साहाय्याने ते नेमबाजीचा सराव करूं

लागले. मध्यंतरींच्या काळांत आपल्या हालचालींचा 'इंडिया हाउस'ला उपसर्ग पोचूं नये म्हणून सावरकर बिपिनचंद्र पाल यांच्याकडे राहवयास गेले.

धिंग्रा यांनी इंडियन नॅशनल ॲसोसिएशनचें सदस्यत्व स्वीकारल्यानंतर फ्री इंडिया सोसायटीच्या बैठकींत त्यांच्या निषेधाचा ठराव चर्चेसाठी आला. कारण इंडियन नॅशनल ॲसोसिएशन ही संस्था इंग्रजांनी स्थापन केली असून इंग्रजी राज्याची महती हिंदी तरुणांच्या मनावर बिंबविणें हें तिचें कार्य होतें. धिंग्रा यांनी त्या ॲसोसिएशनचें सदस्यत्व कां स्वीकारलें आहे हें सावरकरांना माहीत असल्यामुळे धिंग्रा यांच्या वर्तनाबद्दल त्यांच्याकडून खुलासा मागवावा व तो येईपर्यंत त्यांच्या निषेधाचा ठराव मतास टाकूं नये अशी उपसूचना सावरकरांनी मांडली व ती मंजूरहि झाली.

नॅशनल इंडियन ॲसोसिएशनचा वार्षिक समारंभ १ जुलै रोजीं रात्रीं ९ वाजतां इंपीरियल इन्स्टिटयूटच्या जहांगीर हॉलमध्ये साजरा होणार असल्याचें जाहीर होतांच या समारंभाला कोण कोण हजर राहणार आहेत याची धिंग्रा यांनी माहिती मिळविली. तीन रिव्हॉल्व्हर्स, एक खंजीर व एक सुरा एवढीं आयुधें आपल्या खिशांत घालून धिंग्रा या समारंभाला हजर राहिले. अकरा वाजतां समारंभ संपल्यानंतर सर कर्झन वायली ओव्हरकोट घेण्यासाठी तळ-मजल्यावरच्या खोलींत शिरले. मदनलालजी तेथे आले व वायली यांना कांही तरी सहज विचारूं लागले. भोवतालच्या गोंगाटांत धिंग्रांचा आवाज ऐकूं येईना म्हणून वायली थोडेसे खाली वांकले. लागलीच धिंग्रा यांनी खिशांतील रिव्हॉल्व्हर काढून वायली यांच्यावर लागोपाठ चार गोळ्या झाडल्या. गोळ्यांचा आवाज ऐकतांच त्या खोलींत एकच गोंधळ उडाला. रिव्हॉल्व्हरचे बार ऐकतांच डॉ. कावस लालकाका धांवत धांवत तेथे आले तो मदनलाल यांनी पांचवी गोळी त्यांच्यावर झाडली. वायली आणि लालकाका रक्ताच्या थारोळ्यांत खाली पडले होते. शेवटच्या सहाव्या गोळीने स्वतःचा जीव घेण्याचा मदनलाल यांचा विचार होता. त्यांनी रिव्हॉल्व्हर आपल्या छातीच्या रोखाने वळवितांच शेजारीं उभ्या असलेल्या सर लेस्ली प्रोबिन यांनी त्यांचा उजवा हात पकडला. आपल्या डाव्या हाताने खिशांतले दुसरें रिव्हॉल्व्हर काढण्याचा मदनलालजी प्रयत्न करीत असल्याचें पाहतांच प्रोबिन यांनी त्यांचा दुसरा हात पकडला. दोघांची झटापट सुरू झाली. परंतु मदनमोहनसिंह हा हिंदी

विद्यार्थी प्रोबिन यांच्या मदतीस धांवून आल्यामुळे मदनलालजींचा निरुपाय झाला. मदनमोहनसिंहाने त्यांच्या हातांतील रिव्हॉल्व्हर काढून घेऊन त्यांना जमिनीवर उताणे पाडलें. अशाहि परिस्थितींत मदनलाल हसत हसत म्हणाले, " प्लीज, तेवढा चष्मा घेऊं दे ना मला. "

वायली जागच्या जागींच मरण पावले होते. लालकाकांच्या शरिरांत धुगधुगी होती म्हणून त्यांना रुग्णालयांत नेण्यांत आले. परंतु वाटेंतच ते मरण पावले. पोलिसांनी मदनलालांची झडती घेऊन त्यांना ताब्यांत घेतले. तेथे हजर असलेल्या डॉक्टरांपैकी एकाला मदनलाल यांची नाडी तपासण्यास सांगण्यांत आलें. हा सर्व प्रकार झाल्यानंतरहि मदनलाल इतके निर्विकार व शांत होते की, त्यांच्या नाडीचे ठोके नेहमीसारखे पडत होते. ही सर्व प्राथमिक तपासणी झाल्यानंतर मदनलाल यांना वॉल्टन स्ट्रीट पोलिस-ठाण्यावर नेण्यांत आलें. तेथे पोचतांच मदनलाल शांतपणाने झोपीं गेले. दुसऱ्या दिवशीं त्यांना वेस्टमिन्स्टर पोलिस-कोर्टापुढे हजर करण्यांत आलें. पोलिसांनी तपासणी-साठी आठवड्याची मुदत मागून घेतली व मदनलालजींची कच्च्या कैदेंत रवानगी झाली.

धिंग्रा यांच्या या कृत्याचा निषेध करण्याची लंडनमधील हिंदी नाग-रिकांना घाई झाली होती. म्हणून ५ जुलै रोजीं आगाखान यांच्या अध्यक्षते-खाली कॅक्स्टन हॉलमध्ये सभा बोलावण्यांत आली. ३ जुलै रोजीं न्यू रिफॉर्म क्लबमध्ये सुरेंद्रनाथ बानर्जींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या निषेध-सभेला सावरकर उपस्थित राहिले नव्हते. परंतु ५ जुलैच्या सभेला हजर राहण्याचें त्यांनी ठरविले. एम्. पी. टी. आचार्य, व्ही. व्ही. एस्. अय्यर, ग्यानचंद्र वर्मा प्रभृति मित्रांसह सावरकर त्या सभेला गेले. प्रारंभीं धिंग्रा यांच्या कृत्याच्या निमित्ताने अनेक वक्त्यांनी क्रांतिकारकांच्या प्रयत्नांवर तोंडसुख घेतलें. त्यानंतर धिंग्रा यांच्या कृत्याचा निषेध करणारा ठराव अध्यक्षांनी वाचून दाखविला. हा ठराव एकमताने मंजूर झाल्याचें मी जाहीर करतों असें अध्यक्ष म्हणतांच सावरकर उभे राहिले व म्हणाले, " एकमताने नाही. कांही जणांचा विरोध आहे. " सावरकरांच्या या विरोधाने सारी सभा चपापली. धिंग्राजींच्या कृत्या-मागे कोणाची प्रेरणा होती हें अनेकांना माहीत होतें. परंतु तरीहि भरसभेंत सावरकर असा विरोध करतील याची कोणालाच कल्पना नव्हती.

सावरकरांनी आपला ठरावाला कां विरोध आहे हें सांगावयाचा प्रयत्न करतांच सभेंत गोंधळ सुरू झाला. सावरकर आपल्या जागेवरून अध्यक्षांना उद्देशून कांही तरी सांगत होते. परंतु गोंधळांत तें ऐकूं येईना. यांत भर म्हणूनच की काय, सावरकरांच्या शेजारीं उभा असलेला पामर नांवाचा इंग्रज त्यांच्या अंगावर धावून आला व त्याने त्यांच्या डोळ्याजवळ ठोसा मारला. या प्रहारामुळे सावरकरांच्या डोळ्याजवळून रक्त येऊं लागलें. तरीहि ते आपला कां विरोध आहे हें सभेला पटवून देण्याचा प्रयत्न करीत होते. पामरच्या या आततायी कृत्यामुळे सावरकरांच्या पाठीमागे बसलेले तिरुमल्लाचार्य चिडले व त्यांनी आपल्या हातांतील काठीचा तडाखा पामरच्या डोक्यावर हाणला. त्याच्याहि डोक्यांतून रक्त वाहूं लागलें. पामरला तडाखा हाणणाऱ्या तिरुमल्लाचार्यांचा गळा पकडण्याचा एक शीख तरुण प्रयत्न करीत आहे हें पाहतांच व्ही. व्ही. एस्. अय्यर यांनी आपल्या खिशांतून रिव्हॉल्व्हर काढलें. परंतु तें परत आंत ठेवण्याची सावरकरांनी त्यांना खूण केली. एवढें सारें होईपर्यंत पोलिस आले व त्यांनी सभा बरखास्त झाल्याचें जाहीर करून उपस्थितांना घरीं जाण्यास सांगितलें.

या मारामारीच्या संधीचा फायदा घेऊन आधीच आपल्यावर टपलेले पोलिस आपल्याला अधिकच त्रास देऊं लागतील म्हणून सावरकरांनी घरीं जातांच धिंग्रा यांच्या निषेधाच्या ठरावाला आपला कां विरोध होता या-संबंधी खुलासा करणारें पत्र लंडन टाइम्सकडे धाडलें व त्या वृत्तपत्राने आपल्या दुसऱ्या दिवशींच्या अंकांत तें प्रसिद्ध केलें.

धिंग्रा यांनी अद्याप कबुलीजबाब दिला नसल्यामुळे व न्यायालयानेहि त्यांच्यावर खुनाचा आरोप देखील ठेवला नसल्यामुळे ते गुन्हेगार आहेत असें जाहीर विधान करण्याने आपण न्यायालयाचा अवमान करीत आहोंत ही वस्तु-स्थिति अध्यक्षांच्या कानांवर घालतां यावी म्हणून आपण ठरावाला विरोध केला असा खुलासा सावरकरांनी या पत्रांत केला होता.

१० जुलैपासून धिंग्रा यांच्यावरील खटल्याची प्राथमिक सुनावणी सुरू झाली. पोलिस आपला साक्षीपुरावा मांडत असतांना धिंग्रा शांतपणे बसून होते. कच्च्या कैदेंत असतांना त्यांनी पोलिसांना लेखी निवेदन दिलें होतें. परंतु

पोलिस तें दडवून ठेवत आहेत असें आढळतांच धिंग्रा यांनी न्यायालयांत नवें निवेदन केलें. ते म्हणाले, "व्यक्तिशः माझ्या बचावासाठी मला कांहीहि म्हणावयाचें नाही. पण माझें कृत्य न्याय्य कसें आहे हें सिद्ध करण्यासाठी मी कांही गोष्टी सांगूं इच्छितों. माझें असें म्हणणें आहे की, मला अटक करून कारावासांत ठेवण्याचा वा देहान्त शासन करण्याचा अधिकार कोणत्याहि इंग्रजी न्यायालयाला नाही. आणि म्हणूनच मी वकील दिलेला नाही. जर्मनांनी इंग्लंड जिंकल्यास त्यांच्याविरुद्ध झगडणारा इंग्रज जर देशाभिमानी ठरणार असेल तर इंग्रजांविरुद्धचा माझा झगडाहि तितकाच न्याय्य व देशाभिमानाचा आहे. कारण गेल्या पन्नास वर्षांत माझ्या आठ कोटि देशबांधवांचे खून झाले असून त्याला इंग्रजच जबाबदार आहेत. मीं जें कांही केलें तें माझी मातृभूमि स्वतंत्र व्हावी या हेतूने केलें असल्यामुळे मी दयेची याचना करीत नाही. इंग्रज लोकांनी मला देहान्ताची शिक्षा द्यावी अशीच माझी इच्छा आहे. कारण तसें झालें तरच माझ्या देशबांधवांची सूड घेण्यांची प्रवृत्ति अधिक तीव्र होईल."

साऱ्या इंग्लंडमध्ये धिंग्रा-प्रकरण चर्चिलें जात असतांनाच सावरकर बॅरिस्टरीची परीक्षा उत्तीर्ण झालें व त्यांना सनद द्यावयाची किंवा नाही हा प्रश्न 'ग्रेज इन्'च्या प्रमुखांपुढे आला. सावरकरांच्या सध्याच्या हालचाली लक्षांत घेतां त्यांना तूर्त तरी बॅरिस्टर म्हणून मान्यता देऊं नये असा 'ग्रेज इन्'च्या १४ जुलै रोजीं भरलेल्या बैठकींत निर्णय करण्यांत आला.

धिंग्रा यांच्यावरील खटल्याचा निकाल २३ जुलै रोजीं जाहीर होणार असल्यामुळे सावरकर आदल्या दिवशीं त्यांना भेटावयास गेले. पोलिसांच्या उपस्थितींत धिंग्रा यांचें अभिनंदन करतां येणार नाही म्हणून अतिशय सूचक शब्दांचा वापर करून सावरकरांनी धिंग्रा यांचा गौरव केला. गजांआड उभे राहिलेले धिंग्रा दिसतांच सावरकर म्हणाले, "मी आपल्या दर्शनासाठी आलों आहें." सावरकरांची व आपली ही शेवटचीच भेट ठरणार असल्यामुळे धिंग्रा त्यांना म्हणाले, "हिंदुधर्माप्रमाणे माझी उत्तरक्रिया व्हावी. माझ्या मृत देहास कोणत्याहि अहिंदूंचा स्पर्श होऊं नये. ब्राह्मणाकडून माझ्या प्रेताला अग्नि दिला जावा आणि माझे कपडे, पुस्तकें आदि सामान विकून जे पैसे येतील ते हुतात्मा निधीमध्ये जमा करावेत."

२३ जुलैला खटल्याची सुनावणी सुरू होतांच पोलिसांनी जप्त केलेलें आपलें लेखी निवेदन न्यायालयांत वाचलें जावें अशी धिंग्रा यांनी मागणी केली. परंतु तें निवेदन न्यायालयापुढे आलें नसल्याचें कारण सांगून ती मागणी फेटाळण्यांत आली. सुनावणीचें काम संपलें व धिंग्रा यांना देहान्ताची शिक्षा सांगण्यांत आली.

शिक्षा ऐकल्यानंतरहि धिंग्रा शांत होते. पोलिसांबरोबर बाहेर पडण्यापूर्वी न्यायालयाला उद्देशून ते एवढेंच म्हणाले, "या न्यायालयाचा अधिकार मी मानत नाही ही गोष्ट मीं अनेक वेळां सांगितलें आहे. तुम्हांला हवें असेल तें तुम्ही करूं शकतां. तुम्हीं मला देहान्ताची शिक्षा दिली आहे, पण मला त्याची पर्वा नाही. एक गोष्ट मात्र लक्षांत असूं द्या की, एक दिवस असा येईल की, त्या दिवशीं आम्ही सत्ताधीश होऊं आणि आम्हांला योग्य वाटेल तें आम्ही करूं. मृत्यूची मला पर्वा वाटत नाही. कारण मायदेशासाठी बलिदान करण्याचा मान मिळाला हें माझें समाधान मृत्यूपेक्षाहि मोठें आहे."

धिंग्रा यांना फाशींची शिक्षा सुनावण्यांत आल्यानंतर त्या शिक्षेची अंमलबजावणी होण्यापूर्वी पोलिसांनी दडपून टाकलेलें त्यांचें निवेदन प्रसिद्ध होणें आवश्यक होतें. हें निवेदन सावरकरांनीच लिहून दिलेलें असल्यामुळे त्याची एक प्रत सावरकरांजवळ होतीच. इंग्लंडमधल्या वृत्तपत्रांत तें निवेदन प्रसिद्ध करण्याचें सावरकरांचे प्रयत्न चालू असतांनाच कदाचित् ब्रिटिश पत्रांनी तें छापावयाचें नाकारलें तर निदान परदेशांत तरी तें प्रसिद्ध व्हावें या हेतूने ग्यानचंद वर्मा यांना पॅरिसला धाडण्यांत आलें. १७ ऑगस्टला धिंग्रा फाशीं जाणार होते. त्याच्या आदल्या दिवशीं लंडनमधल्या 'डेली न्यूज'च्या अंकांत तें निवेदन छापून आणण्यांत सावरकर यशस्वी ठरलें. हें निवेदन वृत्तपत्रांत प्रसिद्ध होतांच पोलिस-खात्यांत एकच खळबळ उडाली.

## आव्हान

"परवा एका इंग्रजाचें रक्त सांडण्याचा मीं प्रयत्न केला ही गोष्ट खरी आहे. देशाभिमानी हिंदी तरुणांना निर्दयपणें फासावर चढविण्यांत आलें व निर्वासित करण्यांत आलें या घटनेचा अल्पसा सूड म्हणून मीं हें कृत्य केलें. हा प्रयत्न करतांना मी माझ्या सदसद्विवेकबुद्धीव्यतिरिक्त इतर कोणाचा

सल्ला घेतला नव्हता. परतंत्र राष्ट्र हें सदैव युध्यमान असतें. निःशस्त्र देशाला उघड उघड रणांगणांत उतरून सामना करणें अशक्य असल्यामुळे मीं बेसावध असलेल्या इंग्रजावर हल्ला चढविला. तोफा वापरणें मला अशक्य होतें म्हणून मीं रिव्हॉल्व्हर वापरलें.

आत्मबलिदान कसें करावें ही एकच शिकवण सध्या हिंदुस्थानांत दिली पाहिजे. ही शिकवण देण्याचा एकमेव मार्ग म्हणजे स्वतःचें बलिदान करून दाखविणें हा होय. या जाणीवेने प्रेरित होऊन मी आत्मार्पण करीत असल्या-मुळे मला माझ्या हौतात्म्याचा अभिमान वाटत आहे. याच भारतभूमीचा पुत्र म्हणून मला पुनर्जन्म लाभो व याच पवित्र कार्यांत बलिदान करण्याची मला पुन्हा संधि मिळो एवढीच माझी परमेश्वराजवळ प्रार्थना आहे. ”

### वंदे मातरम्

१७ ऑगस्टला सकाळीं नऊ वाजतां पेण्टेन्व्हिली कारागृहांत मदनलाल धिंग्रा या क्रांतिवीराला फाशीं देण्यांत आलें. त्यांचें शव मित्रांच्या स्वाधीन करण्यास तुरुंगाच्या अधिकाऱ्यांनी नकार दिल्यामुळे हिंदु पद्धतीप्रमाणे त्यांचा अंत्यसंस्कार करणें शक्य झालें नाही. त्या दिवशीं संध्याकाळीं लंडनमधल्या हिंदी विद्यार्थ्यांची सभा बोलावून सावरकरांनी आपल्या या झुंजार मित्राला श्रद्धांजलि वाहिली. धिंग्रा यांना फाशीं देण्याच्या कांही तास अगोदर सावरकरांनी एक पत्रक प्रसिद्ध करून शांत पावलें टाकत वधस्तंभाकडे निघालेल्या आपल्या मित्राचा निरोप घेतला.

‘ आज १७ ऑगस्ट १९०९ या दिवसाची सकाळ. मातृभूमीवर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भारतीयांच्या हृदयावर रक्ताक्षरांनी कोरली जाईल. याच सकाळीं थोर देशभक्त, आपला लाडका धिंग्रा पेण्टेन्व्हिली कारागृहांत फासावर चढत आहे. त्याची पवित्र मान फाशींच्या दोरांत जखडली जात आहे. त्याचा उदात्त आत्मा त्याच्या शरिरांतून बाहेर पडून वर जात आहे. त्याच्या या बलिदानामुळे आमच्या कार्याला आध्यात्मिक बळ प्राप्त होत आहे. धिंग्रांचें पार्थिव शरीर आता आमच्यांत नाही. पण त्यांचा आत्मा आमच्याभोवतींच आहे. तो आमच्याभोवतींच राहील आणि मातृभूमि-विमोचनाच्या कार्यांत तो आमचें मार्गदर्शन करील. ’

धिंग्रा यांच्या बलिदानानंतर सरकारची 'इंडिया हाऊस'वर वक्रदृष्टि वळली. सावरकर त्यापूर्वीच पाल यांच्याकडे राहवयास गेले होते. त्यामुळे शामजी कृष्णवर्मा यांनी 'इंडिया हाउस' ही संस्था बंद करून इमारतहि विकून टाकली. धिंग्रा-प्रकरणानंतर आपल्यामुळे पाल यांना त्रास होऊं नये म्हणून सावरकरांनी तें घर सोडलें. परंतु पोलिसांच्या ससेमिऱ्यामुळे कोणताहि घरमालक त्यांना जागा देईना. दुसरीकडे सोय होईपर्यंत दोन-तीन दिवस त्यांना अक्षरशः फूटपाथवरच काढावे लागले.

धिंग्रासारख्या शूर सहकाऱ्याचा मृत्यु, कॅक्स्टन हॉलमधील मारामारी, बॅरिस्टरीची सनद देण्यास 'ग्रेज इन्'चा नकार, तिकडे आपलें वाङ्मय प्रकाशित केलें म्हणून आपल्या वडील बंधूंना – बाबांना – झालेली जन्मठेप काळ्यापाण्याची शिक्षा, लंडनमध्ये राहण्यासाठी जागा मिळण्याबाबत येणाऱ्या अडचणी, या सर्व घटनांचा सावरकरांच्या शरिरावर व मनावर बराच ताण पडला. निरंजन पाल त्या वेळीं ब्रायटनला राहत होते; म्हणून सावरकर विश्रांतीसाठी ब्रायटनला गेले. निरंजन पाल यांच्यासमवेत संध्याकाळच्या वेळीं समुद्रकिनाऱ्यावर बसले असतांना सावरकरांना लवकरच कोसळणारे संकटाचे ढग दिसत होते. आपल्या प्रिय मातृभूमीचें आपल्याला पुन्हा दर्शन तरी होणार आहे की नाही, या शंकेने या धीरोदात्त क्रांतिकारकाचें भावनोत्कट मन कातर झालें. सभोवतालचें जग ते विसरून गेले. त्यांच्या डोळ्यांतून आसवें वाहूं लागलीं आणि क्रूरपणें हसत समोर उभ्या असलेल्या सागराला उद्देशून ते गुणगुणूं लागले –

ने मजसी ने परत मातृभूमीला। सागरा प्राण तळमळला
नभीं नक्षत्रें बहुत एक परि प्यारा। मज भरतभूमिचा तारा
प्रासाद इथे रम्य परी मज भारी। आईची झोपडी प्यारी
तिजवीण नको राज्य, मज प्रिय साचा। वनवास तिच्या जरि वनिंचा
भुलविणें व्यर्थ हें आता
बहु जिवलग गमतें चित्ता
तुज सरित्पते जी सरिता
तद्विरहाची शपथ घालितों तुजला। सागरा प्राण तळमळला
या फेनमिषें हससि निर्दया कैसा। का वचन भंगिसी ऐसा

त्वत्स्वामित्वा संप्रति जी मिरविते। भिऊनि त्या आंग्लभूमीते
मन्मातेला अबल म्हणून फसविसी। मज विवासनाते नेसी
जरि आंग्लभूमि-भयभीता
अबला न माझिही माता
कथिल हें अगस्तिस आता
जो आचमनीं एक क्षणीं तुज प्याला। सागरा प्राण तळमळला

ब्रायटनला स्वस्थ बसूनहि सावरकरांना करमेना. पंधरा-एक दिवसांतच ते लंडनला परतले.

६

# अलौकिक सागरदिव्य

लंडनला परततांच सावरकरांनी '१८५७चें स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाच्या प्रकाशनाचें कार्य हातीं घेण्याचें ठरविलें. मूळ मराठी ग्रंथ त्यांनी १९०८ च्या मे महिन्यांत बाबांकडे पाठवून दिला होता. परंतु या ग्रंथाच्या निमित्ताने आपल्यावर सरकारी रोष होईल या भीतीने महाराष्ट्रांतील कोणताहि मुद्रक तो छापून देण्यास तयार होईना. शेवटीं सोलापूरच्या 'स्वराज्य' साप्ताहिकाचे संपादक श्री. लिमये यांनी आपल्या छापखान्यांत हा ग्रंथ छापून देण्याची जबाबदारी स्वीकारली. परंतु पोलिसांना या बातमीचा सुगावा लागतांच त्यांनी लिमये यांना धमकी देण्यास सुरुवात केली. त्यामुळे लिमयांनी हस्तलिखित बाबांकडे धाडून दिलें. अन्य प्रांतांत तरी हा ग्रंथ छापून मिळतो आहे का, या दृष्टीने बाबांनी प्रयत्न केले; परंतु ते सर्व प्रयत्न अयशस्वी ठरल्यामुळे सावरकरांच्या सूचनेप्रमाणे बाबांनी तें हस्तलिखित पॅरिसला धाडून दिलें. सावरकर पॅरिसला गेले व नागरी लिपींत संस्कृत वाङ्मय प्रसिद्ध करणाऱ्या एखाद्या जर्मन छापखान्यांत हा ग्रंथ छापून मिळेल काय, या दृष्टीने त्यांनी चौकशी सुरु केली. कांही जर्मन मुद्रणालयांत नागरी टाईप असला तरी जर्मन जुळाऱ्यांना मराठी भाषेची कांहीच माहिती नसल्यामुळे हा प्रयत्नहि सोडून द्यावा लागला.

मूळ मराठी ग्रंथ प्रकाशित होण्याची कोणतीहि शक्यता नाही असें आढळून आल्यानंतर सावरकरांनी त्याचा इंग्रजी अनुवाद करण्याचें ठरविलें. या कार्यांत त्यांना कोरेगावकर, फडके व कुंटे या लंडनमधल्या सहकाऱ्यांचा

बराच उपयोग झाला. हा इंग्रजी ग्रंथ छापून देण्यास इंग्लंडमधला छापखानेवालाहि तयार होईना. म्हणून श्री. अय्यर यांनी इंग्रजी हस्तलिखित पॅरिसला धाडलें. परंतु फ्रान्स आणि ब्रिटन यांचे मैत्रीचे संबंध असल्यामुळे फ्रेंच मुद्रकांनीहि नकार दिला. शेवटीं हॉलंडमध्ये तो ग्रंथ छापून मिळाला.

हा ग्रंथ युरोपांत कोठे तरी छापला जात आहे याचा ब्रिटिश सरकारला सुगावा लागतांच हा ग्रंथ आक्षेपार्ह ठरवून त्याच्यावर बंदी घालण्यांत आली. हा प्रकार मोठा अपूर्व होता. 'हा ग्रंथ आक्षेपार्ह आहे हें सरकारला तो प्रकाशित होण्यापूर्वीच कसें कळलें' अशी विचारणा करणारें पत्र सावरकरांनी लंडन टाइम्सकडे धाडलें. लंडन टाइम्सने सावरकरांचें पत्र तर प्रसिद्ध केलेंच; शिवाय प्रकाशनापूर्वीच म्हणजेच ग्रंथांत काय आहे हें कळण्यापूर्वी तो जप्त करण्याच्या आपल्या सरकारच्या धोरणाबद्दल संपादकीय टीप लिहून नापसंती व्यक्त केली.

हॉलंडमध्ये छापून मिळलेल्या या ग्रंथाच्या प्रती पॅरिसमध्ये आणण्यांत आल्या व तेथून त्या 'पिकविक पेपर्स', 'डॉन क्विझोट' अशा प्रसिद्ध इंग्रजी ग्रंथांच्या आवरणाखाली गुप्त रीतीने भारतांत धाडण्यांत आल्या. परदेशांतील क्रांतिकारकांसाठी मॅडम कामा यांनी 'स्वातंत्र्यसमर'ची दुसरी आवृत्ति काढली. या वेळीं लाला हरदयाळ अमेरिकेंत 'गदर' पत्र चालवीत होते. या पत्रामार्फत हरदयाळांनी हिंदी सैनिकांसाठी 'स्वातंत्र्यसमरा'चा पंजाबी, हिंदी व उर्दू अनुवाद प्रसिद्ध केले. या प्रती प्रामुख्याने शीख पलटणींमध्ये वांटण्यांत आल्या. देशी व परदेशी क्रांतिकारकांमध्ये या ग्रंथाची लोकप्रियता इतकी शिगेला पोचली की, जेव्हा आवृत्ति संपावयास आली तेव्हा कांही जणांनी तीनशे रुपये देऊन हा ग्रंथ विकत घेतला. 'क्रांतिकारकांची गीता' म्हणून सर्वमान्य झालेल्या या 'स्वातंत्र्यसमरा'ची तिसरी आवृत्ति नंतर हुतात्मा भगतसिंगांनी प्रसिद्ध केली. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेना उभारली. या सेनेसाठी त्यांनीहि 'स्वातंत्र्यसमरा'ची आणखी एक आवृत्ति काढली. भारतीय क्रांतिकारकांचे देशांत व देशाबाहेर जे जे उठाव झाले त्यामागे सावरकरांच्या या तेजस्वी ग्रंथाची प्रेरणा उभी होती. १९४६ मध्ये सावरकरवाङ्मयावरील बंदी उठविण्यांत आल्यानंतर सावरकरांचें मूळ मराठी हस्तलिखित सापडण्याची कोणतीच शक्यता उरली नसल्यामुळे या इंग्रजी ग्रंथाचा मराठी

अनुवाद करण्यांत आला. परंतु योगायोगाची गोष्ट अशी की, १९४७ च्या नोव्हेंबरमध्ये मूळ मराठी हस्तलिखिताचा शोध लागला.

सावरकर लंडनला असतांना डॉ. जे. डी. एस्. कुटिन्हो नांवाचे गोमांतकीय गृहस्थ ‘ अभिनव भारता ’चे सदस्य होते. पॅरिसहून परत आलेले मराठी हस्तलिखित सुरक्षित राहवें म्हणून सावरकरांनी ते कुटिन्हो यांच्याजवळ ठेवावयास दिलें होतें. पुढे कुटिन्हो यांनी लंडन सोडलें व ते अमेरिकेंत स्थायिक झाले. सावरकर-वाङ्मयावरील बंदी उठल्याचें वृत्त जेव्हा त्यांच्या वाचनांत आलें तेव्हा जवळ जवळ चाळीस वर्षे काळजीपूर्वक जतन केलेलें मराठी हस्तलिखित सावरकरांना पोचविण्यासाठी त्यांनी वॉशिंग्टनला राहत असलेल्या गोहोकरांकडे पाठवून दिलें. तें घेऊन गोहोकर १९४९ च्या डिसेंबरमध्ये भारतांत आले. त्या वेळीं सावरकरांना गांधी खून खटल्यांतील आरोपी म्हणून दिल्लीच्या लालकिल्ल्यांत ठेवण्यांत आले होते. त्यामुळे सावरकरांची तेथे भेट घेणें गोहोकरांना जमलें नाही. १९४९ च्या फेब्रुवारींत सावरकरांची खटल्यांतून निर्दोष मुक्तता झाल्यानंतर गोहोकरांनी सावरकर-सदनांत येऊन हें हस्तलिखित त्यांच्या स्वाधीन केलें. या ऐतिहासिक महत्त्वाच्या ग्रंथाने आपल्या जन्मदात्याप्रमाणे अनंत आपदांवर मात केली ती ही अशी.

ब्रायटनहून परतल्यानंतर सावरकर ‘स्वातंत्र्यसमरा’च्या प्रकाशनात गुंतलें असतांना, धिंग्रा-प्रकरणानंतर लंडनमधील हिंदी विद्यार्थ्यांत जें एक प्रकारचें शैथिल्य आलें होतें तें कसें दूर करावें याचाहि ते विचार करीत होते. दसरा जवळ आल्याचें पाहून सावरकरांनी हा सण मोठ्या उत्साहाने साजरा करण्याचें ठरविलें. त्या वेळीं महात्मा गांधींचें लंडनमध्ये वास्तव्य होतें. त्यामुळे त्यांनी या समारंभाचें अध्यक्षस्थान स्वीकारावें असें सावरकरांनी सुचविलें. दसऱ्याच्या निमित्ताने गांधीजींनी प्रभु रामचंद्रांच्या जीवनकार्याचें विवेचन केलें. ते म्हणाले, “ प्रभु रामचंद्रांचे सद्‌गुण आपल्या राष्ट्रांत पुन्हा उतरतील तर आपली उन्नति होण्यास वेळ लागणार नाही. ” सावरकरांनीहि आपल्या भाषणांत प्रभु रामचंद्रांच्या कार्याचें स्मरण केलें. ते म्हणाले, “ श्रीराम जोंपर्यंत हिंदुस्थानांत आहे तोंपर्यंत हिंदुस्थानची उन्नति सहजसाध्य आहे. श्रीरामाचा विसर पडला की, हिंदुस्थानांतला राम नाहीसा झाला असें खुशाल समजावें.

हिंदु हिंदुस्थानचें हृदय आहे. तथापि इंद्रधनुष्याचें सौंदर्य रंगांच्या अनेकतेने न बिघडतां उलट तें अधिकच खुलतें तसें मुसलमान, पारशी, यहुदी वगैरे जगांतील सर्व सुधारणांचे उत्तमांश मिसळून घेऊन हिंदुस्थानहि कालाच्या आकाशांत अधिकच खुलून दिसेल."

लंडनमधील क्रांतिकार्याची पुनश्च जुळवाजुळव करण्याचे प्रयत्न चा असतांनाच बाबांची जन्मठेपेची शिक्षा मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाने कायम केल्याचें वृत्त सावरकरांना कळलें. तत्पूर्वी व्हॉइसरॉय लॉर्ड मिंटो यांच्यावर अहमदाबाद येथे बॉंब फेकण्याच्या प्रयत्नाबद्दल जी धरपकड झाली तींत धाकट्या बंधूंना – नारायणरावांना – पकडण्यांत आलें होतें. आपण येथे लंडनला, बाबा काळ्यापाण्यावर आणि नारायणराव अटकेंत – अशा परिस्थितींत घराची जबाबदारी मोठ्या धीराने सांभाळणाऱ्या येसूवहिनींची मनःस्थिति कशी झाली असेल आणि घर चालविणें त्यांना किती जिकिरीचे होऊन बसलें असेल या विचाराने सावरकरांचा जीव कासावीस झाला. डिसेंबरच्या अखेरीस येसूवहिनींचें पत्र आलें तेव्हा तर त्या माउलीच्या आठवणीने ते सद्गदित झाले. सारे सावरकर-कुटुंब उद्ध्वस्त होण्याची शक्यता निर्माण झाली असतांनाहि सावरकरांचा आपल्या कार्यावरचा विश्वास अभंग होता देशासाठी निर्वंश होण्याची वेळ आली असतांनाहि आपल्या आणि आपल्या कुटुंबीयांच्या समर्पित जीवनाबद्दल त्यांना केवढी धन्यता वाटत होती हें त्यांनी येसूवहिनींना त्या वेळीं जें ओवीबद्ध पत्र लिहिलें आहे त्यावरून प्रतीत होते.

## सांत्वन

१

जयासि तुवां प्रतिपाळिले। मातेचें स्मरण होऊं न दिलें  
श्रीमती वहिनी वत्सले। बंधु तुझा तो तुज नमी  
आशीर्वादपत्र पावलें। जें लिहिलें ते ध्यानीं आलें  
मानस प्रमुदित झालें। धन्यता वाटली उदंड  
धन्य धन्य आपुला वंश। सुनिश्चये ईश्वरी अंश  
की रामसेवा पुण्य-लेश। आपुल्या भाग्यीं लाधला

२

अनेक फुलें फुलतीं । फुलोनिया सुकोन जातीं
कोणी त्यांची महती गणती । ठेविली असे
परि जें गजेंद्रशुंडेने उपटिलें । श्रीहरीसाठी मेले
कमलफूल तें अमर झालें । मोक्षदायी पावन
त्या पुण्य गजेंद्रासमची । मुमुक्षु स्थिती भारतीची
करुणारवें ती याची । इंदीवर श्यामा श्रीरामा
स्वोद्यानी तिने यावें । आपुल्या फुलास भुलावें
खुडोनिया अर्पण करावें । श्रीरामचरणां
धन्य धन्य आपुला वंश । सुनिश्चये ईश्वरी अंश
श्रीरामसेवा पुण्य-लेश । आपुल्या भाग्यीं लाधला

३

अशींच सर्व फुलें खुडावीं । श्रीरामचरणीं अर्पण व्हावीं
कांही सार्थकता घडावी । या नश्वर देहाची
अमर होय ती वंशलता । निर्वंश जीचा देवाकरिता
दिगंतीं पसरे सुगंधिता । लोकहित परिमलाची
सुकुमार आमुच्या अनंत फुलां । गुंफोनी करा हो सुमनमाला
नवरात्रींच्या नवकाला । मातृभूमी वत्सले
एकदा नवरात्र संपली । नवमाला पूर्ण झाली
कुलदेवी प्रकटेल काली । विजयालक्ष्मी पावन

४

तूं धैर्याची अससी मूर्ति । माझे वहिनी, माझे स्फूर्ति
रामसेवाव्रताची पूर्ति । ब्रीद तुझें आधीच
महत्कार्यांचें कंकण धरिलें । आता महत्तमत्व पाहिजे बाणलें
ऐसें वर्तन पाहिलें केलें । की जे पसंत पडलें संतांना
अनेक पूर्वज ऋषीश्वर । अजात वंशजांचे संभार
साधु साधु गर्जतील । ऐसें वर्तणें या काला

पोलिसांचा ससेमिरा चुकवण्यासाठी करावी लागणारी धांवपळ व राहण्या-जेवण्याचे हाल या दोन गोष्टींचा सावरकरांच्या प्रकृतीवर बराच परिणाम झाला होता. वहिनींना धीर देणारें पत्र लिहिल्यानंतर कांही दिवसांच्या आंतच त्यांना न्युमोनियाने घेरलें. लंडनला शुश्रूषेचीहि आबाळ होत होती. शेवटीं डॉ. मुथु लंडनला आले व त्यांनी वेल्समधल्या आपल्या रुग्णालयांत त्यांना नेलें. डॉ. मुथु यांच्या औषधोपचारामुळे प्रकृति कांहीशी सुधारतांच सावरकरांनी 'शिखांचा इतिहास' लिहिण्यास प्रारंभ केला. हा इतिहास मार्चमध्ये प्रकाशित करण्याचा त्यांचा विचार होता. त्यामुळे रुग्णालयांतला त्यांचा बराचसा वेळ वाचन-लेखनांतच जाई. या सुमारास डॉ. मुथु यांच्या सल्ल्यावरून सावरकर हवापालट करण्यासाठी पॅरिसला गेले. मॅडम कामा यांच्या साहाय्याने त्यांनी तेथे 'तलवार' पत्र सुरू केलें होतें. 'शिखांच्या इतिहासा'बरोबर 'तलवार' पत्रासासाठीहि त्यांचें लेखन सुरू होतें. फेब्रुवारीच्या अखेरीपर्यंत 'शिखांचा इतिहास' लिहून पुरा झाला. या ग्रंथाच्या त्यांनी तीन हस्तलिखित प्रती तयार केल्या. त्यांतील एक कामाबाईकडे ठेवावयास दिली व दुसऱ्या दोन प्रती प्रकाशनासाठी भारतांत धाडण्यांत आल्या. परंतु या दोन्ही प्रती प्रवासांतच गहाळ झाल्या. कामाबाईकडे ठेवलेल्या प्रतीचाहि नंतर ठावठिकाणा लागू शकला नाही. त्यामुळे सावरकरांचा 'शिखांचा इतिहास' हा ग्रंथ प्रकाशित होऊं शकला नाही. हा ग्रंथ त्यांनी आपल्या दिवंगत मुलाला – प्रभाकराला – अर्पण केला होता. कारण –

धर्मकार्यसिध्यर्थ धाडुनी रणीं खड्गपाणी
बाल-बाल झुंजार आपुले श्रीगोविंदांनी
हुतात्म होता हसत पाहिलें सुकीर्ति परिसुनी ती
म्याहि कितीदा रणीं पाहिली अमूर्त तव मूर्ती
पूर्वि जसा होतास तसाची नंतरही सखया
अमूर्त तूं कल्पना एक मधु-मधुर अशी हृदया

मिंटो यांच्यावर बॉंब फेकण्याचा प्रयत्न झाल्यापासून हिंदुस्थान सरकारने लोकांना दहशत बसावी म्हणून दडपशाहीचें तंत्र अवलंबण्यास प्रारंभ केला. अशा वेळीं ब्रिटनचा आपल्यावर रोष होऊं नये म्हणून जो तो संस्थानिक आपल्या राजनिष्ठेचा वारंवार उच्चार करूं लागला. संस्थानिकांच्या या राज-

निधेला उद्देशून त्यांना इशारा देणारें 'Choose, Oh Indian Princes' नांवाचें पत्रक सावरकरांनी 'तलवार'मध्ये प्रसिद्ध केलें. नंतर त्याच्या प्रती काढण्यांत येऊन त्या भारतांत धाडण्यांत आल्या. हिंदी संस्थानिकांना उद्देशून दिलेल्या इशाऱ्यांत सावरकर म्हणतात, "हिंदी संस्थानिकहो, तुम्हांला स्पष्ट इशारा देण्यांत येत आहे. त्याच्याकडे दुर्लक्ष करून तुम्ही शत्रूशीं संगनमत कराल तर तुमच्यासारखे करंटे तुम्हीच. क्रांतीच्या जन्मकाळच्या प्रसववेदना आता कोठे सुरू झाल्या आहेत तोंच बलिष्ठांतले बलिष्ठ साम्राज्य लटपटूं लागलें आहे. अशा परिस्थितींत तुमच्यासारख्या दुबळ्यांनी त्या क्रांतीचा पुरोगामी प्रवाह थांबविण्यासाठी पुढे सरसावणें हें गुरुत्वाकर्षणाचा नियम किंवा पृथ्वीचा आकार बदलण्याला धजण्यासारखेंच नाही काय? तुम्हीं काय केलें व काय करायचें टाळलें याचा हिशेब बारकाईने मागितला जाईल हें विसरूं नका. नवजात हिंदी राष्ट्र तुमच्याशीं जशास तसें या न्यायाने वागावयास चुकणार नाही. आमच्या या म्हणण्याचा गंभीरपणें व खोलवर विचार करा. काय पत्करतां तें ठरवा. पण जसें कराल तसें भराल हें मात्र विसरूं नका!"

सावरकरांनी चतुर्भुजमार्फत धाडलेल्या पिस्तुलांपैकी कांही पिस्तुलें अभिनव भारताच्या नाशिक येथील सदस्यांपर्यंत येऊन पोचली होतीं. लोकमान्य टिळक व शिवरामपंत परांजपे या आपल्या दोन श्रद्धास्थानांना सरकारने राजद्रोहाच्या आरोपावरून शिक्षा ठोठावल्यामुळे नाशिकमधला तरुण क्रांतिकारकांचा गट संतप्त झाला होता. त्यांतच आपल्या सहकाऱ्याची – बाबांची जन्मठेपेची शिक्षा वरिष्ठ न्यायालयांत कायम झाल्यामुळे सरकारच्या या दडपशाहीचा सूड घेण्याचा विचार या तरुणांमध्ये बळावला. नुकताच धिंग्रा यांनी त्यांना मार्गहि दाखविला होता. त्यामुळे नाशिकचा कलेक्टर जॅक्सन याचा खून करून ब्रिटिश सरकारच्या जुलमांविरुद्ध आपला आवाज उठविण्याचें या तरुणांनी ठरविलें. हें कृत्य करण्यासाठी अनंत लक्ष्मण कान्हेरे, कृष्णाजी गोपाळ कर्वे व विनायक नारायण देशपांडे हे तरुण पुढे आले. जॅक्सन यांची लवकरच नाशिकहून बदली होणार होती. त्यामुळे त्यांना निरोप देण्यासाठी नाशिकमध्ये अनेक समारंभ आयोजित करण्यांत येत होते. जॅक्सन यांना मराठी नाटकांची आवड होती. म्हणून २१ डिसेंबर १९०९ रोजीं रात्रीं

९ वाजतां विजयानंद नाट्यगृहांत 'शारदा' नाटकाचा प्रयोग ठेवण्यांत आला. कान्हेरे, कर्वे व देशपांडे रिव्हॉल्व्हर्स घेऊन नाट्यगृहांत येऊन उभे राहिले. ९॥ च्या सुमारास जॅक्सन आंत येऊन आपल्या खुर्चीवर बसणार तोंच अनंत कान्हेरे लगबगीने तेथे आला व त्याने जवळून त्यांच्यावर एकामागोमाग एक अशा सात गोळ्या झाडल्या. त्यानंतर आत्महत्या करण्यासाठी तो रिव्हॉल्व्हर स्वतःवर रोखणार एवढ्यांत जॅक्सन यांच्याबरोबर आलेल्या डेप्युटी कलेक्टरने त्याचा हात पकडला. कान्हेरे डाव्या हाताने खिशांतील दुसरे रिव्हॉल्व्हर काढण्याचा प्रयत्न करूं लागतांच जॉली नांवाच्या इंग्रज गृहस्थाने त्याचा दुसरा हात पकडला.

जॅक्सन यांच्या खुनामुळे सरकार पिसाळलें. या खुनामागे कोणाकोणाचा हात आहे हें शोधून काढण्यासाठी संशयितांची धरपकड करून त्यांच्या छळाला आरंभ झाला. कान्हेरेचें कृत्य सावरकरांना पॅरिसमध्ये कळतांच त्यांनी 'तलवार'मध्ये त्यांच्या गौरवार्थ ' नाशिकचा हुतात्मा ' या शीर्षकाखाली खास लेख लिहिला. त्यामुळे कान्हेरेच्या खुनामागे मूळ प्रेरणा सावरकरांची आहे हा सरकारचा संशय बळावला. सावरकर पॅरिसला असल्यामुळे सरकारला कांही करतां येण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यांच्या आप्तेष्टांचा छळ सुरू झाला. भाऊराव चिपळूणकरांना जव्हारमधून रातोरात पळ काढावा लागला. नंतर त्यांची मालमत्ताहि जप्त करण्यांत आली. सावरकरांना इंग्लंडला जाण्यासाठी जव्हारचे राजे कृष्णशहा यांनी मदत केली होती म्हणून त्यानाहि कांही काळ स्थानबद्ध करण्यांत आलें. लंडनमधलें गुप्त-पोलिसदलहि स्वस्थ बसलेलें नव्हतें. सावरकरांच्या लंडनमधील सहकाऱ्यांना दररोज जाबजबाबासाठी बोलावण्यांत येऊं लागलें. त्यांच्या प्रत्येक हालचालीवर पोलिस पाळत ठेवूं लागले. या त्रासाला कंटाळून कांहीजण तर इंग्लंड सोडून युरोपांत राहवयास गेले.

आपल्या अनुयायांचा, सहकाऱ्यांचा आणि आप्तेष्टांचा भारतांत आणि इंग्लंडमध्ये असा छळ होत असतांना पॅरिसमधील विश्रांति, शारीरिक दृष्टीने आवश्यक असली तरीहि सावरकरांना ती सुखाची वाटेना. नाशिकमधील आपल्या सहकाऱ्यांच्या पाठीशीं आपण आता उभें राहिलें पाहिजे या विचाराने त्यांनी भारतात येण्याचें ठरविलें. परंतु पॅरिसमधल्या मॅडम कामा, सरदारसिंग राणा प्रभृतींनी सावरकरांना त्या विचारापासून परावृत्त केलें. भारतांत जाऊन

आत्मघात करून घेण्याऐवजी, जायचेंच असेल तर लंडनला जा, कारण ब्रिटन-मधला खटला चालविणें आम्हांला सोयीचें जाईल असें या सहकाऱ्यांनी परोपरीनें सांगितल्यामुळे १३ मार्चच्या सकाळीं सावरकरांनी पॅरिस सोडलें व रात्रीं नऊ वाजतां ते लंडनमधील व्हिक्टोरिया स्टेशनवर उतरले.

सावरकरांनी लंडनला परतायचें ठरविलें ही बातमी लंडनमधल्या गुप्त पोलिस-खात्याला कळलेली होती. त्यामुळे व्हिक्टोरिया स्टेशनवरच्या वेटिंग रूममध्ये सावरकर शिरतांच मॅक्कॉर्थी आणि पार्कर या पोलिस-अधिकाऱ्यांनी त्यांना अटक केली. 'सावरकरांनी भारतांत राजद्रोहाचा आणि खुनाला प्रोत्साहन दिल्याचा गुन्हा केला असून ते फरारी असल्यामुळे त्यांना पकडण्यांत यावें' असें वॉरंटमध्ये म्हटलें होतें. 'सावरकर फरारी आहेत' हा आरोप मोठा गमतीचा होता. कारण सरकारकडून पासपोर्ट घेऊनच १९०६ मध्ये ते लंडनला आले होते व त्या पासपोर्टच्या आधारेंच ते पॅरिसला गेले होते व परतलेहि होते. व्हिक्टोरिया स्टेशनवरून त्यांना बो स्ट्रीट पोलिस-ठाण्यावर नेण्यांत आलें आणि दुसऱ्या दिवशीं, तपासासाठी मुदत मागून घेण्यासाठी त्यांना पोलिस-कोर्टांत हजर करण्यांत आलें.

व्ही. व्ही. एस्. अय्यर सावरकरांना भेटण्यासाठी पोलिस-ठाण्यावर गेले तेव्हा ते शांत मनःस्थितींत बसले असल्याचें अय्यर यांनी पाहिलें. सावरकरांवरील खटला इंग्लंडमध्ये चालला तरच त्यांच्या सुटकेची कांही तरी आशा आहे असें अय्यर प्रभृतींना वाटत होतें. म्हणून त्यांनी 'वर्ल्ड' मासिकाचे संपादक गाय आल्ड्रेड यांच्या मदतीने सावरकर बचाव समिति स्थापन केली. लागलीच शामजी कृष्णवर्मा यांनी पॅरिसहून सावरकरांच्या बचाव-निधीसाठी दहा पौंड पाठवून दिले. आपला खटला येथे चालेल असें सावरकरांना मात्र मुळीच वाटत नव्हतें. आपल्याला हिंदुस्थानांत धाडण्यांत येईल व तेथे आपल्याला जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यांत येईल असाच त्यांचा कयास होता. म्हणूनच भेटावयास आलेल्या अय्यर यांना ते म्हणाले, "अंदमानला नेलें तर ज्येष्ठ बंधूंच्या दर्शनाचा मला लाभ होईल हें समाधानहि कांही कमी नव्हे."

सावरकर महिनाभर कच्च्या कैदेंत होते. या काळांत त्यांना पळवून नेण्याचा बेत आखण्यांत आला होता. वीरेंद्रनाथ चट्टोपाध्याय यांनी सावर-करांच्या भेटीस जाऊन त्यांच्या जागीं बसावें व सावरकरांनी पळून जावें अशी

ही योजना होती. अर्थात् त्यासाठी पहाऱ्यावरच्या पोलिसाला खूष करणें आवश्यक होतें. परंतु तो पैशाला बधत नाही असें आढळून आल्यामुळे तो विचार सोडून द्यावा लागला. आपण आता पकडले गेलों आहोंत आणि लवकरच आपल्याला दीर्घ मुदतीची शिक्षा होणार हें वृत्त येसूवहिनींना कळवितांना, त्यांची पुन्हा भेट होण्याची शक्यता नसल्यामुळे सावरकरांनी त्यांना लंडनहून निरोपाचें पत्र धाडलें. 'माझें मृत्युपत्र' असें अर्थगर्भ शीर्षक यांनी या पत्राला दिलें आहे –

हें मातृभूमि, तुजला मन वाहियेलें
वक्तृत्व-वाग्विभवही तुज अर्पियेलें
तूंतेचि अर्पिलि नवी कविता रसाला
लेखाप्रती विषय तूंचि अनन्य झाला
त्वत्स्थंडिलीं ढकलिले प्रिय मित्रसंघा
केलें स्वये दहन यौवन-देह-भोगा
त्वत्कार्य नैतिक सुसंमत सर्व देवा
त्वत्सेवनीच गमली रघुवीर सेवा
त्वत्स्थंडिलीं ढकलली गृह वित्त-मत्ता
दावानलांत वहिनी, नवपुत्र, कांता
त्वत्स्थंडिलीं अतुल धैर्य वरिष्ठ बंधु
केला हवी परम कारुण पुण्यसिंधु
त्वत्स्थंडिलावरिं बळी प्रिय बाळ झाला
त्वत्स्थंडिलीं बघ अता मम देह ठेला
हें काय ! बंधु असतो जरि सात आम्ही
त्वस्थंडिलींच असते दिधले बळी मी
संतान या भरतभूमिस तीस कोटी
जें मातृभक्तिरत सज्जन धन्य होतीं
हें आपुलें कुलहि त्यामधि ईश्वरांश
निर्वंश होउनि ठरेल अखंड वंश
कीं ते ठरोहि अथवा न ठरो परंतु
हे मातृभू, अम्हि असो परिपूर्ण-हेतु

दीप्तानलांत निज मातृ-विमोचनार्थ
हा स्वार्थ जाळूनि अम्ही ठरलों कृतार्थ
ऐसें विवंचुनि अहो वहिनी व्रताते
पाळोनि वर्धन करा कुला दिव्यतेते
श्रीपार्वती तप करी हिमपर्वतीं ती
कीं विस्तवांत हसल्या बहु राजपूती
ते भारतीय अबला बल तेज कांही
अद्यापि या भरतभूमित लुप्त नाही
हें सिद्ध होइल असेंच उदार उग्र
वीरांगने तव सुव्रतन हो समग्र
माझा निरोप तुज येथुनि हाच देवि
हा वत्स वत्सल तुझ्या पदिं शीर्ष ठेवी
सप्रेम अर्पण असो प्रणती तुम्हांते
आलिंगन प्रियकरा सम अंगतेते
की घेतलें व्रत न हें अम्हि अंधतेने
लब्धप्रकाश – इतिहास – निसर्ग-माने
जें दिव्य दाहक म्हणूनि असावयाचें
बुद्धयाचि वाण धरिलें करिं हें सतीचें

सावरकरांच्या वतीने त्यांचे वकील रेजिनॉल्ड व्हॉगन् यांनी जामीनअर्ज न्यायालयाला सादर केल्यामुळे खटल्याचें कामकाज रेंगाळणार असें दिसूं लागलें व म्हणून पोलिसांनी सावरकरांना ब्रिक्स्टनच्या कारागृहांत हलविलें. सावरकरांवरील खटला इंग्लंडमध्येच चालावा; त्यांना हिंदुस्थानांत नेण्याची गरज नाही असा युक्तिवाद हॉगन् यांनी केला. परंतु जामीन-अर्जाप्रमाणेच हा अर्जहि फेटाळून लावण्यांत आला. यामुळे सावरकरांना आता लवकरच हिंदुस्थानांत धाडण्यांत येणार हें निश्चित झालें. आयरिश क्रांतिकारकांच्या मदतीने सावरकरांना पळविण्याचा पुन्हा एकदा प्रयत्न करण्याचें ग्यानचंद वर्मा, एम. पी. टी. आचार्य, व्ही. व्ही. एस्. अय्यर प्रभृतींनी ठरविलें. सावरकरांना न्यायालयांतून तुरुंगांत परत नेण्यांत येत असतांना या आयरिश क्रांति-

कारकांनी पोलिसांच्या मोटारीवर हल्ला करून सावरकरांची सुटका करावयाची व आयर्लंडमार्गे त्यांना अमेरिकेंत धाडावयाचें अशी ही योजना होती. परंतु या वेताचाहि पोलिसांना सुगावा लागला. त्यामुळे ज्या दिवशीं हा कार्यक्रम आखण्यांत आला होता त्या दिवशीं पोलिस-गाडीऐवजी दुसऱ्याच गाडीतून आणि दुसऱ्याच रस्त्याने सावरकरांना तुरुंगांत नेण्यांत आलें. आयरिश क्रांतिकारकांनी ठरल्याप्रमाणे पोलिसांच्या गाडीवर हल्ला केला; परंतु त्या गाडींत सावरकर नाहीत असें आढळून येतांच ते पसार झाले.

सावरकरांवरील खटल्याच्या प्राथमिक चौकशीचें काम तीन महिने चाललें होतें. शेवटीं सावरकरांना शक्य तितक्या लवकर हिंदुस्थानांत धाडावें असा निकाल २१ जून रोजीं जाहीर करण्यांत आला. त्यामुळे आठ-दहा दिवसांतच त्यांना इग्लंडमधून हलविण्यांत येणार होतें. आपल्याला घेऊन जाणारी बोट फ्रान्समधल्या महत्त्वाच्या बंदरांमध्ये थांबणार असल्यामुळे त्या वेळीं पळून जाण्याचा प्रयत्न करावा असें सावरकरांनी ठरविलें व त्या वेळीं पुढील व्यवस्थेसाठी तयार राहा असा निरोपहि अय्यर यांच्यामार्फत पॅरिसमधील आपल्या मित्रांना धाडला. हा प्रयत्न यशस्वी ठरला नाही, तर मात्र आपल्या मित्रांची पुन्हा कधीहि गाठ पडणार नाही म्हणून त्यांनी ब्रिक्स्टन कारागृहांतून आपल्या या मित्रांना निरोपाचें पत्र धाडलें. मूळ इंग्रजी पत्र काव्यबद्ध असून त्यांत काव्यप्रतिभा आणि देशभक्ति यांचा मनोज्ञ संगम झालेला आहे.

" मित्रांनो, ईश्वराने आपल्यांपैकी प्रत्येकाची भूमिका ठरवून टाकली आहे. आपण प्रत्येकाने आपली भूमिका वठवावी यासाठी आपली ताटातूट होत आहे. ईश्वराने नेमून दिलेली भूमिका वठवीत असतांना, प्रसंगीं जळत्या खडकांना बांधून कोंडून पडावें लागेल; प्रसंगीं कीर्तीच्या उसळणाऱ्या लाटांच्या शिखरावर स्वार होतां येईल; कधी आपण लोकांना दिसूं, तर कधी अदृश्य राहूं. कधी आपण अवनत होऊं, तर क्वचित उन्नत होऊं. जगन्नियंत्याने कोणत्याहि परिस्थितींत ठेवलें तरी ती परिस्थिति सर्वोत्तम आहे असें मानून आपण असें समजलें पाहिजे, का आपलें जीवितकार्य एकाकी पार पाडणें हेंच आपल्या वांट्याचें कार्य आहे.

' माझा देहपात होऊन माझ्या अस्थि आणि रक्षा कोठे पडतील याचा नेम नाही. अंदमानचें वातावरण आधीच निर्जन व भेसूर आहे. तेथे वाह-

णाऱ्या नदी-नाल्यांचा उदासवाणा आवाज तेथील मूळच्या निर्जनपणाला अधिकच भेसूर बनवत असतो. किंवा असेंहि घडेल की, मध्यरात्रीं आपला नियत खेळ आकाशांत खेळणाऱ्या तारकांचें प्रतिबिंब पोटांत सामावून घेणाऱ्या गंगामातेच्या स्फटिकशुद्ध प्रवाहाच्या शेजारीं कोठे तरी माझ्या अस्थि नि रक्षा पडून राहतील. त्या कोठेहि पडलेल्या असोत! श्रीरामाने आपल्या आवडत्या लोकांचा पक्ष विजयधवल ठरविला आहे, दुष्टांना माघार घ्यावी लागली आहे आणि त्यांचा पाय जेथून पुढे पडला तेथवर त्यांना माघार घ्यावी लागली आहे, आपला हा भारतवर्ष वैभवांत उभा आहे, मानवजातीचें मार्ग-दर्शन करणारा दीपस्तंभ म्हणून यापुढे तो तेजस्वितेने तळपत राहील, असा पुकारा झाला आणि हौतात्म्य गाजविणाऱ्या विचारवीरांनो आणि कृतिवीरांनो, तुम्ही ज्या संग्रामांत लढलांत आणि पडलांत तो संग्राम यशस्वी झाला, उठा!' अशी घोषणा झाली की त्या वेळीं, त्या पडून राहिलेल्या अस्थि आणि ती पडून राहिलेली रक्षा यांच्यांत फिरून तेज व चैतन्य सळसळूं लागेल.

तोंवर, प्रिय मित्रांनो, राम राम!"

सावरकरांना बोटीवर नेतांना पळविण्याचा प्रयत्न होईल या भीतीने पोलिसांनी त्यांच्या प्रयाणाचा मार्ग व वेळ या बाबतींत अतिशय गुप्तता राखली होती. १ जुलै १९१० रोजीं सावरकरांना घेऊन 'मोरिया' बोटीने इंग्लंडचा किनारा सोडला.

प्रवास सुरू होतांच बोटीवरून पळून कसें जावें या दृष्टीने सावरकर विचार करूं लागले. आपल्या या विचाराचा आपल्या बरोबरच्या पार्कर आणि पॉवर या पोलिस-अधिकाऱ्यांना थांगपत्ता लागूं नये म्हणून ते युरोपीय पद्धतीचा रुबाबदार पोषाख करून भोजनगृहांत जात व सहप्रवाश्यांबरोबर गप्पा मारण्यांत, हास्यविनोद करण्यांत रंगून जात. ७ जुलैच्या रात्रीं 'मोरिया'ने मार्सेलिसच्या बंदरांत नांगर टाकला. किनारा अवघा दीडशे फुटांवर होता. मध्यरात्र होऊन गेली तरीहि सावरकरांना झोप येत नव्हती. मनांत विचारांचें काहूर माजलें होतें. पुढच्या बेताची मनांत उजळणी होत होती. शेजारीं झोपलेल्या पोलिस-अधि-काऱ्यांना संशय येऊं नये म्हणून त्यांनी झोपेचें सोंग मात्र छान घेतलें होतें. उजाडे-पर्यंत त्यांनी कसाबसा धीर धरला. आता अधिक वेळ दवडण्यांत अर्थ नव्हता!

सकाळीं ते शौचकुपाकडे निघताच पार्कर आणि पॉवर दोघेहि शौचकुपापर्यंत गेले. परंतु आत जातांच सावरकरांनी दरवाजा आंतून बंद केला व झोपावयाच्या वेळीं अंगावर चढविलेला गाऊन आरशावर टाकला. त्यामुळे सावरकर आंत काय करीत आहेत हें बाहेरून दिसेना. सावरकरांनी उडी मारून पोर्ट-होल गाठलें व त्यांतून आपले शरीर बोटीबाहेर झोकून देण्याचा ते प्रयत्न करूं लागले. या प्रयत्नांत बरगड्यांची कातडी सोलून निघाली. परंतु त्याकडे लक्ष देण्याइतका वेळ नव्हता. पोर्ट-होलमधून शरीर बाहेर काढतांना त्यांना कमालीचा त्रास झाला. त्रासापेक्षाहि वेळ जात आहे याचीच त्यांना चिंता वाटत होती. बऱ्याच प्रयासानंतर सावरकर पोर्ट-होलमधून बाहेर पडले व त्यांनी समुद्रांत उडी टाकली. बोटीच्या क्वार्टर-मास्टरच्या ध्यानांत हा प्रकार येतांच त्यानेहि सावरकरांच्या मागोमाग उडी टाकली. सावरकरांवर पहारा करण्यासाठी ठेवलेल्या एका इन्स्पेक्टरनेहि क्वार्टर-मास्टरचें अनुकरण केलें. या दोघांजणांनी गाठावयाच्या आंतच सावरकरांनी किनारा गाठला व 'गाडी' 'गाडी' असें ओरडत ते रस्त्यावरून धांवूं लागलें. धांवत असतांना आपले सहकारी कोठे दिसतात काय याचा ते शोध घेत होते. परंतु दोन-अडीच फर्लांग धांवूनहि कोणी दिसेना तेव्हा ते रस्त्यावर उभ्या असलेल्या फ्रेंच पोलिसापाशीं थांबले व आपल्याला मॅजिस्ट्रेट-कडे घेऊन चल असें ते त्याला सांगूं लागलें. मोडक्या-तोडक्या फ्रेंचमध्ये सावरकर आपली बाजू समजावून देत असतांना क्वार्टर-मास्टर व इन्स्पेक्टर तेथे येऊन पोचले होते. त्यांच्याबरोबर धक्क्यावरचा तेथे फ्रेंच अधिकारीहि आला होता. फ्रान्सच्या भूमीवर आपला अधिकार चालणार नाही हें ओळखून इंग्रज इन्स्पेक्टरने त्या फ्रेंच शिपायाला लाच दिली व सावरकरांना आपल्या ताब्यांत घेतलें. त्यांना बोटीवर आणण्यांत येतांच त्या चिडलेल्या इन्स्पेक्टरने त्यांना गुद्दा मारला. तशाहि परिस्थितींत सावरकर चवताळले आणि म्हणाले, "मारहाण कराल तर तुमच्यापैकी एकाचा तरी मुडदा पाडल्याशिवाय मी मरणार नाही हें ध्यानांत ठेवा." त्यांचा तो त्वेष पाहतांच इन्स्पेक्टर चपापला व त्याने सावरकरांच्या हाता-पायांत बेड्या अडकवून त्यांना केबिनमध्ये कोंडलें. दुसऱ्या दिवशीं 'मोरिया'ने मार्सेसिलचा किनारा सोडला. विजेच्या वेगाने बोटींतून उडी मारून एका स्वतंत्र राष्ट्राच्या भूमीवर पाय ठेवण्यासाठी करण्यांत

आलेले हें अनन्यसाधारण सागरदिव्य अयशस्वी ठरलें. सावरकरांचा पुढचा प्रवास सुरू झाला.

या प्रवासांत पोलिस-अधिकाऱ्यांनी सावरकरांचा अतोनात छळ केला. बेड्या तर हातापायांत कायमच असत. लहानशा कोठीबाहेर पडण्याची त्यांना मनाई करण्यांत आली. शिवीगाळ तर सतत चालू होती. एकदा तर पहारेकऱ्याने मारहाणीची धमकी दिली. साखळदंडांत अडकलेला हात हलवीत सावरकर म्हणाले, " अरे, मारहाणीची भीति कोणाला घालतोस ! मेलेल्याला कशाची रे भीति ! या उद्योगाकडे वळलो तेव्हा आम्हीं प्रथम आमच्या सर्वस्वाला आग लावली आणि मग दुसऱ्यांच्या चिता पेटवावयास निघालों. तूं मात्र आपला विचार कर ! जिवावर उदार झालेल्या माझ्यासारख्याच्या अंगाला हात लावलास तर नाहक प्राण गमावशील ! बायकोमुलें आहेत ना तुला ! " पहारेकऱ्याची शिवीगाळ बंद पडली होती.

एका महान् प्रयत्नांत अपयश आल्यानंतरहि सावरकरांची स्वतःवरील आणि अंगीकृत कार्यावरील श्रद्धा दुर्दम्य होती. हातापायांत बेड्या खळखळत असतांनाहि त्यांचा आत्मा गर्जून सांगत होता –

अनादि मी, अवध्य मी, अनंत मी भला
जिंकिल रिपु कवण असा जगतिं जन्मला
लोटि हिंस्र सिंहाच्या पंजरीं मला
नम्र दाससम चाटिल तो मत्पदांघ्रिला
कल्लोळी ज्वाळांच्या फेकिशी तरी
हट्टुनि भवति रचिति शीत सुप्रभावली
आण तुझ्या तोफांना क्रूर सैन्य तें
यंत्र तंत्र शास्त्र अस्त्र आग ओकतें
हलाहल त्रिनेत्र तो
तुम्हां मी सर्वां गिळूनि जिरवितों

बोटीने एडन सोडल्यानंतर उकाडा वाढला आणि सावरकरांचा दम्याचा विकार बळावला. उकाड्याने जिवाची इतकी तगमग होई की, श्वासोच्छ्वास करणेंहि जड जाऊं लागलें. या वेळीं त्यांच्या मनांत एकदा आत्महत्येचा विचारहि

१६.६.७४


येऊन गेली. अखेर २२ जुलैच्या सकाळीं 'मोरिया' मुंबईच्या धक्क्याला लागली. मुंबईहून सावरकरांना प्रथम नाशिकला नेण्यांत आलें आणि नंतर त्यांची येरवड्याच्या कारागृहात कच्ची कैद सुरू झाली.

सावरकरांवरील खटल्याची पूर्वतयारी चालू असतांना इंग्लंड-फ्रान्समधील वृत्तपत्रांमध्ये मार्सेलिस-प्रकरण गाजत होतें. सावरकरच्या '८ जुलैच्या उडी'ची बातमी तीन दिवसांनी प्रथम डेली मेलच्या अंकांत प्रसिद्ध झाली. या बातमीच्या आधारें पॅरिसमधल्या L'Humanite पत्राने आपल्या दुसऱ्या दिवशींच्या अंकांत फ्रेंच सरकारवर टीकेची झोड उठविली. 'आश्रय मागण्याच्या अधिकाराचा या प्रकरणांत भंग झाला असून तो निषेधार्ह आहे-विशेष म्हणजे सारें प्रकरण गुप्त ठेवण्यांत आलें ही गोष्ट तर सर्वस्वीं अनुचित आहे' असें या पत्राने म्हटलें होतें. इतकेंच नव्हे तर ही बातमी प्रसिद्ध केल्या-बद्दल डेली मेलचें अभिनंदन करून या पत्राने अशी मागणी केली की, हें प्रकरण येथेंच थांबतां कामा नये. मार्सेलिसच्या अधिकाऱ्यांनी राजकीय शरणार्थील दुसऱ्या सरकारच्या स्वाधीन केलें ही गोष्ट सरकारला न विचारतां झाली असली तरी देखील न्यायाची मुस्कटदाबी झाली आहे हा प्रश्न शिल्लक उरतोच.

मॉर्निंग पोस्ट, डेली मेल आदि कांही ब्रिटिश पत्रांनीहि दुसऱ्या भूमी-वर पाऊल ठेवलेला राजबंदी ब्रिटिश सरकारच्या अधिकारकक्षेबाहेर जातो ही गोष्ट आपल्या सरकारने ध्यानांत घेतलें पाहिजे अशी मागणी केली. या सर्व टीकेमुळे फ्रान्सने ब्रिटनला असें कळविलें की, मार्सेलिस-प्रकरणाची संपूर्ण चौकशी होईपर्यंत सावरकरांवरील खटल्याचें काम तहकूब ठेवावें. परंतु ही विनंती ब्रिटिश सरकारने फेटाळून लावली. फ्रान्सच्या भूमीवर पाऊल ठेवलेल्या सावरकरांवर ब्रिटनचा अधिकार चालतो किंवा नाही या प्रकरणाचा निर्णय लागण्यापूर्वीच नाशिकच्या न्यायालयांत सावरकरांवरील आरोपांची प्राथमिक चौकशी पुरी करून सरकारने या खटल्यासाठी सरन्यायाधीश सर बेसिल स्कॉट, न्यायमूर्ति हीटन व न्यायमूर्ति चंदावरकर या तिघांचे खास न्यायाधीश-मंडळहि नेमलें.

आपल्या सूचनेकडे लक्ष न देतां ब्रिटिश सरकारने सावरकरांवरील खटल्याचें काम सुरू केलें म्हणून सावरकरांना आपल्या ताब्यांत द्यावें अशी फ्रान्सने मागणी केली. परंतु सावरकर-प्रकरण हा आपला अंतर्गत

प्रश्न असल्यामुळे फ्रान्सने त्यांत हस्तक्षेप करूं नये असें ब्रिटनतर्फे कळविण्यांत आलें. उभय राष्ट्रांमधील हा वाद अखेर हेगच्या आंतरराष्ट्रीय न्यायालयाकडे सोपविण्याचें उभयपक्षीं ठरलें. २५ ऑक्टोबर १९१० रोजीं झालेल्या करारान्वये बेल्जमचे भूतपूर्व प्रधानमंत्री एम्. बर्नार्ट, नॉर्वेचे भूतपूर्व मंत्री ग्रॅम व हॉलंडच्या राज्यसभेचे सदस्य लोहमन या तिघांचें लवाद-मंडळ स्थापन होतांच या मंडळापुढे आपली बाजू मांडण्याची आपल्याला संधि मिळाली पाहिजे अशी सावरकरांनी मागणी केली. परंतु ब्रिटनने ती अमान्य केली. या छोट्या राष्ट्रांच्या प्रतिनिधींचें लवाद-मंडळ ब्रिटनच्या तंत्रानुसार वागणार हें उघडच होतें. शिवाय फ्रान्सलाहि या प्रकरणांत फारसा उत्साह नव्हता. त्यामुळे फ्रेंच प्रतिनिधीनें आपली बाजू अगदी मोघम शब्दांत मांडली. २४ फेब्रुवारी १९११ रोजीं लवाद-मंडळाने आपला निर्णय जाहीर केला. त्यांत असें म्हटलें होतें की, " सावरकरांना पकडणें व त्यांना ब्रिटिश पोलिसांच्या स्वाधीन करणें हा प्रकार अनुचित झाला हें आम्हांस मान्य आहे. एका राष्ट्राचा बंदिवान दुसऱ्या राष्ट्राच्या नोकराने चुकीने परत केला म्हणून तो बंदिवान त्या दुसऱ्या राष्ट्राच्या ताब्यांत पुन्हा दिला पाहिजे असें पहिल्या राष्ट्रावर बंधन घालणारी तरतूद आंतरराष्ट्रीय कायद्यांत नाही. शिवाय सावरकरांना आता राजद्रोहाच्या आरोपाखाली दोन जन्मठेपींची शिक्षा झाली असल्यामुळे त्यांना परत फ्रान्समध्ये आणण्यामुळे कांहीच निष्पन्न होणार नाही. "

लवाद-मंडळाचा हा निर्णय समाधानकारक नाही व या मंडळाने केवळ उडवाउडवीचें धोरण स्वीकारलें अशी टीका मँचेस्टर गार्डियन, डेली न्यूज या ब्रिटिश पत्रांनी केली. परंतु ब्रिटिश सरकारने या टीकेकडे सोयिस्कर दुर्लक्ष केलें.

सावरकरांवरील आरोपांची चौकशी करण्यासाठी सर बेसिल स्कॉट यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यांत आलेल्या खास मंडळापुढे तीन खटले चालणार होते. परंतु प्रारंभींच बादशहाविरुद्ध युद्ध पुकारल्याचा आरोप मागे घेण्यांत आला. राजद्रोहाच्या आरोपावरून भरलेल्या खटल्यांत सावरकरांसमवेत आणखी सदतीस आरोपी होते. जॅक्सन यांच्या खुनाला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपावरून भरलेल्या खटल्यांत मात्र ते एकटेच आरोपी होते.

१५ सप्टेंबर १९१० रोजीं खास मंडळाचें कामकाज सुरू झालें. तत्पूर्वी सावरकरांना येरवड्याहून मुंबईतल्या डोंगरीच्या तुरुंगांत आणण्यांत आलें

होतें. अतिशय कडक बंदोबस्तांत सावरकरांना न्यायालयांत आणलें जातांच इतर आरोपींनी टाळ्या वाजवून आपल्या नेत्यासंबंधीचा आदर व्यक्त केला. विलायती पोषाख करून सावरकर न्यायालयांत हजर झाले होते. भोवतालच्या सदतीस आरोपींमध्ये त्यांचे धाकटे बंधू नारायणरावहि होते. सावरकर इंग्लंडला जावयास निघाले होते तेव्हा नारायणराव निरोप देण्यासाठी मुंबईला आले होते. त्यानंतर दोघे भाऊ प्रथमच भेटत होते; एकाच खटल्यांतील आरोपी म्हणून. न्यायालयाचें कामकाज सुरू होण्यापूर्वी सावरकर आपल्या सहकाऱ्यांशीं गप्पा मारण्यांत रंगून गेले. खटल्याचें कामकाज चालू असतांनाच वि. स. बवें, वि. वा. फुलंब्रीकर व शं. ब. वैद्य या तिघांजणांना सोडून देण्यांत आलें. का. ह. अंकुशकर, द. पां. जोशी, वा. रा. कुळकर्णी व चतुर्भुज हे चौघे माफीचे साक्षीदार झाले होते. सावरकरांच्या वतीने जोसेफ बॅप्टिस्टा काम पाहत होते. ६९ दिवस चाललेल्या या खटल्यामध्ये तीनशे साक्षीदारांचे जबाब घेण्यांत आले.

आपल्याला कांही सांगावयाचें आहे काय असें सावरकरांना विचारण्यांत आलें. ते म्हणाले, " फ्रान्सकडून मला संरक्षण मिळालें पाहिजे अशी माझी मागणी आहे. स्वातंत्र्य, बंधुभाव आणि समता या तत्त्वांचा पुरस्कार करणारा फ्रान्स मला आसरा देईल या आशेने मी तेथे गेलों. पण ब्रिटिश शिपायांनी जबरदस्तीने मला पकडून आणलें. त्यामुळे ब्रिटिश सरकार मला फ्रान्सला पाठवील अशी माझी अपेक्षा आहे. माझ्यावर भरण्यांत आलेला खटला या न्यायालयाच्या अधिकारकक्षेबाहेरचा असल्यामुळे मी या खटल्याच्या कामकाजांत भाग घेऊं इच्छित नाही. "

२२ डिसेंबरला खटल्याचें काम संपलें. दोन दिवसांनी खटल्याचा निकाल सांगण्यांत येणार होता. आपल्याला सर्वांत जास्त शिक्षा होणार हें सावरकरांना दुसऱ्या कोणी सांगण्याची गरज नव्हती. या शिक्षेमुळे मातृभूमीच्या ऋणांतील पहिला हप्ता आपण फेडणार आहोंत या भावनेने निकालाच्या आदल्या दिवशीं डोंगरीच्या कारागृहांत सावरकरांनी ' पहिला हप्ता ' या कवितेंत आपलें मनोगत व्यक्त केलें आहे –

> मानुनि घे साची । अल्पस्वल्प तरि सेवा अपुल्या अर्भक बालाची
> ऋण हें बहु झालें । तुझ्या स्तनींचें स्तन्य पाजुनी धन्य अम्हां केलें
> ऋण तें फेडाया । हप्ता पहिला तप्त स्थंडिलीं देह अर्पितों हा

सवेचि जन्मुनिया। त्वन्मोचन हवनांत हवी करूं पुनः पुन्हा देहा
सारथी जिचा अभिमानी। कृष्णजी अणी राम सेनानी
अशि तीस कोटि नवसेना
ती अम्हांविना थांबेना
परि करूनि दुष्टदलदलना
रोविलच स्वकरीं। स्वातंत्र्याचा हिमालयावरिं झेंडा जरतारी

२४ डिसेंबर १९१० हा दिवस उजाडला. सावरकरांसह सर्व आरोपींना न्यायालयांत आणण्यांत आलें. थोड्याच वेळांत तिथे न्यायाधीशहि प्रविष्ट झाले. सरन्यायाधीश सर बेसिल स्कॉट निकालपत्र वाचूं लागलें – पहिले आरोपी विनायक दामोदर सावरकर यांना जन्मठेप काळेपाणी व सर्व मालमत्तेची जप्ती.

आठ आरोपी निर्दोष ठरले व उरलेल्या सव्वीस जणांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा सुनावण्यांत आल्या. नारायणराव सावरकरांना सहा महिने सश्रम कारावासाची शिक्षा झाली होती. निकालपत्र वाचून होतांच सर्व आरोपी उभे राहिले आणि त्यांच्या कंठांतून गर्जना उठली – 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय!' पोलिस दटावूं लागतांच पुन्हा एकदा हीच घोषणा न्यायालयांत दुमदुमली. पोलिसांनी प्रथम सावरकरांना हातकडी घातली. आरोपींच्या पिंजऱ्यांतून त्यांना एकट्यालाच प्रथम बाहेर काढण्यांत आलें. सावरकर क्षणभर मागे वळलें. धाकट्या भावाचा निरोप घेतला. बद्ध हातांनी सहकाऱ्यांना नमस्कार केला आणि धीरगंभीर पावलें टाकीत ते पोलिसांबरोबर बाहेर पडलें.

सावरकरांना एक जन्मठेप देऊन सरकारचें समाधान झालें नव्हतें. २३ जानेवारी १९११ रोजीं जॅक्सन यांच्या खुनाला प्रोत्साहन दिल्याच्या आरोपाखाली दुसरा खटला सुरू झाला. १९ एप्रिल १९१० रोजीं जॅक्सन खून-प्रकरणीं कान्हेरे, कर्वे व देशपांडे यांना फाशीं देण्यांत आल्यानंतर वस्तुतः हें प्रकरण संपलें होतें. परंतु सावरकर हातांत लागतांच तो आरोप उकरून काढण्यांत आला. सावरकरांनी हा खटला तरी लढवावा असा बॅप्टिस्टा यांचा आग्रह होता. परंतु या न्यायालयाला आपल्यावर खटला भरण्याचा अधिकारच नाही ही सावरकरांची भूमिका ठाम होती. त्यामुळे आठवडाभरांतच खटल्याचें कामकाज आटोपलें आणि ३० जानेवारी रोजीं, सावरकरांना आणखी एका जन्म-

ठेपेची शिक्षा सुनावण्यांत आली. पन्नास वर्षें काळेपाणी. कधीहि कोणालाहि न झालेली शिक्षा. आता तरी हा धीरोदात्त क्रांतिकारक हादरून जाईल व दयेची याचना करील अशी न्यायाधीशांची अपेक्षा होती. परंतु शिक्षा ऐकल्यावर सावरकर एवढेच म्हणाले – " तुमच्या कायद्यानुसार तुम्हीं जी परमावधीची शिक्षा मला सांगितली आहे ती निमूटपणें भोगण्यास मी सिद्ध आहें. आमची प्रिय मातृभूमि तात्कालिक नसल्या तरी शाश्वत स्वरूपाच्या विजयापर्यंत पोचावयाची असेल तर ती आमचे कष्ट आणि त्याग या मार्गानेच पोचेल अशी माझी श्रद्धा आहे. "

मातृभूमीच्या ऋणाचा पहिला हता फेडण्यासाठी पन्नास वर्षांच्या शिक्षेचा बोजा डोक्यावर घेऊन सावरकर डोंगरीच्या तुरुंगांत परतले. २४ फेब्रुवारी रोजीं हेगच्या आंतरराष्ट्रीय लवाद-मंडळाने दिलेला निकाल भारतांत पोचावयास सहा-सात दिवस लागले. त्या निकालाची प्रत घेऊन डोंगरीचे बंदीपाल १ मार्च १९११ रोजीं सावरकरांच्या कोठडींत आले. त्यांनी हेगचा निकाल वाचून दाखविला. सावरकरांनी घरचे कपडे उतरवून कैद्याचा पोषाख चढविला. छातीवर रुळणारा बिल्ला सुटकेचा दिवस सांगत होता – २४ डिसेंबर १९६० !

निरोप घेण्यापूर्वी बंदीपाल निष्ठुर विनोद करण्यासाठी सावरकरांना म्हणाला, " कांही चिंता नाही. दयाळु सरकार तुम्हांला १९६० सालीं सोडीलच सोडील. "

" पण मृत्यु अधिक दयाळु आहे. त्याने मला त्यापूर्वीच सोडून दिलें तर – ! " – हसण्याचा प्रयत्न करीत सावरकर उत्तरले.

बंदीपाल हसत हसत निघून गेला. त्या कोठडींत दोघेचजण उरले होते. सावरकर आणि त्यांची पन्नास वर्षें काळ्यापाण्याची शिक्षा. त्या उदास कोठडींत सावरकर आपल्या शिक्षेकडे निरखून पाहूं लागले.

७

# अंदमानच्या अंधेरींत

बंदीपाल निघून गेला आणि हवालदार आंत आला. त्याच्या मागे डोक्यावर चऱ्हाट घेतलेला कैदी उभा होता. चऱ्हाटाचा काथ्या कसा करतात हें यांना दाखव बघूं असें हवालदाराने कैद्याला सांगतांच, सावरकरांना आपल्या शिक्षेची ओळख पटली. सारें आयुष्य काथ्या कुटण्यांत वाया घालवावयाचें या कल्पनेने त्यांचें मन आक्रंदूं लागलें. पण लगेच तें सावरलें गेलें. ते स्वतःलाच समजावूं लागले – 'हं चल, दे तोंड तिला. काथ्या कुटावयाचा इतकेंच ना! हा रे वेड्या मना! त्यांत हलकेंपण तें काय आहे? आयुष्य व्यर्थ जातें? अरे, हें आयुष्यहि स्वतःच एक काथ्याकूट आहे. पंचमहाभूतांस पिळून वळून हें आयुष्याचें चऱ्हाट वळावयाचें, तेच ते तंतु जोडून जोडून लांबवीत बसावयाचें व शेवटीं सडत आलें की, मृत्यूच्या 'मोगरी'ने कुटून, पुन्हा काथ्या करून, पंचमहाभूतांच्या ढिगांत मिसळून द्यावयाचें! सकाळ झाली की संध्याकाळ, संध्याकाळ झाली की सकाळ, सगळी काथ्याकूट! आपण वनस्पति खात खात जगावयाचें, जगत जगत मरावयाचें, मरतांच त्या हाडामांसास वनस्पतीने खावयाचें, सगळीं काथ्याकूट! त्याचाच अवश्य व अपरिहार्य भाग म्हणून हें वळलेलें चऱ्हाट उकलून कुटण्याची आमची काथ्याकूट. जर ती महान् काथ्याकूट महत्त्वाची असेल, जर तींत आयुष्य व्यर्थ जात नसेल तर हीहि एक छोटीशी काथ्यकूट कर्तव्यच आहे. कारण त्या महान् काथ्याकुटीचा हाहि एक अपरिहार्य घटक आहे. कारण तो घडत आहे.'

सतत पन्नास वर्षें उदासवाण्या कोठर्डांत एकाकी अवस्थेंत एक एक तास मोजत आयुष्य व्यतीत करण्याची कल्पना सदैव प्रतिकूल तेंच घडेल असें गृहीत धरून त्याला तोंड देण्याची मनाची सिद्धता करणाऱ्या सावरकरांनाहि असह्य वाटूं लागली. कोठडींतील निष्क्रियता त्यांना अस्वस्थ करीत होती. यापुढचें आपलें सारें आयुष्य निरर्थक ठरणार ही व्यथा सलूं लागली. पण या निरर्थक आयुष्यालाहि एक भव्य आणि उदात्त अर्थ आहे याचीहि त्यांना लगेच जाणीव होई व स्वतःलाच ते म्हणत, ' सिद्धीच्या मानससरोवरावर क्रीडा करण्याचें ज्या पिढीचें भाग्य असेल तें राजहंस सुखेनैव मुक्ताफळ-भोजन करून बिसतंतूंचा फराळ करीत! परंतु प्रयत्नांच्या मृतसरोवराच्या विषारी प्रदेशांतून ज्या पिढीस मार्ग कंठावयाचा आहे तिने प्रतिकुलाचे लोखंडाचे चणेच खावयाची व पचवावयाची सवय ठेवली पाहिजे !'

महाकाव्य लिहिण्याची बालपणापासून त्यांच्या मनांत वसत असलेली आकांक्षा कारागृहांतील एकांतवासामुळे पुन्हा आकार घरूं लागली. कागद-पेन्सिल मिळाली तर ठीकच, नाही तर दररोज दहा-वीस ओळी जुळवावयाच्या, त्या पाठ करावयाच्या, दुसऱ्या दिवशीं प्रथम त्या म्हणावयाच्या व नंतर पुढल्या भागाकडे वळावयाचें अशी मनाला सवय लावून घेतली तर हा एकान्तवासहि तितकासा कंटाळवाणा वाटणार नाही या विचाराने सावरकरांचें कविमन महाकाव्याचा विषय शोधूं लागलें. त्यांच्या डोळ्यांपुढे प्रथम उभे राहिले ते गुरु गोविंदसिंह. ज्याच्या संसाराची राखरांगोळी झाली आहे, पराभवाची चाहूल लागतांच सहकाऱ्यांनी ज्याची साथ सोडलेली आहे आणि तरी तें दुःख व तें अपयश ज्याने हलाहलासारखें पचविलें त्या गुरु गोविंदसिंहांचें अपयशच आपण गावें हा विचार मनांत स्थिर होतांच, काथ्या कुटतां कुटतां सावरकर गोविंदसिंहांच्या चरित्रगायनांत रंगून गेले. दहा-पंधरा आर्या रचूनहि झाल्या. क्षणमात्र ते भोवतालचें जग विसरले होते. काथ्या कुटतांना सोलून निघालेल्या तळहातांतून रक्त ठिबकूं लागलें तेव्हा कोठे ते भानावर आले.

सावरकर डोंगरीच्या तुरुंगांत महिनाभर होते. या काळांत गोविंदसिंहा-वरील काव्य पुरें झालें होतें. डोंगरीच्या तुरुंगांतील दिनक्रम ठरून गेला होता. सकाळीं लवकर उठावयाचें, योगसूत्रें म्हणत आणि त्या सूत्रांवर विचार करीत

फिरण्याचा व्यायाम करावयाचा, दुपारीं काथ्या कुटतांना काव्यसाधनेंत निमग्न व्हावयाचें आणि संध्याकाळचें जेवण आटोपलें की ध्यानधारणा करावयाची.

कारागृहांतील आपल्या जीवनाची दैनंदिनीहि काव्यबद्ध करावी असें सावरकरांनी ठरविलें आणि डोंगरीच्या तुरुंगांत 'सप्तर्षि' या काव्याचा पहिला भाग त्यांनी पुरा केला. 'हेगच्या न्यायालयाने तुमचा अर्ज फेटाळला असून पन्नास वर्षे काळ्यापाण्याची शिक्षा आता कायम करण्यांत आली आहे' हें वृत्त बंदीपालाने सांगतांच आपली मनःस्थिति कशी झाली याचें वर्णन सावरकरांनी या कवितेंत केलें आहे –

प्रातःकाळीं आला कळवूं, कारागृहाधिपती मजला
झाली सजा अहा हीं वर्षें पन्नास पुरीं तुजला
अभ्यासकठोरहि तें हृदय तयाचें सखेद कळवळलें
परि हें स्मित मद्वदनावरूनी श्रवणें न लेश मावळलें
तोंची वस्त्रे माझीं सहवासाचीं हिरोनिया मजशीं
देतां बंदीची तीं केलीं धारण करीत राम जशीं
मंत्र तसाची वारंवार स्फूर्त्यर्थ मी तदा साचा
वर्णित रामविवासन जपतां तो श्लोक कालिदासाचा
जातांचि परि अधिपति सोडूनि मज एकला सशंख तो
सहस्राचि लोट तत्क्षण दुःखाश्रूंचा अदम्य खळखळतो
वर्षें पन्नास! अहा! वर्षें पन्नास हीं! अहा! वर्षें!
ध्वनि हा पुनः पुन्हा ही मजवरि पाऊस की तसा वर्षे

या अशा मनस्थितींत पतंजलीचें योगशास्त्रच आपल्या मनाला शांति देऊं शकेल या विचाराने शिक्षेच्या पहिल्या दिवसापासून सावरकरांनी पूर्वी पठण केलेल्या योगसूत्रांचा अभ्यास करावयास प्रारंभ केला. या योगशक्तीच्या बळावरच, सारा जन्म तुरुंगांत सडत काढण्याच्या भीषण कल्पनेवर त्यांचें मन मात करूं शकलें.

नियमानुरूप त्या मी चित्तैकाग्रीं करावया प्रगती
पुरती 'सक्तमजुरी' होतांची की धुवोनी कर मग ती

योगीराजाचा त्या ग्रंथ श्रीराजयोग मी उघडी
शांतरसाचा पेला दूर करावा गमेचि जो न घडी
घेतां घेतां ऐशा वृत्ती ध्यानस्थ चित्ति विलयाते
ये सुखद अनुभवाया आत्मरतीचा प्रसाद तिल याते
मोहक मोहक झरली शांत रसाचे हृदांत पाझर ते
कैवल्यामृत-निधिचे उडतां कांही तुषार ओझरते

या 'सप्तर्षि' काव्याचा उत्तरार्ध त्यांनी भायखळ्याच्या कारागृहांत पुरा केला.

सावरकर डोंगरीच्या तुरुंगांत असतांना माई – त्यांच्या पत्नी – आपल्या थोरल्या भावासह त्यांना भेटावयास आल्या. पांच वर्षांपूर्वी आपण बॅरिस्टरीचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला निघालों होतों तेव्हा या एकोणीस-वीस वर्षांच्या मुलीने आपल्या डोळ्यांपुढे किती रम्य स्वप्नें खेळविलीं असतील आणि आज आपण गजाआड उभे आहोंत, अंगावर कैद्याचा पोषाख आहे, पायांत जड वजनाच्या बेड्या ठोकलेल्या आहेत आणि हें सारें दिव्य एक नव्हे, दोन नव्हे, पन्नास वर्षे करावयाचें आहे या जाणीवेने जीवनसहचारिणीने आपल्याकडे पाहिलें तर तिला काय वाटेल या विचाराने सावरकरांचा जीव कासावीस झाला. परंतु हृदयांत उसळलेला हा डोंब आपल्या चेहऱ्यावर दिसला तर त्या बिचारीची काय अवस्था होईल असा विवेक करून सावरकर बळेंच हसत म्हणाले, "काय, मला पाहिल्याबरोबर ओळखलेंत का ? हे केवळ कपडे बदललेले आहेत. मी तोच आहें. थंडीचें निवारण करणें हा जो कपड्यांचा मुख्य हेतु आहे तो ह्या कपड्यांनीहि बहुतांशीं पूर्ण होतो."

सावरकरांच्या या बोलण्याने माईंना थोडा धीर आला. त्यांनीहि स्वतःला सावरलें आणि पोलिसी पहाऱ्यांत पति-पत्नींच्या गप्पा सुरू झाल्या. गप्पांच्या ओघांत सावरकर आपल्या पत्नीला म्हणाले, "ईश्वराची दया असेल तर पुन्हा भेट होईलच. तोंवर जर कधी ह्या सामान्य संसाराचा मोह होऊं लागला तर असा विचार करा की, मुलां-मुलींची वीण वाढविणें व चार काटक्या एकत्र करून घरटीं बांधणें ह्यालाच जर संसार म्हणावयाचें असेल तर असले संसार कावळे-चिमण्याहि करीतच आहेत. पण संसाराचा याहून भव्यतर अर्थ घेणें असेल तर मनुष्यासारखा संसार थाटण्यांत आपणहि कृतकार्य झालों आहोंत

आपली चार चूल-बोळकीं आपण फोडून टाकलीं. पण त्यायोगे पुढेमागे हजारो जणांच्या घरीं क्वचित् सोन्याचा धूर निघेल."

भेटीची वेळ आटोपली. डोळ्यांच्या कडेला साठलेले अश्रुबिंदु पुसत माई उठल्या. वेडीचा आपल्याला कांहीच त्रास होत नाही हें माईंना दाखविण्यासाठी त्या वेडीचा आवाज करीत सावरकरांनी आपल्या पत्नीचा निरोप घेतला आणि ते कोठडीकडे परतले. इतका वेळ विवेकाचा बांध घातलेल्या त्यांच्या मनाने कोठडींत प्रवेशतांच एकच आकांत मांडला. कुटुंबीयांची व आपली पुन्हा कधी तरी भेट होणार आहे की नाही या शंकेने त्यांचें मन ठणकत होतें. कोठडीच्या वळचणींत बसलेलीं कबुतराचीं पिल्लें, सकाळपासून बाहेर गेलेली आई परत न आल्यामुळे तडफडत होतीं. त्या पिल्लांचें आणि आपलें दुःख कांही वेगळें नाही असें जमिनीवर पडल्या पडल्या विचारांचें आवर्त मनांत निर्माण होत आहे तोंच हवालदार खेकसला – " असें झोपलांत काय ? कामाला लागा ! " पुन्हा काथ्याकूट सुरू झाली.

एप्रिलच्या प्रारंभीं सावरकरांना भायखळ्याच्या तुरुंगांत आणण्यांत आलें. डोंगरीपेक्षाहि ही जागा अधिक उदासवाणी व निर्जन होती. मनाची उदासीनता दूर करण्यासाठी आपल्याला पुस्तकें वाचावयास मिळावींत असा त्यांनी अर्ज केला. दुसरें कोणतेंच पुस्तक देणें शक्य नसेल तर निदान बायबल तरी द्या असें त्यांनी कळविल्यामुळे दोन-चार दिवसांनी बायबल देण्यांत आलें. पॅरिसला असतांना सावरकरांनी तें एकदा वाचलें होतें. तेव्हापासून येशु ख्रिस्ताच्या जीवनाविषयी व उपदेशाविषयी त्यांच्या मनांत आदर निर्माण झाला होता. येशूच्या जीवनावरहि महाकाव्य लिहिण्याचा विचार मनांत आल्यामुळेच त्यांनी बायबल मागविलें होतें.

आपल्या दोन जन्मठेपींच्या शिक्षा एककालिक कराव्यात व पंचवीस वर्षांनी आपली सुटका करावी असा एक अर्ज सावरकरांनी सरकारकडे धाडला होता. त्यांत त्यांनी असेंहि म्हटलें होतें की, एका जन्मठेपीची शिक्षा भोगल्यानंतर दुसरी जन्मठेप भोगावयाची असा जर दोन जन्मठेपींचा अर्थ करण्यांत आला तर ही दुसरी जन्मठेप भोगण्यासाठी आपल्याला दुसरा जन्मच घेतला पाहिजे. परंतु हा अर्ज फेटाळण्यांत आला व एका जन्मठेपीनंतर दुसरी जन्मठेप

भोगावयाची असल्यामुळ १९६० मध्येच आपली सुटका होईल असें सरकारने त्यांना कळविलें तेव्हा ते गमतीने म्हणाले, " म्हणजे हिंदु लोकांच्या पुनर्जन्माच्या सिद्धान्तावर सरकारचाहि विश्वास आहे तर ! "

भायखळ्याच्या तुरुंगांत दीड महिना काढल्यानंतर मेच्या दुसऱ्या आठवड्यांत त्यांना ठाण्याच्या तुरुंगांत हलविण्यांत आलें. आपले धाकटे बंधु नारायणराव याच तुरुंगांत आहेत असें वॉर्डरकडून त्यांना कळलें. नारायणरावांचें पत्र घेऊनच तो वॉर्डर आला होता. मध्यरात्रींच्या वेळीं कंदिलाच्या अपुऱ्या प्रकाशांत सावरकरांनी त्या पाटीवर उत्तर लिहिलें – ' जर तेथील नियमाप्रमाणे मला कुटुंबास तिकडे दहा-पांच वर्षांनी नेऊं दिलें तर जीवित तिकडे ज्ञानाच्या व्यासंगांत घालवीन आणि जरी मला हिंदुस्थानच्या पूण्यभूमीच्या तटावर पाय ठेवतां आला नाही तरी मी रचीत असलेलें महाकाव्य ईश्वराने दिलें, तर त्या अभिनव कुमारांच्या कंठांनी देशभर प्रख्यात करवीन. एका आयुष्याचें साफल्य संपादण्यास हें कार्यहि समर्थ आहे. या कार्यक्रमाला धरून मी पंचवीस वर्षें अंदमानांत काढीन. परंतु जर ही एक जन्मठेप भोगल्यानंतरहि मला सोडण्यांत आलें नाही तर मात्र ... सुटेन वा ... असा मरेन हा माझा निर्धार आहे.

' तूं चिंता करूं नकोस किंवा जीवित विफल झालें म्हणून खिन्न होऊं नकोस. बाष्पयंत्रांत प्रेरणा उत्पन्न होण्यासाठी आपल्या देहास इंधन करून जर कोणी जळत राहणेंच असेल तर मग तें आपणच कां राहूं नये ? असलें नुसतें जळत राहणें कर्मच आहे, इतकेंच नव्हे पण महत्कर्म आहे. '

नारायणरावांची प्रत्यक्ष भेट घेणें मात्र त्यांना जमलें नाही. कारण सावरकरांना तेथे आणलें जातांच नारायणरावांना दुसऱ्या तुरुंगांत हलविण्यांत आलें. भविष्यकाळच्या विचारांत सावरकर निमग्न असतांना पहाऱ्यावरचा शिपाई म्हणावयाचा, " दादा, सोन्यासारखें हें रूप, तारुण्य, बालिस्टरी, दिवाणाची मुलगी दिलेली. नाश केलांत बघा आयुष्याचा ! अहो, विलायतेंतच कोण्या छानछबेलीच्या रंगांत रंगून ही पंचविशी काढावयाची तों तींतच मिसूर फुटते न फुटते तो ह्या लोखंडी बेड्या कवटाळण्याची तुम्हांला काय हौस झाली ? " हा शिपाई आणखी दहा-पांच बंदीवान जमवून ' देखो हमारा वीर ' म्हणत हसे व काठी फिरवीत नाचूं लागे. आपला हा तमाशा चोरापोरांच्या

करमणुकीस्तव चालण्यापेक्षा आपल्याला फाशीं झाली असती तर बरें झालें असतें असें सावरकरांना वाटे.

दोन जन्मठेपींबरोबरच सावरकरांची मालमत्ता जप्त करण्याचा हुकूमहि न्यायालयाने दिला होता. भगूरची शेतजमीन, वाडा वगैरे पूर्वीच घरखर्चासाठी विकून टाकण्यांत आला होता. राहतां राहिली होती ती बखळ. तिचा लिलाव करून सरकारने अडीचशे रुपये वसूल केले. मालमत्ता जप्त करण्याच्या हुकमाची कसोशीने अंमलबजावणी करण्यासाठी सावरकर ठाण्याच्या तुरुंगांत असतांना त्यांचा चष्मा व एक आणा किमतीचें गीतेचें लहानसें पुस्तक या दोन वस्तूहि जप्त करण्यांत आल्या. कांही सरकारी सामान कैद्याला केवळ वापरण्यासाठी म्हणून दिलें जातें. त्या सवलतीखाली दुसऱ्या दिवशीं चष्मा व गीता या ‘ सरकारी मालकी ’च्या वस्तु केवळ वापरण्याठी म्हणून परत देण्यांत आल्या.

काळ्यापाण्यावर सावरकरांना नेण्यासाठी जूनच्या शेवटच्या आठवड्यांत मद्रासला नेण्यांत आलें. मुंबईहून मद्रासपर्यंतचा सारा प्रवास त्यांना बंद डब्यां-तून करावा लागला. यामुळे उकाड्याचा फारच त्रास झाला. बाहेर ऊन रणरणत होतें. अंतःकरणांत मातृभूमीच्या वियोगामुळे दुःखाचे कढ येत होते. त्यांचें मन आक्रंदत होतें – ‘ गावामागून गावें, नगरामागून नगरें मागे टाकीत, वनें-उपवनें, पर्वत, नद्या ओलांडीत ही आगगाडी पिसाळलेल्या वाघिणीसारखी मला तोंडांत धरून धांवत चालली आहे. जितक्या वेगाने ही आगगाडी मला माझ्या मायदेशांतून काळ्यापाण्याकडे ओढून नेत आहे, हाय हाय ! तित-क्याच वेगाने ती मला काळ्यापाण्यावरून परत आणून माझ्या मायदेशांत कधी सोडील ? कधी सोडील का ? कसली सोडणार ? तशी आशा करणें हें मानसिक आश्चर्यच नव्हे काय ? सैबेरियांत नाही का रशिया रशिया करीत शेकडो लोक मेले. मीहि अंदमानांत हाय भारत, हाय हिंदुस्थान करीत मरेन ! ’

मद्रास बंदरांत उभ्या असलेल्या ‘महाराजा’ बोटीवर प्रथम खुनी, लुटारू, दरोडेखोर आदि अट्टल गुन्हेगारांना चढविण्यांत आलें. त्यानंतर एका लहानशा होडींतून सावरकरांनाहि कडेकोट बंदोबस्तांत बोटीवर नेण्यांत आलें.

त्या वेळीं बोटीमध्ये अधिकारी, नोकर व भोवतालचे कैदी सावरकरांना पाहण्यासाठी उभे होते. आपण जसे एखाद्या प्रेताला तिरडीवर चढवितांना व नीटनेटकें बांधतांना पाहतों तसे ते खलाशी व कैदी आपल्याकडे स्तिमित नजरेने व निर्लज्ज गमतीने पाहत असल्यामुळे सावरकरांच्या मनांत विचार आला की, ' त्या महाराजा बोटीवर जन्मठेप्यांचें चढणें म्हणजे प्रेताच्या तिरडीवर जिवंतपणींच बांधलें जाणें होतें. आजपर्यंत जे शेकडो, हजारो जन्मठेपी अपराधी त्या भयंकर बोटीवर चढून काळयापाण्यावर गेले त्यांपैकी हजारीं दहाहि जिवंतपणीं देशास परत येऊं शकले नाहीत. अठरा-वीस वर्षांची चढत्या तारुण्याचीं पोरें त्या जहाजावर पाय टाकतां ऐंशीं वर्षांच्या म्हाताऱ्यासारखीं प्रेतकळा आलेली दिसूं लागत. मी खरोखरच तिरडीवर चढविला जात होतों. फरक इतकाच की, प्रेताला तिरडीवर चढवितांना ज्या भावना प्रेक्षकांच्या मनांना स्तंभित करून वा कासावीस करून प्रेतयात्रेच्या वाटेवर खिळून धरतात त्या भावना यात्रा करणाऱ्या प्रेताला कळत नसतात. पण मी तिरडीवर बांधला जात आहें आणि माझी प्रेतयात्रा निघत आहे मला कळत होतें. मी प्रेत होत आहें या कळण्यापेक्षा हजारो देशबांधव 'आ' करून मजकडे नुसतें पाहत उभे राहिले आहेत या कळण्याचेंच मला अधिक दुःख वाटलें. त्यांतील एक जरी मनुष्य मला असें सांगतां, ' जा बंधो, जा. तुझ्यामागे मी आणि आम्ही तुझ्या व्रताचें पारणें फेडून, ह्या आपल्या हिंदुस्थानला स्वतंत्र करू ' तर माझ्या तिरडीची तेथल्या तेथेच फुलांची सेज झाली असती. '

१ जुलै १९१० रोजीं 'मोरिया' बोटीने इंग्लंडचा किनारा सोडला होता. बरोबर एक वर्षाने १ जुलै १९११ रोजीं 'महाराजा' बोटीने भारताचा किनारा सोडला. 'मोरिया' सावरकरांना मायदेशास आणीत होती. 'महाराजा' त्यांना मायभूमीपासून दूर नेत होती – अंदमानांत पन्नास वर्षांची शिक्षा भोगण्यासाठी !

४ जुलै रोजीं 'महाराजा' पोर्टब्लेअर बंदरांत येऊन उभी राहिली आणि बेड्यांनी जखडलेल्या अनवाणी पायांनी सावरकर अंदमानची चढण चढूं लागले. चढण संपतांच सेल्युलर जेलचा दरवाजा उघडला गेला आणि सावरकरांना आंत घेऊन तो पुन्हा बंद झाला. एवढ्यांत बंदीपाल बारी तेथे आला व सावरकरांना न्याहाळत पोलिसांना म्हणाला, " सोडा त्याला. तो कांही वाघ

नाही." पोलिस बाजूला होतांच बारी सावरकरांना म्हणाला, "मार्सेलिसहून पळून जाण्याचा तूंच प्रयत्न केला होतास, नाही का?"

"होय."

"तूं तसें कां केलेंस?"

"अनेक त्रासांतून सुटका करून घेण्यासाठी."

"पण येथून पळून जाण्याचा प्रयत्न केलास तर महाभयंकर संकटांत सापडशील बरें का!"

"पोर्टब्लेअर हे मार्सेलिस नाही हें मी जाणून आहें."

सात नंबरची तीनमजली चाळ सावरकरांसाठी रिकामी करण्यांत आली होती. या चाळींतील तिसऱ्या मजल्यावरच्या खोलीत जाण्यापूर्वी सावरकरांना स्नान करावेंसें वाटलें. त्यांच्या हातांत लंगोटी देत जमादार म्हणाला, "इथे स्नान करतांना किंवा काम करतांना लंगोटी नेसली पाहिजे आणि आंघोळींसाठी फक्त तीन कटोरेंच पाणी मिळेल, बरें का."

समुद्राच्या खाऱ्या पाण्याने स्नान केल्यामुळे सावरकरांचे सगळे अंग चिगचिगीत झालें. त्यामुळे केसहि राठ झाले. स्नान केलें नसतें तर बरें झालें असतें असें त्यांना वाटूं लागलें. पण विवेकी मनाने पुन्हा बजावलें,'लंडन-पॅरिस-मधले टर्किश बाथ उपभोगलेत. आता थोडी 'अंदमानिश बाथां'ची ही गंमत नको का अनुभवायला! राष्ट्रीय-पापांचें क्षालन उंची साबण व सुगंधी तेलें लावून ऊन पाण्याच्या फवाऱ्याखाली केलेल्या स्नानांनी आणि संस्कृत संकल्पांनी होणारें नसून खारट पाण्याच्या 'लेव पाणी' म्हणून ओरडणाऱ्या कठोर संकल्पांच्या आज्ञेप्रमाणे घेतलेल्या ह्या तीन कटोरी स्नानानेच होणार आहे.'

पहिले दोन दिवस सावरकारांना कोणतेंच काम देण्यांत आलें नाही. बोलावयास जवळ कोणी नाही. वाचण्यासाठी तूर्त पुस्तकहि मिळण्यासारखें नव्हतें. कांही लिहूं म्हणावें तर कागदाचा कपटाहि जवळपास नव्हता. एकल-कोंडींत वेळ घालविण्याचें उत्तम साधन म्हणून त्यांनी कविता रचण्याचें ठरविलें. रामायण-महाभारातासारखीं प्राचीन महाकाव्यें ज्या अनुष्टुप छंदांत गाइलीं आहेत त्या छंदांतच काव्यरचना करावी असें त्यांच्या मनाने घेतलें. परंतु या वृत्ताचे नियम आठवेनात. बऱ्याच प्रयत्नांनी अनुष्टुपाचे नियम

ध्यानांत येऊं लागले. पानपतच्या युद्धावर महाकाव्य लिहिण्याचें – नव्हे रचण्याचें त्यांनी ठरविलें. अंदमानच्या त्या भीषण कारावासांत, त्या सात नंबरच्या चाळींतील तिसऱ्या मजल्यावरच्या उदासवाण्या खोलींत महाकवीच्या प्रतिभेंतून महाकाव्य आकार घेऊं लागलें.

'कमला', 'महासागर', 'गोमांतक' आणि 'विरहोच्छ्वास' असे चार सर्ग मिळून सहा हजार ओळींचें काव्य सावरकरांनी अंदमानांत रचलें. हे चारहि सर्ग त्या संकल्पित महाकाव्याचे निरनिराळे भाग होते. कविता मनांत रचाव्यात, जमल्यास काट्याने वा खापरीच्या चिंचोळ्या तुकड्याने पहारेकऱ्याचा डोळा चुकवून पांढरा रंग दिलेल्या भिंतीवर कोरून ठेवाव्यात, हळूहळू पाठ झाल्या की, खरडून टाकाव्या. वर्षअखेरी पुन्हा रंग दिला की, भिंतीच्या कोऱ्या कागदांचा आयताच पुरवठा होई. कधी कधी ही गोष्ट पहारेकऱ्याच्या लक्षांत येई व आठ-आठ दिवस हातकडींत टांगून राहण्याची शिक्षा मिळे. अशा वेळीं मागच्या पाठ केलेल्या हजारो कवितांची उजळणी करतां येई. पुढे अंदमानांतहि संप, शिक्षणप्रसार, शुद्धि आदि कार्यांत सावरकर गुंतल्यानंतर महाकाव्य पुरें करण्याचें काम मागे पडलें तें पडलेंच. 'कमला' व 'विरहोच्छ्वास' हे सर्ग १९२३ मध्ये व 'गोमांतक' १९२४ मध्ये प्रकाशित झाले. त्या वेळींहि सावरकर कारावासांत असल्याने 'विजनवासी' आणि 'महाराष्ट्रभाट' या टोपण नांवांनीच या सर्गांच्या पहिल्या आवृत्त्या प्रकाशित झाल्या.

'कमला' काव्यांत मुकुंद आणि कमला या यौवनाच्या सीमा-रेषेवर उभ्या असलेल्या नवविवाहितांचा प्रणय अतिशय हळुवार रीतीने चित्रित करण्यांत आला आहे.

कमला बगीच्यांत एकटीच हिंडत असतांना –

तोंचि सरसरलें कांही कुंजांतूनि ! पहा पहा !
कोण तो कमले येई ! चोर ओळखिचाच हा !
आला, संभाळ, आलाची ! थांब रे क्षणचा तरी
असावधावरी घाला रीत ही न तुझी बरी !
धरिलाचि परी पक्षी ! वार्धक्यें अजि आंधळीं
वदतींच नभोवाणी ' धर्मयुद्ध न हें ' तरी !

चोरट्या कटिला गुंफी कापतां कर तो झणीं
लाजऱ्या लागती गाला ओठ लाजत त्याहुनी !
साचीकृताननना, लज्जाचित्र हृद्य, अशा तई
प्रियेच्या पहिल्याची तो चुंबनासि युवा पिई
प्रियेच्या पहिल्याची हें लज्जाचंचल चुंबना
कोण प्राणी जगीं की जो विसरेल तुझ्या क्षणा

एवढ्यांत कोणाची तरी चाहूल लागली म्हणून मुकुंद दूर झाला व ती संधि साधून कमला घरांत परतली –

वाजे कांही ! अली झाला चुंबनी पळतां ! अणी
कळी स्पर्शसुखौत्कट्ये ती भेदोन्मुख तत्क्षणीं
पुसें हळूचि सासूसी ' पोटीं कां उठती कळा ! '
पोटीं का हृदयीं ! मुग्धे अद्यापि न कळे तुला
कळा ना शशिलेखे, ह्या ज्योत्स्नेच्या फुलत्या कला
मधु-प्रतिपदा होवो मधु प्रतिपदा तुला

अन् मग पहिल्या मीलनाचा क्षण जवळ आला तेव्हा –

' प्रेयाचा स्वर्ग गे स्वर्ग श्रेयाचाहि लुटूं तरी '
' सख्या समुपभोगी तूं घट्ट ह्या हृदयीं धरी '
' न अंग सुभगे चोरी, निर्विकल्प समाधिते
बीजसाधन हें कामासन ! तूं रत हो तिथे
आणि पंचशरा ये ये पंचही शर या पली
मार रे सुकुमारी या मन्मथा मिथुनावरी
झटशील असे साधू शुभची सुमकार्मुका
काम कामा तरी तुझा करी शंकर राग कां !
घेच संमोहनास्त्राही घेच खेचुनि या पली
मुकुंद कमला घे घे, समाधिस्थ परस्परी
विमानांत अहा आलिंगनाच्या रति-मूर्च्छिता
उंच उंच: अनंगा, ने सुखाच्या गगनांत त्या

मंजु मंजुल गीतांच्या नव निर्झरती सरी
चंद्रिका-चंद्रकांतांचे रस स्नेहरसांतरीं
हासल्या लतिका आशीर्वाद मंगल तेधवा
शुभे हो शिव हे तूंते नवें वर्ष ऋतू नवा

सावरकर एकदा असेच कविता-साधनेंत दंग असतांना त्यांच्या कोठडींत लहानसा दगड येऊन पडला. पहाऱ्यावरच्या पठाण वॉर्डरने तें पाहिलें आणि रागारागाने वर येऊन त्याने सावरकरांच्या शरिराची झडती घेतली. पण त्याला त्या दगडाबरोबर तुरुंगतांल्या बंगाली राजबंद्यांनी धाडलेली चिठ्ठी कांही सापडूं शकली नाही. वॉर्डर खाली गेल्यावर सावरकरांनी ती चिठ्ठी वाचली. कांही राजबंदी तेलाच्या घाण्यासारख्या जाचक कामाचा त्रास वांचविण्यासाठी इतर राजबंद्यांविषयी खऱ्याखोटया बातम्या बारीला सांगूं लागल्यामुळे आपण कोणाशींहि बोलतांना सावधगिरी बाळगावी अशी सूचना त्या चिठ्ठींत देण्यांत आली होती.

राजबंद्यांना छिलक्याचें काम देण्यांत येई. छिलका म्हणजे नारळाच्या सोलून काढलेली जाड सालें वाळवून कुटावयाचीं व त्यांच्यांतील काथ्या नीट साफ करून द्यावयाचा. हें काम कष्टाचें असलें तरी एकच करावयास मिळत असल्यामुळे राजबंद्यांना परस्परांशीं बोलण्याची संधि मिळत असे. परंतु कलकत्त्याहून जो एक नवा पोलिस-अधिकारी अंदमानच्या पाहणीसाठी येऊन गेला त्याने राजबंद्यांना निरनिराळ्या चाळींत एकएकटें कोंडून ठेवण्यास सांगितलें. त्यामुळे राजबंदी आपापसांत बोलतांना आढळले की, बेड्या, हातकड्या अशा शिक्षांचा सपाटा सुरू होई. जेवतांना साधें 'काय, कसें काय?' असें जरी विचारलें तरी सात दिवस हातकडी घालून उभें राहण्याची शिक्षा मिळे. राजबंद्यांना अधिक छळ करण्यासाठी त्यांना तेलाचा घाणा ओढण्याचें काम देण्यांत येऊं लागलें. सकाळीं उठतांच लंगोटी नेसून आपल्या कोठडींत घाण्याची दांडी फिरवीत बसावयाचें. उखळींत तेल पडतांना इतका विलक्षण त्रास होई की, कसलेले हमाल देखील रडकुंडीला येत. सकाळीं दहा वाजेपर्यंत घाणा फिरवावा लागे. अनेक राजबंदी तर घाणा फिरवितांना कष्ट सहन न होऊन बेशुद्ध पडत. जेवण आटोपलें की, पुन्हा जें या 'कोलू'ला जुंपून घ्यावें

लागे ते संध्याकाळीं पांच वाजेपर्यंत. मध्यंतरीं श्रमाने तहान लागली तरी पाणी मिळत नसे. एवढें करूनहि दिवसभरांत ठरलेलें तेल उखळींत जमा झालें नाही तर वॉर्डरांच्या लाथाबुक्यांचा व शिपायांच्या दंडुक्यांचा मार खावा लागे. या वेळीं वॉर्डर तर इतक्या अर्वाच्य शिव्या देत की, त्या ऐकण्यापेक्षा मरण बरें वाटावें. पुरेसें तेल जमा झालें नाही तर कधी कधी राजबंद्याचें संध्याकाळचें जेवण बंद केलें जाई. रात्रीं उपाशीपोटीं राहून दिवसा कमी पडलेलें तेल काढून द्यावें लागे. या अमानुष छळामुळे राजबंद्यांना शारीरिक व मानसिक रोग होऊं लागले. कांही जणांनी आत्महत्या करून घेतली तर इतर कांही जण वेडे झाले.

'कोलू'च्या श्रमामुळे बाबाराव सावरकरांना अर्धशिशीचा त्रास होऊं लागला. डोक्याच्या तिडका असह्य झाल्या की, ते भिंतीवर डोकें आपटून घेऊं लागत. बारी हें सारें शांतपणें पाहत असे. परंतु तरीहि तो कैद्याला डॉक्टरकडे जाऊं देत नसे. उलट पुन्हा 'कोलू'ला जुंपी. बारीसाहेबाच्या राजवटींत राजबंद्यांचा छळ एवढ्यावरच थांबलेला नव्हता. कैद्यांना संध्याकाळीं सहा वाजतां जें कोठडींत कोंडलें जाई ते सकाळीं सहा वाजतां कोठडी पुन्हा उघडे. कोठडींत लघवीसाठी मडकें ठेवलेलें असे. त्यांत शौचास बसावयाची मनाई होती. त्यामुळे रात्रीं जर कोणाला शौचाला लागली, तर सकाळीं सहा वाजेपर्यंत थांबावें लागे. एखाद्याला हें जर जमलें नाही, तर तो सरळ कोठडींत जमिनीवर शौचास बसे. दुसऱ्या दिवशीं सकाळीं जमादाराला हा प्रकार दिसून आला की, प्रथम तो कैद्याला लाथाबुक्यांनी मारी व नंतर बारीसाहेबापुढे नेऊन उभें करी. मग बारीसाहेब तीन-चार दिवस खोड्यामध्ये उभें राहण्याची शिक्षा देई. सकाळीं सहा ते दहा व दुपारीं बारा ते पांच असे नऊ तास हातकडींत टांगून उभें राहवें लागे. या वेळांत शौचालाच काय, पण लघवीलाहि सोडण्यांत येत नसे.

कटोराभर भात आणि दोन पोळ्या हें कैद्यांचें अन्न असे. त्यांतील पोळ्यांवर मिर्झाखानसारख्या स्वतःला छोटा बारी समजणाऱ्या पठाण वॉर्डरांची नजर. मिर्झाखानच्या हाताखालचे वॉर्डर कैद्यांच्या थाळींतील पोळ्या गोळा करून घेऊन जात. एखाद्याने विरोध केला की, शिव्यांचा आणि दंडुयांचा प्रसाद मिळे. भात आणि पोळ्या मिळत त्याहि एक तर कच्च्या भाजलेल्या किंवा अर्ध्या जळालेल्या. स्वयंपाकी गलिच्छ आणि गुप्तरोगाने पछाडलेले. त्यांचा घाम

आमटींत पडायचा आणि ती आमटी भुरके मारीत खायची. भाजीच्या पाल्या-बरोबर गोमी व साप येत. तेहि भाजीबरोबर शिजविले जात. सकाळीं मिळणाऱ्या कांजीला रॉकेलची घाण यायची. शिवाय वाढलेलें सारें खाल्लेंच पाहिजे हा नियम. त्यामुळे कांही टाकण्याची सोय नसायची. शिवाय एवढें काम करा-वयाचें म्हणजे पोटांत कांही तरी ढकलल्यावांचून गत्यंतर नव्हतें. पावसाळ्यांत तर कैद्यांच्या हालांना सीमा नसे. काम करतांना ओले झालेले कपडे अंगावर वाळवीत. उभ्याउभ्याच एका हातावर पावसाने भिजलेल्या पोळ्या घेऊन त्या पावसाच्या पाण्याने भरलेल्या भांड्यांतील आमटीबरोबर खाव्या लागत.

या सर्व गाऱ्हाण्यांविरुद्ध राजकैद्यांनी हिंदुस्थान सरकारकडे तक्रार करूं नये म्हणून राजदंडाप्रमाणे आपली काठी आपटीत बारी म्हणायचा, " दुनि-यामें एक परमेश्वर वसता है। वो आकाशमें रहता है। लेकिन पोर्टब्लेअरवर दोन परमेश्वर रहते हैं। एक आकाशमें और एक पृथ्वीपर। पृथ्वीपर रहने-वाला वो पोर्टब्लेअरका परमेश्वर मै हूँ। उपरका परमेश्वर तुम्हे उपर फल देगा। पर मै पोर्टब्लेअरका परमेश्वर तुम्हे इधरका इधरही फल दूँगा। ठीक चलना हाँ।" पोर्टब्लेअरचा हा परमेश्वर कधी कधी आपल्या गाडीला बैलांऐवजी माणसें जोडी आणि अशी दमछाक करणारी कामें करून कैदी नरमला की, मग त्याला आपल्या बंगल्यावर सोपीं कामें देई. असले कैदी तुरुंगभर त्याचे हेर म्हणून वावरत असत.

सावरकरांसारख्या सुविद्य कैद्याशीं दररोज पांच-सहा मिनिटें तरी बोलल्या-वांचून बारीसारख्या असंस्कृत बंदीपालाला करमत नसे. आपला मोठेपणा सावरकरांना सांगण्यांत याला मोठी धन्यता वाटे. 'तुम्ही राजबंदी नसून इतर चार-चौघांसारखे सर्वसामान्य कैदी आहांत' याची सावरकरांना जाणीव करून देण्यासाठी त्याचा सारखा आटाकीटा चालू असे. सावरकरांच्यादेखत राजबंद्यांना शिवीगाळ करणें हाहि एक त्याचा आवडता उद्योग असे. न जाणो आपल्या-वरहि एक दिवस अशी पाळी येईल या भीतीने सावरकरांनी आपल्याशीं नमून वागलें पाहिजे हा त्यामागचा खरा हेतु असे. एकदा असाच सावरकरां-समोर राजबंद्यांना शिवीगाळ करून बारी निघून गेला. राजबंदी हिरमुसले. सावरकर त्यांना म्हणाले, " माझ्यासमोर तुम्हांस तो बंदीपाल अश्लील भाषा बोलला म्हणून तुम्ही मनांत संकोच करूं नका. धीरहि खचूं देऊं नका. आज तो

तुम्हांस भिकारडे म्हणत आहे. उद्या मलाहि म्हणेल. आज आपण अवश आहोंत. आज आपला या जगांत अपमान होईल, पण असाहि एक दिवस कचित् येईल की, अंदमानच्या याच कारागारांत आपले पुतळे उभारले जातील आणि येथे हिंदुस्थानचे राजबंदी राहत असत म्हणून हजारो लोक यात्रेल लोटतील."

"तुम्हांला खरेंच का असें वाटतें!" एकाने विचारलें.

"कचित् असें होईलहि. निदान झालें पाहिजे." सावरकर उतरले.

१४ ऑगस्ट रोजीं बारी एक पत्र घेऊन सावरकरांकडे आला. आपली बी. ए.ची पदवी काढून घेतली आहे असें मुंबई विद्यापीठाने त्या पत्रांत कळविलें होतें. पत्र वाचल्यानंतर सावरकर नुसतें हसले. या पत्रांत हसण्यासारखें काय होतें हें बारीला कांही समजूं शकलें नाही.

अंदमानांत येऊन एक महिना होऊन गेला तरी बाबांची भेट घेणें सावरकरांना जमलें नव्हतें. आपला धाकटा भाऊ येथे आलेला आहे हें बाबांना ठाऊक नव्हतें. हेंहि त्यांना कळवावें व त्यांची प्रकृति कशी काय आहे तें पाहावें म्हणून एका बॉर्डरच्या मदतीमुळे बाबांचें दुरून दर्शन घेणें सावरकरांना शक्य झालें. बाबा आश्चर्याने म्हणाले, "तात्या, तूं येथे कसा आलास ?"

बाबांशीं खूप बोलावें असें सावरकरांना वाटत होतें. परंतु आपण दोघे बोलत आहोंत ही गोष्ट अधिकाऱ्याच्या कानांवर गेली तर आपल्याबरोबर बाबांनाहि शिक्षा होईल या जाणीवेने त्यांनी तो मोह टाळला व आपल्या कोठडीकडे परतले. दुसऱ्या दिवशीं बाबांची चिठ्ठी आली—'तूं बाहेर कार्य यशस्वी करशील, प्रिय हिंदुस्थानचे ... स्वातंत्र्य दृष्टिपथांत येईल ही मला कोण आशा! त्या आशेने मला काळेंपाणी झालें त्याचें मला कांहीच वाटेना. मन त्या संकटास कस्पटाप्रमाणे लेखी. कारण ज्या कार्यांत हें बलिदान मी करीत आहें तें पूर्ण करण्यासाठी तूं उरलेलाच आहेस ही कल्पना मला धीर देई. कष्टांचें साफल्य भासवी. पण तूं पॅरिसला असतांनाहि ह्यांच्या कसा हातीं लागलास ? आता अभिनव भारताच्या कार्याचें कसें होईल? तुझी योग्यता, कर्तव्य आता मातीमोल होणार ना ? प्रत्यक्ष पाहूनहि मला अजून विश्वास पटत नाही, कळत नाही की, हाय हाय, तूं येथे कसा आलास ?'

सावरकरांनी उत्तर लिहिलें – 'लौकिक आणि भाग्योदयाच्या आशांची राख अंगाला फासून झुंजत राहूं शकणें हेंच अलौकिक भाग्य नाही का? यथाप्राप्त संकटास तोंड देण्यास आणि स्वार्थास समूळ खणून काढून लोकांना कर्तव्य-क्षेत्रांत जीं संकटें भोगा म्हणून सांगितलें तोच प्रसंग येतांच त्याच क्षेत्रांत स्वतः निर्भय चित्ताने भोगावयास सिद्ध होण्यांतच खरें कर्तृत्व आणि योग्यता तुमची, आमची आणि या सर्वांची प्रगट होत आहे. यशापयश योगायोगाच्या गोष्टी आहेत. हीं संकटें सोसणें आणि असें कारागारांत सडत कोणालाहि न कळत, ज्यांच्यासाठी हे कष्ट भोगले त्यांचेहि शिव्याशाप खात असें मरणें हेंच आता आपल्या आयुष्याचें ध्येय; तितकेंच महान् की, जितकें बाहेर राहून कीर्तीच्या आणि दुंदुभींच्या तालावर नाचत राहणें महान् समजलें जातें. कारण अंतिम विजयास तें शांत झुंजणें व ते दुंदुभींचे निनाद जितके अवश्य असतात तितकेच हे भुयारांतील अश्रूंत कण्हणें आणि अज्ञात प्राणोत्क्रमणेंहि अवश्यच असतात.'

सावरकरांनी महिनाभर छिलका कुटण्याचें काम केल्यानंतर एक दिवस बारी त्यांच्या कोठडीपाशीं आला आणि छद्मीपणाने म्हणाला, "तुमची वरच्या इयत्तेंत बढती झाली आहे." दुसऱ्या दिवसापासून सावरकरांना 'कोलू'ला – तेलाच्या घाण्याला जुंपण्यांत आलें. सहा-सात दिवसांनी बारी पुन्हा तेथे आला आणि म्हणाला, "शेजारचा कैदी दुपारीं दोन वाजतांच पुरें तीस पौंड तल मोजून देतो आणि तुम्ही संध्याकाळपर्यंत राबूनहि दोन पौंड कमीच, लाज वाटली पाहिजे तुम्हांला!"

"लाज वाटली असती. जर मला लहानपणापासून त्याच्यासारखें हमालीचें काम करण्याची सवय असती तर," सावरकरांनी उत्तर दिलें, "तुम्हीं त्याला एक तासाच्या आंत कविता करून दे म्हटलें तर त्याला ती करतां येईल का?"

बारी कांही न बोलतां निघून गेला.

दुपारच्या उकाड्यांत कोलू फिरवीत असतांना सावरकरांना भोंवळ आली. थोड्या वेळाने भानावर आले तरी चार-पांच मिनिटें आपण कोठे आहोंत, किती वाजले आहेत, भोंवतीं काय चाललें आहे याचा त्यांना कांहीच उलगडा

होईना इतकें मन थकलें होतें. या वेळीं त्यांच्या मनांत आत्महत्येचा विचार चमकून गेला. खिडकीच्या गजाला अंगरख्याने टांगून घेऊन कैदी आत्महत्या करतात हें त्यांना माहीत होतें. त्यामुळे त्यांचें लक्ष कोठडीच्या गजांवर खिळलें होतें; परंतु हा विचार अल्पकाळ टिकला. विवेकी मन समजावून सांगूं लागलें, 'मरणारच असशील तर असा कुत्र्याच्या मोलाने आपल्या हाताने कां मरतोस ? त्यांना तुला फाशीं देऊं नये म्हणून दया आली होती की काय ? मग जे त्यांना करतां आलें नाही तें तूं त्यांच्याकरिता स्वतःच्या हाताने करून आपल्या पक्षाच्या हानींत आणि अपजयांत आणखी भर कां घालतोस ? जर मरणें तर ज्या सेनेंतील तूं एक सैनिक आहेस त्या सेनेचें तसेंच एखादें कार्य करून मग तरी मर. फाशीं घेऊन नव्हे तर ... आपल्या एक जीवास्तव ... असा मर !'

या विचाराने त्यांचें मन स्थिर झालें. अंदमानच्या कारागारांत आत्महत्येच्या विचारापासून सावरकरांनी अनेक राजबंद्यांना परावृत्त केलें तें याच विचाराच्या बळावर.

चौदा दिवसांनंतर सावरकरांच्या मागचा तेलाचा घाणा सुटला व त्यांना दोरखंडें वळण्याचें काम देण्यांत आलें. कोठडीच्या तळाशीं वारा येण्यापुरती फट अट असे. कैद्याला पलीकडच्या खोलींतील कैदी दिसूं नये म्हणून या फटींना जाळी बसविलेली होती. दोरखंडें वळतांना आपापसांतील निरोप इकडून तिकडे कळविण्यासाठी सावरकरांनी एक क्लृप्ति शोधून काढली. अलीकडच्या कोठडींतील कैद्याने जेवणाची थाळी वाजविली की, त्यास कांही तरी निरोप द्यावयाचा आहे हें शेजारच्या कोठडींतील कैद्याला कळे. तो लागलीच जाळीपाशीं येई व निरोप ऐके. ती जाळी म्हणजे अंदमानमधील कैद्यांचा टेलिफोन. त्या फटींतून निरोपांची देवाणघेवाण होई.

अंदमानमधील राजबंद्यांना वर्षातून एकदा घरीं पत्र धाडण्याची परवानगी असे. कोणात्याहि अपराधाबद्दल वर्षभरांत बारीसाहेबांनी ज्याला शिक्षा केली असेल त्याची त्या वर्षापुरती पत्र धाडण्याची सवलत काढून घेतली जाई. ही पत्रें अधिकारी काळजीपूर्वक वाचीत व नंतरच रवाना करीत. त्यामुळे या पत्रांतून अंदमानमधील दुःस्थितीची कल्पना देणें अशक्य झालें होतें.

१५ डिसेंबर १९१२ रोजीं सावरकरांनी आपल्या धाकट्या बंधूंना पहिलें पत्र लिहिलें, 'अठरा महिन्यांनंतर शाईला व लेखणीला स्पर्श करावयाची संधि

मिळत आहे ' या वाक्यानेच त्यांनी या पत्राचा प्रारंभ केला आहे. हें पत्र लिहिण्याचा वेळीं नारायणराव वैद्यकीच्या अभ्यासासाठी कलकत्त्याला राहत होते. या निमित्ताने सावरकरांनी असें लिहिलें की, ' मला मोठी भीति वाटते की, त्या चतुर बंगाल्यांपैकी कोणी तुझें हृदय चोरलें आहे अशी वार्ता केव्हाहि ऐकावयाची मी माझ्या मनाची सिद्धता करून ठेवावयाला पाहिजे. पण मनांतलें सांगावयाचें तर मला एखादी बंगाली भावजय मिळाली तर फार आवडेल. आपल्या राष्ट्रीय जीवनाच्या सध्याच्या स्थितींत युरोपीय मुलींशीं विवाहबद्ध होण्याच्या मी जितका विरुद्ध आहें तितकाच आंतरप्रांतीय विवाहांचा पुरस्कर्ता आहे. '

या पत्रांत त्यांनी आपला दिनक्रमहि कळविला आहे. ' सकाळीं पांच वाजतां घंटा होते तेव्हा मी उठतों. तिचा नाद ऐकतांच उच्च शिक्षणासाठी आपण महाविद्यालयांत प्रवेश करतों आहों असा भास होतो. दहा वाजेपर्यंत नेमून दिलेलें श्रमाचें काम करतों. त्यानंतर मी नवीन कविता करतों. मग आमचें जेवण होऊन बारा वाजतां पुन्हा कामास लागतों तें चार वाजेपर्यंत. मग विश्रांति, वाचन इत्यादि. सकाळीं आणि संध्याकाळीं मी प्राणायाम करतों व तो करतांच गोड आणि गाढ झोप लागते. त्या वेळची ती विश्रांति किती स्वस्थ आणि शांत असते. इतकी शांत की, सकाळीं जेव्हा मला जाग येते तेव्हा किती तरी वेळ मी कारागृहांत आहे आणि लाकडी फळ्यांवर पहुडलों आहोंत याची जाणीव येत नाही. '

१९११ च्या डिसेंबरमध्ये पंचम जॉर्ज यांच्या राज्यारोहणाचा सोहळा दिल्लींत साजरा झाला. त्या वेळीं पंचम जॉर्ज स्वतः भारतांत आले होते. या निमित्ताने अंदमानमधील राजबंद्यांची सुटका होणार असल्याची बातमी सेल्युलर जेलमध्ये पसरली. परंतु प्रत्यक्षांत मात्र तसें कांही घडलें नाही. राज्यारोहणाच्या वेळीं बंगालची फाळणी रद्द करण्यांत आल्याची घोषणा वाचून सावरकरांना अतिशय समाधान वाटलें. या निमित्ताने राजधानी कलकत्त्याहून दिल्लीला आणण्यांत आली. परंतु या स्थलांतराबद्दल सावरकरांना विशेष असें कांही वाटलें नाही. राजधानी उज्जयिनीला आणण्यांत आली तर मात्र त्यांना आनंद झाला असता. कारण लंडनमध्ये भारताच्या राजधानीबाबत क्रांति-

कारकांत चर्चा होई तेव्हा ऐतिहासिक, सांस्कृतिक, औद्योगिक, भौगोलिक आणि सामरिक दृष्टीने उज्जयिनीच भारताची राजधानी होण्यास योग्य आहे असें सावरकर प्रतिपादन करीत असत.

१९१२ मध्ये दिल्लींत राज्यारोहणानिमित्त जी मिरवणूक निघाली होती त्या वेळीं गव्हर्नर जनरल लॉर्ड हार्डिंज यांच्या रोखाने बॉंब फेकण्यांत आला. ही बातमी अंदमानांतील राजबंद्यांना कळूं नये म्हणून बारी खबरदारी घेत होता. तरीहि ती बातमी सगळ्या राजबंद्यांना कळली आहे हें आढळून येतांच चिडला व सूड म्हणून, सावरकरांचा धाकटा भाऊ ह्या बॉंब-प्रकरणांत धरला गेला असून तोहि लवकरच अंदमानांत येणार आहे असें सांगण्यास त्यानें सुरुवात केली. पर्यवेक्षक सावरकरांना चिडविण्यासाठी म्हणाला, "तुमचा धाकटा भाऊ भित्रा दिसतोय. कारण दिल्लींत बॉंबस्फोट होतांच 'मी इथे कलकत्त्याला आहे' अशी त्याने दिल्लीच्या पोलिस-प्रमुखाला तार धाडली.'

सावरकर उत्तरले, 'तर मग सगळ्या कलकत्त्यांत तोच एक खरा चाणाक्ष मनुष्य आहे. त्याने बॉंब फेकला नाही हें उघडच आहे. पण जरी त्याने तो फेकला असता तरी देखील त्याने अशीच त्वरित तार करून पोलिसांना चकवा-वयास हवें होतें. तो भित्रा नव्हे. जो दुष्ट शत्रूवर आघात करून पुन्हा निसटून जाण्याचेंहि साधतो तोच खरा शूर.'

नारायणराव सावरकरांना पकडल्याची बातमी खोटी असल्याचें लवकरच कळलें. नारायणराव वैद्यकीची परीक्षा उत्तीर्ण होऊन डॉक्टर झाल्याचें वृत्त कळलें तेव्हा सावरकरांना खूप आनंद झाला. दोन वर्षांनंतर धाकट्या भावाला पत्र लिहिण्याची त्यांना पुन्हा संधि मिळाली. हें पत्रलेखन किती आनंददायी ठरतें हें सांगतांना सावरकर लिहितात, 'घरीं पत्र लिहावयाचा दिवस हाच आमचा खरा पाडवा, वर्षप्रतिपदेचा दिवस असतो. मी माझ्या वर्षगणनेचा प्रारंभ ह्या दिवसापासूनच करतों. कारण पत्र लिहितांना आप्तेष्टांशीं जी एकतानता साधता येते तीमुळे लाभणाऱ्या उत्साहामुळे व सामर्थ्यामुळे पुढे एक वर्षभर श्वासोच्छ्वास करतां येतो, जगतां येतें, हसतां-खेळतां येतें.'

नारायणरावांनी पाठविलेल्या पुस्तकावरील अभिप्राय कळवितांना भारतांत सध्या राजकीय इतिहास, विज्ञान, अर्थशास्त्र आदि विषयांवरील पुस्तकें प्रसिद्ध व्हावयास हवींत असें सांगून सावरकर पुढे लिहितात, 'वेदान्त

तत्त्वज्ञानावरच्या पुस्तकांसंबंधी सांगावयाचें म्हणजे आपल्या लोकांनी असल्य गोष्टींत लक्ष घालणें सध्या तरी अनुचित आहे. अमेरिकेला वेदान्त तत्त्वज्ञानाची आवश्यकता आहे. इंग्लंडलाहि तशीच आहे. कारण त्यांनी आपला जीवनक्रम परिणत, ऐश्वर्यसंपन्न व पौरुषपूर्ण केला आहे. त्यांचें क्षत्रियत्व संपादून झालें आहे आणि ज्या अवस्थेंत गेलें तरच तें तत्त्वज्ञान समजावयाचें आणि अनुभवायाचें सामर्थ्य येतें त्या ब्राह्मण्याच्या सीमारेषेपर्यंत ते गेले आहेत. हिंदुस्थानचें तसें नाही. आपण सर्व आज शूद्रावस्थेंत आहोंत. आणि वेद किंवा वेदान्त ह्यांना स्पर्श करावयाचा आपल्याला अधिकार नाही.

'शुद्रांना वेदपठनाला अनधिकारी ठरविण्याच्या मुळाशीं हीच कल्पना आहे. हा निषेध निष्ठूरपणाने किंवा संकुचित स्वार्थबुद्धीने घातलेला नाही. तसें असतें तर त्याच ब्राह्मणांनी त्याच तत्त्वज्ञानाचें सुलभ विवरण करणारे पुराणग्रंथ त्यांच्यासाठी लिहिले नसते. आपण राष्ट्र या दृष्टीने त्या उदात्त कल्पनांना अयोग्य आहोंत. दुसरे बाजीराव मोठे वेदान्ती होते; पण कदाचित् म्हणूनच त्यांना स्वतःचें राज्य आणि परक्यांचें पेन्शन ह्यांतील अंतर दिसलें नाही. आपण इतिहास, राजकारण, विज्ञान, अर्थशास्त्र ह्यांचा अभ्यास केला पाहिजे. ह्या जगांत मानाने जगावयास शिकलें पाहिजे. गृहस्थाचें सर्व कर्तव्य बजावून गृहस्थाश्रम यथासांग पार पाडला पाहिजे. मग वानप्रस्थाश्रम आणि त्या आश्रमांतील वेदान्ताची पहाट उजाडेल तोंपर्यंत या गोष्टींचा कोणताहि उपयोग असो, त्या विधवांकडे, म्हाताऱ्या-कोताऱ्यांकडे किंवा पेन्शनरांकडे सोपविल्या पाहिजेत. त्यांच्यासाठी भूतकाळ, तीं जुनीं पुस्तकें व आत्मा आणि परमेश्वर यांचीं जुनीं कोडीं आहेत. तरुणानी भविष्यकाळांत कां संचार करूं नये ? म्हणे वेदान्त ! वाराणसीने एकहि हुतात्मा जगाला दिला नाही आणि आपल्या मायदेशासाठी एक पैहि द्यावयाची तिची योग्यता नाही !'

अंदमानच्या नियमानुसार राजबंद्याने कोठडींत पांच वर्षें काढलीं की, त्याला तुरुंगाबाहेरील बेटावर आपल्या कुटुंबियांसमवेत राहण्याची सवलत मिळे. आपल्यालाहि ही सवलत मिळावी म्हणून सावरकरांनी चीफ कमिशनरकडे अर्ज केला होता. परंतु तो अर्ज फेटाळण्यांत आला. आता चौदा वर्षें एकांतवासांतच काढावीं लागणार हें निश्चित झाल्यामुळे सावरकरांनी राजबंद्यांची

गाऱ्हाणीं दूर करण्याकडे आणि इतर अशिक्षित बंदीवानांना लिहिणें-वाचणें शिकविण्याच्या कार्याकडे लक्ष केंद्रित करावयाचें ठरविलें.

एवढ्यांत कोणी तरी बातमी सांगितली की, इंग्रजांचें जावयाशीं युद्ध जुंपलें आहे. हा जावई कोण! त्या अशिक्षित कैद्याला बाहेर जाऊन नीट माहिती मिळविण्यास सांगण्यांत आलें. तो चिठ्ठी घेऊन आला आणि मग सारा खुलासा झाला.

जर्मनी आणि ब्रिटन यांचें युद्ध सुरू झालें होतें. क्रांतिकारक गेलीं अनेक वर्षें वाट पाहत होते ती याच सुवर्णसंधीची. परंतु सावरकरांना या वेळीं कांहीहि करतां येण्यासारखें नव्हतें. ते सेल्युलर जेलच्या सातव्या चाळींत अडकून पडले होते आणि बाहेर बारीचा पहारा होता.

४१०१५ ... ३५५.६ ... १५०२००

८

# ते चरण पुन्हा दिसले !

इंग्लंड आणि जर्मनी यांच्या दरम्यान येत्या पांच-सहा वर्षांच्या आंतच युद्ध सुरू होईल व त्या वेळीं हिंदुस्थानला स्वातंत्र्यसंपादनाची सुवर्णसंधि प्राप्त होईल असें भाकित सावरकरांनी १९०८ च्या प्रारंभापासून सुरू झालेल्या 'तलवार' या अभिनव भारताच्या मुखपत्राच्या पहिल्याच अंकांत व्यक्त केलें होतें. त्यामुळे स्वातंत्र्यसंपादनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर प्रयत्न करण्याची संधि उपलब्ध झाली असतांना आपण कारागृहांत अगतिक अवस्थेमध्ये जखड-लेलें असावें याबद्दल त्यांचें क्रांतिप्रवण मन हळहळलें.

मध्यंतरीं लाला हरदयाळ यांनी अमेरिकेला जाऊन 'गदर' पक्षाची स्थापना केली होती. त्यामुळे आपण कारावासांत असतांना लाला हरदयाळां-सारखे क्रांतिकारक जागतिक महायुद्धामुळे निर्माण झालेल्या संधीचा फायदा करून घेण्यासाठी कोणतीं पावलें टाकीत आहेत हें जाणून घेण्याची सावरकरांना उत्सुकता लागली होती. परंतु अंदमानमध्ये मिळणाऱ्या बातम्या अगदीच तुटपुंज्या असत. त्यातच सावरकरांना असेंहि कळलें की, तुर्कस्थान जर्मनीच्या बाजूने युद्धांत उतरलें आहे. अशा परिस्थितींत जर्मनीचा हात तुर्कस्थानमार्फत हिंदुस्थानपर्यंत पोचला आणि इंग्लंड व जर्मनी यांचें हिंदुस्थानलगतच्या भूमीवर तुंबळ युद्ध झालें, तर या दोन परकीय सत्तांच्या झुंजींत आपली स्वातंत्र्यकांक्षा साध्य करून घेणें हिंदी जनतेला शक्य होईल. परंतु त्याचबरोबर एक धोका असाहि होता की, ही झटापट सुरू असतांना, भारतांत पन्नास-साठ

वर्षांपूर्वी अस्तंगत झालेली मुसलमानी सत्ता रशियांतील मुसलमानी टोळधाडींना भारतांत येण्याचें आमंत्रण देण्याचा संभव होता. युद्धपरिस्थितीने कोणतेंहि वळण घेतलें तरी राष्ट्रीय जीवनांतील या अशा बिकट क्षणीं क्रांतिकारक पक्ष मुक्त असावयास हवा या विचाराने महायुद्धाची संधि साधून सावरकरांनी हिंदुस्थान सरकारला एक आवेदन धाडलें.

त्यांत ते म्हणतात, "या महायुद्धांत हिंदुस्थानची राजकीय स्थिति सरकारला चिंता उत्पन्न करीत असणें साहजिक असल्याने आणि विशेषतः हिंदुस्थानी क्रांतिकारक, युद्धांत कोणतें धोरण स्वीकारतात हें समजण्याची सरकारला उत्सुकता लागणें संभवनीय असल्याने क्रांतिकारक चळवळींशीं संनिकट परिचय असलेल्या माझ्यासारख्या बंदीवानाचे विचार कळविणें मला आपलें कर्तव्य वाटतें. हिंदुस्थानला स्वतंत्र राष्ट्राच्या पदवीस पोचविणें हें आपलें ध्येय होतें आणि आहेहि; तथापि त्या ध्येयाच्या सिद्धीसाठी रक्तपाताचा सशस्त्र प्रतिकारी मार्गच काय तो अवलंबन करावयाचा अशी कांही आम्हीं शपथ घेतलेली नाही. इतकेंच नव्हे तर इतर कोणताहि उपाय जर सफल होण्याचा संभव असता तर आम्हीं सशस्त्र प्रतिकाराचा अवलंब केलाच नसता.

"जी गोष्ट साधनाची तीच साध्याची. राजकारणाच्या व्यवहाराचें आणि शासनशास्त्राचें ऊच्चतम ध्येय सर्व मनुष्यजातीस समसमान अधिकार असणाऱ्या एका प्रातिनिधिक शासनसंस्थेचे नागरिक बनविणें हें होय. एक देव, एक भाषा, एक जात, एक जीवन – अशा एका न्यायप्रवण आणि प्रातिनिधिक शांतिसाम्राज्याची स्थापना आध्रुवध्रुव करून आणि त्या मानवसाम्राज्यांत हे कुल-वंश-जाति-देश-भाषा-भिन्नत्वाचे क्षुद्र अभिमान आणि अहंकार विलीन करून उभ्या मनुष्यजातीचें राजकीय सात्त्विक एकीकरण हेंच ज्याचें अंतिम ध्येय आहे त्या आम्हांस या ध्येयाच्या सिद्धीसाठी तदनुकूल असलेल्या सर्व संस्था त्या ध्येयाकडे जाणाऱ्या मार्गावरील टप्पे म्हणून ग्राह्यच वाटतात. एतदर्थ आज ज्यास ब्रिटिश साम्राज्य म्हटलें जात आहे त्यांत अंतर्भूत असणाऱ्या हिंदुस्थानला जर स्वप्रकृतिप्रमाण आणि तत्तत्परिस्थितिप्रमाण स्वातंत्र्य उपभोगूं देण्यांत येईल तर आम्हीं त्या साम्राज्याशीं एकनिष्ठ राहणें हेंच आमचें कर्तव्य समजूं. ह्या साम्राज्याच्या प्रस्तुत चालकांच्या अंगांत जर तसें सात्त्विक साहस करणारें धैर्य असेल तर तदंतर्गत असलेल्या या हिंदुस्थानच्या विस्तृत आणि

प्रमुख राष्ट्रास तरी त्यांनी त्वरित तें स्वातंत्र्य उपभोगतां येईल असे अधिकार त्वरित देऊन टाकले पाहिजेत."

या आवेदनांत सावरकर पुढे म्हणतात, "आम्ही असें वचन देतों की, जर आम्हांस या वेळीं मुक्त करण्यांत येईल तर आम्ही हिंदुस्थानेवर स्वारी करून येण्याची शक्य ती खटपट करणाऱ्या अफगाण, तुर्कादिक आशियांतील विदेशी टोळधाडीपासून स्वदेशाचें संरक्षण करण्यासाठी सैन्यांत भरती होऊन हिंदुस्थानच्या सीमासमरावर किंवा इतर तदनुषंगिक अशा कोणत्याहि रण-क्षेत्रांत जाण्यास कचरणार नाही. आपल्या सुटकेनंतर आम्ही हिंदुस्थानच्या शांततेचा भंग करूं की नाही हें नक्की सांगतां येणें तर कठीण; तेव्हा राजबंदीवान वर्गासच न सोडणें बरें अशी शंका जर सरकारला येत असेल तर मी असें आनंदाने आपण होऊन सुचवितों की, सरकारने मला न सोडतां अंदमानांतल्या, हिंदुस्थानांतल्या आणि बाहेर देशोदेशीं निर्वासित होऊन अटकून पडलेल्या राजबंदीवानांना तात्काळ मुक्त करावें. त्यांच्या मुक्ततेंत मला जवळ जवळ माझ्या मुक्ततेइतकाच आनंद होईल."

सावरकरांनी १९१४ च्या सप्टेंबरमध्ये धाडलेल्या या आवेदनपत्राला चार महिन्यांनी असें उत्तर आलें की, सद्यःपरिस्थितींत तरी ही सूचना स्वीकारणें सरकारला अशक्य वाटत आहे.

युद्धाच्या वेळोवेळीं हातीं येणाऱ्या बातम्यांच्या आधारें सावरकर राज-बंद्यांशीं व इतरहि बंदीवानांशीं चर्चा करून त्यांना सद्यःस्थितीसंबंधी शिक्षण देऊं लागले. त्या वेळीं त्यांना असें आढळून आलें की, अडाण्यांतील अडाणी मुसल-मान बंदीवान तुर्कस्थानच्या वा अफगाणिस्तानच्या अमीराचें साम्राज्य भारतावर प्रस्थापित होण्याचें स्वप्न पाहत आहे. या मुसलमानांच्या व पठाणी वॉडरांच्या हास्यास्पद मूर्खपणाच्या बुडाशीं जो एक लक्षात येण्यासारखा ज्यात्याभिमान असे तो हिंदु बंदीवानांच्या ध्यानांत आणून देण्यासाठी सावरकरांना बरेच प्रयास पडले. अंदमानसारख्या बंदीशाळेंतहि मुसलमान कैदी हिंदु कैद्यांच्या धार्मिक भाबडेपणाचा गैरफायदा घेऊन त्यांना मुसलमान बनवीत आहेत हें ध्यानांत येतांच सावरकरांनी बंदीजीवन कंठत असतांनाहि शुद्धि आणि संघटना या कार्याचा शुभारंभ केला. हिंदु बंदीवानांमधील अज्ञान दूर करण्यासाठी त्यांना

साक्षर करणें आवश्यक होतें. त्यामुळे प्रथम त्यांनी या बंदीवानांमध्ये लिहिण्या-वाचण्याची गोडी निर्माण केली. परंतु हें कार्य मुसलमान वॉर्डरांना पसंत पडणें शक्यच नव्हतें. म्हणून त्यांनी सावरकर बंदीवानांना राजद्रोह शिकवतात असें बारीला सांगावयास सुरुवात केली. राजद्रोह हा शब्द ऐकतांच बारी बिथरला व त्यानी पुन्हा सावरकरांना छिलका कुटण्याची शिक्षा फर्मावली.

परंतु अशा शिक्षेमुळे सावरकरांचें प्रचारकार्य थांबेल ही बारीची अटकळ कांही खरी ठरूं शकली नाही. एकीकडे शिक्षा भोगत असतांनाहि सावरकरांचे बंदीवानांसाठी पुस्तकें जमविण्याचे प्रयत्न सुरूच होतें. अनेक अडचणींना तोंड देऊन त्यांनी अंदमानमध्ये दीड-दोन हजार पुस्तकांचा संग्रह केला. या ग्रंथालयाच्या निमित्ताने सावरकरांच्या वाचनालाहि पुन्हा गति प्राप्त झाली. थॉमस एकेम्पिसचे 'इमिटेशन्स' हें पुस्तक त्यांना आवडत होतें. कुराणाचें इंग्रजी भाषांतर वाचून त्यांनी मुसलमानी धर्माच्या मूळ शिकवणुकी-चाहि अभ्यास केला. त्यांचें तत्त्वज्ञ मन उपनिषदें, योगवासिष्ठ आदि प्राचीन संस्कृत ग्रंथांतहि रमूं लागलें. एकीकडे तत्त्वज्ञान व दुसरीकडे इतिहास अशा भिन्न विषयांच्या वाचनाच्या वेळीं मनांत कर्म आणि नैष्कर्म्य यांचा कसा झगडा होई हें विशद करतांना सावरकर लिहितात, "वेदान्तविषयक ग्रंथ वाचावयास घेतले की, तात्काळ शिरा-शिरा आणि तंतु-तंतु ढिले, समरस आणि तल्लीन होऊन पुन्हा कर्माच्या निरर्थक उठाठेवींत पडण्यास अगदी इन्कार करीत. कर्मोत्साह पार मावळून जाई. स्वदेशसेवा, भूतदया इत्यादि अत्युदार भाषाहि क्षणिक आणि पोरखेळ वाटूं लागे. उलटपक्षीं इतिहास आणि भौतिक शास्त्रें वाचीत गेल्यास स्वाभाविक कार्यलालसा केव्हा केव्हा इतकी प्रखर होई, महायुद्धाच्या हिंदुस्थानांतील तत्कालीन क्रांतिकारक आघात-प्रत्याघातांच्या, रशियातील झारसारख्यांचीं सिंहासनें चक्काचूर झाल्याच्या बातम्या ऐकतांच कार्यशक्ति इतकी अनावर होऊन उठे कीं, वाटे, बुक्कीसरशीं या तुरुंगाच्या भिंती धुळीस मिळवून आणि तो पूर्वोक्त हिंदुस्थानचा ध्वज उभारून मरणमारणा-च्या क्षेत्रांत उडी घ्यावी."

बंदीवानांशीं शिक्षण देण्याच्या निमित्ताने परिचय झाल्यानंतर मुसलमान बंदीवान हिंदु बंदीवानांना बाटवितांना कोणत्या तंत्राचा अवलंब करतात हेंहि

सावरकरांना पाहवयास मिळालें. पठाणी वॉर्डर नव्याने अंदमानांत आलेल्या हिंदु बंदीवानांमधील कोवळ्या मुलांना प्रथम अतिशय कष्टप्रद कामें देत. या कामांनी तो मुलगा रडकुंडीस आला की, मग वॉर्डर त्याची समजूत घालीत. ते म्हणत, " तूं असा कां मरतोस ? मुसलमान झालास तर तुझी या कष्टांपासून सुटका होईल. " या आमिषामुळे तो मुलगा मुसलमान व्हावयास तयार झाला की, ते वॉर्डर त्याला दुसऱ्या दिवशीं जेवण्यासाठी मुसलमानी पंगतींत नेऊन बसवीत. तो एकदा मुसलमानी पंगतींत बसला की, हिंदु बंदीवान त्याला पुन्हा आपल्या पंगतींत घेणार नाहीत याविषयी ते वॉर्डर निश्चित असत. अशा रीतीने दर महिन्या-दोन महिन्यांमागे तीन-चार तरी हिंदु बंदीवान मुसलमान होत. या बाटग्या मुसलमानांचा हिंदुद्वेष अधिकच कडवा व जहरी बने. त्यामुळे हिंदु समाजाच्या धर्मांतराबाबतच्या उदासीन आणि आत्मघातक प्रवृत्तीला आळा घालण्याचें कार्य हातीं घेणें निकडीचें झालें आहे हें सावरकरांना आढळून आलें. धर्मांतर म्हणजे राष्ट्रांतर हा सिद्धान्त त्यांनी सुटकेनतर मांडला. तत्पूर्वी धर्मांतर हें राष्ट्रांतर कसें ठरतें हें त्यांनी अंदमानांत आपल्या डोळ्यांनी पाहिलें होतें. त्यांना शुद्धि आणि संघटना या कार्याची प्रेरणा मिळाली ती येथेच.

मुसलमानी पंगतींत जेवावयास बसलेल्या बंदीवानांना सावरकर हिंदु बंदीवानांच्या पंगतींत बोलावूं लागतांच हिंदु बंदीवान त्यांना विरोध करूं लागले. तेव्हा खाण्याने मनुष्य बाटतो ही हिंदु समाजांत रूढ झालेली हास्यास्पद समजूत दूर करण्यासाठी ते हिंदु बंदीवानांना सांगूं लागले, " जर हिंदूंचें खाऊन मुसलमान हिंदु होत नाही, ते हिंदूंचें अन्न पचवून पुन्हा मुसलमानच राहतो किंवा ख्रिस्तीचा ख्रिस्ती राहतो तर मुसलमानांचें अन्न खातांच तुम्हांलाच कां धर्माचा रेच व्हावा ? तुमच्या हिंदुपणाची पचनशक्ति क्षीण कशी झाली ? मुसलमानांचें अन्न खाऊन, ख्रिस्त्याचें पाणी पिऊन, तें पचवून पुन्हा हिंदूचे हिंदु राहण्याइतकी तुमची पचनशक्ति आता वाढली पाहिजे. "

या आपल्या युक्तिवादाच्या बळावर सावरकरांनी मुसलमान वॉर्डरांच्या व बारीसारख्या बंदीपालाच्या विरोधाला न जुमानतां अडाणी हिंदु बंदिवानांच्या सक्तीच्या धर्मान्तराला आळा घालण्यासाठी आपलें प्रचारकार्य जोमाने चालू केलें.

याच सुमारास 'एम्डेन' ही जर्मन रणतरी अंदमानच्या आसपास घिरट्या घालीत असल्याचें वृत्त बंदीवानांपर्यंत येऊन धडकलें. अंदमानांत अडकलेल्या हिंदी क्रांतिकारकांना मुक्त करण्यासाठी 'एम्डेन'चा संचार चालू असल्याचा सरकारला सुगावा लागतांच अंदमान बेटाभोवतालच्या लष्करी पहाऱ्यांत बरीच वाढ करण्यांत आली. 'एम्डेन'चा प्रयत्न यशस्वी होईल किंवा नाही हे अंदमानांत मिळणाऱ्या अपुऱ्या माहितीच्या आधारें सावरकरांना सांगतां येण्यासारखें नव्हतें. परंतु इंग्रजांचें नौदल-सामर्थ्य अतुलनीय असल्यामुळे अडाणी बंदीवानांप्रमाणे भोळ्याभाबड्या स्वप्नरंजनांत दंग होण्यांत राजबंद्यांचा कांहीच फायदा नव्हता. त्यामुळे आपण लवकरच मुक्त होऊं अशी भलती आशा मनांत बाळगून स्वतःची फसवणूक करूं नका असें सावरकर त्यांना सांगत होते. परंतु त्याचबरोबर 'एम्डेन'चा प्रयत्न सफल झाला तर भाषण काय करावयाचें याचाहि विचार करून ठेवणें आवश्यक होतें. 'एम्डेन'ने आपल्याला मुक्त केलें तर काय घडूं शकेल याचा मनाशीं आराखडा बांधून सावरकरांनी आपल्या विश्वासांतील राजबंद्यांपाशीं मुक्तता झाली तर स्वदेशसेवेसाठी आपण कोणतीं पावलें टाकावयाचीं याचें सूतोवाच केलें होतें. त्यामुळे 'एम्डेन' पकडली गेल्याचें वृत्त कळल्यानंतर मुक्ततेची आणखी एक संधि हुकली म्हणून सावरकर आणि त्यांचे सहकारी हळहळणें स्वाभाविक होतें.

'एम्डेन'-प्रकरण गाजत असतांनाच मिरत येथील लष्करी छावणींत उठावाचा प्रयत्न झाला. या उठावाचा बीमोड करण्यासाठी सरकारने अतिशय कडक उपाय योजले. परंतु तेव्हापासून उत्तर भारतांत क्रांतिकारकांच्या चळवळीला अधिकच जोर चढला. लाहोर येथील क्रांतिकारकांची टोळी हातीं लागतांच सरकारने या क्रांतिकारकांना जन्मठेपेची शिक्षा सुनावून त्यांची अंदमानांत रवानगी केली. यामुळे १९१५–१६ या वर्ष-दीड वर्षाच्या अवधींत अंदमानांतील राजबंद्यांच्या संख्येंत बरीच वाढ झाली. आपण तुरुंगाच्या गजाआड गेल्यानंतरहि ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध लढण्यासाठी पेटविलेली सशस्त्र प्रतिकाराची ज्योत देशांतील आणि परदेशातील हिंदी क्रांतिकारकांनी तेवत ठेवली आहे हें पाहून सावरकरांना समाधान वाटलें. नव्याने अंदमानात आलेले राजबंदी या क्रांतिकारक चळवळीचा आपण समग्र इतिहास लिहा

असा जेव्हा सावरकरांना आग्रह करूं लागले तेव्हा ते म्हणाले, " मित्रांनो, इतिहास करणें हें आपल्या पिढीचें मुख्य काम आहे ! इतिहास लिहिणें हें दुय्यम. तें पुढील पिढी कचित् करील."

अंदमानमध्ये बंदीजीवन व्यतीत करीत असतांना सावरकरांचें देशांत चाललेल्या लहानमोठ्या घटनांकडे बारकाईने लक्ष होतें. आंध्रसभेने स्वतंत्र आंध्र प्रांताच्या निर्मितीची चळवळ सुरू केल्याचें कळतांच त्यांनी ९ मार्च १९१५ रोजीं नारायणरावांना लिहिलेल्या पत्रांत या चळवळीसंबंधी आपले विचार व्यक्त केले आहेत. ते लिहितात, " आंध्रसभेची चळवळ प्रचंड व महत्त्वाची आहे. पण तो प्रांत तामिळांच्यापासून अलग करण्याची कल्पना कोती आहे. त्यांतल्या त्यांत आंध्रमाता की जय या घोषाने राष्ट्रीय जयजयकार करण्यांत आला हें वाचून मला फार खेद झाला. क्षुद्र प्रांताभिमानाच्या वृत्तीचा तो स्वाभाविक परिपाक आहे. या गवताच्या काडीवरून येणाऱ्या अशुभ वादळाची कल्पना येते. स्वदेशीच्या भव्य चळवळीची ही रोगट प्रतिक्रिया आहे. महाराष्ट्र, मद्रास, बंगाल हे सारे मोठे आहेत आणि चिरंजीवहि होतील. पण ते तिच्या संपूर्ण भारतमातेच्या द्वारें. तेव्हा आपण आंध्रमाता की जय असा जयघोष न करतां भारतमाता की जय असा केला पाहिजे आणि बंग आमार असें राष्ट्रगीत न गातां हिंद आमार असें राष्ट्रगीत गायिलें पाहिजे."

या सुमारास सावरकरांची प्रकृति ढासळूं लागली. १९१० मध्ये लंडनच्या व्हिक्टोरिया स्टेशनवर ब्रिटिश पोलिसांच्या हातीं लागल्यापासून गेलीं दहा वर्षें त्यांच्या प्रकृतीची सतत हेळसांड होत गेली. त्यांतच कौटुंबिक चिंता व क्रांतिकारक चळवळीच्या भवितव्याबद्दलचा मनावरचा ताण यांची भर पडली. अंदमानांतील अतिशय निकृष्ट प्रतीचें अन्न व शारीरिक शक्ति करपवून टाकणारे परिश्रम यांचा त्यांच्या पचनशक्तीवर इतका विकृत परिणाम झाला की, आमांशाचा विकार जडून पोळी, डाळ पचेनाशी झाली. शेवटीं भात घेऊन त्यांत साधें पाणी कालवावयाचें व त्यावर भूक शमवावयाची अशी वेळ येऊन ठेपली. आमांशाबरोबर शरीरांत ताप सुरू लागतांच भातहि पचेनासा झाला. घोटभर दूध मिळणेंहि मुष्किलीचें होऊन बसलें. बाबारावांना स्वतंत्रपणें स्वयंपाक करण्याचा अधिकार मिळाला असल्यामुळे ते जें कांही शिजवतील त्यांतला थोडासा भाग ते लपवत-

छपवत सावरकरांकडे धाडूं लागले. परंतु सावरकरांची प्रकृति इतकी बिघडली होती की, थोरल्या बंधूंच्या हातचें अन्नहि पचेना. यामुळे त्यांचें वजन १२० पौंडांवरून ९८ पौंडांपर्यंत खाली आलें.

अशा रीतीने शरीर दुर्बल होत चाललें असतांनाहि अंदमानमधील राजबंद्यांच्या परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठी सावरकरांचे प्रयत्न सुरू होते. भानसिंग नांवाच्या शीख राजबंद्याला इतकी बेदम मारहाण करण्यांत आली की, त्याला रक्ताच्या उलट्या झाल्या आणि दीड महिन्याच्या आंतच तो मरण पावला. बारीच्या या राक्षसी कृत्याचा निषेध करण्यासाठी सावरकरांनी राजबंद्यांना काम करण्याचें नाकारून संपावर जाण्यास सांगितलें. सहा महिने हा संप चालू होता. संपाच्या प्रारंभीं बारीचा ताठरपणा कायम होता. तो संपावर गेलेल्या राजबंद्यांना वाटेल तशा शिक्षा फर्मावूं लागला. परंतु तरीहि राजबंदी आपल्या निर्धारापासून ढळत नाही हें पाहिल्यानंतर बारी नरमला व तेव्हापासून अंदमानांत मारहाणीचे प्रकार फारसे घडले नाहीत.

१९१७ च्या ऑगस्टमध्ये त्या वेळचे भारतमंत्री मॉंटेग्यु यांनी हिंदुस्थानांत राजकीय सुधारणा घडवून आणण्याचा ब्रिटनचा मनोदय असल्याचें जाहीर केलें. ब्रिटिश साम्राज्याचा एक स्वयंपूर्ण घटक म्हणून हिंदुस्थानचा क्रमाक्रमाने विकास व्हावा व तेथे प्रातिनिधिक स्वायत्तता निर्माण व्हावी अशी आपल्या सरकारची इच्छा असल्याचें त्यांनी आपल्या भाषणांत जाहीर केलें. सैन्यदलांतील वरिष्ठ जागा हिंदी तरुणांना देण्यांत येणार असल्याचें आश्वासनहि देण्यांत आलें. आपल्या या घोषणेबद्दलची भारतांतील पुढाऱ्यांची प्रतिक्रिया जाणून घेण्यासाठी मॉंटेग्यु भारतांत येऊन गेले. त्यांच्या या भारतभेटीच्या संधीचा फायदा घेऊन सावरकरांनी क्रांतिकारक पक्षाच्या वतीने त्यांना निवेदन धाडलें. या निवेदन-पत्रांत सावरकरांनी राजबंद्यांच्या सुटकेच्या मागणीवर भर दिला. त्यांनी असे लिहिलें की, हिंदुस्थानांतून प्रातिनिधिक शासकयंत्रणा स्थापन करण्याचा सरकारचा विचार असेल तर राजबंद्यांची सुटका करण्यास कांहीच हरकत नाही. मात्र त्याबरोबरच सरकार जर केवळ राजबंद्यांची सुटका करणार असेल व जाहीर केलेल्या सुधारणा अमलांत आणणार नसेल तर या सुटकेलाहि कांही अर्थ उरणार नाही. कारण अंतर्गत स्वराज्य आणि राजबंद्यांची सुटका या दोन गोष्टी परस्परावलंबी आहेत.”

सावरकरांनी मॉँटेग्यु यांना धाडलेल्या निवेदनाच्या प्रती नारायणरावांनी तयार करून त्या कॉंग्रेसच्या अधिवेशनांत वाटल्या. कॉंग्रेसनेहि राजबंद्यांच्या सुटकेची मागणी करावी असा त्या मागचा उद्देश होता; परंतु सशस्त्र क्रांतिकारकांबद्दल साधी शाब्दिक सहानुभूति दाखविण्यासहि कॉंग्रेस-नेत्यांनी नकार दिला. इतर प्रांतिक परिषदांमध्ये मात्र राजबंद्यांच्या मुक्ततेची मागणी करणारे ठराव संमत होत होते. त्या आधारें नागरिकांच्या सह्या गोळा करून राजबंद्यांच्या मुक्ततेसाठी सार्वजनिक अर्ज सरकारकडे धाडावा असे सावरकरांनी नारायणरावांना सुचविलें.

कौटुंबिक आघात होत असतांनाहि नारायणरावांनी वैद्यकीचा अभ्यास पुरा करून संसाराची जबाबदारी उचलण्यास प्रारंभ करतांच सावरकरांना आनंद झाला. नारायणरावांना धाडलेल्या एका पत्रांत त्यांनी हा आनंद व्यक्त केला आहे. परंतु त्याबरोबरच जीवनाचें स्वरूप संमिश्र कसें असतें हेंहि त्यांत त्यांनी विशद केलें आहे. सावरकर म्हणतात, “ चिरंतन प्रकाशित राहील असा दिवस कधीच येणें शक्य नाही. आपलें जीवन त्रिदल पुष्पाप्रमाणे आहे. एका पातळीवर सुखाचा रंग चढला आहे, दुसरीवर दुःखाचा चढवला आहे आणि तिसरीवर कोणताच रंग नाही किंवा या दोन्ही रंगांचें मिश्रण आहे. आज सुखाच्या तर उद्या दुःखाच्या पाकळीला कीड लागलेली असते आणि हें असें गाडें सारखें चाललेलें असतें. कोणतेंहि जीवन वा इतिहास म्हणजे थोड्या किंवा अधिक प्रमाणांत इतके जन्म आणि मृत्यु, इतके विवाह आणि इतकी अशौचे, इतका रंग आणि इतकी छाया यांचें गणित केलेलें एक कोष्टक आहे. म्हणून मध्यंतरी क्षणभर विसावा मिळाला, आनंदाचा किरण चुकून प्राप्त झाला. वसंतवायूची ओझरती झुळुक लागली तर लागलीच आपण शिशिर ऋतूंतील कष्ट विसरून जातां कामा नये. आपल्या या काळांत ज्यांचा भारतांत जन्म झाला त्यांचा नेहमीचा सहचर शिशिर आहे, वसंत नव्हे. प्राचीन ऋषींप्रमाणे आपणहि प्रार्थना करूं या. – तुला वाटेल तें आणि तुला वाटेल तेव्हा आणि तुला वाटेल तितकें आम्हांला दे. तसेंच तुला वाटेल तें आणि तुला वाटेल तितकें आमच्यापासून काढून घे ! ”

युद्धाचा शेवट जसजसा जवळ येऊं लागला तसतसा जर्मनी पराभूत होणार हें स्पष्ट होऊं लागलें. यामुळे सुटका होण्याचा संभव दुरावल्यामुळे राजबंद्यांवर औदासीन्याची कळा पसरली. आता त्यांना एवढीच आशा होती की, सरकार आपल्या विजयाप्रीत्यर्थ आपल्या शिक्षेंत कांही तरी सूट देईल. त्याप्रमाणे कांही राजबंद्यांना सूट मिळाली, परंतु सावरकरांना मात्र एक दिवसाची सूट देण्यासहि सरकारने नकार दिला. अशा परिस्थितींत नजीकच्या भविष्यकाळांत आपली सुटका होईल अशी त्यांनी आशा करणें व्यर्थच होतें. या काळांत सावरकरांचा आमांशाचा विकार बळावला आणि त्यांतच दररोज ताप येऊं लागला. त्यामुळे अधिकाऱ्यांनी सावरकरांना रुग्णालयांत हलविलें. तेथे ते जवळ जवळ वर्षभर पडून होते. आमांशामुळे त्यांनी अन्न वर्ज्य करतांच अशक्तता इतकी वाढली की, थोडेसें वाचलें किंवा बोललें तरी ताप चढे. या आजारपणामुळे वजन आणखी तीन पौंडांनी घटून ते ९५ वर आलें. त्यांच्या शरीरांत क्षयाचीं चिन्हेंहि दिसूं लागलीं. सुटकेची आशा नाही आणि शरीर असें कणाकणाने क्षीण होत चाललेलें. त्यामुळे अंदमानच्या अंधेरींत आपल्याला मृत्यूचा केंव्हा हिसडा बसेल आणि जीवनाचा धागा तुटेल याचा सावरकरांना भरवसा वाटेना. ते मृत्यूच्या छायेंत वावरूं लागले. परंतु या उदासवाण्या मनःस्थितींतहि आपण आपल्या कर्तव्यांत उणें पडलों नाही याचा दुर्दम्य अभिमान त्यांच्या मनांत वास करीत होता. आणि म्हणूनच ऐन तारुण्यांत जीवनाचा अंत समोर दिसूं लागला असतांनाहि हा राष्ट्रयोगी मृत्यूला सांगत होता –

ये मृत्यो ये। तूं ये। यावयाप्रति
निवालाचि असशील जरि ये तरी सुखे
कोमेजुनि जावया मिवोत हीं फुलें;
हीं द्राक्षें रसरशीत सुकुनि जावया,
भ्यावें तें कां म्हणुनी तुजसि परी मी ?
माझ्या पेल्यांत किती पीत राहिलों
तरी न संपतीच अशा असति आजि या
अश्रूंच्या मदिराची मात्र राहिल्या !
ये ! नैवेद्या त्या जरि असलि सुकेला !

आणि जरी दिवस असे अजुनि तरुण हा
तरि लहानथोर अशी असति संपली
दिवसांची कार्यैहि बहुत करूनिया
तोडजोड करूनि परी फेडलीं ऋणें

आणि म्हणूनच –

मरणाची वेस जयामाजिं उघडते
त्या अदृष्ट नगरांतील अति सुरम्य ते
राखवूनि ठेवियले असति बंगले
आधीची आम्हांस्तव भरुनिया अम्ही
कर्मांच्या, धर्मांच्या, नियत विसारा !

फक्त मृत्यूला एवढीच विनंती आहे की –

ये तरि हे अखिल-वीर-वीर विजेत्या
एकलाचि, अपुरस्सर आणि अकस्मात्

परंतु तसें करणें शक्य नसेल तरीहि हरकत नाही.

परि अशक्य जरि तें तुज एकटें तसें
येणेंची, तरि त्याही क्रूरपीडका
रोगांच्या सैन्याचा क्षोभ सोसण्या
मी असेचि सिद्ध, आजि दोन वत्सरें

कारण –

मूल्य म्हणुनि मृत्यूच्या यातनाहि की
समजुनि कर्तव्य राहूं सिद्ध असेची

सावरकरांची प्रकृति इतकी क्षीण झाल्यानंतर सरकारने अखेर त्यांना घरच्या मंडळींना भेटण्याची परवानगी दिली. त्यानुसार त्यांच्या पत्नी माई, धाकटे बंधु नारायणराव व त्यांच्या पत्नी असे तिघेजण अंदमानास गेले. १९०६ मध्ये सावरकर इंग्लंडला जाण्यासाठी मुंबईच्या किनाऱ्यावर उभे होते तेव्हा त्रिवर्ग बंधूंची भेट झाली होती. त्यानंतर तेरा वर्षांनी हे तिघे भाऊ पुन्हा भेटत होते. आणि तरीहि भेटीची वेळ फक्त एक तासच होती. त्यानंतर माईंना स्वतंत्रपणें भेटण्यासाठी सावरकरांना आणखी अर्धा तास देण्यांत

आला. बस्स, यापेक्षा अधिक कोणतीहि सवलत देण्यांत आली नाही. कुटुंबीयांच्या भेटीची ही परवानगी मिळण्यापूर्वीच येसूवहिनींचें निधन झालें होतें. १९०९ मध्ये बाबा अंदमानला गेल्यापासून त्यांचा जीव पतिदर्शनासाठी तळमळत होता. आणि आता भेटीची परवानगी मिळाली तेव्हा मानसिक आणि शारीरिक विपदांनी त्या माउलीचा देह इतका श्रांत झाला होता की, अंदमानच्या दिशेकडे डोळे लावून त्या जर्जर देहांतील प्राणपाखरूं उडून गेलें. बाबांसारख्या धीराच्या पुरुषाने देखील हें दुःख कसें गिळलें असेल याची कल्पनाहि करवत नाही.

नारायणरावांना लिहिलेल्या पत्रांत सावरकर म्हणतात – " पण आपली वहिनी ! – सुटल्यानंतर जेथे माझी वहिनी प्रेमाने माझें स्वागत करावयास येणें शक्य नाही अशा घरांत जावें लागेल ही कल्पना आली की, सुटकेंतील अर्धा आनंद निघून जातो आणि उदासीनता वाटते. माझी मैत्रीण, माझी बहीण, माझी आई, माझी सहकार्यकर्त्री – प्रेमाचीं सर्व नातीं तिच्यांत साठविलीं होतीं. तिने खरोखरीच एखाद्या सतीप्रमाणे मरण स्वीकारलें. हूं की चूं न करतां तिने आपलें जीवन मायभूमीच्या स्थंडिलावर अर्पण केलें. उसासे टाकून झिजत झिजत, ज्यांची पुन्हा भेट होणें दैवीं लिहिलें नाही अशा आपल्या प्रियकराच्या परत येण्याची प्रतिक्षा करीत. "

कुटुंबीय मंडळी निघून गेल्यानंतर सावरकरांना रुग्णालयांतून हलवून पुन्हा कोठडींत बंद करण्यांत आलें. पांचव्या क्रमांकाच्या चाळींतील तिसऱ्या मजल्यावरच्या या नव्या कोठडींतून समोरच्या रास बेटावरची शोभा पाहवयास मिळत असे. अशक्ततेमुळे वाचन किंवा ध्यानधारणा करणें सावरकरांना अशक्य झाल्यामुळे समोरच्या सागर-लहरींचा खेळ बघत बसण्याचा त्यांच्या कविमनाला छंद जडला. मधूनच बेटावरचे बुलबुल आणि मैना कोठडींत येऊन कुजबुज करीत तेव्हा त्यांची भाषा जाणून घेण्याचाहि सावरकरांनी प्रयत्न केला. या पक्ष्यांना आपण पाळावें असें त्यांना खूप वाटे; पण कारागृहांत पक्षी पाळावयास बंदी होती. परंतु या पक्ष्यांनी आपल्याला किती लळा लावला होता हें सांगतांना ते लिहितात, " हे पक्षी मला पाळतां आले असते तर मी त्यांना राष्ट्रप्रीतीची गाणीं शिकविलीं असतीं. आणि मग शंकराचार्य मंडनमिश्रांचें घर कोणतें म्हणून विचारीत गेले तेव्हा जसे लोकांनी

अभिमानाने सांगितलें कीं, ज्याच्या दारापुढे पोपट आणि मैना वेदान्ताचा वाद करीत असतात ' जानीहि तन्मंडनमिश्रगेहं ' त्याप्रमाणे माझ्या कोठडी-विषयीहि चौकशी करीत एखादा नवीन बुलबुल आला असता जुन्या बुलबुलांनी सांगितलें असतें की, जिच्या दाराशीं मैना आणि बुलबुल हिंदुस्थानची स्वातंत्र्यगीतें गात असतात ' जानीहि तन्बंडनमिश्रकक्षं ' – ती त्या बंडन-मिश्राची, बंडखोराची कोठडी होय ! ''

या नव्या कोठडींत राहवयास मिळाल्यामुळे तेथील मोकळ्या वाऱ्याचा प्रतिहत संचाराने दीड-दोन वर्षांच्या आंतच सावरकरांची प्रकृति सुधारली.

या सुमारास महायुद्धाची गडबड संपल्यामुळे सरकारने तुरुंगांतील परिस्थितींत सुधारणा घडवून आणण्यासाठी जेल-कमिशनची नेमणूक केली. अंदमानच्या वसाहतींचें काय करावयाचें हा प्रश्न या कमिशनपुढे होता. त्यामुळे जेल-कमिशन राजबंद्यांची प्रत्यक्ष परिस्थिति पाहण्यासाठी अंदमानला गेले. या वेळीं राजबंदीवानांच्या वतीने सावरकरांनी कमिशनला तेथील सारी परिस्थिति विशद केली. नंतर त्यांनी या मंडळाकडे राजबंद्यांच्या सुटकेची मागणी करणारे निवेदन धाडलें. या निवेदनांत त्यांनी अंदमानाचे लष्करी महत्त्व जाणून घेऊन सरकारने तेथील वसाहत बंद करूं नये असें सुचविलें होतें. त्यांनी या निवेदनांत असें म्हटलें की, अंदमान हा हिंदुस्थानचाच जलदुर्ग आहे. आज नाही पण उद्या येथे वैमानिक आणि सामुद्रिक ठाणें स्थापन केलें जाईल आणि पूर्वेच्या राजकीय महत्त्वाकांक्षेचा अन्याय्य आक्रम जर कधी हिंदुस्थानवर झाला तर त्याच्या सामुद्रिक रणनौकांस आणि विमानांस पहिला शह हा अंदमानचा दुर्ग देईल.

जेल-कमिशनकडे राजबंद्यांच्या मुक्ततेची मागणी करणारे निवेदन सावर-करांनी ज्या वेळीं धाडलें त्याच सुमारास मुंबईच्या राष्ट्रीय संघाने या मागणीचा पाठपुरावा करणारा पंचाहत्तर सह्यांचा अर्ज सरकारकडे धाडला होता.

राजबंद्यांच्या मुक्ततेचा प्रश्न देशांत सर्वत्र चर्चिला जात असतांना क्रांति-कारकांच्या ध्येयधोरणाचा पुन्हा एकदा खुलासा व्हावा या उद्देशाने ६ जुलै १९२० रोजीं आपल्या बंधूंना लिहिलेल्या पत्रांत सावरकरांनी आपली वैचारिक भूमिका पुढील शब्दांत मांडली आहे – " ज्यांत सर्व मनुष्यजातीचा समावेश

होईल आणि जेथील एकूण एक स्त्रियांना आणि पुरुषांना ही पृथ्वी, हा सूर्य, ही भूमि आणि हा प्रकाश यांच्यापेक्षा मिळणाऱ्या लाभासाठी प्रयत्न करण्याचा आणि त्याचा उपभोग घेण्याचा समान अधिकार राहील असें संपूर्ण जगाचें एक राष्ट्र हें आमचें ध्येय आहे. मानव्य ही देशाभिमानाच्या वरची कोटी आहे हें तत्त्व आम्हांला संमत असल्यामुळेच एकच अवयव इतरांच्या जिवावर इतका पुष्ट होऊं लागला आणि एखाद्या असाध्य काळपुळीप्रमाणे फुगून सर्व मनुष्य-जातीचें जीवन संकटांत आल्यासारखें वाटूं लागलें त्या वेळीं आम्हांला स्वस्थ बसवेनासें झालें. दुसरा परिणामकारक असा कोणताहि उपाय दिसत नसल्यामुळे शल्यचिकित्सकाची सुरी आपल्या हातांत धरावी लागली. सर्वच अत्याचारांचा मी मनापासून तिटकारा करीत आलों आहें. या भरतभूमीवर परक्यांनी अधिकार गाजवावा या गोष्टीच्या विरुद्ध माझें मन जितकें बंड करून उठें तितकेंच तें येथल्या जातिभेद आणि अस्पृश्यता या गोष्टींविरुद्ध उठें."

राजबंद्यांच्या सुटकेसाठी देशभर निर्माण झालेल्या वातावरणाची दखल घेऊन सरकारने राजबंद्यांची क्रमशः सुटका करण्याचें ठरविलें. त्यानुसार अंदमानांतील राजबंद्यांची मुक्तता होऊं लागली. परंतु सावरकर बंधूंच्या सुटके-संबंधी सरकारने मौन स्वीकारलें होतें. शिवाय सावरकरांना अंदमानांतून हल-विलें तरी देशांतील कोणत्या तरी तुरुंगांतच त्यांना ठेवण्यांत येणार असल्याची बातमी कानांवर येतांच सावरकरांनी सरकारला असें कळविलें की, हिंदुस्थानांत परत धाडतांच माझी मुक्तता होणार नसेल तर मी अंदमानमध्येच राहूं इच्छितों. मात्र दहा वर्षे भरलीं असल्यामुळे मला सहकुटुंब राहतां यावें. कारागृहांतच ठेवावयाचें तर मला अंदमानांतच ठेवावें.

देशांत चाललेल्या सुटकेच्या प्रयत्नांची माहिती देण्यासाठी नारायणराव १९२० च्या नोव्हेंबरमध्ये पुन्हा अंदमानला येऊन गेले. बाबांची व आपली प्रकृति क्षीण झाली असल्यामुळे व सुटकेचा संभव उरला नसल्यामुळे सावरकर त्यांना म्हणाले, " बाळ, तुझ्यापासून वस्तुस्थिति लपवून ठेवण्याचें मला कारण दिसत नाही. म्हणून सांगतों की, आता तूं आमच्या दोघांच्या जीवनांतील शेवटची बातमी ऐकावयास सिद्ध रहा. आता फार दिवस निभतील असें दिसत नाही. तरी देखील असंभवनीय गोष्टीहि घडतात हेंहि विसरूं नकोस. पण आता तो संभव अगदी विरळा ! बहुधा ही शेवटचीच भेट."

परंतु थोड्याच दिवसांनी एका वॉर्डराने सावरकरांना गुप्तपणें एक चिठ्ठी आणून दिली. मुंबई प्रांतांतील कोणत्या तरी तुरुंगांत ठेवण्याच्या निमित्ताने आपल्याला अंदमानांतून हलविण्यांत येणार असल्याची बातमी त्या चिठ्ठीमुळे कळली. प्रथम त्यांचा या बातमीवर विश्वास बसेना. पण नंतर बातमी खरी असल्याची खात्री झाल्यानंतर सावरकरांनी पुस्तकांची बांधाबांध करण्यास व आपल्याजवळच्या इतर वस्तु बंदीवानांना वांटण्यास सुरुवात केली. सावरकरांना अंदमानांतून हलविण्यांत येणार असल्याची वार्ता कारागृहांत पसरतांच सर्व कैदी त्यांच्या दर्शनासाठी येऊं लागले. आपल्यामागे राहणाऱ्या राजबंद्यांनी कसें वागावयाचें हेंहि सावरकरांनी संबंधितांना समजावून सांगितलें. निघावयाच्या दिवशीं जे दोन मित्र त्यांना भेटावयास आले होते त्यांतील एकाला त्यांनी अंदमानांत स्थापन केलेल्या संस्थेची शपथ दिली –

एक देव, एक देश, एक आशा
एक जाति, एक जीव, एक भाषा

हा शपथविधि होत असतांनाच पहारेकरी ओरडला, "साहब आता है, आपको ले जानेवाले सिपाहीओंकी तुकडीभी आती है।"

सावरकर कोठडींतून बाहेर पडले. जे कधी काळीं घडेल असें मुळीच वाटत नव्हतें तें घडत होतें. अंदमानच्या कारागृहाचा तो लोखंडी उंबरठा ओलांडतांना सावरकर बाबांना म्हणाले, "बाबा, हा एवढासा लोखंडी उंबरठा जीवनमरणाच्या सीमेची रेषा आहे. ओलांडला. मरणाच्या सीमेंतून जीवनाच्या सीमेंत हा वितीएवढा उंबरठा ओलांडून आपण पुन्हा एकदा पाय टाकला ! आता पुढचें पुढे !"

सावरकरांना पाहण्यासाठी कराग्रहाच्या बाहेर बंदीवानांची गर्दी होईल याची अधिकाऱ्यांना कल्पना होती. म्हणून त्यांनी साऱ्या बंदीवानांना दूरच्या कामावर पिटाळलें होतें; परंतु तरीहि एवढ्यांत जमादाराचें काम करीत असलेला कैदी चपळाईने पुढे आला आणि भोवतालच्या शिपायांना न जुमानतां त्याने सर्व कैद्यांच्या वतीने सावरकरांच्या गळ्यांत हार घातला. शिपाई आरडा-ओरडा करण्यापूर्वी तो जमादार सावरकरांच्या पायावर डोकें ठेवून तेथून

निघूनहि गेला होता. रत्नांच्या माळेपेक्षाहि रानचाफ्यांच्या फुलांची ती माळ सावरकरांना अधिक प्रिय वाटली, मोलाची वाटली. अंदमानमध्ये भोगलेल्या साऱ्या श्रमांचा आणि कष्टांचा भार हलका करण्याचें अलौकिक सामर्थ्य त्या साध्या फुलमाळेंत होतें.

एवढ्यांत 'महाराज' जहाज आलें. ते कलकत्त्याला जाणार होतें. त्या जहाजाच्या तळमजल्यावरच्या पिंजऱ्यांत वेड्यांना बंद करण्यांत आलें होतें. सावरकर बंधूंनाहि त्याच पिंजऱ्यांत ढकलण्यांत आलें. या तळमजल्यावर वारा अजिबात येत नसल्यामुळे जिवाची तगमग होत होती. सावरकरांनी ही सारी परिस्थिति अधिकाऱ्यांना सांगितल्यानंतर त्यांना वेड्यांपासून निराळ्या ठिकाणीं ठेवण्याची व सायंकाळच्या वेळीं मोकळ्या हवेसाठी डेकवर अर्धा तास नेण्याची व्यवस्था करण्यांत आली.

चार-पांच दिवसांच्या प्रवासानंतर सावरकर आणि बाबा मोकळ्या हवेसाठी डेकवर आले असतांना त्यांना समोर हिंदुस्थानचा तट दिसूं लागला. दोघांच्या चित्तवृत्ति मोहरून आल्या. सावरकरांनी लिहिलें आहे – " मी चमकलों! हिंदुस्थानचा तट! ज्या प्रिय मातृभूमीच्या केवळ स्मृतीने प्रस्फूर्त होऊन आजवर या अनेक यातना भोगल्या तिची ती प्रत्यक्ष मूर्ति! ते चरण पुन्हा दिसले! या आयुष्यांत पुन्हा दिसले!" मी वळून बाबांना म्हटलें, " बाबा, तो पाहा भारत आणि ते पाहा त्याचे नीलसिंधुजलधौतचरणतल!"

दोघेहि भक्तिभावाने थरथरून उठले आणि मातृभूमीच्या चरणांपुढे हात जोडून ललकारले, " स्वातंत्र्यलक्ष्मी की जय! वंदे मातरम्!"

# ९
# समाजपुरुषा, जागृत हो !

सावरकरांना अंदमानहून कलकत्त्याला आणल्यानंतर आठ दिवस अलीपूरच्या तुरुंगांत ठेवण्यांत आलें. त्यांना आणि बाबांना निरनिराळ्या कोठड्यांत बंद करण्यांत आलें तेव्हा क्षयाच्या खोकल्याने बेजार झालेला आपला हा थोरला भाऊ पुन्हा भेटणार की नाही या काळजीने त्यांचा जीव व्याकुळ झाला. सावरकरांना अलीपूरहून प्रथम मुंबईला व नंतर तेथून रत्नागिरीला नेण्यांत आलें. रत्नागिरीच्या कारागृहांतील पहिला महिना फारच त्रासदायक गेला. अंदमानांत त्यांना शेवटीं शेवटीं दूध व बऱ्यापैकी अन्न देण्यांत येत होतें. रत्नागिरीच्या बंदीशाळेंत सावरकरांचें दूध तर बद करण्यांत आलेंच. शिवाय पुन्हा जाडीभरडी भाकरी खाण्याची पाळी आली. सावरकरांचा इतर कैद्यांशीं संपर्क येऊं नये म्हणून त्यांना एकलकोंडींत ठेवण्यांत आलें. या निर्जन कोठडींत जाणारा प्रत्येक क्षण युगासारखा भासूं लागला व यापुढचें सारें आयुष्य असेंच एकान्तवासांत व्यतीत करावयाचें असेल तर या जीवनाचा आताच अंत कां करून घेऊं नये असा उद्वेगजनक विचार सावरकरांच्या मनांत थैमान घालूं लागला. सारा दिवसभर हा विचार मनांत घोळत्रीत असतांना त्यांचें विवेकी मन पुन्हा एकदा त्यांना समजावूं लागलें, “ अंदमानांत इंदूभूषणपासून प्रा. परमानंदांपर्यंत जे अनेक बंगाली, पंजाबी, शीख देशभक्त यातनांना कंटाळून आत्मघाताला कर्तव्य समजूं लागले तेव्हा त्यांना ज्या कारणासाठी तूं त्या कृत्यापासून परावृत्त केलेस त्याच कारणासाठी तूंहि परावृत्त हो. मरणेंच तर शंभरीं शंभर रुपये घेऊन. ”

या विचाराच्या प्रभावामुळे मन शांत झाल्यानंतर दुसऱ्या दिवसापासून सावरकरांनी कविता रचण्याचा अंदमानांतील उद्योग येथेहि सुरू केला. इंग्लंडला पकडले गेल्यापासून रत्नागिरीस येईपर्यंतचा बंदीजीवनाचा वृत्तान्त काव्यबद्ध करण्यासाठी दररोज एकेक भाग मनांत रचीत जावा, पाठ करीत जावा, हा क्रम सुरू झाला. या काव्यरचनेच्या बळावर सुटकेनंतर त्यांनी 'माझी जन्मठेप' हा अंदमानांतील विलक्षण कष्टमय बंदीजीवनाचें दर्शन घडविणारा ग्रंथ लिहिला. सावरकरांच्या इतर वाङ्मयाप्रमाणे या ग्रंथालाहि कांही दिवस सरकारी जप्तीच्या अंधारांत पडून राहवें लागलें होतें.

अशा रीतीने दोन-तीन महिने गेल्यानंतर सावरकरांना देण्यांत येणाऱ्या अन्नांत सुधारणा करण्यांत आली. त्यामुळे प्रकृति हळूहळू सुधारूं लागतांच सावरकरांनी येथेहि व्याख्यानाचें सत्र सुरू करून राजबंद्यांना प्रचलित राजकीय परिस्थितीची पार्श्वभूमि विशद करण्यास सुरुवात केली. त्या काळांत मलबार-मधील मोपल्यांच्या बंडाच्या वार्ता कानीं येत होत्या. त्या निमित्ताने 'मला काय त्याचें' या हिंदु समाजाच्या आत्मघातक प्रवृत्तीवर सावरकर कडाडून हल्ला चढवीत असत. त्यांनी पुढे 'मला काय त्याचें' अर्थात् मोपल्यांचें बंड या नांवाची या विषयावर कादंबरीहि लिहिली. याच सुमारास भारतीय राज-कारणावर महात्मा गांधींचा प्रभाव वाढत चालला होता. गांधीजींचा स्वराज्य-प्राप्तीसाठी हिंदु-मुसलमान ऐक्यावर आणि सत्य-अहिंसा या साधनांवर भर होता. परंतु तत्कालीन परिस्थिति ध्यानांत घेतां गांधीजींनी पुरस्कारिलेल्या तत्त्वांमुळे हिंदु समाज अधिकच दुबळा होईल व मुसलमान समाज शिरजोर होण्यांत त्याची परिणति होईल असा इशारा सावरकर राजबंद्यांपुढील आपल्या भाषणांत देत असत. अनेक देशी आणि परदेशी इतिहासांतील दाखले देऊन राजकारणांत 'बळी तोच कान पिळी' हाच न्याय सर्वत्र कसा आचरला जात आहे व समर्थ हिंदु समाजच या देशाचा भाग्यविधाता कसा ठरूं शकेल याबाबतचें सावरकरांचें विवेचन बिनतोड असे.

अंदमानप्रमाणे रत्नागिरीच्या कारागृहांतहि सिंधी व पठाणी मुसलमान कैदी हिंदु मुलांना बाटविण्याच्या कारवाया करीत असल्याचें सावरकरांना आढळून येतांच तेथेहि त्यांनी शुद्धिकार्य आरंभिलें. यामुळे चिडलेल्या मुसलमान वॉर्डरांनी हिंदु कैद्यांना मारहाण करण्याचा बेत आखला. परंतु या

बेतासंबंधी सावरकरांनी हिंदु कैद्यांना अगाऊच सावध केलें असल्यामुळे हिंदु कैद्यांनी मुसलमानी हल्ल्याला चांगलें तोंड दिल्यामुळे त्यांची गुंडगिरी बंद पडली. शुद्धिकार्याबरोबरच सावरकरांनी अडाणी कैद्यांसाठी साक्षरताप्रसाराचें कार्य हातीं घेतलें. त्यासाठी त्यांनी सरकारकडे अर्ज करून पांचशे रुपयांची पुस्तकें मागविलीं.

हिंदुसमाजाचें भवितव्य अधिक उज्ज्वल व्हावें यासाठी या समाजांतील फुटीर वृत्ति नष्ट होऊन हा समाज एकात्म आणि एकरस व्हावा आणि हा समाज प्राचीन सांस्कृतिक बंधनांबरोबरच आधुनिक राष्ट्रवादाच्या बैठकीवर उभा राहवयास हवा या आपल्या प्रदीर्घ चिंतनाच्या आधारें सावरकरांनी 'हिंदुत्व' या प्रबंधाची रचना केली. १९२१ च्या अखेरीस आणि १९२२ च्या प्रारंभीं रत्नागिरीच्या कारागृहांत हा प्रबंध लिहिल्यानंतर तो बाहेर धाडण्यांत आला व १९२३ मध्ये 'मराठा' या टोपण नांवाखाली नागपूरहून तो प्रसिद्ध करण्यांत आला. हिंदु हा शब्द धर्मवाचक नसून राष्ट्रवाचक आहे व त्यामुळे हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व कसें ठरतें याची मूलगामी मीमांसा या प्रबंधांत करण्यांत आली आहे.

आसिंधुसिंधुपर्यन्ता यस्य भारतभूमिका
पितृभूःपुण्यभूश्चैव स वै हिंदुरिति स्मृतः

अशी सावरकरांनी हिंदु या शब्दाची व्याख्या केलेली आहे. हिंदुराष्ट्रवादाची गीता म्हणून गौरविला गेलेला हा प्रबंध वाचतांच स्वामी श्रद्धानंद कौतुकाने उद्गारले, "अहो, कोणत्या शुभमुहूर्तीं लेखकाला हें सत्य स्फुरलें. ती वेळ बहुधा उषःकालाचीच असली पाहिजे !"

ज्या लोकांना प्रदेश, धर्म आणि वंश यांच्या योगाने सामाजिक आणि सांस्कृतिक एकत्व प्राप्त होतें तेंच राष्ट्र या संज्ञेला पात्र होत असल्यामुळे हिंदु हें एक राष्ट्र आहे याचें विवेचन करतांना सावरकर म्हणतात, "जो सिंधूपासून समुद्रापर्यंत पसरलेल्या या आसिंधुसिंधूपर्यंत भूमीला आपली पितृभू मानतो, त्याचप्रमाणे वैदिक सप्तसिंधूंच्या प्रदेशांत ज्या जातीच्या प्रारंभाचा पहिला आणि दृश्य पुरावा मिळतो व ज्या जातीने नवीन प्रदेश आक्रमीत पुढे जात असतां ज्याचा ज्याचा स्वीकार केला तें सर्व आपल्यांत समाविष्ट केलें व जें जें

समाविष्ट केलें तें परमोत्कर्षाला पोचविलें व जी जाति पुढे हिंदु जाति या नांवाने प्रसिद्ध पावली त्या जातीचें रक्त हिंदु या नांवास पात्र होणाऱ्या मनुष्याच्या अंगांत खेळत असतें. समान इतिहास, समान वाङ्मय, समान कला, एकच निर्बंध-विधान, एकच धर्म-व्यवहारशास्त्र, सामायिक यात्रामहोत्सव, सामायिक धार्मिक आचारविधि, सामायिक सण आणि सामायिक संस्कार एवंगुणविशिष्ट अशी जी महान् हिंदु जातीची संस्कृति त्या संस्कृतीचा वारसा त्याला मिळालेला असतो आणि या सर्वांच्यापेक्षा ज्यामध्ये त्याचे तत्त्वद्रष्टे मुनि, संत-महंत, गुरु आणि अवतारी पुरुष जन्माला आले आणि ज्यामध्ये त्याचीं पुण्यकारक अशीं यात्रास्थळें आहेत त्या सिंधुस्थानलाच तो आपली पुण्यभूमि मानतो. हीच ती हिंदुत्वाचीं आवश्यक लक्षणें."

हिंदुत्व हेंच राष्ट्रीयत्व कसें ठरतें यासंबंधी लिहितांना ते सांगतात, "राष्ट्र उभें राहण्याला कांही पायांची आवश्यकता असतेच असते आणि राष्ट्राच्या जीवनाचें खरें अस्तित्व जर कोठे प्रगट होत असेल तर तें त्या राष्ट्राच्या त्याच एका विशिष्ट लोकांच्याच नि जातींच्याच जीवनांत प्रगट होत असतें की, ज्या लोकांचे सारे हितसंबंध, भूतकाळचा सारा इतिहास आणि भविष्यकाळच्या साऱ्या आशाआकांक्षा त्या राष्ट्राशीं व त्या भूमीशींच अत्यंत एकरूपतेने निगडित झालेल्या असतात आणि जे खरोखर त्या राष्ट्रमंदिराचे पहिले आणि शेवटचे असे एकमेव आधारस्तंभ असतात."

रत्नागिरीच्या कारागृहांत दोन-अडीच वर्षें काढल्यानंतर सावरकरांना येरवड्यास नेण्यांत आलें. या सुमारास ठिकठिकाणच्या राजकीय परिषदांमध्ये सावरकरांच्या मुक्ततेची मागणी करण्यांत येत होती. म्हणून मुंबईचे गव्हर्नर सर जॉर्ज लॉइड यांनी येरवड्यास जाऊन सावरकरांशीं त्यांना कोणत्या अटींवर मुक्त करतां येईल याची चर्चा केली. पांच वर्षें राजकारणांत भाग घ्यावयाचा नाही व रत्नागिरी जिल्ह्याबाहेर जावयाचें नाही या दोन अटींवर सावरकरांची मुक्तता करण्यास सरकार तयार झालें. सावरकरांनी या अटींबद्दल आपली संमति कळविल्यानंतर त्यांची सुटका करण्यांत आली. त्यांनी १ मार्च १९११ रोजीं डोंगरीच्या कारागृहांत घरचे कपडे उतरवून कैद्याचे कपडे चढविले होते. ६ जानेवारी १९२४ रोजीं येरवड्याच्या कारागृहांत त्यांनी हा बंदीवेष

उतरवून घरचे कपडे अंगावर चढविले. चौदा वर्षांचा वनवास आटोपला होता. मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सुरू केलेल्या आत्मयज्ञांतील पहिल्या पर्वाची सांगता झाली होती.

सावरकरांना आणण्यासाठी डॉ. वि. म. भट येरवड्याला गेले. पुण्यांतील आपल्या चार-पांच तासांच्या मुक्कामांत सावरकरांनी कै. न. चिं. केळकर यांची गायआळींतील त्यांच्या निवासस्थानीं भेट घेतली. तेथून ते कै. शि. म. परांजपे यांना भेटण्यास गेले. दुपारीं तीनच्या गाडीने सावरकर मुंबईला रवाना झाले व तेथे एक-दोन दिवस राहून रत्नागिरीला पोचले.

त्यांच्या जीवनांतील एक कालखंड संपला होता. अंदमानांतील चिंतनाच्या आधारें सावरकरांनी आपल्या पुढील कार्याची दिशा निश्चित केली होती.

राजकारणांत भाग घ्यावयाची बंदी असल्यामुळे रत्नागिरीस जातांच सावरकरांनी समाजकारणाकडे आपले लक्ष केंद्रित केलें. जातिभेदांमुळे हिंदु समाज पोखरला गेला असून जन्मजात अस्पृश्यतेच्या कल्पनेपायी या समाजाचें एकसंघ स्वरूप पार लयाला गेल्याचें सावरकरांना आढळून आल्यामुळे त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध जोरदार आघाडी उघडून आपल्या समाजसुधारणेच्या कार्याचा श्रीगणेशा केला. सावरकरांच्या समाजसुधारणेचें वैशिष्ट्य हें होतें की, इतर सुधारकांप्रमाणे सावरकर या प्रश्नाकडे पाश्चात्यांच्या दृष्टिकोनांतून पाहत नव्हते. त्यांच्या समाजसुधारणेची प्रेरणा विशुद्ध आणि एकात्म राष्ट्रजीवनाच्या चिंतनातून जन्मास आली होती. आपल्या समाजांत अंधश्रद्धांनी थैमान घातलें आहे, रूढींच्या दडपणाखाली समाजांत विज्ञाननिष्ठा निर्माण होऊं शकत नाही व या कारणांमुळे हा समाज बलिष्ठ होत नाही याची सावरकरांच्या मनाला बोच होती. त्यामुळे हिंदु समाजांतील पोथीनिष्ठेबद्दल लिहितांना त्यांची लेखणी अक्षरशः आग ओकतांना दिसते. परंतु त्यामागे उगाच दूषणें देण्याची तिऱ्हाइताची अलिप्तता दिसत नाही. आपणहि याच समाजाचे घटक असल्यामुळे समाज सुधारण्याची, त्याला विज्ञाननिष्ठा देण्याची आपल्यावर जबाबदारी आहे या आपुलकीच्या भावनेंतून सावरकरांनी या प्रश्नाकडे पाहिलें आहे. त्या काळीं 'श्रद्धानंद' साप्ताहिकांत व 'किर्लोस्कर' मासिकांत त्यांचे जे लेख प्रसिद्ध झाले ते वाचले की, या समाजाच्या दौर्बल्यामुळे सावरकरांचें अंतःकरण कसें जळत होतें हें स्पष्ट होतें.

'जन्मजात जातिभेद मोडायचा म्हणजे काय करायचें?' या लेखांत ते म्हणतात, "हिंदुराष्ट्रास अत्यंत अपाकारक झालेल्या जन्मजात जातिभेदाचा उच्छेद करण्यासाठी आपणांस केवळ मानीव असलेल्या या पोथीजात उच्च-नीचतेला उचलून धरणाऱ्या आणि व्यक्तीच्या प्रगट गुणांचा विचार न करतां तिला कोणते तरी विशिष्ट अधिकार वा विशिष्ट हानि चिकटविणाऱ्या ज्या ज्या रूढि प्रचलित आहेत त्यांचें त्यांचें उच्चाटन आपणांस केलें पाहिजे."

जातिभेदामुळे हिंदु समाजाचे किती अतोनात नुकसान केलें याचें दुसऱ्या एका लेखांत विवेचन केल्यानंतर त्यांनी पोथीजात जातिभेद कशासाठी नाहीसे केले पाहिजेत हें सांगतांना असें म्हटलें आहे की, 'वेदोक्तबंदी, व्यवसायबंदी, स्पर्शबंदी, सिंधुबंदी, शुद्धिबंदी, रोटीबंदी आणि बेटीबंदी या पोथीजात जाति-भेदाच्या प्राणघातक विळख्यांना तोडून फोडून एकदा का आपल्या हिंदुराष्ट्राच्या संघटित सामर्थ्याचे हातपाय मोकळे झाले म्हणजे ज्या बाह्य आपत्तीने ज्या विदेशी लोकांनी आज आपणांस चीत केलें आहे, डांबून टाकलें आहे त्या संकटाशींहि उलट खाऊन पुन्हा एकदा टक्कर देण्यास आपलें राष्ट्र आज आहे त्याहून शतपटींनी अधिक शक्त झाल्यावांचून राहणार नाही हें नक्की."

सावरकर अशा रीतीने एकीकडे हिंदु समाजाच्या अंधश्रद्धेवर जोरदार कोरडे ओढत असतांनाच दुसरीकडे 'हिंदुपदपादशाही' हा ग्रंथ लिहून मराठ्यांच्या साम्राज्यसंस्थापनेच्या कार्याला गौरवांजलि वाहत होते. 'काळेपाणी' यासारखी कादंबरी असो किंवा 'संन्यस्तखड्ग', 'उःशाप' किंवा 'उत्तरक्रिया' यांसारखीं नाटकें असोत, सावरकरांच्या डोळ्यांपुढे एकच स्वप्न तरंगत होतें— स्वतंत्र, समर्थ, संपन्न हिंदुस्थानचें.

आणि म्हणूनच ते मोठ्या आवेशाने हिंदु समाजाला सांगत होते, "सोडून दे या स्पर्शबंदीच्या, सिंधुबंदीच्या, रोटीबंदीच्या, पोथीजात जातपातीं-च्या पांच हजार वर्षांपूर्वीच्या भाकड भावना! तोडून टाक त्या तुझ्या कर्तृत्वाच्या पायांत अडकलेल्या त्या शब्दनिष्ठ श्रुतिस्मृतिपुराणोक्त प्रवृत्तीच्या बेड्या! आणि जें हत्यार तुझ्यावर चढून आलेल्या आजच्या आपत्तींच्या उच्छेदाला आज समर्थ होईल – उपस तें हत्यार! मग तें त्या तुझ्या शास्त्रागारांत सापडो वा या नवीनांच्या शस्त्रागारांतून छिनतां येवो."

सावरकरांच्या लेखणींतून असे स्फुल्लिंग बाहेर पडत असतांना केवळ अशा लेखनावर किंवा व्याख्यानांवर त्यांच्यासारख्या कृतिवीराचें समाधान होण्यासारखें नव्हतें. म्हणून त्यांनी रत्नागिरीला पोचल्यानंतर पंधरा दिवसांच्या आंतच रत्नागिरी हिंदुसभेचीं सूत्रें स्वतःकडे घेऊन शुद्धि आणि संघटन या कार्याचा पाया घातला. ते स्वतः हरिजनांच्या वस्तींत जाऊन त्यांच्या मनांत परंपरागत रुजलेला हीनगंड दूर करण्याचा कळकळीचा प्रयत्न करीत असत. त्यांनी हरिजन मुलांसाठी शाळा चालविल्या व या शाळांमध्ये सवर्ण हिंदूंच्या मुलांनी आले पाहिजे असा आग्रह व्यक्त करूं लागले. प्रारंभीं त्यांच्या या अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याला सनातनी समाजाकडून कडवा विरोध होई. परंतु या विरोधामुळे ते आपल्या अंगीकृत कार्यापासून दूर झाले नाहीत. उलट सनातनी समाजाने कालबाह्य ठरलेल्या श्रुतिस्मृतिपुराणोक्त संस्कृतीचा त्याग करून नव्या विज्ञाननिष्ठ संस्कृतीचें स्वागत करावयाला सिद्ध झालें पाहिजे असें ते प्रतिपादन करूं लागले. ‘दोन शब्दांत दोन संस्कृति’ या आपल्या गाजलेल्या लेखांत सावरकर म्हणतात, “हिंदुराष्ट्रास या काळाच्या तडाख्यांतून वाचावयाचें असेल तर ज्या या श्रुतिस्मृतिपुराणोक्ताच्या बेडीने कर्तृत्वाचे हातपाय जखडून टाकले आहेत ते सोडले पाहिजे. आणि तें सुदैवाने अगदी आणि सर्वस्वीं आपल्या इच्छेवर अवलंबून आहे. कारण ती बेडी मानसिक आहे. युरोप चार शतकांपूर्वीपर्यंत धर्माच्या अपरिवर्तनीय सत्तेचा असाच दास झाला होता. पण त्याने बायबलला दूर सारून विज्ञानाची कास धरतांच, श्रुतिस्मृतिपुराणोक्ताची बेडी तोडून अद्ययावत् बनतांच, अपटुडेट बनतांच, युरोप गेल्या चारशे वर्षांत आमच्या पुढे चार हजार वर्षें निघून गेला. त्रिखंड विजयी झाला ! तसें आपल्या भारतीय राष्ट्रासहि होणें असेल तर ‘पुरातनी’ युगाचा ग्रंथ मिटून, ही प्राचीन श्रुतिस्मृतिपुराणादि शासनें गुंडाळून आणि केवळ ऐतिहासिक ग्रंथ म्हणून संग्रहालयांत सन्मानपूर्वक ठेवून विज्ञानयुगाचें पान उलटलें पाहिजे. त्या ग्रंथांचा ‘ काल काय झालें ’ इतकेंच सांगण्यापुरता अधिकार. आज काय योग्य ते सांगण्याचा अधिकार प्रत्यक्षनिष्ठ, प्रयोगक्षम विज्ञानाचा.”

या श्रुतिस्मृतिपुराणोक्त अंधश्रद्धेवर हल्ला चढवितांना गाय ही माता मानणाऱ्या सनातनी समाजाच्या समजुतीवर सावरकरांनी जे कोरडे ओढले आहेत ते वाचतांना चाबकाच्या फटकाऱ्यांचीच आठवण व्हावी. ‘शेण खाणें ही

शिवी आहे, संस्कार नव्हे ' असे रोखठोक शब्दांत सुनावून सावरकर पुढे म्हणतात की, गाय जर कोणाची खरोखरच महामाता असेल तर ती बैलाची होय, हिंदूंची नव्हे! ज्या हिंदुत्वास गायीच्या पायांवरच उभें राहवें लागतें ते गायीच्या पायासारखेच संकटाच्या पहिल्या झटक्यास मटकन् खाली बसलेच पाहिजे. देवाचे गुण भक्तांत उतरतात. गायीस देव मानतां मानतां, गायीची पूजा करतां करतां हिंदूंचें राष्ट्रच गाय होऊन गेलें. त्याने दातीं तृण धरलें. आता जर कोणाच्या पायावर आपलें हें हिंदुत्व उभारावयाचें असेल तर तें सिंहाच्या पायांवर उभारलें पाहिजे. मदोन्मत्त दिग्गजांची गंडस्थानें एका झेपेसरशीं फोडून फाडून टाकणारीं ककच तीक्ष्ण नखरें ज्याचीं आहेत तो नृसिंह आता पूजला पाहिजे. हिंदुत्वाचें ध्येय तें, खूण ती. गाईचा खूर नव्हे !

१९२४ च्या पावसाळ्यांत रत्नागिरीला प्लेग सुरू झाल्यामुळे कांही दिवस नाशिकला राहण्याची सावरकरांना परवानगी मिळाली. एकोणीस वर्षांच्या प्रदीर्घ वियोगानंतर ते आपल्या कर्मभूमीला परतत होते. सावरकरांच्या आगमनामुळे आपल्याला झालेला आनंद व्यक्त करण्यासाठी आणि त्यांच्या विलक्षण कष्टमय देशसेवेबद्दल आपली कृतज्ञ भावना व्यक्त करण्यासाठी नाशिक येथे सावरकरांना बारा हजार रुपयांची थैली देण्यांत आली. २४ ऑगस्ट १९२४ रोजीं झालेल्या या समारंभाचें अध्यक्षस्थान कै. बा. शि. मुंजे यांनी स्वीकारलें होतें. नाशिकला असतांना सावरकरांनी भगूर, त्र्यंबकेश्वर व नगर या गावांनाहि भेटी दिल्या. रत्नागिरीमधील प्लेगचा जोर ओसरल्यानंतर सावरकर नोव्हेंबरमध्ये रत्नागिरीला परतले. नाशिकहून रत्नागिरीला जात असतांना ते मुंबईला कांही दिवस थांबले होते. तेथे त्यांची व शौकतअलींची भेट झाली. हिंदुसंघटनाची सावरकरांची चळवळ मुसलमान समाजाला पसंत नसल्याचें शौकतअलींनी सांगतांच सावरकर म्हणाले, ' मुसलमानांनी खिलाफत चळवळ बंद करावी; मग हिंदु समाजाने काय करावें तें सांगायला यावें. '

मुस्लिम नेत्यांच्या खिलाफत चळवळीचा महात्मा गांधींनीहि पुरस्कार चालविला होता. अफगाणिस्तानच्या अमीराने भारतावर स्वारी करून यावें अशी इच्छा खिलाफत चळवळीचे पुरस्कर्ते व्यक्त करीत होते. या इच्छेला आपला पाठिंबा आहे हें कळविण्यासाठी गांधीजींनी असें लिहिलें की,

अफगाणिस्तानच्या अमीराने ब्रिटिश सरकारविरुद्ध युद्ध पुकारलें तर मी त्याला खचित साहाय्य करीन. गांधीजींच्या या मुस्लिमधार्जिण्या धोरणावर सावरकर प्रखर टीका करीत असत. ही खिलाफत नसून आफत आहे असें ते म्हणत. मुसलमानांचीं आर्जवें करीत गेल्यास तो समाज शेफारला जाऊन गैरवाजवी मागण्या मांडीत जाईल हा सावरकरांनी १९२७ मध्ये दिलेला प्रगट इशारा वीस वर्षांनंतर खरा ठरला ! हिंदु-मुसलमान ऐक्याप्रमाणेच गांधीजी राजकारणांत अहिंसेवर भर देत होते. वैयक्तिक जीवनाचें उदात्तीकरण करणारी अहिंसा राष्ट्रीय जीवनांत आत्मघातकी ठरते हें जनमनावर बिंबविण्यासाठीच सावरकरांनी 'संन्यस्त खड्ग' हें नाटक लिहिलें. या नाटकांतील सेनापति विक्रम शाक्त राष्ट्रावर आक्रमकांचे सेनासागर कोसळूं लागतांच बुद्धदेवास सांगतो, "तर मग तुम्ही न सांगतां, मीच अशा त्या दुबळ्या, जातिघातक, मनुष्यहितविरोधक संन्यासधर्माचा हा संन्यास केला पाहा ! हें कर्तव्याचें कृपाण उचललें पाहा. शाक्त राष्ट्रा, हे संत्रस्त मनुष्यमात्रहो, राष्ट्रधर्मास्तव, मनुष्यधर्मास्तव, भूतदयेस्तव अपरिहार्य साधन म्हणून हा संन्यासी हें शस्त्र उचलीत आहे. गेल्या चाळीस वर्षांतील शस्त्रसंन्यासाने मी जितक्या साधूंचें परित्राण आणि जिवांची दुःखापासून सुटका करूं शकलों नाही तितकें लोक-कल्याण या शस्त्रधारणाने मी येत्या चाळीस दिवसांत करूं शकेन. ज्या आत्यंतिक अहिंसेमुळे दुष्टांचें परित्राण आणि साधूंचा विनाश होतो ती अहिंसा धर्म नसून प्रत्यक्ष अधर्मच असल्यामुळे मी तिला सोडून जात आहे. भगवान् बुद्धदेवास नव्हे !"

१९२७ च्या मार्चमध्ये गांधीजी रत्नागिरीस आले असतांना त्यांची व सावरकरांची विविध विषयांवर चर्चा झाली. त्या दोघांची पहिली भेट लंडनमध्ये १९०९ मध्ये झाली होती. त्यानंतर अठरा वर्षांनी ते दोघे भेटत होते. अठरा वर्षांपूर्वी त्या दोघांत राजकीय कार्यपद्धतीविषयी जे मतभेद होते ते आता बरेच विस्तारले आहेत एवढेंच या चर्चेच्या वेळीं दिसून आलें. त्यानंतर या दोघांची पुन्हा कधीच भेट झाली नाही.

अस्पृश्यतानिवारणासाठी सावरकरांनी हरिजनांच्या मंदिरप्रवेशाची चळवळ हातीं घेतांच त्यांना जसा सनातनी समाजाकडून विरोध होत होता

तसाच विरोध शुद्धिकार्य हातीं घेतांच मुसलमान व ख्रिश्चन समाजाकडून होऊं लागला. शुद्धि आणि संघटना या आपल्या दुहेरी कार्यक्रमाच्या प्रचारासाठी सावरकरांनी रत्नागिरी येथे अखिल हिंदु गणेशोत्सव सुरू केला. अशा एका गणेशोत्सवांत त्यांनी भंगी तरुणाकडून वैदिक मंत्रांचें पठन करून घेतांच या घटनेबद्दल साऱ्या देशांत चर्चा होऊं लागली. रत्नागिरीचे विठ्ठल मंदिर हरिजनांना खुलें व्हावें म्हणून सावरकर सतत चार वर्षं प्रयत्न करीत होते. शेवटीं १९२९ च्या नोव्हेंबरमध्ये तें मंदिर हरिजनप्रवेशासाठी मोकळें होतांच सावरकरांनी या मंदिरप्रवेशाच्या निमित्ताने एक खास गीत लिहिलें. शिवू भंगी नांवाचा मुलगा त्या पदाचें एकेक चरण म्हणत मंदिराची एक एक पायरी चढत होता व त्याच्या भागे इतर लोक उभे होते. साराच प्रसंग भावना उचंबळून टाकणारा होता.

हें सुतक युगांचें सुटलें
विधिलिखित विटाळहि मिटले
जन्मांचें भांडण मिटलें
आम्ही शतकाचे दास आज सहकारी
आभार जाहले भारी

हें शेवटचें कडवें म्हणत शिवू मंदिराच्या सभामंडपांत येऊन पोचला तेव्हा तेथे जमलेल्या तीन हजार लोकांच्या डोळयांच्या कडा ओल्या झाल्या होत्या.

गणेशोत्सवामध्ये हिंदुसंघटन कार्याचा प्रचार करण्यासाठी सावरकरांनी अखिल हिंदु मेळ्याची स्थापना केली. या मेळ्यासाठी त्यांनी अनेक कवनें रचलीं. त्यांतील 'हिंदूंचें एकतागान' हें गीत तर सर्वत्र सामुदायिक रीतीने गायिलें जाऊं लागलें.

तुम्ही-आम्ही सकल हिंदु, बंधु-बंधू
तो महादेवजी पिता आपुला चला तया वंदू

असें त्या एकता-गीतांत आवाहन करण्यांत आलें होतें.

अस्पृश्यतानिवारणाचें कार्य स्त्रीसमाजांतहि दृढमूल व्हावें यासाठी हरिजन स्त्रियांसमवेत हळदीकुंकवाचे समारंभहि सावरकरांच्या प्रेरणेने सुरू

करण्यांत आले. त्या काळीं बॅंड फक्त मुसलमानांचेच असत. म्हणून सावरकरांनी हिंदु तरुणांना एकत्र आणून त्यांचा बॅंड सुरू केला.

हरिजनांच्या मंदिरप्रवेशाची चळवळ सुरू असतांनाच सर्व हिंदूंना मुक्तद्वार असलेलें मंदिर बांधण्याचा आपला मनोदय सावरकरांनी कै. भागोजी कीर यांच्यापाशीं व्यक्त करतांच त्या दानशूर गृहस्थाने गणपतीचें मंदिर बांधून दिलें. 'पतितपावन मंदिर' असें सावरकरांनी त्या मंदिराचें नामाभिधान केलें. २२ फेब्रुवारी १९३१ रोजीं या पतितपावन मंदिराचें उद्घाटन झालें त्या वेळीं सावरकरांनी प्रारंभिलेल्या हिंदुसंघटनेच्या चळवळीने रत्नागिरींत साकार रूप धारण केल्याची लोकांना प्रचीति आली.

या मंदिरांतील देवप्रतिष्ठेच्या वेळीं —

अनुताप परी जाळितसे या पापा
दे तरी अजि उःशापा
निर्दाळुनि त्या अजि भेद-दैत्याशीं
ये हिंदु जाति तुजपाशीं
ते अवयव विच्छिन्न सांधिले आजी
तूं फुंकि जीव त्यामाजीं

अशी प्रार्थना करण्यांत आली होती.

अस्पृश्यतानिवारणाच्या कार्याला चालना मिळावी म्हणून मंदिरप्रवेशा-बरोबरच सावरकरांनी सहभोजनाचा कार्यक्रम हातीं घेतला. १९३० च्या डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यांत सहभोजनाचा जो भव्य सोहळा झाला त्याला उपस्थित असलेल्यांनी पुढीलप्रमाणे शपथ घेतली — " जातींच्या श्रेष्ठकनिष्ठतेवर माझा विश्वास नाही. आंतरजातीय विवाहाचा मी पुरस्कार करीन. जन्मावर वा व्यवसायावर आधारलेला जातिभेद मी मानणार नाही. मी यापुढे स्वतःला ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य असें न मानतां केवळ हिंदु असाच मी माझा उल्लेख करीन. त्याचप्रमाणे अमकेंच खाईन व अमक्याच्या हातचेंच खाईन असा आग्रह धरणें चुकीचें आहे हें मला पटल्यामुळे रुचतील व पचतील असे स्वच्छ पदार्थ कोठेहि खाण्यास मी विरोध करणार नाही. कारण पोट हें धर्माचें स्थान नसून धर्म असतो तो आपल्या हृदयांत, याची मला जाणीव झालेली आहे."

श्रीपतितपावन मंदिराच्या उद्घाटनाच्या निमित्ताने सामाजिक समता परिषद बोलावण्यांत आली. डिप्रेस्ड क्लास मिशनचे कर्मवीर शिंदे यांनी या परिषदेच्या बाबतींत बराच पुढाकार घेतला. परिषदेचें अध्यक्षस्थान सावरकरांनी भूषविलें होतें. सावरकरांनी अस्पृश्यतानिवारणासाठी केलेल्या कार्याची कर्मवीर शिंदे यांनी आपल्या भाषणांत मनमोकळी प्रशंसा केली. ते म्हणाले, "साऱ्या भारताने रत्नागिरीचें उदाहरण आपल्या डोळ्यांसमोर ठेवलें तर अल्पावधींतच या भूमीवर अस्पृश्यतेची साधी खूणहि राहणार नाही." नंतर एप्रिलमध्ये जी सोमवंशीय महार परिषद भरविण्यांत आली तींत अध्यक्षपदावरून बोलतांना सावरकरांनी हरिजनांमधील जाति-उपजातींत जी श्रेष्ठता-कनिष्ठता पाळली जाते ती नाहीशी करण्यासाठी महार समाजाने पुढे यावें असें आवाहन केलें.

१९३१ च्या नोव्हेंबरमध्ये अखिल भारतीय गुरखा लीगचे अध्यक्ष ठाकूर चंदनसिंग नेपाळच्या राजघराण्यांतील हेमचंद्र समशेरजंग यांच्यासमवेत रत्नागिरीस गेले होते. भारताच्या उत्तर सीमेवरचें नेपाळ हें एकमेव स्वतंत्र हिंदु राज्य असल्यामुळे भारताने या राज्याबरोबरचे आपले संबंध दृढ करून स्वातंत्र्यलढ्यांत सहभागी होण्याचें नेपाळ-नरेशांना आवाहन करावें असें लंडनमध्ये असल्यापासून सावरकरांना वाटत होतें. त्यामुळे चंदनसिंगांच्या व हेमचंद्र समशेरजंगांच्या रत्नागिरी-भेटीची संधि साधून सावरकरांनी त्यांच्या स्वागतासाठी खास समारंभ आयोजित केला होता. या वेळीं सावरकर, हेमचंद्र समशेरजंग व एक भंगी नागरिक अशा तिघांनी खांद्याला खांदा लावून पतित पावनाच्या चरणीं पुष्पांजलि वाहिली आणि अखिल हिंदु एकतेचा त्रिवार जयजयकार केला. या समारंभानिमित्त रचलेल्या गीतांत सावरकरांनी —

ऐक भविष्याला। भव्य भीषणाला
विगता। भयहता वर्तमानाला
हिंदु जाति ही ज्यासाठी चालली रणाला
होऊनिया मुक्त स्वता। करील मुक्त ती जगता
ममतेच्या, समतेच्या। सुजनरक्षणाला

असा निर्धार व्यक्त केला होता.

गुरखा नेत्यांचें सावरकरांनी केलेलें स्वागत मुंबई सरकारला रुचलें नाही. सरकारकडून सावरकरांच्या भाषणाचा वृत्तान्त मागविण्यांत आला. इतकेंच नव्हे तर अशा स्वरूपाच्या राजकीय कार्यांत पुन्हा भाग घेतल्यास आपल्याला उरलेली सदतीस वर्षांची जन्मठेपेची शिक्षा भोगावी लागेल असाहि सरकार-तर्फे इशारा देण्यांत आला.

रत्नागिरीस आल्यापासून सावरकरांनी भाषाशुद्धीचें आंदोलनहि हातीं घेतलें. मराठी भाषेंत घुसलेल्या इंग्रजी व उर्दू शब्दांचें उच्चाटन करून त्या जागीं अर्थसुलभ मराठी प्रतिशब्द वापरण्याचा त्यांनी पायंडा पाडला. १९२५ च्या एप्रिल व मे महिन्यांत 'केसरी'मध्ये लेख लिहून त्यांनी भाषाशुद्धीबाबतची आपली भूमिका विशद केली. सावरकर-प्रणीत भाषाशुद्धीमुळे मराठी भाषेचें आजचें मुलायम स्वरूप नष्ट होईल असा कांही साहित्यिकांनी गिल्ला करतांच त्यांच्या सर्व आक्षेपांना सडेतोड उत्तर देण्यासाठी केसरीमध्ये सप्टेंबरपासून नोव्हेंबरपर्यंत आणखी त्यांनी एक लेखमाला लिहिली. भाषाशुद्धीप्रमाणेच लिपि-शुद्धीच्या चळवळीलाहि त्यांनी चालना दिली. नागरी लिपि मुद्रणसुलभ व्हावी यासाठी त्यांनी अ आ अि अी अशी नवी बाराखडी रूढ केली. या काळांत मुसलमानांचीं आर्जवें करण्यासाठी राष्ट्रभाषेसाठी उर्दूमिश्रित हिंदीची म्हणजेच तथाकथित हिंदुस्थानीची टूम पुढे येऊं पाहत होती. त्याचप्रमाणे ही हिंदुस्थानी भाषा रोमन लिपींत लिहावी असेंहि सुचविण्यांत येऊं लागलें होतें. संस्कृत-सारख्या समृद्ध भाषेचा वारसा सांगणाऱ्या भारतीय भाषांनी उर्दूचा आसरा घ्यावा किंवा उच्चारानुसारी नागरी लिपीचा त्याग करून रोमन लिपि स्वीकारावी या आत्मवंचक धोरणाविरुद्ध सावरकरांनी आपला खणखणीत आवाज उठवून संस्कृतनिष्ठ हिंदी हीच आमची राष्ट्रभाषा व देवनागरी हीच आमची राष्ट्रलिपि या सूत्राची घोषणा केली.

सावरकर रत्नागिरीस राहत असतांना त्यांच्या जुन्या स्नेह्यांपैकी अनेकांचें निधन झालें. व्ही. व्ही. एस्. अय्यर, श्यामजी कृष्णवर्मा, मॅडम कामा, स्वातंत्र्यशाहीर गोविंद, शि. म. परांजपे प्रभृतींच्या निधनामुळे सावरकरांचें मन दुःखी-कष्टी झालें. त्यांतच त्यांचे श्वशूर श्री. भाऊराव चिपळूणकर व मेहुणे श्री. भास्करराव काळे यांचेंहि देहावसान झालें. २३ मार्च १९३१ रोजीं क्रांतिवीर

भगतसिंगांना फाशीं देण्यांत आलें. या क्रांतिसिंहाच्या आत्मयज्ञामुळे सावरकरांच्या मनांत निर्माण झालेल्या मनःक्षोभाचें दर्शन त्या दिवशीं रचलेल्या कवितेंत पाहवयास सापडतें –

हा भगतसिंग, हाय हा
जाशि आजी फाशिं आम्हांस्तवचि वीरा, हाय हा !
साक्ष ठेवुनि शपथ घेतों आम्ही उरलों ते पहा
शस्त्रसंगर चंड हा
झुंजवुनि कीं जिंकुची स्वातंत्र्यविजयासी पहा
हा भगतसिंग, हाय हा !

१९०६ सालीं सावरकर इंग्लंडला जावयास निघतांना विस्कळित झालेल्या त्यांच्या कौटुंबिक जीवनाचा धागा १९२४ मध्ये पुन्हा त्यांच्या हातीं गवसला। त्यांना तीन अपत्यें झालीं. प्रभात व शालिनी या मुली व विश्वास हा मुलगा। त्यांतील शालिनी दीड-दोन वर्षांची असतांनाच निवर्तली.

सावरकरांचे रत्नागिरी येथील एक सहकारी श्री. वामनराव चव्हाण यांनी १९३४ च्या मे महिन्यांत मुंबईस जाऊन एका इंग्रजी लष्करी अधिकाऱ्यावर गोळ्या झाडल्या. या प्रकरणांत सावरकरांचा हात असावा या शंकेमुळे सरकारने सावरकरांना दोन आठवडे कारागृहांत नेऊन ठेवले होते. सावरकरांची रत्नागिरींतील स्थानबद्धतेची मुदत प्रारंभीं पांच वर्षांची होती. त्यामुळे १९२९ मध्ये त्यांच्यावरील सर्व निर्बंध दूर व्हावयास हवे होते. परंतु सरकारने हें ना तें कारण पुढे करून १९३७ पर्यंत मुदत वाढविली होती. आपल्यावरील सर्व निर्बंध रद्द करण्यांत आले पाहिजेत, अशी सावरकर सतत मागणी करीत होते. त्याचप्रमाणे मुंबई विधिमंडळांतहि सावरकरांच्या सुटकेसंबंधी प्रश्न विचारले जात. १९३५ च्या जुलैमध्ये मुंबई येथे डॉ. एम्. बी. वेलकर यांच्या अध्यक्षतेखाली सावरकर मुक्तता समिति स्थापन करण्यांत आली.

१९३५ च्या कायद्यानुसार सर्व प्रांतांत निवडणुका होऊन कॉंग्रेसला घवघवीत बहुमत मिळालें. परंतु मंत्रिमंडळें बनवावयाचीं किंवा नाही यासंबंधी कॉंग्रेस-नेत्यांचा निर्णय होत नव्हता. कॉंग्रेसला सत्तास्वीकार करणें भाग पडावें

या हेतूने सरकारने हंगामी मंत्रिमंडळें बनविलीं. मुंबई प्रांतांत खानबहादूर धनजीशहा कूपर यांच्या नेतृत्वाखाली जें हंगामी मंत्रिमंडळ बनविण्यांत आलें, त्यांत जमनादास मेहता यांचा समावेश करण्यांत आला होता. श्री. जमनादास मेहता यांच्या प्रयत्नामुळे १० मे १९३७ रोजीं सावरकरांवरील सर्व निर्बंध बिनशर्त मागे घेण्यांत आले. सत्तावीस वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर ते पुन्हा राजकारणांत भाग घेऊं शकत होते.

रत्नागिरींतील सहकाऱ्यांचा निरोप घेऊन सावरकर कोल्हापूरला आले. तेथे त्यांचा ' हंस पिक्चर्स 'मध्ये मुक्काम होता. या वास्तव्यांत त्यांनी चित्रपट-सृष्टींत वापरण्यांत येणाऱ्या इंग्रजी शब्दाच्या जागीं सुटसुटीत व अर्थवाही मराठी प्रतिशब्द सुचविले. कोल्हापुरानंतर ते पुण्यास आले तेव्हा त्यांचें वास्तव्य बालमोहन नाटक मंडळीच्या बिऱ्हाडीं होतें. पुण्यांतील वास्तव्यांत सावरकरांनी ज्ञानप्रकाशचे संपादक कै. काकासाहेब लिमये व आचार्य प्र. के. अत्रे यांच्या साहाय्याने मराठी भाषाशुद्धिकरण मंडळ व हिंदु समाजसेवा संघ या दोन संस्थाचीं स्थापना केली. पुण्याहून ते मुंबईला गेले व तेथेंच आपलें कायमचें वास्तव्य करण्याचें त्यांनी ठरविलें. प्रारंभीं दादरमधील 'भास्कर-भवन' येथे ते राहूं लागले. बाबाराव व डॉ. नारायणराव यांचे दादरमध्ये वेगळें बिऱ्हाड होतें. कालांतराने सावरकरांनी शिवाजी उद्यानालगतच्या भागांत 'सावरकर-सदन' ही आपल्या मालकीची वास्तु बांधली.

सावरकर मुंबईस राहवयास गेल्यानंतर त्यांचें पुण्यास वारंवार येणें-जाणें होत असे. त्या वेळीं हिंदु तरुणांनी सैनिकी शिक्षण घेतलें पाहिजे असें त्यांचें मुख्य प्रतिपादन असे. त्यानुसार शस्त्रनिर्बंध रद्द करण्यासाठी पुण्यांतील विद्यार्थ्यांनी जी मिरवणूक काढली तिच्यासाठी सावरकरांनी शस्त्रगीत रचलें होतें –

**शस्त्रबंधनें करा समस्त नष्ट या क्षणा**
**शस्त्रसिद्ध व्हा झणीं समर्थ आर्त रक्षणा**
**व्हावया स्वदेश सर्वसिद्ध आत्मशासना**
**नव्या पिढीस द्या त्वरें समग्र युद्धशिक्षणा**

अशी मागणी या गीतांत करण्यांत आली होती.

१ ऑगस्ट १९३७ रोजीं टिळक पुण्यतिथीनिमित्त पुण्यांत भरलेल्या प्रगट सभेंत सावरकरांनी आपण लो. टिळक यांनी स्थापन केलेल्या लोकशाही स्वराज्य पक्षांत प्रवेश करीत असल्याचें जाहीर केलें. परंतु हिंदुसंघटनाची ध्वजा देशभर उभारण्याच्या दृष्टीने त्यांनी हिंदुमहासभेचीं सूत्रें स्वीकारावींत असें सुचविण्यांत आलें आणि त्यानुसार त्या वर्षीच्या डिसेंबरमध्ये अहमदाबाद येथे भरावयाच्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदीं सावरकरांची निवड झाली. त्या वेळीं त्यांच्या डोळ्यांसमोर एकच स्वप्न तरळत होतें, जिवाला एकच ध्यास लागला होता –

अखिल हिंदु विजयध्वज हा उभवूं या पुन्हा

## ९०

# राष्ट्रवादाचें पुरुषसूक्त

हिंदुमहासभेचें अध्यक्षपद स्वीकारल्यापासून सावरकरांनी हिंदुराष्ट्रवादाचा हिरीरीने प्रचार करावयास प्रारंभ केला. आतापावेतों हिंदुमहासभा ही हिंदु समाजाच्या अडीअडचणींना वाचा फोडणारी सामाजिक आणि सांस्कृतिक संस्था होती. सावरकरांनी तिचे राजकीय पक्षांत रूपांतर केलें. या देशांत हिंदु ही एक जमात नसून ते एक राष्ट्र आहे आणि राष्ट्र म्हणून हिंदु समाजास या भूमींत सन्मानाने जगावयाचें असेल तर विशाल हिंदुत्वाच्या आणि विज्ञाननिष्ठ दृष्टिकोनाच्या आधारावरच या समाजाला उभे राहवयास हवें हा सावरकरांच्या हिंदुराष्ट्रवादाचा गाभा आहे. त्यासाठीच त्यांनी हिंदुमहासभेच्या व्यासपीठावरून 'राजकारणाचें हिंदूकरण आणि हिंदूंचें सैनिकीकरण' या सूत्राचा पुकारा केला.

अहमदाबाद येथे भरलेल्या हिंमहासभेच्या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून भाषण करतांना सावरकरांनी हिंदुराष्ट्रवादाच्या मूलभूमिकेचें मार्मिक आणि तर्कशुद्ध विवेचन केलें. भौगोलिक एकता हाच केवळ राष्ट्रवादाचा पाया असतो ही समजूत कशी चुकीची आहे यासंबंधी बोलतांना ते म्हणाले, "कोणताहि देश किंवा भौगोलिक परिमाण हे कांही स्वयमेव राष्ट्र बनूं शकत नाही. आपला देश हा आपल्या जातीचें, आपल्या लोकांचें, प्रियतम नि जवळच्या अशा आप्तस्वकीयांचें निवासस्थान असतो म्हणूनच तो आपल्याला प्रिय असतो आणि त्याच दृष्टीने केवळ अलंकारिक

भाषेंत त्याचा आपण ‘ आपलें राष्ट्रीय अस्तित्व ’ या शब्दांनी निर्देश करीत असतों. हिंदुस्थान हे हिंदु जातीचे आरंभापासून आजपर्यंतचें निवासस्थान आहे. ती आमच्या धर्मप्रवर्तक ऋषिमुनींची नि वीरपुरुषांची, देवांची नि संतमहंतांची जन्मभूमि आहे. याच कारणाने ते आम्हांस प्रिय आहे. नाही तर केवळ भूमीस भूमि एवढ्यापुरताच विचार करावयाचा तर पृथ्वीच्या पाठीवर सोन्यारुप्याने इतकेच संपन्न असलेले पुष्कळ देश असतील. म्हणून निव्वळ भूगोलावरील हिंदुस्थान नांवाच्या एका मातीच्या तुकड्याचें स्वातंत्र्य हा कांही स्वराज्याचा खरा अर्थ नव्हे. हिंदूंना त्यांचें हिंदुत्व – त्यांची धार्मिक, वांशिक नि सांस्कृतिक एकात्मता – अबाधित राहण्याची शाश्वति जर त्यांत असेल तर तेंच हिंदुस्थानचें स्वातंत्र्य काय तें मोलाचें वाटूं लागेल. ”

कॉंग्रेसला प्रारंभापासूनच हिंदु या शब्दाचें वावडें होतें. ज्या चळवळींत वा कार्यात मुसलमान समाज सहभागी होत नाही ती चळवळ वा तें कार्य राष्ट्रीय होऊंच शकत नाही या भ्रांत समजुतीपायी मुसलमानांना आपल्या चळवळीकडे आकृष्ट करण्यासाठी त्यांचा अनुनय करण्याचें धोरण कॉंग्रेसने अंगीकारलें होतें. अर्थात् यामुळे घडत होतें तें नेमकें उलट. मुसलमान समाज जास्तींत जास्त सवलती मिळवून घेण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय चळवळीपासून फटकूनच वागूं लागला. परंतु तरीहि कॉंग्रेसचे मुस्लिम-अनुनयाचें धोरण कायमच होतें. या धोरणापायीच मुसलमानांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य करण्यांत आली होती. मुस्लिम जात्यंधतेचा विषवृक्ष पोसला गेला तो याच स्वतंत्र मतदारसंघांमधून. याउलट मुसलमान समाज आपलें स्वतंत्र अस्तित्व न मानता राष्ट्रीय चळवळींत सहभागी होत असेल तर त्या समाजाचें स्वागत करावयास सावरकरहि तयार होते. परंतु त्यासाठी त्या समाजाला गैरवाजवी सवलती देऊन दिखाऊ ऐक्याचें नाटक करावयास त्यांचा विरोध होता. अहमदाबादच्या अध्यक्षीय भाषणांत याबाबतची आपली भूमिका त्यांनी पुढील शब्दांत विशद केली आहे –

‚ संयुक्त हिंदी राज्याचें स्वप्न जर पहिल्याने कोणाला पडलें असेल तर तें ‚हिंदूंनाच होय. पण तें हिंदी राज्य मात्र निर्भेळ हिंदीच असूं द्या. कोणतीहि जाति किंवा पंथ, वंश किंवा धर्म विचारांत न घेतां ‘ एक मनुष्य, एक मत ’ असा सर्वसामान्य नियम होऊं द्या. अशा स्वरूपाचें हिंदी राज्य जर दृष्टीपुढे

घरावयाचें असेल तर हिंदुसंघटनवादी स्वतः हिंदुसंघटनाच्या हितार्थ त्या राज्याला अंतःकरणपूर्वक पहिल्याने आपली निष्ठा अर्पण करतील."

'मागे लागून ऐक्य मिळविण्याचा प्रयत्न करणें म्हणजे ते गमावणेंच होय हें काँग्रेसच्या हिंदु-मुसलमान ऐक्याच्या प्रयोगांत हिंदूंना भरपूर मोल देऊन पटलें आहे' हें पुराव्यानिशीं सिद्ध केल्यानंतर टिकाऊ हिंदु-मुसलमान ऐक्यासाठी हिंदूंनी कोणतें धोरण स्वीकारावें यासाठी सावरकरांनी पुढील रोख-ठोक नि व्यवहार्य सूत्र सुचविलें – "याल तर तुमच्यासह, न याल तर तुमच्या-वांचून, विरोधाल तर तुमच्या विरुद्धहि, हिंदुराष्ट्र आपलें भवितव्य बनेल तसें घडवील." हें सूत्र जर हिंदुसमाजाने या देशांत राहणाऱ्या मुसलमानांच्या बाबतींत अवलंबलें तर हिंदूंवर उपकार करण्याकरिता म्हणून नव्हे, तर स्वतःच्या उपकाराकरिता मुसलमान समाज स्वातंत्र्याच्या लढ्यांत हिंदूंच्या बाजूने उभा ठाकेल असा त्यांचा विश्वास होता.

अहमदाबादचे अधिवेशन आटोपल्यानंतर हिंदुराष्ट्रवादाच्या प्रचारार्थ सावरकरांनी साऱ्या देशभर झंझावाती दौरे काढले. त्यांचें वक्तृत्व इतकें प्रभावी होतें की, भाषण सुरू झाल्यानंतर अल्पावधींतच तें श्रोत्यांच्या मनाची विलक्षण पकड घेई. अग्नि-फुलांची उधळण करणारें त्यांचें तेजाळ वक्तृत्व ऐकतांना तृणांकुरांच्या राशीमागून राशी पेट घेत चालल्या आहेत असा भास होई. मधूनच एखादा नर्मविनोद ऐकावयास मिळे; पण तो क्षणभरच. पुन्हा विजेच्या वेगाने त्यांच्या वक्तृत्वाचा ओघ निनादत राही. आत्मविश्वासाने नटलेल्या या वक्तृत्वाला क्वचित् कारुण्याची गर्द निळी छटा लाभे तेव्हा श्रोत्यांचीं अंतकरणें अक्षरशः हेलावून जात. एकदा हिंदुराष्ट्राच्या उज्ज्वल भवितव्याचें स्फूर्तिदायक चित्र रेखाटत असतांना अचानक सावरकरांचा स्वर कातर झाला आणि ते म्हणाले, "वटवृक्षाचें बीज मोहरीहूनहि लहान असतें; पण त्या बीजांत जी स्फूर्ति असते, जी वल्गना असते ती वाढतां वाढतां तिचा प्रचंड वटवृक्ष बनून त्याखाली गाईचीं खिल्लारें विसावा घेतात. उन्हाने श्रांत झालेल्यांना वटवृक्ष सावली देतो.

मलाहि एक वल्गना करूं द्या !
माझें गाणें मला गाऊं द्या !

या जगांत आपणांला जर हिंदुत्वाचें मानाचें राष्ट्र म्हणून जगावयाचें असेल तर, तसा आपला अधिकार आहे आणि तें राष्ट्र हिंदुध्वजाखालीच स्थापन झालें पाहिजे. या नाही तरी पुढल्या पिढींत ही वल्गना खरी ठरेल.

माझी ही वल्गना खोटी ठरली, तर वेडा ठरेन मी.

माझी ही वल्गना खरी ठरली तर मी प्रॉफेट ठरेन.

माझा हा वारसा मी तुम्हांला देत आहें!"

देशहिताकरिता जसा अनेक गोष्टींचा त्याग करावा लागतो तसाच लोकप्रियतेचा त्याग करण्याचीहि खऱ्या देशसेवकाच्या मनाची तयारी असली पाहिजे याची सावरकरांना पक्की जाणीव होती. नव्हे, ज्या समाजासाठी त्यांनी आपल्या तेजस्वी जीवनाचा क्षण अन् क्षण अग्निकुंडांत समिधेमागून समिध टाकावी त्या धीरगंभीर वृत्तीने व्यतीत केला त्या समाजाकडून मानसन्माना ऐवजी उपेक्षेचें हलाहल मिळाल्यानंतरहि सावरकरांची आपल्या कार्यावरील निष्ठा शेवटपर्यंत अभंग राहिली. आपलें हें जीवनविषयक तत्त्वज्ञान त्यांनी- "वरं जनहितं ध्येयं, केवला न जनस्तुतिः" या सूत्रांत ग्रथित केलें आहे.

हिंदुसभेचें ध्येयधोरण सांगण्यासाठीहि त्यांनी असेंच एक सूत्रबद्ध अनुष्टुप लिहिलें –

राष्ट्रस्वतंत्रता ध्येयं, यथा साध्यं च साधनम्<br>
अभ्युत्थानाय हिंदूनां, इयं पक्षः प्रवर्तितः

हिंदुसभेच्या प्रचारकार्याची धामधूम सुरू असतांनाच १५ एप्रिल १९३८ रोजीं मुंबईस भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदावर सावरकरांची निवड झाली. या भाषणांत त्यांनी मराठींतील क्रियापद-दारिद्र्यासंबंधी आपले विचार मांडले. ते म्हणाले की, संमति देणें, प्रचार करणें, निषेध करणें, आनंद होणें, दुःख होणें या दुशब्दी क्रियापदांमुळे त्याच त्या देणें, करणें, होणें इत्यादि शब्दांची कंटाळवाणी पुनरुक्ति करावी लागते. इतकेंच नव्हे तर प्रतिकार करणें, स्वीकार करणें अशा क्रियापदांच्या बाबतींत तर एकाच धातूची द्विरुक्ति होते. म्हणून प्रतिकारणें, स्वीकारणें अशी एकेरी स्वतंत्र क्रियापदें वापरण्याची पद्धत रूढ व्हावी. यासंबंधांत आपण इंग्रजी

भाषेचें अनुकरण करावें असें सुचवितांना ते म्हणाले की, जें जें चांगलें तें तें परकीय असलें तरी ग्राह्यच होय असें आपण धोरण बाळगलें पाहिजे.

त्या काळीं मराठी वाङ्मयांत नवमतवादाची व पुरोगामी साहित्याची लाट आली होती. तिचा परामर्श घेतांना सावरकर म्हणाले, “ कोणतीहि गोष्ट केवळ नवी आहे म्हणूनच ग्राह्य वा त्याज्य ठरत नाही. तसेंच कोणतेंहि वाङ्मय नुसतें पुरोगामी आहे म्हणून कांही सत्य वा तथ्य ठरेलच असें गृहीत धरतां येत नाही. आईच्यापुढे दुड दुड धांवत जाणारें पुरोगामी मूल खड्ड्यांत पडण्याचाहि संभव असतो. लक्ष्याच्यापुढे निघून जाणारी गोळी पुरोगामी असली तरी चुकलेली ठरते. वास्तव वाङ्मयाचें जें साध्य तें सत्य वा तथ्य. अर्थात् अनेक वेळां नवीं मतें हीं उपद्व्याप न ठरतां जुन्या अपायकारक अंधारांत घुसलेलीं प्रकाशाचीं आणि आरोग्याचीं किरणेंहि ठरलेलीं आहेत.”

भाषाशुद्धि आणि लिपिशुद्धि यांचा पुरस्कार करतांना, भारतीय भाषांनी रोमन लिपि स्वीकारावी अशी सूचना करणाऱ्यांच्या परप्रत्ययी बुद्धीची कीव करून सावरकरांनी उच्चारानुसारी देवनागरी लिपीचा यथायोग्य गौरव केला. ते म्हणाले की, आजहि जगताला देण्यासारख्या ज्या आदर्श वस्तु आम्हांपाशीं आहेत त्यांत जसें योगशास्त्र तशीच ही नागरी.

मातृभूमि परतंत्र असतांना स्वातंत्र्यसंपादन हें साहित्यनिर्मितीपेक्षा किती तरी महत्वाचें कार्य आहे हे सांगतांना सावरकर म्हणाले, “ साहित्यासाठी सुद्धा आज साहित्याच्या पोथ्या गुंडाळून सैन्याच्या शिबिराकडे वळलें पाहिजे. कारण जें राष्ट्र खुरटें, दुबळें त्याचे साहित्यिकहि खुरटे नि दुबळेच असणार. ज्या दुबळ्या राष्ट्राला परक्यांची प्रबळ दारू आग लावते त्याच्या साहित्यालाहि कशी आग लागते तें तक्षशिलेला विचारा, नालंदेला विचारा.”

शस्त्रेण रक्षिते राष्ट्रे शास्त्रचिंता प्रवर्तते

या इतिहासाच्या दाखल्याची आठवण करून देऊन सावरकरांनी साहित्यिकांना प्राप्त परिस्थितीत ‘ लेखण्या मोडा, बंदुका उचला ’ असा आदेश दिला आपल्या भाषणाच्या अखेरीस ते म्हणाले, “ पुढील दहा वर्षांत सुनीतें रचणारा एकहि तरुण न निघाला तरी चालेल; प्रत्यहीं साहित्यसंमेलनें न झालीं तरी चालेल. पण दहा-दहा हजार तरुण सैनिकांच्या वीरचमू आपल्या खांद्यावर नव्यांतील नव्या रायफली टाकून, राष्ट्राच्या मार्गामार्गांतून, शिबिराशिबिरांतून

टपटप करीत संचलन करतांना दिसल्या पाहिजेत. ग्रंथालयांइतकी तरी, बौद्धिक कॉलेजांइतकी तरी, नगरानगरांतून सैनिकी कॉलेजें गजबजलेलीं आढळलीं पाहिजेत. मग मधून मधून त्यांनी एखादी कादंबरी वा प्रेमकथा वाचली वा सुनीत लिहिलें तरी चालेल. नेपोलियनहि रणांगणावर करमणूक म्हणून शीळ वाजवी. दिल्लीच्या बादशहाची दाढी जाळून आल्यावर पहिले बाजीरावहि मस्तानीच्या अंतःपुरांत एखादें पान खातांना आढळत. पण जन्मभर नुसतीं झाडांचीं पानेंच चघळणाऱ्या आणि तमाशांतील तबलेच झडत राहिलेल्या दुसऱ्या बाजीरावाचें एक ब्रह्मावर्तच या राष्ट्राने बनावें हें मला पाहवत नाही. ''

१९३८ डिसेंबरमध्ये नागपूर येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून बोलतांना सावरकरांनी आपलें परराष्ट्रीय धोरण कसें असावें याचा ऊहापोह केला. स्वराष्ट्रहित हीच कोणत्याहि देशाच्या परराष्ट्रीय धोरणाची कसोटी असते हें अनेक उदाहरण देऊन विशद केल्यानंतर ते म्हणाले, '' आपण हें लक्षांत ठेवलें पाहिजे की, आंतरराष्ट्रीय व्यवहारांत नीति म्हणून कांही आता उरलेली नाही. व्यक्तिव्यक्तींचे व्यवहार नीतीच्या तत्त्वावर कितीहि चालत आले तरी राष्ट्राराष्ट्राचे कारभार नीतिनियमानुसार कधीहि चाललेले नाही. राष्ट्र म्हणजे समूह. त्यांच्यापुढे एकच ध्येय असतें आणि तें म्हणजे स्वसंरक्षण व स्वहितवर्धन. सत्य नि अहिंसा हीं तत्त्वें कानाला कितीहि गोड लागोत, राष्ट्राचें धोरण ठरवितांना त्यांचा काडीमात्र उपयोग होत नाही. तसा उपयोग झाल्याचा एकाहि राष्ट्राचा दाखला नाही. ''

याच सुमारास हैदराबाद संस्थानांतील निजामी राजवटीने हिंदुविरोधी दडपशाहीचें थैमान घातलें होतें. निजामाच्या या मुजोर धोरणाविरुद्ध सावरकरांनी निशस्त्र-प्रतिकाराचें आंदोलन हातीं घेतलें. देशाच्या सर्व भागांतून जवळ जवळ पंधरा हजार कार्यकर्त्यांनी हैदराबादला जाऊन हिंदूंचा धार्मिक स्वातंत्र्याचा अधिकार बजावण्यासाठी सत्याग्रह केला. शेवटीं विधिमंडळांत हिंदूंना निम्म्या जागा देण्याचें निजामाने आश्वासन दिल्यानंतर हें आंदोलन मागे घेण्यांत आलें.

१९३९ च्या प्रारंभीं दुसऱ्या महायुद्धाचा भडका उडतांच, सावरकरांनी या संधीचा हिंदु तरुणांनी सैनिकी शिक्षण मिळविण्यासाठी फायदा करून

घ्यावा असें आग्रहानें प्रतिपादन केलें. त्यांच्या प्रेरणेने ठिकठिकाणीं सैनिकीकरण-मंडळें उघडण्यांत आलीं. राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा अखेर सैनिकी बळावरच लढावा लागतो हें सावरकरांचें सूत्र नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी आझाद हिंद सेना उभारून नंतर सिद्ध केलें. कॉंग्रेसजनांची टीका सहन करूनहि सैनिकीकरणाचा आग्रह धरणाऱ्या सावरकरांचें धोरणच कसें बरोबर होतें याची पुन्हा प्रचीति आली. सिंगापूर येथील 'आझाद हिंद' नभोवाणीवरून २५ जून १९४४ रोजीं केलेल्या भाषणांत नेताजी म्हणाले, "कॉंग्रेसमधील बहुतेक अदूरदर्शी पुढारी ब्रिटिश हिंदी सैन्यास केवळ भाडोत्री नि पोटभरू म्हणून सारखे निंदित असतांना, ही उत्साहदायी गोष्ट आहे की, वीर सावरकर निर्भयपणें हिंदी तरुणांना सैन्यांत शिरा म्हणून सारखें उत्तेजन देत आहेत. ब्रिटिशांच्या सेनेंत शिरलेल्या याच हिंदी तरुणांमधून आमच्या आझाद हिंद सेनेला समरकलेंत प्रवीण नि मुरलेल्या प्रशिक्षितांचा नि सैन्याचा पुरवठा होत आहे." नेताजींनी १९४१ च्या प्रारंभीं भारतांतून गुप्तपणें परदेशी प्रयाण करण्याच्या अगोदर सहा महिने मुंबईला येऊन सावरकरांची भेट घेतली होती ही घटनाहि या परिस्थितीच्या संदर्भांत सूचक ठरते.

९ ऑक्टोबर रोजीं व्हॉइसरॉय लॉर्ड लिनलिथगो यांनी सावरकरांना चर्चेसाठी पाचारण केलें होतें. या चर्चेच्या वेळीं सावरकरांनी हेंच सांगितलें की, या युद्धांत उतरलेलें कोणतेंहि राष्ट्र मानवी वा नैतिक भूमिकेवरून लढत नसून स्वहितरक्षणासाठी लढत असल्यामुळे भारताच्या सहकार्याची अपेक्षा करणाऱ्या इंग्लंडने भारताची स्वातंत्र्याची मागणी मान्य केली पाहिजे आणि या संपूर्ण स्वातंत्र्याच्या मार्गावरील पहिलें पाऊल म्हणून ताबडतोब अंतर्गत स्वराज्य देऊं केलें पाहिजे. 'एक मनुष्य, एक मत' या तत्त्वाच्या आधारें देशांत निवडणुका घेऊन प्रातिनिधिक सरकार स्थापन करावयास हवें व भारतीय तरुणांना सैन्यांतील वरिष्ठ जागा देण्याचीहि इंग्लंडने तयारी दर्शविली पाहिजे अशाहि त्यांनी मागण्या केल्या.

महायुद्ध सुरू होतांच ब्रिटिश सरकारशीं असहकार करण्याचें कॉंग्रेसने ठरविलें व त्यानुसार आपल्या मंत्रिमंडळाचे राजीनामे सादर केले. नंतर ब्रिटनने आपली युद्धकालीन उद्दिष्टें जाहीर करावींत या मागणीसाठी वैयक्तिक सत्याग्रहाची चळवळ हातीं घेण्यांत आली. कॉंग्रेसच्या सत्तात्यागाची

संधि साधून जिना यांनी मुस्लिम लीगचीं मंत्रिमंडळें स्थापन केलीं. इतकेंच नव्हे तर कॉंग्रेसचा म्हणजेच हिंदूंच्या जोखडांतून मुक्तता झाल्याबद्दल मुसलमानांनी मुक्तिदिन साजरा करावा असा आदेश दिला. मुस्लिम लीगच्या या कारवायांचा रोख लक्षांत घेऊन १९३९ च्या अखेरीस कलकत्त्यास भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनांत अध्यक्षपदावरून बोलतांना सावरकरांनी पाकिस्तानच्या मागणीच्या दिशेने मुस्लिम लीगची लवकरच पावलें पडतील असा इशारा दिला. आणि नेमकें घडलेंहि तसेंच. १९४० च्या मार्चमध्ये लाहोर येथे मुस्लिम लीगचें अधिवेशन भरून त्यांत मुस्लिम बहुसंख्याक प्रदेशांचें स्वतंत्र राज्य स्थापन करावयास हवें अशा आशयाचा ठराव मंजूर करण्यांत आला. तेव्हापासून भारताच्या विभाजनाबाबत मुस्लिम लीगच्या ज्या कारवाया सुरू झाल्या त्याबद्दल सावरकर सदोदित इशारा देत होते. परंतु पाकिस्तान अस्तित्वांत येणारच नाही व कदाचित् अस्तित्वांत आलें तरी फार काळ टिकणार नाही असला बाष्कळ युक्तिवाद कॉंग्रेसनेत्यांच्या तोंडून ऐकूं येत होता. पाकिस्तानबाबत कॉंग्रेस-नेते सध्या राणा भीमदेवी थाटाचीं भाषणें करीत असले तरी अचानक ते पाकिस्तानला संमति देऊन केव्हा मोकळे होतील याचा भरवसा देतां येत नाही अशी शंका सावरकर नेहमीच व्यक्तवीत होते.

१९४० च्या मे महिन्यांत सावरकर सायटिकाच्या विकाराने आजारी होते. त्यामुळे हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदावरून निवृत्त होण्याचा त्यांचा विचार होता. परंतु कार्यकर्त्यांच्या आग्रहामुळे मदुरा येथे भरलेल्या अधिवेशनाचें अध्यक्षपद त्यांना स्वीकारावें लागलें. पुढचें अधिवेशन भागलपूरला भरलें. या अधिवेशनामुळे शांतताभंग होईल असें कारण सांगून बिहार सरकारने त्यावर बंदी घातली. सावरकरांनी बंदीहुकूम मोडून अधिवेशन भरविण्याचें ठरविलें. त्याप्रमाणे ते भागलपूरला जाण्यास निघाले तेव्हा गया स्थानकावर त्यांना अटक करण्यांत आली. परंतु इतर प्रतिनिधि भागलपूरला पोचले असल्यामुळे त्यांनी सावरकरांचें अध्यक्षीय भाषण वाचून अधिवेशन साजरें केलें.

महायुद्ध संपल्यानंतर ब्रिटिशांना भारताला स्वातंत्र्य द्यावें लागेल व त्या वेळीं पाकिस्तानची मागणी पुढे येण्याचा संभव आहे हें ओळखून सावरकरांनी देशभर संचार करून हिंदूंना आगामी संकटाबाबत सावधान

राहण्याची सूचना दिली. मुंबईतील एका सभेंत बोलतांना ते म्हणाले, " आज आपण निःशस्त्र आहोंत. पण एक दिवस असा येईल – नि तो दिवस आंतरराष्ट्रीय योगायोगामुळे तुम्हांस कल्पना करवणार नाही इतक्या त्वरेने जवळ येत आहे – की जगाच्या नव्या नकाशावर इंग्रजांकरिता इंग्लंड, जर्मनांकरिता जर्मनी, त्याप्रमाणे हिंदूंकरिता हिंदुस्थान हा देश निश्चितीने राखला जाईल. "

१९४२ च्या प्रारंभीं ब्रिटनच्या दृष्टीने युद्धपरिस्थिति बरीच बिकट झाली होती. सिंगापूरचा पाडाव होऊन जपानी सेना ब्रह्मदेशाच्या रोखाने निघतांच भारतांतील ब्रिटिश सत्तेला धोका निर्माण झाला. अशा वेळीं भारताने आपल्या बाजूने उभे राहवें अशी जर इंग्लंड अपेक्षा करीत आहे तर त्याने युद्ध आटोपतांच भारताला स्वातंत्र्य देण्याचा आपला मनोदय असल्याचें आताच जाहीर करावें अशी मागणी करणारी तार सावरकरांनी ७ मार्च रोजीं ब्रिटनचे प्रधानमंत्री चर्चिल यांना धाडली. भारताच्या बाबतींत अमेरिकेचेंहि ब्रिटनवर सारखें दडपण येत होतें. त्यामुळे मोठ्या नाइलाजाने चर्चिल यांनी भारतीय स्वातंत्र्याची योजना तयार करुन क्रिप्स यांना २३ मार्च रोजीं दिल्लीस धाडलें. क्रिप्स यांच्या योजनेंत प्रांतांना मध्यवर्ती संघराज्यामधून फुटून निघण्याचा अधिकार नमूद करण्यांत आला होता.

क्रिप्स-योजनेमध्ये प्रांतांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्यांत आला असल्यामुळे सावरकरांनी या योजनेला तीव्र विरोध केला. याउलट प्रांतांचा स्वयंनिर्णयाचा अधिकार निःसंदिग्ध स्वरूपांत मान्य करण्यांत आला नसल्याचें कारण देऊन जिना यांनीहि आपला विरोध जाहीर केला. कॉंग्रेसची भूमिका थोडीशी वेगळी होती. युद्धाची समाप्ति झाल्यानंतर ही योजना अमलांत येणार असल्यामुळे ही योजना म्हणजे निव्वळ भविष्यकाळचा वायदा आहे या कारणामुळे कॉंग्रेसने क्रिप्स-योजना फेटाळून लावली. अशा रीतीने कॉंग्रेस, हिंदुमहासभा व मुस्लिम लीग या तीनहि पक्षांच्या नेत्यांनी क्रिप्स-योजनेचें स्वागत न केल्यामुळे भारताच्या स्वातंत्र्याचा प्रश्न तसाच अनिर्णित राहिला. युद्ध संपल्यानंतर हीच योजना नव्या नांवाखाली पुन्हा मांडली जाण्याचा संभव असल्यामुळे व त्या वेळीं प्रांतांच्या स्वयंनिर्णयाच्या अधिकाराला म्हणजेच पर्यायाने पाकिस्तानच्या निर्मितीला कॉंग्रेस-नेते मान्यता देण्याचा संभव असल्यामुळे सावरकरांनी अखंड हिंदुस्थानच्या प्रचारासाठी व्याख्यानें आणि दौरे हा कार्यक्रम

हातीं घेतला. हिंदु मतदारांनी हिंदुत्वनिष्ठ उमेदवारांना निवडून दिलें तरच पाकिस्तानचा धोका टळूं शकेल असें ते आवाहन करीत होते. हिंदुमहासभेच्या वतीने १० मे १९४२ हा पाकिस्तान-निषेध-दिन म्हणून पाळण्यांत आला. गांधी-नेहरू प्रभृतींना पाकिस्तानची निर्मिति ही घटना असंभाव्य वाटत होती. परंतु राजगोपालाचार्यांसारखे नेते मात्र पाकिस्तानच्या निर्मितीने हिंदु-मुसलमान प्रश्न कायमचा मिटेल असे सांगत होते. हिंदु आणि मुसलमान या दोघांनी स्वातंत्र्याची मागणी केली तरच ब्रिटिश सरकार ही मागणी मान्य करील व दोन्ही समाजांनी ही मागणी करावी यासाठी आपण म्हणजे हिंदूंनी मुसलमानांना पाकिस्तान हवें असल्यास त्याला विरोध करूं नये असें राजाजींचें म्हणणें होतें. परंतु या भोळसट आशावादाला विरोध काय तो एकट्या सावरकरांनी केला. ते म्हणत की, हिंदु आणि मुसलमान या दोघांनी एकत्र येऊन स्वातंत्र्याची मागणी केली तर आपण हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याचा विचार करूं हें ब्रिटिश सरकारचें आश्वासन मानभावीपणाचें आहे. आणि म्हणूनच मुसलमान समाज हिंदु समाजापासून फटकून वागावा अशा तऱ्हेची चिथावणी ब्रिटिश सरकार नेहमीच मुस्लिम नेत्यांना देत असते. यामुळे आपण मुसलमानांच्या कच्छपी लागून त्यांची मनधरणी करण्याने कोणतीच कार्यप्राप्ति होणार नाही. भारताला स्वातंत्र्य द्यावयाचें की नाही या बाबतींतील ब्रिटनचें धोरण बव्हंशीं युद्धोत्तर परिस्थितीवर अवलंबून राहील. पाकिस्तान देऊन टाकलें की मुसलमानांची भूक भागेल व ते गोडीगुलाबीने वागतील अशी आशा करणें म्हणजे इतिहासाचें अज्ञान प्रगट करण्यासारखें आहे असेंहि सावरकर अनेक उदाहणें देऊन सांगत असत. ब्रिटिशांमुळे हिंदु आणि मुसलमान या दोन समाजांत कलह होत आहे अशी भाबडी समजूत करून देणाऱ्या कॉंग्रेस-नेत्यांच्या आत्मवंचक धोरणावर सावरकरांनी कडक टीका केली. पाकिस्तान निर्माण केल्याने हिंदुस्थान आपल्या सीमेवर कायमची डोकेंदुखी निर्माण करून बसणार आहे असा इशारा ते देत होते. त्या वेळीं या इशाऱ्याकडे सोयिस्कर दुर्लक्ष करणाऱ्यांना पाकिस्ताननिर्मितीनंतर सावरकरांच्या या भविष्यवाणीची प्रचीति आली.

गेल्या पांच वर्षांतील दगदगीमुळे सावरकरांची प्रकृति बिघडली व त्यामुळे ३१ जुलै १९४२ रोजीं हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचा राजीनामा

सादर केला. या सुमारास काँग्रेसने ब्रिटिश साम्राज्यसत्तेविरुद्ध आंदोलन सुरू करण्याचें ठरविलें होतें. ७ ऑगस्टपासून अ. भा. काँग्रेस समितीचें मुंबईला जें अधिवेशन भरणार होतें त्यांत ब्रिटिश सरकारला 'छोडो भारत'चा आदेश देण्यांत येणार होता. या आंदोलनांत हिंदुसभेनेहि भाग घ्यावा असें कांही जणांकडून सुचविण्यांत येत होतें. म्हणून २ ऑगस्ट रोजीं पुण्यांतील प्रगट सभेंत बोलतांना सावरकर म्हणाले, "कोणत्याहि परिस्थितींत आपण विभाजनाला मान्यता देणार नाही असें जर काँग्रेस-नेते सांगत असतील तर या आंदोलनांत सहभागी होण्यास हिंदुसभेची तयारी आहे." परंतु त्यांच्या या आवाहनाची काँग्रेसकडून दखल घेतली गेली नाही. ठरल्याप्रमाणे ७ ऑगस्टला अ. भा. काँग्रेसचें अधिवेशन सुरू झालें. त्या दिवशीं गांधीजी म्हणाले की, ब्रिटिश सरकारने येथून निघून जावें असा आमचा आग्रह आहे. त्यासाठी ते मुस्लिम लीगकडे सत्ता सुपूर्त करणार असतील तर तेंहि आम्हांस चालेल. दुसऱ्या दिवशीं 'छोडो भारत'चा ठराव मांडण्यांत आला व त्यावर चर्चा सुरू झाली. ९ ऑगस्ट रोजीं गांधीजी 'छोडो भारत' आंदोलनाची रूपरेखा कथन करणार होते. परंतु ८ ऑगस्टच्या रात्रींच गांधी-नेहरू-पटेल-आझाद प्रभृति वरिष्ठ काँग्रेस-नेत्यांना अटक करण्यांत आली. या धरपकडीमुळे साऱ्या देशभर असंतोषाचा वणवा भडकला व सरकारी मालमत्तेचा विध्वंस करण्याचें सत्र सुरू झालें. काँग्रेसच्या अनेक तरुण कार्यकर्त्यांनी भूमिगत होऊन या जन-आंदोलनाचें मार्गदर्शन केलें.

'छोडो भारत' चळवळीचें पर्यवसान 'तोडो भारत' चळवळींत होईल या शक्यतेमुळेच सावरकर या आंदोलनापासून दूर राहिले. त्यांच्या या कृतीचा विरोधकांनी वेगळा अर्थ लावला नसता तरच तें नवल ठरलें असतें. परंतु वैयक्तिक लोकप्रियतेपेक्षा तत्त्वनिष्ठाच मोलाची मानणारे सावरकर विरोधकांनी टीकेचे मोहोळ उठविलें असतांनाहि आपल्या भूमिकेवर निर्धाराने उभे होते. देशाचें स्वातंत्र्य आज ना उद्या खचित मिळवितां येईल; पण भारतमातेची मूर्ति एकदा भंगली की ती पुन्हा सांधणें हें कार्य महादुर्घट आहे हें सावरकरांना ठाऊक होतें. त्यांनी आपल्या बालपणापासून भारतमातेशिवाय कशाचीच पूजा केली नव्हती. त्यांचें जीवन, नव्हे त्या जीवनांतील क्षण अन् क्षण मातृभूमीवरील उत्कट अन् जाज्वल्य भक्तीचें साकार

रूप होतें. त्यांनी स्वतःच एके ठिकाणीं म्हटलें आहे की, " माझ्या मृत्यूनंतर माझ्या दहनस्थळीं जर माझ्या नांवाची शिला लावणार असाल तर त्या शिलेवर ' स्वातंत्र्यवीर सावरकर ' यापेक्षा ' हिंदुसंघटक सावरकर ' असा लेख कोरला गेल्यास तो मला अधिक आवडेल. कारण स्वातंत्र्यार्थ मीं जे जे प्रयत्न केले ते ते हिंदुसंघटनेसाठी होते, समर्थ-संपन्न हिंदुराष्ट्रासाठीच होते, अखंड हिंदुस्थानसाठीच होते. "

गांधी-नेहरू प्रभृति कॉंग्रेस-नेते कारागृहांत अडकले असतांना पाकिस्तानची योजना कॉंग्रेसने मान्य करावी असा राजाजी प्रचार करीत होते. त्यांनी पाकिस्तानबाबत सावरकरांइतकी कडवी भूमिका न घेणाऱ्या श्यामाप्रसाद मुकर्जी यांच्यासारख्या नेत्याने हिंदुमहासभेचें अध्यक्षपद स्वीकारावें अशी खटपट सुरू झाली. त्यांच्या या खटपटीला यश आलें तर हिंदुराष्ट्रवादाचा कणखर पुरस्कार करणारा पक्षच या देशांत उरणार नाही हा धोका ओळखून प्रकृति ठीक नसतांनाहि सावरकरांनी हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचा आपला राजीनामा मागे घेतला. इतकेंच नव्हे तर कानपूर येथे भरणाऱ्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदाची निवडणूक लढविण्याचें ठरविलें. सावरकरांचा हा निर्धार पाहतांच बहुतेक सर्व हिंदुसभा-शाखांनी त्यांच्या नांवाचा पुरस्कार केला व त्यामुळे ते निवडून आले. कानपूरच्या अधिवेशनांत पाकिस्तानच्या मागणीला हिंदुमहासभेचा सतत तीव्र विरोध राहील, अशा आशयाचा ठराव संमत करण्यांत आला. हिंदुसभा आपल्या मतानुसार चालविण्याचा प्रयत्न असफल झाल्यामुळे राजाजींनी साहजिकच हळहळ व्यक्त केली.

आपण सांगत असलेलें राष्ट्रधर्माचें पुरुषसूक्त ऐकण्याची वा आचरण्याची हिंदुसमाजाची आज तरी मनःप्रवृत्ति दिसत नाही ही जाणीव सावरकरांच्या मनाला क्लेशदायक ठरे. ' मी म्हणजे मरणोन्मुख हिंदुराष्ट्राची किंकाळी आहें ' असें ते एकदा स्वतःसंबंधी म्हणाले होते. परंतु त्याबरोबरच आपण जें सांगत आहोंत तेंच बरोबर आहे हा त्यांचा आत्मविश्वासहि अभंग होता. सावरकरांचा हिंदुत्ववाद आपल्याला मान्य नसल्याचें सांगतांना कांही तरुण कॉंग्रेस-कार्यकर्त्यांनी असे उद्गार काढले होते की, १९०८ सालचें सावरकर आम्हांला मान्य आहेत. मान्य नाहीत ते १९३० सालचे सावरकर. तात्काळ सावरकर उद्गारले,

" १९०८ चे सावरकर आणि आजचे सावरकर यांच्यामध्ये यत्किंचितहि भेद आहे असें मला वाटत नाही. तथापि आपण १९०८ च्या सावरकरांचे अनुयायी होण्यास सिद्ध असाल तर माझ्या तरुण मित्रांनो, आपण १९३८ च्या सावरकरांचा निषेध केला तरी चालेल. मात्र १९०८ च्या सावरकरांनी केलेल्या वर्तनाचे परिणाम भोगण्याची सिद्धता ठेवा. कारण १९०८ च्या सावरकरांचा आणि त्यांच्या क्रांतिकारक मित्रांचा १९०८ च्या समाजाने निषेधच केला आहे; अभिनंदन नव्हे. आज १९०८ च्या सावरकरांचें अभिनंदन केलें जात आहे, पण आजचा समाज आजच्या सावरकरांचा विरोधकच आहे या घटनेंतील मर्म नीट ध्यानीं घ्या. नाही तर १९०८ च्या सावरकरांचें अभिनंदन करणें योग्य आहे असें १९३८ मध्ये वाटूं लागलें, तसें १९३८ च्या सावरकरांचें हिंदुराष्ट्रस्वातंत्र्याचें नेतृत्व अत्यंत योग्य होतें असें म्हणण्याचा प्रसंग १९६८ मध्ये आपल्यावर यावयाचा. "

२८ मे १९४३ रोजीं सावरकरांनी एकसष्टाव्या वर्षांत पदार्पण केलें. या निमित्ताने पुणें-मुंबई आदि ठिकाणीं त्यांच्या षष्ट्यब्दीपूर्तीचे समारंभ मोठ्या उत्साहाने साजरे करण्यांत आले. महाराष्ट्रीय साहित्यिकांच्या वतीनेहि त्यांना मानपत्र देण्यांत आलें. २८ मे रोजीं पुण्यांत झालेल्या विराट् समारंभाच्या वेळीं त्यांना सव्वा लाख रुपयांची थैली देण्यांत आली. या प्रसंगीं बोलतांना त्यांनी यापुढचें आयुष्यहि देशस्वातंत्र्यासाठीच व्यतीत करण्याचा आपला निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, " स्वातंत्र्यप्राप्तीचें कार्य एकाच पिढींत पूर्ण होतें असें नाही. म्हणून देश स्वतंत्र झालेलाच पाहीन या आग्रहापेक्षा देशाच्या स्वातंत्र्यासाठी मी जन्मभर लढेन व लढतां लढतां मरेन असा निश्चय करण्यांतच मला अधिक समाधान वाटेल. "

जुलैच्या अखेरीस सावरकरांनी हिंदुमहासभेच्या अध्यक्षपदाचा तिसऱ्यांदा राजीनामा धाडला. या वेळेसहि तो स्वीकारण्यांत आला नाही. उलट वर्षअखेरीस अमृतसर येथे भरणाऱ्या अधिवेशनाच्या अध्यक्षपदावर त्यांची सतत सातव्या वेळीं अविरोध निवड झाली. परंतु अधिवेशनाच्या अगोदर कांही दिवस सावरकर ब्रॉकॉयटिसचा विकाराने आजारी पडल्यामुळे डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांनी अध्यक्षपद भूषविलें.

१९४४ च्या मे महिन्यांत गांधीजींची मुक्तता झाली आणि देशाच्या स्वातंत्र्याबाबत गेल्या कांही वर्षांत निर्माण झालेल्या पेचप्रसंगाची सोडवणूक करण्याच्या दिशेने नवे प्रयत्न सुरू झाले. मुंबईतील मलबारहिलवरील जिना यांच्या अलिशान बंगल्यांत गांधीजी आणि जिना यांच्या दरम्यान तीन आठवडे वाटाघाटी होत होत्या. या वाटाघाटींच्या वेळीं जिना यांनी पाकिस्तानशिवाय मुसलमानांचें समाधान होणार नाही या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. जिनाच्या आग्रहापुढे कॉंग्रेस-नेते नमतील असा धोका दिसून आल्यामुळे ७ व ८ ऑक्टोबर रोजीं दिल्ली येथे सावरकरांनी अखंड हिंदुस्थान परिषद् बोलावून पुन्हा एकदा आगामी संकटाची जाणीव करून दिली. डिसेंबरमध्ये बिलासपूर येथे डॉ. श्यामाप्रसाद मुकर्जी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचें उद्‌घाटन करतांना सावरकरांनी भारताची भावी राज्यघटना कशी असावी यासंबंधी आपले विचार मांडले. हिंदुमहासभेच्या आर्थिक समन्वयाच्या धोरणाचाहि या अधिवेशनांत विचार झाला.

बिलासपूरचें अधिवेशन संपवून सावरकर मुंबईला परतले तेव्हा त्यांच्या थोरल्या बंधूंची – बाबांची – प्रकृति बरीच बिघडली असल्याचें त्यांना कळलें. म्हणून ८ फेब्रुवारी रोजीं ते बाबांना भेटण्यासाठी सांगलीला गेले. रुग्णशय्येवरील बाबांचा कृशजर्जर हात आपल्या हातांत घेतांना सावरकरांच्या डोळ्यांपुढे आपल्या कुटुंबीयांच्या समर्पित जीवनाची पानें फडफडूं लागलीं. मुंबईला गेल्यानंतर त्यांनी बाबांना जें पत्र लिहिलें त्यांत त्याचें प्रतिबिंब पाहवयास सापडतें.

"बाबा, आपल्या तिघां भावांचें जीवितकार्य एकरूप, एकजीव असेंच होतें. आपण आपल्या पिढींत आपल्या कुलाचें ऋण फेडलें आहे. भारताच्या इतिहासांतील एक अध्याय सुवर्णाक्षरांनी नोंदला गेलाच पाहिजे. 'सावरकर-युग' – शत्रूंनी तो शब्द रूढविला आहे. 'स्वातंत्र्यलक्ष्मी की जय' ही पहिली क्रांतिघोषणा आपली; व तिलाच पूर्तता देणारी 'हिंदुस्थान हिंदुओंका, नही किसीके बापका' ही दुसरी क्रांति-घोषणाहि आपलीच. आपण दोन वेळां राष्ट्राची विचारक्रांति व आचारक्रांति घडवून आणली आहे. जो स्वातंत्र्ययज्ञ आपण प्रथम चेतविला तो आज राष्ट्रभर भडकलेला आहे. त्यांत आपल्यासारख्या सतत साठ वर्षे लढत असलेल्या वीराची काया जी पडेल ती मानवी काया नव्हे तर देवांच्या हातच्या वज्राची एक महान् दिव्य समिधाच होय!

'पूर्वी विशी-तिशी-चाळिशींमध्ये वारंवार मृत्यूची गाठ पडली होती. तेव्हाहि आपण त्याचें स्वागत केलें. पण तें कांहीसें आव्हानाच्या स्वरूपांत होतें. 'येतोस तर ये, कोण भितोय तुला !' असा ध्वनि त्या वेळच्या सिद्धतेचा होता. आता मृत्यु आला नाही तर आपण होऊन महाप्रस्थानाला निघावयाची घडी भरली. यास्तव समाधानाने मित्राचा जसा हात धरावयाचा तसाच मृत्यूचा; आव्हानाने नव्हे तर आनंदाने ! ज्यांत मागे किंवा पुढे उरलें नाही, तृषा तृप्त झाल्या, एका झटक्यासरशीं जगाची वार्ता, लोभ, क्षोभ, संबंध नाहीसे होऊन केवळ शांतता उरली, 'मी' देखील नाहीसा झालों, त्या अनंतांत हे कर्मवीरा, आता पूर्ण समाधानाने विलिन व्हावें."

(१९४५ मध्ये महायुद्धाचें अखेरचें पर्व सुरू झाल्यानंतर भारताचें स्वातंत्र्य दृष्टिपथांत येऊं लागलें. मध्यवर्ती विधिमंडळांतील काँग्रेस-पक्षाचे नेते कै. भुलाभाई देसाई यांनी मुस्लिम लीगचे सरचिटणीस लियाकतअलीखान यांच्याशीं एक गुप्त करार केला. राज्यकारभारांत हिंदूंना आणि मुसलमानांना समान प्रतिनिधित्व देण्याची या करारांत तरतूद करून भुलाभाईंनी राजाजींवर ताण केली. या करारानंतर हंगामी मंत्रिमंडळ बनविण्याच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या. याबाबत ब्रिटिश सरकारशीं वाटाघाटी करण्यासाठी व्हाइसरॉय लॉर्ड वेव्हेल २१ मार्च १९४५ रोजीं लंडनला गेले. मेच्या पहिल्या आठवड्यांत जर्मनीने शरणागति स्वीकारल्यानंतर ब्रिटनने सार्वत्रिक निवडणुका घेऊन मजूर-पक्ष अधिकारावर आला. नवे ब्रिटिश प्रधानमंत्री ॲटली यांच्याशीं वाटाघाटी करून जूनच्या पहिल्या आठवड्यांत लॉर्ड वेव्हेल दिल्लीला परतले. १४ जून रोजीं त्यांनी आपली योजना जाहीर करून हंगामी मंत्रिमंडळांत सवर्ण हिंदु व मुसलमान यांना समान प्रतिनिधित्व देण्यांत येणार असल्याचें जाहीर केलें.

या योजनेंत काँग्रेस-नेत्यांनी सहभागी व्हावें म्हणून नेहरू, पटेल, आझाद प्रभृति काँग्रेस-नेत्यांची कारागृहांतून मुक्तता करण्यात आली. सिमल्याच्या थंड हवेंत लॉर्ड वेव्हेल काँग्रेसच्या व मुस्लिम लीगच्या नेत्यांशीं हंगामी मंत्रिमंडळाबाबत वाटाघाटी करूं लागले. तत्पूर्वी नुकत्याच पार पडलेल्या प्रांतिक व केंद्रीय विधिमंडळाच्या निवडणुकींत मुसलमान मतदारसंघांतून बव्हंशीं मुस्लिम लीगचे व मुस्लिमेतर मतदारसंघातून बव्हंशीं काँग्रेसचे उमेदवार निवडून

आल्यामुळे सिमला बैठकींत सवर्ण हिंदूंच्या वतीने कॉंग्रेसने व मुसलमानांच्या वतीने मुस्लिम लीगने भाग घेतला. शीख आणि हरिजन यांच्यासाठी हंगामी मंत्रिमंडळांत वेगळ्या जागा ठेवण्यांत येणार होत्या. वेव्हेल-योजना अराष्ट्रीय असल्यामुळे हिंदुमहासभेने आपला विरोध नोंदविला. परंतु निवडणुकींतील अपयशामुळे तिच्या विरोधाची दखल घेण्यांत आली नाही. त्यामुळे पाकिस्तान-च्या निर्मितीच्या रोखाने भारतीय राजकारणाचीं पावलें अधिक द्रुतगतीने पडूं लागलीं.

१९४६ च्या मार्चमध्ये भारतमंत्री पेथिक लॉरेन्स, स्टॅफोर्ड क्रिप्स व ए. व्ही. अॅलेक्झांडर या तिघां ब्रिटिश मंत्र्यांचें शिष्टमंडळ दिल्लींत येऊन या शिष्टमंडळाच्या वतीने भारताला स्वातंत्र्य देण्याचा ब्रिटिश सरकारचा निर्धार व्यक्त करण्यांत आला. 'या शिष्टमंडळाच्या वतीने पाकिस्तानची मागणी पुढे आली तर आपण तिला जोरदार विरोध करूं' असें पं. नेहरूंनी जाहीर केलें. या त्रिमंत्री-योजनेनुसार केंद्र-सरकारकडे परराष्ट्रीय संबंध, संरक्षण व दळणवळण एवढीं तीनच खातीं राहून इतर सर्व बाबतींत प्रांतांना संपूर्ण स्वातंत्र्य मिळणार होतें. त्यामुळे जिना यांचें समाधान न होणें साह-जिकच होतें. त्यांनी त्रिमंत्री-योजना फेटाळून, मुस्लिम लीग प्रत्यक्ष कृतीचा मार्ग अवलंबील असें जाहीर केलें. कॉंग्रेसने मात्र ही योजना मंजूर करून २ सप्टेंबर रोजीं पं. नेहरूंच्या नेतृत्वाखाली हंगामी मंत्रिमंडळ बनविलें. आता आपण मागे राहून चालणार नाही हें ओळखून मुस्लिम लीगने २४ ऑक्टोबर रोजीं हंगामी मंत्रिमंडळांत प्रवेश केला. परंतु तरीहि मुस्लिम लीगच्या प्रत्यक्ष कृतिसमितीने बंगालमध्ये हिंदूंचें हत्याकांड सुरू केलें. हिंदु स्त्रिया व मुली यांच्यावर बलात्कार करणें, अर्भकांचे खून करणें, प्रौढांना हालहाल करून ठार मारणें व हिंदु नागरिकांच्या मालमत्तेचा विध्वंस करणें या मुस्लिम लीगच्या राक्षसी आंदोलनाने बंगालमध्ये अक्षरशः थैमान घातलें. कॉंग्रेसने आपल्या स्थापने-पासून पुरस्कारिलेल्या हिंदु-मुस्लिम ऐक्याच्या स्वप्नाचे तुकडे तुकडे झाले होते.

अशा परिस्थितींतच १९४८ च्या जूनपूर्वी आपण सत्तांतर करणार अस-ल्याचें १९४७ च्या फेब्रुवारींत अॅटली सरकारने जाहीर केलें. सत्तांतराचें हें कार्य सुरळीत रीतीने पार पडावें म्हणून वेव्हेल यांच्या जागीं माऊंटबॅटन यांना व्हाइसरॉय नेमण्यांत आले. कॉंग्रेसच्या व मुस्लिम लीगच्या नेत्यांशीं वाटाघाटी

करून माऊंटबॅटन मेमध्ये लंडनला गेले. ॲटली सरकारशीं विचारविनिमय करून माऊंटबॅटन भारतांत परतले व त्यांनी ३ जून १९४७ रोजीं अशी घोषणा केली की, येत्या १५ ऑगस्ट रोजीं विद्यमान हिंदुस्थानची फाळणी करून भारत आणि पाकिस्तान अशीं दोन राष्ट्रें अस्तित्वांत येतील व त्यांना अंतर्गत स्वराज्य देण्यांत येईल. यानंतर दोन्ही राष्ट्रांनी आपापल्या घटना-समित्या बोलावून आपली राज्यघटना निश्चित करावी.

७ जून रोजीं दिल्ली येथे हिंदुमहासभेच्या कार्यकारिणीची बैठक होऊन तींत अखंड हिंदुस्थानचें विभाजन करणाऱ्या माऊंटबॅटन-योजनेला कसून विरोध करण्याचें ठरलें. याउलट १४ जून रोजीं अ. भा. काँग्रेसची बैठक भरून तींत माऊंनबॅटन-योजनेला पाठिंबा देण्यांत आला. भारताचें विभाजन करण्यापूर्वी आमच्या देहाचें विभाजन करावें लागेल अशी गर्जना करणाऱ्या काँग्रेस-नेत्यांनीच माऊंटबॅटन-योजना स्वीकारल्यामुळे सावरकरांचा एकाकी आवाज ऐकण्याची कोणासहि गरज वाटली नाही.

१५ ऑगस्ट १९४७ चा दिवस उजाडला. लोकांची उपेक्षा सहन करूनहि सावरकर जी भीति व्यक्तवीत होते ती आज वस्तुस्थिति झाली होती. वयाच्या पंधराव्या वर्षीं भगूरच्या अष्टभुजेपुढे मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी आजीवन झगडण्याची शपथ घेतांना सावरकरांनी भारतमातेची जी मूर्ति आपल्या हृदयावर कोरली होती ती आज भंग पावली होती. पाकिस्तान अस्तित्वांत आलें होतें.

होय – हें सारें घडलें होतें ! परंतु त्याबरोबरच मातृभूमि स्वतंत्र झाली होती. त्या प्रतिज्ञेची 'याचि देहीं याचि डोळा' पूर्तता पाहण्याचें भाग्य सावर-करांना लाभलें होतें. तीन-चतुर्थांश हिंदुस्थान एक छत्राखाली आला होता, स्वतंत्र झाला होता. दिल्लीच्या सचिवालयावरचा परका युनियन जॅक खाली आला होता आणि त्या जागीं स्वतंत्र भारताचा राष्ट्रध्वज फडफडूं लागला होता. हेंहि कांही कमी नव्हतें. सावरकरांनी आपल्या घरावर हिंदुराष्ट्रवादाचें प्रतीक असलेल्या कुंडलिनी-कृपाणांकित ध्वजाबरोबरच भारताच्या स्वातंत्र्याची घोषणा करणारा अशोकचक्रांकित ध्वज उभारला.

कारण त्या दिवशीं हिंदुराष्ट्राच्या इतिहासांतील सहावें सोनेरी पान लिहिलें गेलें होतें.

## ११

# सांगता आणि संकल्प

अखेर पाकिस्तान निर्माण झालें. आतापर्यंत केवळ मुस्लिम समाजाचा पाठिंबा एवढेंच जिनांचें आणि त्यांच्या सहकाऱ्यांचें बळ होतें. आता त्यांना सत्ता लाभली होती, सिंहासन मिळालें होतें, स्वतंत्र सेनासामर्थ्याचा आधार लाभला होता. त्यामुळे त्यांच्या हिंदुविरोधाच्या धोरणास अधिकच धार चढली. पाकिस्तान ही इस्लामी भूमि असल्यामुळे तेथून हिंदूंना हुसकावून लावणें हें त्यांचें धार्मिक कर्तव्य ठरलें. पाकिस्तानांतील हिंदु नागरिकांच्या मालमत्तेच्या विध्वंसाला, हिंदु स्त्रियांच्या विटंबनेला धरबंद उरला नाही. स्वतःच्या डोळ्यांदेखत आपल्या आयाबहिणी व मुलींवर होणारे अत्याचार हताश अवस्थेंत पाहण्याची पाळी या दुर्दैवी हिंदु नागरिकांवर आली. जो तो प्राण वांचविण्यासाठी दिल्ली आणि कलकत्ता यांच्या रोखाने धांवू लागला. भारत सरकारपुढे निर्वासितांच्या प्रश्नाने अक्राळ-विक्राळ स्वरूप धारण केलें. यांतच २२ ऑक्टोबर रोजीं पाकिस्तानने काश्मीरमध्ये टोळीवाले घुसवून ईदच्या दिवशीं श्रीनगरवर हिरवा झेंडा लावण्याचा मनसुबा आखला. मुसलमानांची स्वतंत्र राष्ट्राची भूक भागविल्यानंतर ते शांत होतील व एखाद्या समजूतदार शेजाऱ्याप्रमाणे भारताबरोबर गुण्यागोविंदाने नांदतील अशी जी काँग्रेस-नेत्यांची अपेक्षा होती ती पार धुळीस मिळाली.

विभाजनाच्या करारानुसार भारताने पाकिस्तानला पंचावन्न कोटि रुपये द्यावयाचे होते. परंतु पाकिस्तानने काश्मीरवर हल्ला केल्यामुळे आपण ही

रक्कम त्याला देऊं नये; कारण या रकमेचा तो आपल्याविरुद्ध लढण्यासाठीच वापर करील असे सरदार पटेल यांचें मत होतें. परंतु गांधीजींना ही गोष्ट रुचली नाही. म्हणून त्यांनी पाकिस्तानला पंचावन्न कोटि रुपये देण्याबाबत भारत सरकारवर दडपण आणण्यासाठी उपोषण सुरू केलें. अखेर पटेलांनी गांधींचा आग्रह मान्य केला.

गांधीजींची ही पाकिस्तानधार्जिणी वृत्ति हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांना पसंत पडणें शक्यच नव्हतें. त्यांतील पुण्याच्या दैनिक हिंदुराष्ट्र या पत्राचे संचालक ना. द. आपटे व संपादक नथूराम गोडसे यांनी गांधींचा खून करण्याचें ठरविलें आणि ३० जानेवारी १९४८ रोजीं सायंकाळीं सहा वाजतां दिल्लींतील बिर्ला-भवनांत गांधीजी सायंप्रार्थनेसाठी आले असतांना त्यांनी तो बेत पार पाडला. नथूराम गोडसे यांच्या पिस्तुलाच्या गोळीने गांधीजींचा बळी घेतला.

गांधीजींचा खून एका हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्याने केला आहे ही बातमी जाहीर होतांच सर्वच हिंदुत्वनिष्ठांविरुद्ध लोकक्षोभाची जोरदार लाट निर्माण झाली. गोडसे ब्राह्मण असल्यामुळे महाराष्ट्रांत तर ब्राह्मण समाजाच्या माल-मत्तेची जाळपोळ सुरू झाली. गोडसे सावरकरांचे अनुयायी असल्यामुळे ३१ जानेवारीच्या सकाळीं सावरकर-सदनावरहि दगडफेक करण्यांत आली. डॉ. नारायणराव सावरकरांच्या घरावरहि दगडांचा वर्षाव झाला. शेवटीं ते रक्ताच्या थारोळ्यांत खाली पडले तेव्हा कोठे जमाव दुसरीकडे निघून गेला.

एकीकडे लोकक्षोभाचा वणवा भडकला असतांना दुसरीकडे सरकार गांधी-खुनाच्या कटाचे धागेदोरे जुळविण्यांत गढून गेलें. सावरकरांच्या घराची झडती घेण्यांत आली. ३१ जानेवारीपासून देशभर हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांची धरपकड सुरू झाली. ४ फेब्रुवारीच्या रात्रीं पोलिस-अधिकाऱ्यांनी सावरकरांची वैद्यकीय तपासणी केली व दुसऱ्या दिवशीं पहाटे त्यांना अटक करण्यांत आली. ११ मार्च रोजीं त्यांच्यावर गांधी-खून-कटांत सहभागी असल्याचा आरोप ठेवण्यांत आला. २५ मे रोजीं त्यांना दिल्लीला नेण्यांत आलें व २७ मेपासून लाल-किल्ल्यांत आत्मचरण यांच्यापुढे खटल्याचें कामकाज सुरू झालें. या खटल्यांत एकूण नऊ आरोपी होते. ( १ ) नथूराम विनायक गोडसे ( २ ) नारायण दत्तात्रय आपटे ( ३ ) विष्णुपंत करकरे ( ४ ) मदनलाल पहावा ( ५ ) शंकर

किस्तय्या (६) गोपाळ गोडसे (७) डॉ. परचुरे (८) वि. दा. सावरकर आणि (९) दिगंबर बडगे. यांपैकी बडगे हा माफीचा साक्षीदार झाला. याशिवाय गंगाधर दंडवते, गंगाधर जाधव व सूर्यदेव शर्मा हे तीन आरोपी सरकारच्या हातीं सापडूं शकले नाहीत. कै. ल. ब. भोपटकर यांनी सावरकरांचें वकिलपत्र घेतलें.

२२ जूनपासून खटल्याच्या सुनावणीस प्रारंभ झाला. प्रमुख सरकारी वकील दप्तरी म्हणाले की, गांधीजींचा खून नथूराम गोडसे यांनी केला असला तरी त्याची आखणी आपटे यांनी केली व या दोघांमागे सावरकरांची प्रेरणा उभी होती. आरोपपत्रक वाचून दाखविण्यांत आल्यानंतर सर्व आरोपींनी गुन्हा नाकबूल केला. त्यामुळे २४ जूनपासून ६ नोव्हेंबरपर्यंत सरकार-पक्षातर्फे साक्षीदारांचे जाबजबाब घेतले होते. बडगेने आपल्या जबाबांत सांगितलें की, १४ जानेवारी १९४८ रोजीं आपण गोडसे व आपटे यांच्यासमवेत सावरकर-सदनांत गेलों होतों. ते दोघे सावरकरांना भेटण्यासाठी वरच्या मजल्यावर गेले होते. त्याचप्रमाणे गांधी, नेहरू व सुऱ्हावर्दी यांचा खून करण्याचा आदेश सावरकरांनी दिला असल्याचें आपटे यांनी आपल्याला सांगितलें. १७ जानेवारी रोजीं आपण पुन्हा गोडसे व आपटे यांच्याबरोबर सावरकर-सदनांत गेलों असतांना, सावरकरांची भेट घेऊन ते दोघे खाली येत असतांना सावरकर जिन्यापाशीं आले व त्यांनी गोडसे व आपटे यांना यशस्वी व्हा असा आशीर्वाद दिल्याचें आपण ऐकलें.

दुसरे एक सरकारी साक्षीदार प्रा. जगदीशचंद्र जैन म्हणाले, " गांधींचा खून होण्यापूर्वी मदनलाल पहावा हा पंजाबी निर्वासित तरुण मला भेटला होता. निर्वासित छावणींतील आपल्या कार्याबद्दल सावरकरांनी आपली पाठ थोपटल्याचें त्याने मला सांगितलें. " प्रा. जैन यांनी आपणांस ही माहिती सांगितली होती असें मुंबईचे गृहमंत्री श्री. मोरारजी देसाई यांनी आपल्या साक्षींत कथन केलें. दिल्लीच्या हिंदुमहासभा-भवनांतून सावरकर-सदनामध्ये टेलिफोन केल्याच्या नोंदीच्या आधारे सावरकरांचा या कटाशीं संबंध लावण्याचा सरकार-पक्षातर्फे प्रयत्न करण्यांत आला, परंतु तो यशस्वी झाला नाही. सरकार-पक्षातर्फे १४९ साक्षीदारांच्या साक्षी झाल्यानंतर आरोपींनी आपापलीं निवेदनें केलीं. ८ नोव्हेंबर रोजीं नथूराम गोडसे यांनी आपलें निवेदन वाचून दाखविलें. त्यांत

त्यांनी गांधीजी हे पाकिस्तानचे जनक असल्यामुळे आपण तीन गोळ्या झाडून त्यांचा खून केला अशी कबुली दिली. मात्र आपण या कामीं इतर कोणाचाहि सल्ला घेतला नव्हता हें त्यांनी पुनः पुन्हा सांगितलें. गोडसे यांचें हें ९२ पानी निवेदन दुसऱ्या दिवशीं जप्त करण्यांत आलें.

२० नोव्हेंबर रोजीं सावरकरांनी आपलें ५२ पानी निवेदन वाचून दाखविलें. त्यांत त्यांनी सरकार-पक्षातर्फे आपल्याविरुद्ध उभा करण्यांत आलेला आरोपाचा डोलारा कसा पोकळ आहे हें विशद केलें आणि या खटल्यांतून आपली निष्कलंक मुक्तता करण्यांत आली पाहिजे अशी मागणी केली. ते म्हणाले, " माझ्या या निवेदनावरून फिर्यादी-पक्षाच्याहि हें ध्यानीं येईल की, माझ्यावरील सर्व आरोप संशय आणि अनुमान यांवर आधारलेले आहेत. मी पूर्णपणें निर्दोषी आहें. मी सादर केलेल्या सर्व कारणांचा साकल्याने विचार करून माझ्या चारित्र्यावर कसल्याहि प्रकारचा शिंतोडा न उडवतां माझी मुक्तता करण्यांत आली पाहिजे अशी माझी विनंती आहे. "

आरोपींतर्फे कोणताहि साक्षीदार देण्यांत आला नसल्यामुळे १ डिसेंबर पासून ३० डिसेंबरपर्यंत वकिलांचीं भाषणें झालीं. गोडसे यांनी आपली बाजू स्वतःच मांडली. ते म्हणाले, " मी ज्या व्यक्तीचा खून केला तिच्यावर मी दया दाखविली नसल्यामुळे मी न्यायालयाकडून दयेची अपेक्षा करीत नाही. मात्र या कृत्याची जबाबदारी सर्वस्वी माझ्या एकट्यावर आहे. कारण मी कोणाचाहि सल्ला घेतला नाही. " सावरकरांची बाजू देशबंधु चित्तरंजन दास यांचे बंधू व पाटणा वरिष्ठ न्यायालयाचे निवृत्त न्यायाधीश श्री. पी. आर. दास यांनी मांडली. ते म्हणाले की, " सावरकरांची या खटल्यांतून सुटका होईल याबद्दल मला मुळींच शंका नाही. परंतु माझी मागणी आहे ती ही की, सावरकरांची निष्कलंक मुक्तता झाली पाहिजे. "

१० फेब्रुवारी १९४९ रोजीं आत्मचरण यांनी आपलें निकालपत्र वाचून दाखविलें. सावरकरांचा या खुनाशीं यत्किंचितहि संबंध नसल्यामुळे त्यांची निष्कलंक मुक्तता करण्यांत यावी असें त्यांनी सांगितलें. नथूराम गोडसे व ना. द. आपटे यांना फाशींची व गोपाळ गोडसे, करकरे, मदनलाल, किस्तय्या व डॉ. परचुरे यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यांत आली. नंतर डॉ. परचुरे व किस्तय्या यांची अपिलांत मुक्तता झाली. आपटे, मदनलाल व गोपाळ गोडसे

यांना अपील करण्याची परवानगी नाकरण्यांत आली. नथूराम गोडसे यांनी आपल्या अपिलांत हा कट नसल्याचें पुन्हा आग्रहपूर्वक सांगितलें; परंतु न्यायाधीशांनी तें मान्य केलें नाही. शेवटीं १५ नोव्हेंबर १९४९ रोजीं अंबाल्याच्या कारागृहांत नथूराम गोडसे व आपटे हातांत भगवद्गीतेची प्रत घेऊन फाशीं गेले आणि करकरे, गोपाळ गोडसे व पहावा यांची जन्मठेपेची शिक्षा सुरू झाली.

१२ फेब्रुवारी रोजीं सकाळीं साडेदहा वाजतां सावरकर मुंबईतील आपल्या निवासस्थानीं परतले. मानखंडनेच्या यमयातनेंतून ते अग्निदिव्याप्रमाणे तावून-सुलाखून बाहेर पडल्यामुळे त्यांच्यावर अनुयायांनी अभिनंदनाचा वर्षाव केला. सावरकरांनी पी. आर. दास यांना आभारप्रदर्शक पत्र धाडलें. त्याचप्रमाणे गाय आल्ड्रेड या ब्रिटिश मित्राच्या सहानुभूतीबद्दलहि त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. मुंबईला कांही दिवस राहिल्यानंतर सावरकर विश्रांतीसाठी बंगलोरला गेले.

मेच्या अखेरीस घटना समितीने राखीव मतदारसंघ नाहीसे करण्याचा निर्णय केला तेव्हा सावरकरांनी सरदार पटेल यांना अभिनंदनाची तार धाडली यानंतर राष्ट्रभाषा, राष्ट्रलिपि व देशाचें नांव याबाबत घटना-समितींत चर्चा सुरू झाली तेव्हा सावरकरांनी हिंदी ही राष्ट्रभाषा असावी, देवनागरी ही राष्ट्रलिपि असावी व देशाचें नांव भारत असावें अशा आशयाची तार धाडली. घटना-समितीने या तीनहि सूचना मान्य केल्या. भगवा ध्वज हा राष्ट्रध्वज व्हावा अशी सावरकरांची इच्छा होती. परंतु तीनरंगी ध्वज हाच राष्ट्रध्वज ठेवण्याच्या बाजूने बहुमत आहे असें दिसून आलें तेव्हा त्यांनी त्यावर निदान चरखा असूं नये, तर भगवान् श्रीकृष्णाचें सुदर्शनचक्र असावें असें सुचविलें. अशा रीतीने घटना-समितीच्या निर्णयांकडे सावरकर बारकाईने लक्ष पुरवीत होते. त्या सुमारास म्हणजे १९ ऑक्टोबर १९४९ रोजीं त्यांच्या धाकट्या बंधूंचें — डॉ. नारायण रावांचें निधन झालें.

२१ डिसेंबर रोजीं डॉ. ना. भा. खरे यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाचें उद्घाटन करण्यासाठी सावरकर कलकत्यास जाऊन आले. या प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले, " हिंदु अजूनहि संघटित होऊन सामर्थ्य-संपादन न करतील तर हिंदुस्थानांत गेल्या कांही वर्षांत आणखी

पाकिस्तानें निर्माण होण्याचा धोका आहे हें आपण विसरतां कामा नये. यासाठी हिंदुसंघटनेची चळवळ जोराने चालविली पाहिजे व हिंदु तरुणांनी सैन्यदलांत शिरुन अद्ययावत् सैनिकी शिक्षण घेतलें पाहिजे. तसें झालें तर येत्या दहा वर्षांच्या आंत आपण गमावलेला भूभाग परत मिळवूं शकूं."

२६ जानेवारी १९५० रोजीं प्रजासत्ताक भारताचा जन्म झाला. या निमित्ताने राष्ट्रपति डॉ. राजेंद्रप्रसाद यांना धाडलेल्या अभीष्टचिंतनपर संदेशांत सावरकरांनी राष्ट्रपतींच्या आदेशानुसार देशसेवेचें कोणतेंहि कार्य करण्याची आपली तयारी असल्याचें कळविलें. त्याचप्रमाणे प्रजासत्ताक दिनानिमित्त त्यांनी तरुणांना सैन्यांत भरती होण्याचें आवाहन केलें. सावरकर म्हणाले, "आपल्या महत्त्वाच्या सीमारेषा अद्यापहि शत्रूच्याच ताब्यांत आहेत. उच्च तत्त्वाची घोषणा करून कांहीहि साध्य होणार नाही. आपण असेंच स्वप्नरंजनांत दंग राहिलों तर अविरत प्रयत्नांनंतर मिळविलेलें हें स्वातंत्र्य आपण गमावून बसूं. इतर आपल्याशीं जसे वागतात त्याच न्यायाने आपण त्यांच्याशीं वागलों तरच आपण आपलें स्वातंत्र्य टिकवूं शकूं. जशास तसें या धोरणानेच राष्ट्रें टिकतात, यशस्वी होतात."

भारत आणि पाकिस्तान यांमधील संबंध सुधारण्याच्या दृष्टीने १९५० च्या एप्रिलमध्ये प्रधानमंत्री पं.नेहरू यांनी पाकिस्तानचे प्रधानमंत्री लियाकतअली यांना वाटाघाटासाठी दिल्लीस बोलावलें. कॉंग्रेस-सरकारचा सावरकरद्वेष या वेळीं पुन्हा उफाळून आला. नेहरू-लियाकत वाटाघाटीसाठी देशांत योग्य वातावरण निर्माण व्हावें म्हणून सावरकर प्रभृति हिंदुसभा-कार्यकर्त्यांना स्थानबद्ध करण्यांत आले! या घटनेबाबत 'पाकिस्तानला खूष करण्यासाठीच नेहरूंचा हा आटा-पिटा चालला आहे' अशा टीका कांही कॉंग्रेसपक्षीय वृत्तपत्रांनीहि केली. सावरकर बेळगावच्या कारागृहांत स्थानबद्ध असतांना त्यांच्या मुलाने – विश्वासने – या स्थानबद्धतेविरुद्ध मुंबईच्या वरिष्ठ न्यायालयाकडे हेबियस कॉपर्स अर्ज केला. १२ जुलै रोजीं या अर्जाची सुनावणी चालू असतांना सरकारतर्फे असें सांगण्यांत आलें की, सावरकर मुंबईतील आपल्या निवासस्थानींच राहणार असतील व राजकारणांत भाग घेणार नसतील तर त्यांची मुक्तता करण्यास सरकार तयार आहे. सावरकरांच्या वतीने त्यांच्या वकिलांनी ही अट मान्य असल्याचें

कळविल्यानंतर सावरकरांची मुक्तता करण्यांत आली. सरकारला दिलेल्या आश्वासनाप्रमाणे मुंबईस परततांच सावरकरांनी हिंदुमहासभेच्या सदस्यत्वाचें त्यागपत्र दिलें. १५ ऑगस्टचा स्वातंत्र्यदिन कांही दिवसांवर येऊन ठेपला होता. त्या दिवशीं "आपण आपल्या घरावर राष्ट्रध्वज उभारू शकतों की नाही ? का तसें करणें म्हणजे राजकारणांत भाग घेण्यासारखें आहे असें सरकार मानतें" अशी सावरकरांनी गृहखात्याकडे विचारणा केली. सरकारने मोठ्या उदार हृदयाने राष्ट्रध्वज उभारण्याची परवानगी दिली; पण भाषण करूं नका असें बजावलें. एका तेजस्वी स्वातंत्र्यवीराचा स्वतंत्र देशांत एवढा मानभंग करण्यांत आल्याचें यापरतें दुसरें उदाहरण शोधून सापडणार नाही. सावरकरांची बी. ए.ची पदवी किंवा त्यांची मालमत्ता करण्याच्या बाबतींतहि सरकारने आपली क्षुद्र मनोवृत्ति वारंवार प्रगट केली. १९५० च्या अखेरीस पुण्याला हिंदुमहासभेचें अधिवेशन भरलें होतें. या अधिवेशनाला हजर राहण्याचीहि सावरकरांना परवानगी देण्यांत आली नाही.

राजकारणांत भाग घेण्याची परवानगी नाकारण्यांत आल्यामुळे सावरकर इतर विषयासंबंधी लिखाण करूं लागले. त्यांनी १९५१ च्या मे-मध्ये 'केसरी'मध्ये दोन लेख लिहून राष्ट्रीय पंचांगाची आवश्यकता प्रतिपादन केली. भारताचा इतिहास किमान गेल्या पांच हजार वर्षांइतका प्राचीन असल्यामुळे १९५१ हें वर्ष युधिष्ठिर संवत् ५००१ मानावें व यापुढे तशी वर्षगणना करावी असें त्यांनी सुचविलें होतें. त्याचप्रमाणे पहिले अकरा महिने तीस दिवसांचे असावेत, बारावा महिना पस्तीस दिवसांचा असावा आणि चार वर्षांनी येणारा बारावा महिना छत्तीस दिवसांचा असावा असेंहि त्यांनी या लेखांत म्हटलें होतें. त्यांच्या मताप्रमाणे मध्यरात्रींपासून मध्यरात्रींपर्यंत दिवस न मोजतां तो एका सूर्योदयापासून दुसऱ्या सूर्योदयापर्यंत मोजण्यांत यावा. सध्या कांही राज्यांत चैत्रापासून वर्षगणना सुरू होते तर कांही ठिकाणीं कार्तिकापासून नवें वर्ष गणलें जात आहे. हा घोटाळा टाळण्यासाठी राष्ट्रीय पंचागांत चैत्र, वैशाख आदि नांवें वगळून प्रथममास, द्वितीयमास असा उल्लेख करावा. ज्या दिवशीं हें राष्ट्रीय पंचांग अस्तित्वांत येईल तो दिवस 'दिनांक १, प्रथममास, भारतीय संवत् ५००१' असा लिहावा, असें सावरकरांनी या लेखांत म्हटलें होतें.

१९५१ च्या जुलैमध्ये सावरकरांवरील निर्बंध दूर करण्यांत आले. त्या वेळीं भरलेल्या एका प्रगट सभेंत बोलतांना ते म्हणाले, " पाकिस्तानच्या आक्रमणापासून मातृभूमीचें रक्षण करतांना मला मृत्यु यावा एवढीच माझी इच्छा आहे. "

भारताला स्वातंत्र्यप्राप्ति झाल्यानंतर 'अभिनव भारत' या आपल्या क्रांतिकारक संघटनेचें औपचारिक विसर्जन करण्याचें सावरकरांनी ठरविलें. प्रारंभीं गांधी-खून खटल्यांत गोवले गेल्यामुळे व नंतर राजकारणांत भाग न घेण्याचा निर्बंध असल्यामुळे सावरकरांना हा कार्यक्रम पुढे ढकलावा लागला होता. आता त्यांच्यावरील सर्व निर्बंध रद्द झाल्यामुळे १० मे १९५२ रोजीं हा सांगता-समारंभ आयोजित करण्यांत आला. या समारंभानिमित्त पुण्यांत पर्वतीजवळ क्रांतिस्तंभ उभारण्यांत आला. या क्रांतिस्तंभावर पुढील वाक्य लिहिण्यांत आलें होतें : " भारतीय स्वातंत्र्यसंग्रामांत इंग्रज शत्रूशीं सशस्त्र लढा देतांना १८५७ पासून १९४७ पर्यंत ज्या सशस्त्र क्रांतिकारक हुतात्म्यांनी आणि वीरात्म्यांनी आपल्या प्राणाहुति दिल्या त्या सहस्त्रावधि ज्ञात आणि अज्ञात भारतीय सशस्त्र क्रांतिकारकांच्या स्मरणार्थ. "

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यांत क्रांतिकारकांनी बजावलेल्या महनीय कामगिरीचा गौरव केल्यानंतर सावरकर म्हणाले, " माझ्या सहस्त्रावधि हितचिंतकांकडून वेळोवेळीं असे उद्गार निघतात की, हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळाल्यानंतरहि त्या स्वातंत्र्यासाठी झुंजतांना मी जे कांही कष्ट भोगले त्याचें श्रेय मला मिळालें नाही. सशस्त्र क्रांतिकारकांवांचून इतर निःशस्त्र मार्गांनी कार्य करीत असतां ज्यांनी सापेक्षतः अल्प कष्ट सोसले त्यांचाहि अनेक प्रकारे गौरव होत आहे. कोणाला भूदानें, कोणाला द्रव्यदानें, कोणाला अधिकारदानें, पारितोषकें म्हणून वांटलीं जात आहेत. पण परकीय शत्रूंनी राजहृत केलेल्या, जप्त केलेल्या आम्हां सशस्त्र क्रांतिकारकांचीं घरेंदारें, द्रव्य, मत्ता हीं सुद्धा परत द्यावयाचीं नाही म्हणून प्रस्तुतच्या आपल्या स्वकीय सरकारने उघडपणें सांगून टाकलेलें आहे. पण हा न्याय आहे की नाही, हा प्रश्न सुद्धा आज विद्यमान असलेले वयोवृद्ध क्रांतिकारक विचारांत घेऊं इच्छित नाहीत. निदान माझ्यापुरतें बोलावयाचें तर मला त्याविषयी लवलेश हेवा वाटत नाही. अहो, सारा हिंदुस्थान, आमची सारी

मातृभूमि, निदान हा तीनचतुर्थांश तरी विस्तृत देश शत्रूच्या हातून आम्हांस परत मिळाला, स्वतंत्र झाला यांतच त्या शत्रूंनी छिनावून नेलेल्या टीचटिचीच्या आपल्या क्षुद्र जहागिरी, घरटीं नि दीडदमड्या हीं सारीं आम्हांस परत मिळालेलींच आहेत. या आजच्या स्वतंत्र भारतीय महाराज्याचा अध्यक्ष होण्याचा मान मिळणें हीहि भाग्याची गोष्ट आहेच; पण तें भाग्य पुढच्या पिढींतील कोणा तरी सुयोग्य देशभक्तास लाभावें यासाठीच पन्नास वर्षांपूर्वी देश शत्रूशीं झुंजत असतां मारीत मारीत मरणें हेंच सर्व भाग्यांत परम भाग्य समजणाऱ्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या पुरस्कार-पथकांच्या आम्ही अग्रभागीं राहून शत्रूवर चालून गेलों. जर कधी काळीं पन्नास-पाऊणशे वर्षानंतर स्वराज्य आल्यावर आम्हांस मानाचीं स्थानें किंवा पारितोषिकें याचि देहीं याचि डोळा मिळवीन ही आमची महत्त्वाकांक्षा असती तर आम्ही रिव्हॉल्व्हरें किंवा बॉंब हातीं घेऊन त्या बलाढ्य शत्रूवर तुटून पडलों असतों का? सरळ फाशींच्या वाटेने धांवलों असतों का? मी माझ्यापुरतें तरी अगदी मनःपूर्वक सांगतों की, आम्हीं आमची मातृभूमि स्वतंत्र झालेली पाहिली यांतच आम्ही स्वतःला कल्पनेहून कृतार्थ झालों असें समजतों. कारण ते पाहण्याची आम्हीं कधी लालसा धरली नाही. केवळ तो दिवस केव्हा तरी उगवावा म्हणून झुंजण्याची तेवढी लालसा धरलेली होती. म्हणून तो सोनियाचा दिवस पाहिला यांतच हवें होतें त्याहून अधिक मिळालें. निदान मी तरी अत्यंत समाधानांत आहे. कारण एका अर्थी माझे मूळ संकल्प सफल झालेले आहेत.

"राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर त्याचा अध्यक्ष होणें यांतहि धन्यता आहेच. परंतु दुसऱ्या अर्थी राष्ट्राच्या स्वातंत्र्यासाठी लढून राष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर ती सारी राज्यसत्ता आपल्या देशबांधवांच्या हातीं अर्पून त्यांतील दमडीच्याहि लाभाची वा अधिकारपदाची लालसा न धरतां इतर स्वदेशबांधवांच्या मानांतच आपला मान आणि सुखांतच सुख मानून एका स्वराज्यनिष्ठ सामान्य नागरिकाप्रमाणे शक्यतें राष्ट्रकर्तव्य तेवढें करीत निरिच्छ समाधानांत राहणें यांतहि कृतार्थतेची धन्यतरता आहे.

"यवनांनी सिकंदराच्या ग्रीक सैन्याची आणि राजसत्तेची दाणादाण उडवून दिल्यानंतर आणि चंद्रगुप्ताची त्या स्वतंत्र भारतीय साम्राज्यावर स्थापना झाल्यानंतर शेवटीं आर्यचाणक्य स्वतः निवृत्त होऊन हिमालयांत निघून गेले

अशी कथा आहे. मला वाटतें, कृतार्थ झालेल्या सशस्त्र क्रांतिकारकांच्या आमच्या पिढीनेहि तोच आदर्श डोळयांपुढे ठेवावा. त्यांच्या आत्यंतिक त्यागाच्या प्रतिज्ञेस आणि परंपरेला तोच शोभून दिसेल."

अशा रीतीने क्रांतिकारकांच्या भूमिकेचें विवरण केल्यानंतर सावरकरांनी गेल्या चाळीस-पन्नास वर्षांतील स्वातंत्र्यप्रयत्नांचा अतिशय स्फूर्तिदायक इतिहास कथन केला. अहिंसेने स्वातंत्र्य मिळालें हा दावा किती खोटा आहे आणि हिंदुसंघटनवादी पक्षाला लोकांनी पाठिंबा न दिल्यामुळे स्वातंत्र्यलढ्याची परिणति पाकिस्तान-निर्मितींत कशी झाली यासंबंधीचें सावरकरांनी या सांगता-समारंभाच्या भाषणांत सोदाहरण विवेचन केलें.

पाकिस्तानचें नांव निघतांच सिंधूला आपण अंतरलों या जाणीवेने भारत-मातेच्या या परमभक्ताचें मन कळवळलें. अतिशय भावनोत्कट स्वरांत ते म्हणाले, "आम्हांला प्रत्यहीं ज्यांचें नामस्मरण धार्मिक कर्तव्य म्हणून करावें लागतें तीं आमचीं सारीं पुण्यक्षेत्रें, ती अयोध्या, मथुरा, माया, काशी, कांची, अवंतिका, पुरी द्वारावती ते जगन्नाथपुरीपर्यंत, मथुरेच्या मीनाक्षीपासून तो कामरूपांतील कामाक्षीपर्यंत आमचीं पुण्यक्षेत्रें आज स्वतंत्र, मुक्त, शुद्ध झालीं आहेत. या आमच्या पुण्यक्षेत्रांप्रमाणेच प्रत्यहीं आम्हांस आमच्या राष्ट्रैक्याचें स्मरण करून देणारा आणि आपल्या पुण्यतीर्थांना आवाहन करणारा जो मंत्र, जो प्रत्येकाला स्नानाच्या वेळीं म्हणावा लागतो त्या 'गंगे च यमुनेचैव गोदावरी सरस्वती। नर्मदे सिंधु कावेरी जलेस्मिन् संन्निधि कुरु ॥' या मंत्रांतील ती गंगा, ती यमुना, ती गोदावरी, ती सरस्वती, ती नर्मदा, ती कावेरी हीं आमचीं पुण्यतीर्थेंहि, या आमच्या पुण्यसरिताहि, ह्या भारतीय महाराज्यांत आज विमुक्त आणि विशुद्ध होऊन सामावलेल्या आहेत.

पण या पुण्यसरितांत सिंधु कां दिसत नाही ? सिंधु कोठे आहे ?

हाय ! हाय ! या पुण्यसरितांतील पुण्यतम सरिता जी सिंधु ती मात्र अद्यापि या महाराज्यांत सामावलेली नाही. सिंधु आम्हांस अजूनहि अंतरलेली आहे.

काय म्हणतां ? आता सिंधूस विसरा ! तिचें नांव त्या मंत्रांतून गाळून टाका आणि तो तुमचा स्नानाचा मंत्र आता यापुढे अर्धाच म्हणत जा ! नाही

तर अमके सोमे-गोमे आमच्यावर रागावतील, आमचा द्वेष करूं लागतील ! म्हणून सिंधूचा संबंध सोडून द्या !

छे ! छे ! सारें जग जरी आमचा द्वेष करूं लागलें किंवा साऱ्या जगाचा जरी आम्हांला द्वेष करावा लागला तरी सिंधूचा संबंध आम्ही सोडणार नाही, तोडणार नाही. सिंधूस आम्ही विसरूं ! सिंधूवांचून हिंदु ? अर्थावांचून शब्द ? प्राणावांचून कुडी ? अशक्य, अशक्य ! जोंवर एक तरी हिंदु जिवंत आहे तोंवर तो सिंधूस विसरणें शक्य नाही !

जिच्या काठांवर आमच्या प्राचीनतम वेदर्षींनी ऋचांची पहिली सामगायनें गायिलीं, जिच्या पुण्यसलिलांनी आपल्या संध्यावंदनांतील अर्घ्यें दिले आणि जिला अत्यादराने वेदांतील देवतांमध्ये स्थान देऊन तिच्यावर सुंदरांतील सुंदर सूक्तें रचलीं त्या तुला, हे ' अंबितमे, नदीतमे, देवीतमे ' सिंधु, आम्ही कधीहि विसरणार नाही. तुझ्या परिसरामध्ये आमच्या प्राचीनतम राजर्षींनी नि ब्रह्मर्षींनी केलेल्या यज्ञांच्या प्रदीप्त हुताशनांत जेव्हा हवि समर्पिले तेव्हा अंतराळांत उंच उंच दरवळत गेलेल्या त्यांच्या सुगंधांनी लालायित होऊन इंद्र, वरुण, मरुतादिक देव त्यांचे त्यांचे हविर्भाग स्वीकारण्यास तुझ्या तीरीं येत आणि सोमरसासमवेतच तुझे सुमधुर सलिल पिऊन प्रसन्न होत, त्या तुला, हे सुरसरिते सिंधु, आम्ही कधीहि विसरणार नाही. ''

अभिनव भारताची मुहूर्तमेढ जेथे रोवली त्या नाशिक शहरांत क्रांतिवीरांचें स्मारक उभारावें या विचाराने सावरकरांनी या स्मारकासाठी निधि जमविण्याचें ठरविलें. त्यासाठी नोव्हेंबरपासून त्यांनी ' हिंदुराष्ट्राच्या इतिहासांतील सहा सोनेरी पानें ' या विषयावर ठिकठिकाणीं व्याख्यानमाला आयोजित केल्या. राष्ट्राच्या इतिहासांतील कोणतें पान सोनेरी ठरतें याचें विवेचन करतांना ते म्हणाले, '' कोणत्याहि राष्ट्रावर पारतंत्र्यासारखें प्राणसंकट जेव्हा गुदरतें, आक्रमक परशत्रूच्या प्रबळ टाचेखाली तें स्वराष्ट्र जेव्हा पिचून गेलेलें असतें किंवा जाऊं लागतें तेव्हा तेव्हा त्या प्रबळ शत्रूचा पाडाव करून नि पराक्रमाची पराकाष्ठा करून स्वराष्ट्रास त्या पारतंत्र्यांतून मुक्त करणारी, त्या पारतंत्र्यांतून सोडविणारी आणि आपल्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचें आणि स्वराज्याचें पुनरुज्जीवन करणारी जी झुंझार पिढी, तिला नि तिला झुंजविणारे जे धुरंधरवीर नि विजयी पुरुष

त्यांच्या स्वातंत्र्ययुद्धाच्या वृत्तान्ताचें जें पान, त्या पानाला मी सोनेरी पान म्हणून संबोधितों." या भूमिकेवरून त्यांनी हिंदुराष्ट्राच्या इतिहासाचा अभ्यास करून सहा सोनेरी पानें श्रोत्यांपुढे मांडलीं. चंद्रगुप्त चाणक्य, यवनान्तक सम्राट् पुष्यमित्र, शककुशाणांतक विक्रमादित्य, हूणांतक यशोधर्मा, अटकेवर जरिपटका फडकतो व इंग्रजहि गेले, हिंदुराष्ट्राचें स्वातंत्र्य सिद्ध झालें अशा या सहा सोनेरी पानांचा स्फूर्तिदायक इतिहास कथन करून त्यांनी हिंदु तरुणांना पराक्रमाची आणि पुरुषार्थाची पूजा बांधण्याचें आवाहन केलें.

या व्याख्यानमालेचा समारोप करतांना सावरकर म्हणाले, "ज्या आमच्या पश्चिम समुद्रांतून आम्ही खड्गानेच साम्राज्य जिंकूं आणि खड्गानेच चालवूं अशी मदोन्मत्त गर्जना करीत ब्रिटिश साम्राज्यसत्ता आमच्या हिंदुस्थान देशावर चढून आली आणि थेट दिल्लीच्या सिंहासनावर आरुढ झाली त्याच दिल्लीच्या सिंहासनावरून तिला पुन्हा खाली ओढून आणि तिच्या त्या गर्विष्ठ खड्गाचे तुकडे उडवून त्याच आमच्या पश्चिम समुद्राच्या तटापर्यंत आम्ही परत पिटाळीत नेली आणि त्याच पश्चिम समुद्रांत बुडविली. पराभूत ब्रिटनचा शेवटचा सोजीर आम्हांला पाठ दाखवीत आणि मान खाली घालीत त्या पश्चिम समुद्रांत परत जातांना आम्हीं आपल्या डोळ्यांनी पाहिला. याप्रमाणे हिंदुस्थानवर ऐतिहासिक काळाच्या दोन सहस्र वर्षांमध्ये जीं परचक्रें चालून आलीं त्यांतील या सर्वांत महाबलाढ्य अशा ब्रिटिशांच्या सहाव्या परचक्राचीहि हिंदुस्थानने दाणादाण उडविली. त्यांच्या राजकीय दास्याचे तुकडे तुकडे केले. इंग्रजांवर मिळविलेला हा अश्वमेधीय विजय ज्या पानावर आम्ही लिहीत आहोंत तेंच हिंदुराष्ट्राच्या इतिहासांतील सहावें सोनेरी पान."

या अतिशय रोमहर्षक व्याख्यानमालेमुळे सावरकरांना अभिनव भारत स्मारक निधीसाठी अल्पावधींतच पैसे उभारणें सहज शक्य झालें व त्या आधारें १० मे १९५२ या दिवशीं, ज्या ठिकाणीं सावरकरांनी आणि त्यांच्या दोन सहकाऱ्यांनी अभिनव भारत या मातृभूमीच्या संपूर्ण स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांति-युद्धाचा रक्तध्वज उभारणाऱ्या संघटनेची स्थापना केली तेथें या स्वातंत्र्य-युद्धांत धारातीर्थीं पडलेल्या ज्ञात अन् अज्ञात हुतात्म्यांच्या पवित्र स्मृतीला गौरवांजलि वाहण्यांत आली. गेल्या पन्नास-साठ वर्षांतील असंख्य चित्तथरारक घटनांचा चित्रपट सावरकरांच्या डोळ्यांपुढून सरकला. दुसऱ्या दिवशीं ते भगूर

या आपल्या जन्मगावीं गेले आणि त्यांनी अष्टभुजेचें दर्शन घेतलें. भारताच्या स्वातंत्र्यासाठी मारतां मारतां मरण्याची शपथ त्यांनी याच देवीपुढे घेतली होती. त्या संकल्पाची पूर्ति करून देवीच्या दर्शनासाठी येण्याचें भाग्य लाभल्या-मुळे सावरकरांना केवढी तरी धन्यता वाटली. त्यांनी वयाची सत्तरी गाठली होती. कोणी तरी विचारलें, "तात्या, एवढ्या हालअपेष्टा पचवूनहि आपलें तेज अंशमात्रहि कमी झाले नाही ही जशी भाग्याची गोष्ट आहे तशीच आश्चर्याची आहे. तुमचें आयुष्य चमत्कारांनी भरलेलें आहे. पण त्यांतहि एवढ्या आपदा सोसून आपल्याला लाभलेलें दीर्घायुष्य हा महान् चमत्कार आहे."

"मी माझ्या प्रबळ इच्छाशक्तीवर जगत आहें"— सावरकरांनी उत्तर दिलें.

भारत स्वतंत्र होतांच पूर्वसीमेवरील नागा जमातीने भारताच्या सार्व-भौमत्वाला आव्हान देण्यास प्रारंभ केला. ख्रिश्चन मिशनऱ्यांनी नागा जमातीला आपल्या ख्रिश्चन धर्माची दीक्षा दिली असल्यामुळे ती जमात भारतापासून फुटून निघण्याची भाषा बोलूं लागली. धर्मान्तर हेंच राष्ट्रान्तर कसें ठरतें या-संबंधी सावरकरांनी केलेल्या मीमांसेचा नागांचें बंड हा बोलका पुरावा होता. १९५३च्या डिसेंबरमध्ये पुण्यास या विषयासंबंधी बोलतांना सावरकर म्हणाले, "या धर्मान्तराच्या काव्यावर करडी नजर ठेवा. धर्म म्हणजे केवळ पारमार्थिक गोष्टींची चर्चा, केवळ द्वैत-अद्वैताचे वादविवाद किंवा चेतन-अचेतन वस्तूचा शोध नव्हे. धर्म म्हणजे व्यवहार, धर्म म्हणजे इतिहास, धर्म म्हणजे राष्ट्र! आणि हा असा धर्म कोणाला सुटला आहे! इंग्लंडचा राजा प्रॉटेस्टंट नसला तर त्यास गादीचें त्यागपत्र द्यावें लागतें. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला प्रॉटेस्टंट बायबलची शपथ घ्यावी लागते. मध्य-पूर्वेतील प्रत्येक लहान लहान राष्ट्रहि धर्मप्रधान आहे. आम्ही जग पाहून आलेले लोक, आम्हांस मिशनऱ्यांनी निधर्मीपणाच्या गप्पा काय सांगाव्या! मनुष्य धर्मातीत राहूंच शकत नाही. धर्म हें प्रचंड सामर्थ्य आहे. निधार्मिक असलेल्या स्टॅलिनलाहि हें मान्य करावें लागलें."

राष्ट्रजीवनांतील धर्माचें महत्त्व विशद केल्यानंतर देशांत सध्या ज्या मिशनऱ्यांच्या कारवाया चालू आहेत त्याची माहिती देऊन सावरकर म्हणाले,

"आज आपल्या देशांत परकीय मिशनऱ्यांनी उचल केली आहे. गोवें-त्रावणकोरमध्ये त्यांनी दंगे करून धर्मान्तर घडवून आणलें आहे. इतरत्र शिक्षण, औषधें, अन्नछत्रें आदि मार्गांनी ते धर्मान्तर घडवून आणीत आहेत. पण धर्मान्तर म्हणजेच राष्ट्रान्तर होय. हिंदूंमध्ये सहिष्णुतेचें वेड फार बोकाळलें आहे. हिंदु धर्मासारखा सहिष्णु धर्म नाही हा विचार परकीयांनी प्रचारिला आहे. हिंदु धर्म हा कांही अंशीं सहिष्णु तर कांही अंशीं असहिष्णु आहे. न्यायाशीं सहिष्णुता व अन्यायाशीं असहिष्णुता ही हिंदु धर्माची शिकवण आहे ! अन्यायाशीं साहिष्णुता दाखविणें मुर्दाडपणा होय. म्हणून यापुढे हिंदूंनी ख्रिश्चन धर्मप्रचारकांच्या कारवायांना धैर्याने तोंड दिलें पाहिजे. या गोष्टी वेळींच केल्या तर धर्मान्तरामुळे होणाऱ्या राष्ट्रान्तराचा धोका टळेल."

भाषणाच्या अखेरीस ते म्हणाले, "पुण्यास येणें मला नेहमीच आवडतें, पण आता प्रकृति ठीक राहत नसल्यामुळे बहुधा ही शेवटचीच भेट ठरेल. आता क्वचित् पुढे पुण्यास आलों तर ते ओंकारेश्वरावर जाण्यासाठीच येईन. इतके दिवस आपल्या समाजाला सारखें सांगून मी आता थकलों आहें. सिंधच्या फाळणीपासून मुसलमानी कारवायांबाबत मी सतत इशारा देत आलों आहें. सिंधी बंधूंनी तेव्हा माझें ऐकलें असतें तर आज निर्वासित होऊन त्यांना येथे यावें लागलें नसतें. निदान यापुढे तरी आपल्या समाजाने जागरूक राहवें एवढेंच माझें सांगणें आहे."

जगांतील प्रत्येक राष्ट्र सामर्थ्यसंपन्न होण्यासाठी झटत असतांना भारताने शांतीची जपमाळ ओढून शस्त्रास्त्रसंपन्न होण्याकडे दुर्लक्ष करावें या गोष्टीची सावरकरांना अक्षरशः चीड येई. खडतर प्रयत्नांनी मिळविलेलें स्वातंत्र्य रक्षिण्यासाठी सामर्थ्याची उग्र उपासना करावयास हवी हा त्यांचा आग्रह किती रास्त होता हें चीनच्या व पाकिस्तानच्या आक्रमणांवरून सिद्ध झालेंच. चीनने १९६२ च्या ऑक्टोबरमध्ये भारतावर आक्रमण केलें. तत्पूर्वी आपल्याला 'हिंदी-चिनी भाई भाई'च्या गर्जना ऐकावयास येत होत्या. चीनसारखें साम्यवादी राष्ट्र भारतावर कधीहि आक्रमण करणार नाही असें पं. नेहरू मोठ्या अट्टाहासाने सांगत होते आणि चौ-एन्-लाय भारत-चीन मैत्रीचा पुकारा करीत असतांनाच भारतावरील आक्रमणाची तयारी करण्यांत गर्क झाले होते. सामर्थ्यसंपन्न चीनच्या एका धक्क्यासरशीं भारताचा शांतिपाठ कसा कोलमडल

हें महिन्याभरांतच दिसून आलें. ही गोष्ट १९६२ ची; परंतु सावरकरांनीं १९५४ च्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जो लेख लिहिला होता त्यांत त्यांनी या धोक्याची संपूर्ण जाणीव करून दिली होती. ते लिहितात –

" वास्तविक पाहतां ज्या दिवशीं आपलें हें भारतीय लोकसत्ताक महाराज्य स्थापित झालें त्याच दिवसापासून आपलें भौमिक, सामुद्रिक आणि वैमानिक शस्त्रबळ वाढविण्याचें व तें अद्ययावत् आयुधांनी सज्ज ठेवण्याचें कार्य आम्हीं तत्काळ हातीं घ्यावयास हवें होतें. पण गेलीं सोन्यासारखीं सहा वर्षें आम्हीं फुकट घालविलीं. नीरा-केंद्रांपासून तो वनमहोत्सवांपर्यंत इतर वाटेल त्या सापेक्षतः अगदी दुय्यम महत्वाच्या असणाऱ्या रिकाम्या नि निकामी उलाढालींतच काळ दवडला! तसा या गोष्टीचाहि कांही उपयोग असतोच. जसा घरांत लहान मुलांच्या पुरता भातुकलीचाहि उपयोग असतो. पण एक महाराज्य हातीं येतांच व त्याच्याभोवतीं शत्रूंचा गराडा पडला आहे हें दिसतांच प्रथमतः सर्व लक्ष त्या महाराज्याचें सामरिक संरक्षण करण्यासाठी अत्यावश्यक अशा शस्त्रबळाची सिद्धता करण्यावरच लक्ष केंद्रित करावयास हवें होतें. पण नेमकें तेंच कर्तव्य आम्हीं जवळ जवळ प्रतिज्ञापूर्वक टाळलें. शाळा, प्रशाळा व महाशाळा यांतून तरुण पिढीस सक्तीचें सैनिकी शिक्षण देण्याची अगदी प्राथमिक गोष्ट सुद्धा अजून हातीं घेतलेली नाही. भोंगळ तत्त्वांच्या शब्दांचे बुडबुडे उडवीत व कागदी घोडे नाचवीत आम्ही शांततेचा दिग्विजय करण्यास निघालों.

" तेच चीनकडे पाहा. याच सहा वर्षांत चीनने त्याचें सारें राष्ट्र अद्ययावत् आयुधांनी शस्त्रसज्ज नि संरक्षणक्षम करून दाखविलें. इतकेंच नव्हे तर, भारताला भीक न घालतां तिबेटचें कीलक राष्ट्र ( Buffer State ) नष्ट करून चीनने त्याच्या महाराज्याच्या विस्तीर्ण सीमांची बळकट तटबंदी केली आणि मनांत येतांच भारतावर सरळ आक्रमण करतां यावें अशा प्रकारें त्याच्या सीमा आमच्या हिंदुस्थानच्या सीमांशीं रेटारेटीने भिडवून टाकल्या. त्या बळावरच आज चीन उघडपणें नेपाळ आणि भुतान या उरलेल्या कीलक राष्ट्रांनाहि गिळून टाकण्याचे डाव खेळत आहे. इतकेंच नव्हे तर, गंगोत्रीपासून बद्रिकेदारपर्यंतच्या आपल्या जिल्हाळ्याच्या अंतर्गत प्रदेशावरहि आपले अधिकार सांगूं लागला आहे.

" तिकडे दुसऱ्या टोकाला पाकिस्तान-अमेरिकेची आता खरोखरीच आपल्याहून बलाढ्य झालेल्या परकीयांची आक्रमक सैन्यें ! पाकिस्तानलाहि जन्मून आपल्यासारखी पांच-सहा वर्षेंच झालीं. परंतु पाकिस्तानने आपल्यासारखें भ्रांतिनिष्ठ राजकारणाच्या मागे न लागतां वस्तुनिष्ठ राजकारण हातीं घेतलें आणि आपलें मुख्य लक्ष सामरिक शक्ति वाढविण्याच्या प्राथमिक कर्तव्यावरच केंद्रित करून व परराष्ट्रीय कारस्थानांचे अनेक डावपेच खेळत खेळत पाक-अमेरिकन संधीमुळे ते आज आमच्या मानगुटीस बसण्याइतकें प्रबळ झालें आहे हें खचित.

" जर गेल्या पांच-सहा वर्षांत वर दिलेल्या चीन प्रभृति राष्ट्रांनी दाखविलेल्या तडफेने आमच्या राष्ट्रानेहि भ्रांतिनिष्ठ राजकारणाच्या मागे न लागतां वस्तुनिष्ठ राजकारणच अवलंबिलें असतें, प्रथमपासून आपलें सामरिक सामर्थ्य वाढविण्याचें आटोकाट प्रयत्न केले असते आणि त्या दिशेने परराष्ट्रीय संधिविग्रहांचीं कारस्थानें खेळविलीं असतीं तर भारतहि तसाच बलाढ्य झाला असता. आम्हीहि ब्रिटन-रशियासारखे स्वतंत्रपणें स्वतःच्या प्रयोगशाळेंत अणुबॉंब सुद्धा करूं शकलों असतों; अद्ययावत् शस्त्रास्त्रांनी सुसज्ज अशा प्रचंड भूदलाच्या, सिंधुदलाच्या नि वैमानिक दलाच्या संरक्षणाने अकुतोभय झालेला आपला आजचा सुदर्शनचक्रांकित राष्ट्रीय ध्वज आपल्या दुर्धर्ष तेजाने आज हिमालयावर फडकत राहिला असता. "

१९५६ मध्ये मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे या घोषणेने महाराष्ट्राचा सारा परिसर दुमदुमून गेला. सर्व राज्यांची भाषावार पुनर्रचना करण्यांत आली असतांना कॉंग्रेस-श्रेष्ठांच्या मनांत महाराष्ट्राबद्दल आकस असल्याने त्यांनी संयुक्त महाराष्ट्राची मागणी नाकारून विशाल द्विभाषिक मुंबई राज्य निर्माण केलें. साहजिकच साऱ्या महाराष्ट्रभर या निर्णयाविरुद्ध संतापाची लाट उसळली. साऱ्या देशाच्या बाबतींत जो नियम केला तो महाराष्ट्राच्या बाबतींत लागू न करण्यांत कॉंग्रेस-श्रेष्ठांच्या महाराष्ट्रद्वेषाशिवाय दुसरें कारण नव्हतें. म्हणून संयुक्त महाराष्ट्राची मागणी न्याय्य आहे व ती मान्य करावयास सरकारला भाग पाडलेंच पाहिजे असें सावरकरांनी जाहीर केलें. परंतु भाषावार राज्यरचनेमुळे कदाचित् भारताच्या अखंडत्वाच्या भावनेला तडा जाईल अशी

शंका वाटल्यामुळे सावरकरांनी या चळवळीचा हिरीरीने पुरस्कार केला नाही. वस्तुतः एखाद्याला लोकप्रियताच मिळवावयाची असती तर त्याने या आंदोलनाचा आवेशाने पुरस्कार केला असता. परंतु सावरकरांनी लोकप्रियतेचा मोह टाळून महाराष्ट्रापेक्षा भारत मोठा आहे, या आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार केला. याचा अर्थ महाराष्ट्रासंबंधी त्यांच्या मनांत प्रेम नव्हतें असें नाही. उलट परकी आक्रमणांना एकट्या महाराष्ट्राने तोंड दिलेलें असल्यामुळे महाराष्ट्रानेच यापुढेहि भारताचा खड्गहस्त झालें पाहिजे असें त्यांनी वारंवार आवाहन केलें. परंतु त्यांच्या डोळ्यांपुढे सदैव प्रतिमा असे ती भारतमातेची, केवळ महाराष्ट्राची नव्हे, एवढेंच यावरून दिसून येतें. 'महाराष्ट्र की जय' ही आपली घोषणा न होतां 'भारतमाता की जय' ही आपली घोषणा असली पाहिजे असें त्यांचें नेहमी प्रतिपादन असे.

२३ जुलै १९५६ रोजीं देशभर लोकमान्य टिळकांच्या जन्मतिथीचा सोहळा भव्य प्रमाणांत साजरा करण्यांत आला. यानिमित्ताने पुण्याला शनिवारवाड्यासमोर जी विराट् सभा भरली होती तिला उपस्थित राहून सावरकरांनी लोकमान्यांना श्रद्धांजलि वाहिली. ते म्हणाले, "आजच्या शुभ प्रसंगीं लोकमान्यांच्या स्मृतीसाठी दिल्लींत एकवीस तोफांची वंदना झडली असती तर काय सरकारचा फार खर्च झाला असता. दिल्ली राजधानी निर्माण करण्याचा पाया तयार करण्यांत बाळ गंगाधर टिळक या एका महान् शिलेचा नाश झाला आहे हें भारतीय जनता विसरूं शकत नाही."

स्वातंत्र्यासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या लो. टिळकांची जन्मशताब्दी स्वतंत्र भारतांत साजरी होत आहे याबद्दल आनंद व्यक्त करतांना सावरकर म्हणाले, "आज आम्ही लोकमान्यांना मुक्तकंठाने सांगूं शकतों की, महाराज, आपण जें महान् कार्य आरंभिलेंत, ज्यासाठी आपण आमरण झुंजलांत, तें आपलें अपुरें राहिलेलें कार्य आम्हीं आपल्या आशीर्वादाने पुरें केलें. स्वातंत्र्यपूर्ण वातावरणांत आम्ही हा उत्सव साजरा करीत आहोंत. इतिहासाच्या एका सोनेरी पानावर आज आम्ही उभे आहोंत. पुष्यमित्रानंतर एवढा मोठा प्रदेश एका सत्तेखाली यापूर्वी कधीच आला नव्हता. आज एवढा मोठा भूभाग स्वतंत्र म्हणून नांदत आहे व त्या आनंदांत आम्ही लोकमान्यांना आदरांजलि अर्पण करीत आहोंत यापरती भाग्याची गोष्ट ती कोणती?"

त्या वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यांत जोधपूर येथे भरलेल्या हिंदुमहासभेच्या अधिवेशनाला सावरकर उपस्थित राहिले. त्या वेळीं त्यांनी भारताने इस्रायेलशीं मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले पाहिजेत असे सुचविलें. ते म्हणाले की, " उद्या भारत आणि पाकिस्तान यांच्यांत युद्ध सुरू झालें तर ज्या मुस्लिम राष्ट्रांच्या मैत्रीखातर आपण इस्रायेलशीं राजनैतिक संबंध निर्माण करीत नाही ती मुस्लिम राष्ट्रें पाकिस्तानच्या बाजूने उभीं राहतील आणि त्यांचा शत्रु जो इस्रायेल हा आपल्याला मदत करूं शकेल. शांततेचीं आणि पंचशीलांचीं गाणीं समर्थ राष्ट्राने गावयाचीं असतात. कारण शांततारक्षण करण्याचें त्यांच्यांत सामर्थ्य असतें. म्हणून भारताला तर शांततेचा ध्यास लागला असेल तर त्याने आधुनिकांतील आधुनिक शस्त्रास्त्रें संपादन केलीं पाहिजेत. इतर राष्ट्रें हैड्रोजन बॉंब तयार करत असतील तर आपण त्याच्यापेक्षा शक्तिशाली असा ऑक्सिजन बॉंब शोधून काढला पाहिजे. "

१९५७ हें वर्ष उजाडलें आणि सावरकरांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची शताब्दी साजरी करण्याचें ठरविलें. १८५७ चें युद्ध हें शिपायांचें बंड नसून तें स्वातंत्र्यसमर होतें हा सिद्धान्त प्रथम त्यांनीच मांडला होता. १९०७ सालीं लंडनमध्ये त्यांनी या स्वातंत्र्यसमराची अर्धशताब्दी साजरी केली तेव्हा त्यांना कल्पनाहि नव्हती की, या समराची शताब्दी स्वतंत्र भारतांत साजरी होईल आणि ती पाहण्याचें भाग्य आपल्याला लाभेल. ' क्रांतिकारकाला विजय किंवा मृत्यु या दोनच गोष्टी माहीत असतात, त्याला तह माहित नसतो ' असें या स्वातंत्र्यसमराची अर्धशताब्दी साजरी करतांना सावरकर म्हणाले होते. क्रांतिकारकाला अभिप्रेत असलेल्या विजयाच्या म्हणजेच मातृभूमीच्या स्वातंत्र्यासाठी सावरकर मृत्यूला अनेकदा सामोरे गेले. परंतु सावरकरांनी मृत्यूवर मात करून स्वतंत्र भारतांत १८५७ च्या स्वातंत्र्यसमराची शताब्दी दिल्ली येथे १० मे रोजीं मोठ्या उत्साहाने साजरी केली. गांधी-खून खटल्यांतून मुक्तता झाल्यानंतर सावरकर प्रथमच दिल्लीला गेले होते. त्यामुळे दिल्ली स्थानकापासून चांदणी-चौकापर्यंत त्यांची जी भव्य मिरवणूक काढण्यांत आली ती पाहून सावरकर गहिवरले.

१२ मे रोजीं रामलीला मैदानावर जमलेल्या जनसागरापुढे बोलतांना सावरकरांनी १८५७ च्या स्वातंत्र्यसंगराचा तेजस्वी इतिहास आपल्या ओघवत्या

आणि नाट्यपूर्ण शैलींत कथन केला. ते म्हणाले, " जगाला युद्ध पाहिजे की बुद्ध पाहिजे असा प्रश्न नेहमीं विचारला जातो. अहिंसा आणि शांति ही तत्त्वें कांही आम्हांला नवीं नव्हेत. वेदकाळापासून आम्ही शांततेचा जप करीत आलों आहोंत. परंतु समाजाला स्वसंरक्षणासाठी मंत्र नव्हे तर शस्त्र उपयोगी पडतें असाच इतिहासाचा दाखला आहे. आज देशाच्या आर्थिक विकासासाठी अनेक योजना हातीं घेण्यांत येत आहेत. परंतु देशाचें संरक्षण करण्याचें आपल्यांत सामर्थ्य नसलें तर ही संपन्नता शत्रूच्याच उपयोगी पडेल. म्हणून आत्मरक्षणासाठी आणि आत्मविकासासाठी शस्त्रबळाची उपासना करावयास हवी."

दिल्लींतील वास्तव्यांत त्यांनी देशी व परदेशी वृत्तपत्रप्रतिनिधींशींहि मनमोकळी चर्चा केली. क्रांतीचा विषय निघाला असतांना ते म्हणाले, " युद्ध काय किंवा क्रांति काय, तिचा प्रारंभ व्हावयास अगदी लहानसें कारण देखील पुरेसें होतें. १८५७ च्या क्रांतियुद्धाच्या बाबतींत देखील तसेंच घडलें. त्या वेळची सामाजिक परिस्थिति लक्षांत घेतां आम जनता त्या युद्धांत सहभागी झाली नाही हें स्वाभाविकच मानावयास हवें. शेवटीं पोलादी निर्धाराने उभ्या राहिलेल्या मूठभर लोकांचा गटच क्रांतीचें नेतृत्व करीत असतो. लोक तिच्यांत सहभागी होतात ते नंतर. तिचें यश नजरेच्या टप्प्यांत येऊं लागल्यानंतर."

दिल्लींतील कार्यकर्त्यांचा आणि अनुयायांचा निरोप घेतांना सावरकरांचे डोळे पाणावले होते. भावनोत्कट स्वरांत ते सांगूं लागले, " गेल्या पंचावन्न-साठ वर्षांच्या माझ्या सार्वजनिक जीवनांत चार पिढ्यांनी माझ्याबरोबर कार्य केलें. पण मी माझ्या सहकाऱ्यांना आणि अनुयायांना कांहीहि देऊं शकलों नाही. आणि तरीहि माझ्या नेतृत्वावर ज्यांनी अढळ निष्ठा ठेवली त्यांचें कसें उतराई व्हावें हें कळत नाही. माझ्या अनुयायांच्या नशिबीं सदैव उपेक्षाच आली. सतत उपेक्षा, सतत पराभव, सतत मानहानि हें ज्यांचें जीवन झालें त्या अनुयायांची निष्ठा पाहून मी स्वतःला धन्य समजतों. एक गोष्ट लक्षांत ठेवा, आज आपला पक्ष पराभूत आहे. परंतु मी आणि तुम्ही आयुष्यभर जें सांगत आलों तेंच बरोबर होतें अशी या समाजाला एक ना एक दिवस कबुली द्यावीच लागेल."

२८ मे १९५८ रोजीं सावरकरांच्या वयास ७५ वर्षें पूर्ण झालीं म्हणून त्यांचा अमृतमहोत्सव साजरा करण्याचें ठरलें. त्या दिवशीं मुंबई महापालिकेने कमला नेहरू उद्यानांत त्यांना मानपत्र देऊन सत्कार केला. सत्काराला उत्तर देतांना भारत रशियाएवढा बलिष्ठ झालेला पाहवयास मिळावा एवढीच आपली अंतिम इच्छा असल्याचें त्यांनी सांगितलें. ५ जुलै रोजीं मुंबईच्या नागरिकांतर्फे आयोजित करण्यांत आलेल्या सत्कार-समारंभांत बोलतांना ते म्हणाले, "आमच्या पिढीने आपलें कर्तव्य पार पाडलें आहे. हिंदुस्थान स्वतंत्र झाला आहे. पुढच्या पिढींत आमच्यापेक्षाहि महान् व्यक्ति जन्माला येवोत आणि त्यांच्या हातून हा भारतवर्ष अधिक समर्थ, अधिक संपन्न होवो. अखंड हिंदुस्थान पुन्हा प्रस्थापित करण्याचें विजिगीषु ध्येय पुढच्या पिढ्यांनी आपल्या डोळ्यांसमोर ठेवावें यापेक्षा आम्ही दुसरें कांही मागत नाही."

पुणें महापालिकेने ६ नोव्हेंबर रोजीं सावरकरांना मानपत्र अर्पण करून अमृतमहोत्सवानिमित्त त्यांचें अभीष्टचिंतन केलें. शिवाजी हा पुण्याचा पहिला नागरिक होता व तेव्हापासून पुण्याने दिल्लीशीं सतत झुंज घेतल्याने दिल्ली-शहांच्या मनांत पुण्याबद्दल अप्रीति आहे असें या प्रसंगीं बोलतांना सावरकरांनी सांगितलें. ते पुढे म्हणाले, "लोकशाही नेहमीच चांगली असते असें नाही. कधी कधी देशाला लष्करी राजवटीचीहि गरज असते. शिवाजीने कांही निवडणुका लढविल्या नाहीत. त्याने निवडणूक लढविली असती तर तो नक्कीच पराभूत झाला असता. शिवाजीचा भवानी तलवारीवर आणि वाघनखांवर विश्वास होता व म्हणूनच तो मोंगलांशीं दोन हात करून हिंदुपदपादशाही स्थापन करूं शकला. सत्प्रवृत्त हुकूमशाही ही देखील कधी कधी राष्ट्राची गरज ठरते."

पुणें विद्यापीठाने सावरकरांना डी. लिट्. (सन्माननीय) पदवी देण्याचें ठरविलें. परंतु या पदवीदान-समारंभास सावरकर हजर राहूं शकले नाहीत. म्हणून ८ ऑक्टोबर १९५९ रोजीं विद्यापीठाच्या कुलगुरूंनी मुंबईस जाऊन सावरकर-सदनामध्ये त्यांना पदवीपत्रक अर्पण केलें. सावरकर गंमतीने म्हणाले, "जें वास्तविक तरुणपणीं मिळावयास हवें होतें तें या म्हातारपणांत मला मिळत आहे." सावरकरांना मिळालेली ही दुसरी डॉक्टरेट. यापूर्वी १९४३ मध्ये नागपूर विद्यापीठाने त्यांना एल्. एल्. डी. पदवी देऊन त्यांच्या

साहित्यसेवेचा गौरव केला होता. मुंबई विद्यापीठाने १ जुलै १९११ रोजीं काढून घेतलेली सावरकरांची बी. ए.ची पदवी ३० एप्रिल १९६७ रोजीं त्यांना परत करून आपल्या कर्तव्याची पूर्ति मानली !

१ मे १९६० रोजीं संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाल्यामुळे सावरकरांनी समाधान व्यक्त केलें. ते आपल्या संदेशांत म्हणाले, " महाराष्ट्र हा भारताचा खड्गहस्त झाला पाहिजे. "

सावरकरांना २४ डिसेंबर १९१० रोजीं जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यांत आली होती. त्या शिक्षेनुसार त्यांची २४ डिसेंबर १९६० रोजीं मुक्तता होणार होती. सुदैवाने हा दिवस पाहण्यासहि सावरकर आपल्यांत आहेत या भावनेने त्यांच्या अनुयायांनी २४ डिसेंबर १९६० हा दिवस मृत्युंजय-दिन म्हणून साजरा करण्याचें ठरविलें. त्या दिवशीं ठिकठिकाणीं सभा होऊन मृत्युंजय सावरकरांचें अभीष्टचिंतन करण्यांत आलें. या मृत्यंजय-महोत्सवानिमित्त १९ जानेवारी १९६१ रोजीं पुण्यांत सावरकरांचा भव्य सत्कार करण्यांत आला. प्रकृति ठीक नसतांनाहि सावरकर लोकाग्रहामुळे या समारंभास उपस्थित राहिले. या समारंभात ते भाषण करूं लागले तेव्हा त्यांचा स्वर अगदी क्षीण होता. परंतु अकस्मात् त्यांना कोठून तरी दिव्य शक्ति प्राप्त झाली आणि पुन्हा त्यांची तेजस्वी वाणी गर्जूं लागली– " हिंदुस्थान स्वतंत्र झाला तेव्हा जर मी अध्यक्ष झालों असतों – मला व्हायचें नाही, पण झालों असतों – तर पहिल्या दिवशीं दोन मानचित्रें मीं माझ्या डोळ्यांपुढे ठेवलीं असतीं. एक म्हणजे हिंदुस्थानच्या आजच्या सीमा कोणत्या आहेत त्या निश्चित करून घेतल्या असत्या आणि दुसऱ्या मानचित्रांत प्राचीन काळांत आमच्या सरसीमा कोठपर्यंत होत्या तें दाखविलें असतें. त्या सीमा पाहून आजची ही जी No man's land आहे ती Hindu man's land करून आमची सेना तेथे नेऊन ठेवली असती. अध्यक्ष वगैरे व्हायचें माझ्या मनांत बिलकूल येत नाही. पण जर तुमचें मत असेल तर मी अध्यक्ष होईन आणि दोन वर्षांच्या आंत मी हा देश ख्रुश्चोव्हच्या रशिया-पेक्षा बलाढ्य करून दाखवीन. दोन वर्षांच्या आंत. हो, हो, दोन वर्षांच्या आंत. त्याने जसा जगास जोडा दाखवला तसा मी माझा बूट उचलून संबंध जगास दाखवीन. अरे, या गोष्टी शक्तीच्या असतात. "

२० ऑक्टोबर १९६२ रोजीं कम्युनिस्ट चीनच्या सेनेने मॅकमॅहान रेषा ओलांडून भारतावर आक्रमण केलें. लडाखमधील अक्साई चीन हा विभाग तर चीनने चार वर्षांपूर्वीच व्यापला होता असें या वेळीं जाहीर करण्यांत आलें. चीनच्या या संभाव्य आक्रमणाला कॉंग्रेसेतर पक्षाचे नेते सरकारला वारंवार इशारा देत होते. परंतु चीनसारखें कम्युनिस्ट राष्ट्र भारतावर आक्रमण करणार नाही असें नेहरू आणि त्यांचे सहकारी पुनः पुन्हा सांगत होते. खरें म्हणजे देशाच्या संरक्षणाचा आतापर्यंत सरकारकडून विचारच करण्यांत आला नव्हता. त्यामुळे पुरेशा शस्त्रास्त्रांच्या व साधनांच्या अभावीं शूर भारतीय सैनिकांना सर्व आघाड्यांवर माघार घ्यावी लागली. या चिनी आक्रमणाने नेहरू-नीतीची सारी प्रतिष्ठा पार लयास गेली. २० नोव्हेंबर रोजीं एकतर्फी युद्धबंदी करून चीन आपली सेना मागे घेईपर्यंत भारताची सारी मदार ब्रिटन व अमेरिकेकडून येणाऱ्या लष्करी मदतीवर उभी होती.

सावरकरांना या घटनेमुळे अतीव दुःख झालें. स्वातंत्र्यप्राप्तीपासून लोकांची आणि राज्यकर्त्यांची उपेक्षा सहन करून आपण हें सारें सांगत असतांना पंचशीलाचे गोडवे गाण्यांत रममाण झालेल्या सरकारला जाग आली नाही ही जाणीव अधिक क्लेशदायक होती. युद्ध का बुद्ध या शांतिवाद्यांच्या लाडक्या प्रश्नाचें रोखठोक उत्तर चीननें दिलें होतें. सावरकरांची आपलेपणाची भाषा समजून न घेणाऱ्या नेहरू-सरकारला चीनची उद्धट भाषा समजावून घ्यावी लागली.

१९६३ च्या मेच्या अखेरीस मोरीमध्ये पाय घसरून सावरकर पडले व त्यामुळे त्यांच्या डाव्या मांडीचें हाड मोडलें. महिनाभर रुग्णालयांत राहिल्यानंतर सावरकर घरीं परतले व दोन-तीन महिन्यांत घरांतल्या घरांत थोडसें हिंडूं-फिरूं लागले. १६ ऑक्टोबर रोजीं माई – त्यांच्या पत्नी – आजारी पडल्या. त्यांना रुग्णालयांत हलविण्यांत आलें. ८ नोव्हेंबर रोजीं माईचें रुग्णालयांत निधन झाल्यानंतर त्यांचा पार्थिव देह तसाच रुग्णवाहू गाडींतून चंदनवाडींत नेण्यांत यावा व विद्युत्दाहिनीवर त्यांचा अंत्यसंस्कार करण्यांत यावा असें सावरकरांनी सांगितलें. ते म्हणाले, “ माई गेली, तिचें सोनें झालें. तिने स्वातंत्र्य पाहिलें. होणार नव्हता तो संसारहि केला. आम्हां दोघांपैकी कोणी तरी एकजण आधी जाणारच होते. ती गेली. अहेवपणीं मरण्याचें भाग्य

तिला लाभलें." सावरकरांचा धार्मिक क्रियाकर्मांतरावर विश्वास नसल्यामुळे त्यांनी माईचें श्राद्ध केलें नाही. माईच्या निधनानंतर सावरकरांनी आपलें जें मृत्युपत्र लिहून ठेवलें त्यांतहि आपल्या निधनानंतर आपल्या देहावर विद्युत्-दाहिनींत अंत्यसंस्कार करावा व श्राद्ध आदि धार्मिक विधि करूं नयेत असें सांगितलें होतें. त्याचप्रमाणे धार्मिक विधि न केल्यामुळे वांचणारे पैसे एखाद्या सार्वजनिक संस्थेस द्यावेत व आपल्या निधनानिमित्त सुट्टी न घेतां लोकांनी हिंदुसंघटनेचें कार्य पुढे चालविण्याची प्रतिज्ञा घ्यावी असेंहि त्यांनी या मृत्युपत्रांत म्हटलें होतें.

१९६२ च्या ऑक्टोबरांतील चीनच्या आक्रमणानंतर १९६५ च्या सप्टेंबरमध्ये पाकिस्तान पुढे सरसावलें. १ सप्टेंबर रोजीं पाकिस्तानी सेनेने आंतरराष्ट्रीय सीमारेषा ओलांडून भारतीय भूमीवर पाय ठेवला. परंतु यापूर्वीच नेहरूंचें निधन होऊन लालबहादूर शास्त्री यांच्यासारख्या वास्तववादी प्रवृत्तीच्या नेत्याकडे देशाचीं सूत्रें आलीं होतीं. पाकिस्तानचें हें तिसरें आक्रमण होतें. त्यामुळे यापुढे त्याच्याशीं वाटाघाटींचा आणि निषेध-खलित्यांचा घोळ घालत न बसतां पाकिस्तानला समजणाऱ्या भाषेंत उत्तर देण्याचें शास्त्रीजींनी ठरविलें. ६ सप्टेंबर रोजीं भारतीय सैनिकांनी पाकिस्तानी भूमीवर पाय रोवून लाहोरच्या दिशेने कूच करताच सावरकरांना परमावधीचा आनंद झाला. आणि ६ सप्टेंबर या दिवसाचें त्यांनी सातवें सोनेरी पान असें वर्णन केलें. स्वाभिमानी राष्ट्र आपल्या स्वातंत्र्याच्या रक्षणासाठी परिणामांची पर्वा न करतां सर्व शक्तिनिशीं प्रतिकारास कसें उभें राहतें हें शास्त्रीजींच्या नेतृत्वाखाली भारताने दाखवून दिलें. सावरकरांचा पाकिस्तानबाबतचा इशारा खरा ठरला होता. सावरकरांचा सैनिकीकरणाचा आग्रहहि बरोबर ठरला होता. त्यांनी आयुष्यभर ज्या तत्त्वांचा पुरस्कार केला तीं सारीं तत्त्वें सावरकरांना श्रेय न देतां स्वतंत्र भारताच्या सरकारला स्वीकारावीं लागलीं.

सावरकरांना वाटलें आपण कृतार्थकाम झालों. ज्यासाठी हा सारा अट्टाहास चालला होता तो फलद्रूप झाला. यापुढे या शरीराचा भार कशासाठी सहन करावयाचा ! 'आत्महत्या आणि आत्मार्पण' या शीर्षकाखाली 'सह्याद्रि' मासिकाच्या १९६४ च्या डिसेंबरच्या अंकांत लिहिलेल्या लेखांत त्यांच्या मनांत कोणते विचार घोळत होते याची कल्पना येते. सावरकर म्हणतात,

"जें जीवनांत संपादावयाचें होतें तें सर्व संपादिलेलें आहे म्हणून आता कर्तव्य असें कांही उरलेलें नाही अशा कृतकृत्य भावनेने रिक्तकाम किंवा पूर्णकाम झालेले धन्य पुरुष आपण होऊन आपले प्राण विसर्जन करतात. ते आपलें नश्वर जीवन विश्वाच्या चिरंतन जीवनांत विलीन करतात. आपल्या या जीवनकार्याची सापेक्षतः परिपूर्णता झाली आहे अशी आत्म-संतुष्टता वाटल्यानंतर समाजाला किंवा स्वतःला जो देह वार्धक्याने म्हणा, व्याधीने म्हणा, पण केवळ भारभूत असाच राहणार आहे त्या देहाचा गुहा-प्रवेशाने, प्रायोपवेशनाने, अग्निदिव्याने, समुद्रसमाधि किंवा जलसमाधि किंवा अंतिम योगसमाधि घेऊन किंवा अशाच कोणात्या तरी मार्गाने. जे त्याग करतात तें त्यांचें कृत्य उत्तान अर्थी बळाने जीव देणेंच असतांहि त्यास आत्म-समर्पण म्हणून जें गौरविलें जातें तें यथार्थच असतें!"

धन्योऽहं धन्योऽहं कर्तव्यं मे न विद्यते क्वचित्
धन्योऽहं धन्योऽहं प्राप्तव्यं सर्वमद्य संपन्नम्

# १२
# अंतिम योगसमाधि

३ फेब्रुवारी हा दिवस उजाडला. सावरकरांनी सर्व कर्तव्यांच्या ऋणांतून मुक्त झाल्यामुळे अतिशय समाधानी मनःस्थितींत उपोषणास प्रारंभ केला. गेले कांही दिवस प्रकृति ठीक नसल्यामुळे ते केवळ चहावरच होते. परंतु ३ फेब्रुवारी-पासून चहाहि सोडला. कारण डॉक्टर चहांतून औषधें देत असल्याचा त्यांना संशय आला. ते केवळ पाण्यावर राहूं लागले. साऱ्या देशभर चिंतेचें वातावरण निर्माण झालें. सावरकरांनी या निर्धारापासून परावृत्त व्हावें म्हणून अनेकांनी पराकाष्ठेचा प्रयत्न करून पाहिला. परंतु या क्रांतिपुत्राचा अंतिम योगसमाधि घेण्याचा निर्णय कायम होता. दिल्लीहून त्यांची कन्या सौ. प्रभात आली व तिने तात्यांनी चहा व औषधें घ्यावींत असा प्रेमळ हट्ट धरला. परंतु सावरकरांचें विरक्त मन हें आग्रह मानण्याच्या किती तरी पुढे गेलें होतें.

उपोषण सुरू केल्यामुळे त्यांच्या घशाला सूज आली. म्हणून ६ फेब्रुवारी रोजीं त्यांनी थोडें पाणी घेतलें. सूज थोडीशी कमी झाली. ९ फेब्रुवारी-पासून पायावरहि सूज येऊं लागली. त्या दिवशीं पुन्हा त्यांनी पाणी घेतलें व त्यामुळे पायावरची सूज ओसरली. त्यानंतर हळूहळू पोटांत चमका निघूं लागल्या. त्यांनी पुन्हा थोडें पाणी घेतलें. डॉक्टर येत होते. प्रकृति तपाशीत होते. औषध घेण्याविषयी विनंती करीत होते. परंतु सावरकर कोणाचेंहि ऐकावयास तयार नव्हते. ते पूर्णपणें शुद्धीवर होते. दररोजचीं वर्तमानपत्रें वाचून घेत. दि. रा. मंकेकर यांचें Pakistan cut to size हें पुस्तकहि मधून मधून वाचून

घेत. शरीर थकत चाललें होतें, पण मनाची तरतरी कायम होती. १७ फेब्रुवारी-पासून बोलतां येईनासें झालें. शक्ति कणाकणाने नाहीशी होत होती. तोंडांतून बाहेर पडणारे शब्द इतके हळू असत की, शुश्रुषा करणाऱ्याला त्यांचा चटकन् बोध होत नसे.

रँग्लर र. पु. परांजपे यांचा १७ फेब्रुवारीला ९१ वा वाढदिवस होता. ते सावरकरांचे गुरु होते. सावरकरांनी गुरुजींना लिहिलें, " आपली जगण्याची इच्छा आहे व म्हणून आपल्याला दीर्घायुरारोग्य लाभावें अशी मी प्रार्थना करतों. "

१८ फेब्रुवारीला सावरकरांचा अशक्तपणा बराच वाढला. ठिकठिकाणांहून प्रकृतीची चौकशी करणारे टेलिफोन येत होते. दुसऱ्या दिवशीं रात्रीं नऊ वाजतां डॉ. आर. व्ही. साठे यांनी प्रकृति तपासली. प्रकृति तपासतांना डॉक्टर आपल्याला औषध देत नाहीत ना याकडे सावरकराचें लक्ष होतें. डॉक्टरहि आश्चर्यचकित होत. कधी हाताला नाडी लागे कधी नाही. सावरकरांनी बाल-पणापासूनच ध्यानधारणेचा व योगशास्त्राचा अभ्यास केला होता. अंदमानच्या विजनवासांत तर या योगशास्त्रानेच त्यांना शारीरिक आणि मानसिक सामर्थ्य पुरविलें. आताहि ते योगशास्त्राचेंच प्रात्यक्षिक करीत होते.

२० फेब्रुवारीला आपलें निधन होईल असें सावरकरांना वाटत होतें. त्या दिवशीं त्यांची प्रकृति चिंताजनक झाली होती ही गोष्टहि खरी. त्यामुळे डॉ. पुरंदरे यांनी कॉरॅमाइन दिलें व त्यामुळे प्रकृतींत पुन्हा जराशी सुधारणा झाली. दुसऱ्या दिवशीं एकदम जाग आल्यानंतर डॉक्टरांनी काल आपल्याला औषध दिल्याचें सावरकरांच्या ध्यानांत आलें. त्यांनी डॉक्टरांना आपल्या खोलींत येण्याची मनाई केली. रात्री डॉ. साठे आले आणि म्हणाले, " तुमच्या परवानगीवांचून आम्ही तुम्हांला यापुढे औषध देणार नाही. " डॉ. साठ्यांच्या आश्वासनावर सावरकरांचा विश्वास होता. यापुढे केवळ डॉ. साठे यांनीच आपली प्रकृति तपासावी असें त्यांनी सांगितलें.

२२ तारखेपासून सावरकरांनी पाणीहि वर्ज्य केलें. त्याच दिवशीं केंद्रीय गृहमंत्री श्री. गुलझारीलाल नंदा यांनी सावरकरांवर औषधोपचार करण्यासाठी एक हजार रुपयांचा चेक धाडला. त्या पैशाचा स्वीकार करण्यास सावर-करांनी मान्यता दिली. इतकेंच नव्हे तर, पैसे घेऊन आलेल्या अधिकाऱ्याला

“ नंदा यांना आमचे आभार कळव ” असें त्यांनी सांगितलें. मृत्यु अगदी समीप आला असतांनाहि सावरकरांची बौद्धिक शक्ति किती दक्ष होती हें यावरून दिसून येतें.

२३ फेब्रुवारीचा दिवस. औषध घेण्यास नकार. पाण्याच्या घोटाबरोबर झोपेची गोळी घेतली. मंकेकरांच्या पुस्तकांतील कांही भाग वाचून घेतला. नेहमीप्रमाणे सकाळीं दहा वाजतां न्हावी आला. त्याच्याकडून दाढी करून घेतली. रात्री डॉ. साठे येऊन गेले. घसा आणि जीभ कोरडी पडल्याचें त्यांना आढळलें. नाडीचा वेग मंदावला होता. २४ फेब्रुवारीला आपल्या वैयक्तिक चिटणीसांना बोलावून घेऊन सावरकरांनी त्यांचा निरोप घेतला. त्यानंतर त्यांनी कोणालाहि आपल्या खोलींत येऊं दिलें नाही.

२६ फेब्रुवारीचा दिवस उजाडला. सकाळीं साडेआठ वाजतां सावरकरांना जाग आली. परिचारिकेने तोंड धुतलें. पण तेवढे श्रमहि सावरकरांना सहन होईनात. मुलगा, मुलगी, सून, नातवंडें पलंगाभोवतीं सचिंत नजरेने उभीं होतीं. तात्यांचे हाल त्यांना पाहवत नव्हते. पण त्याहि अवस्थेंत सावरकर शांत होते. दहा वाजल्यापासून नाडी सापडेनाशी झाली. डॉक्टरी उपायांची पराकाष्ठा सुरू झाली. छातीला मालिश करून कृत्रिम श्वासोच्छ्वास सुरू ठेवण्याचा प्रयत्न झाला.

घड्याळांत अकरा वाजून दहा मिनिटें झालीं आणि इकडे गेलीं सत्तर वर्षें आपल्या शक्तीचा प्रत्येक बिंदु देशसेवेसाठी व्यतीत करणाऱ्या सावरकरांनी योगसमाधि घेतली. हिंदुराष्ट्राचा हा अपराजित सेनानी पंचत्वांत विलीन झाला.

दुपारीं साडेचार वाजतां सावरकरांचा पार्थिव देह दर्शनासाठी तळमजल्यावरच्या खोलींत ठेवण्यांत आला. सावरकर-सदनाभोवतीं दुःखित अंतःकरणाने नागरिक जमूं लागले, आपोआप रांग तयार झाली आणि जो तो भक्तिभावाने आंत जाऊन त्या पार्थिव शरीरावर फूल ना फुलाची पाकळी वाहूं लागला. दुसऱ्या दिवशीं दुपारीं तीन वाजता अंत्ययात्रा निघाली. पन्नास हजारांहून अधिक नागरिक तींत सहभागी झाले होते. चंदनवाडीपर्यंत पोचावयास सात वाजून गेले होते. तेथेहि आपल्या या अलौकिक नेत्याचें अंत्यदर्शन घेण्यासाठी हजारो नागरिकांनी दाटीवाटी केली होती. सावरकरांचा देह ट्रकवरून उचलून

चंदनवाडींतील विद्युत्‌दाहिनींत ठेवण्यांत आला. बाहेरच्या बाजूला ‘ सागरा प्राण तळमळला ’ या गीताचे करुण आलाप कानांवर येत होते. क्षणांत विद्युत्‌दाहिनीवरील चिमणींतून धुराची तिरीप बाहेर पडली. दबलेल्या हिंदुराष्ट्राची किंकाळी अनंतांत विलीन झाली.

भारताच्या स्वातंत्र्येतिहासांतील सावरकरांचें स्थान कोणतें ? त्यांच्या-इतकी लोकोत्तर बुद्धि, त्यांच्याइतका मातृभूचरणीं उत्कट भक्तिभाव, त्यांच्या-इतका अनन्यसाधारण त्याग आदि गुणांचा आढळ अन्यत्र कोठे झाला काय ? सावरकरांचे विजिगीषु तत्त्वज्ञान या समाजाने आत्मसात केलें असतें तर देशाचें भवितव्य बदललें असतें काय ? सावरकरांनी जें कांही सांगितलें त्यांत यत्किंचितहि चूक नसतांना या समाजाला त्यांचें नेतृत्व कां उमगलें नाही ? मनांत गोंधळ उडवून टाकणाऱ्या प्रश्नांचें उत्तर आज तरी देतां येण्यासारखें नाही. उद्याचा इतिहासच त्याचें खरेंखुरें उत्तर देऊं शकेल.

परंतु सावरकर पाहण्याचें आणि ऐकण्याचें भाग्य लाभलेली आजची पिढी, कविश्री ग. दि. माडगूळकर यांच्या शब्दांत एवढें मात्र खचित म्हणेल –

आकाशाहुन विशाल भासे त्याचें व्यक्तित्व
कर्पुरसे जो जाळी अपुलें अवघें कर्तृत्व
चिरंजीव या हौतात्म्याचा विजयी अभिमान
इतिहासाविण कुणी करावा याचा सन्मान

मराठी
१६५६७

REFBK 0016674

REFBK-0016674